मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/३२२/अपील क्रमांक ६६४३/२०११/०२
क्रमांक-मुमाआ/५०६९२/अपील क्रमांक ६७००/२०११/०२

१)श्री. नंदकुमार माधवराव धुमाळ,
पोलीस अधि.वसाहत, खो.क.७, १ला मजला,
पोद्दार आंतरराष्ट्रीय स्कूल व विद्युत कार्यालयाजवळ,
एस.व्ही. रोड, सांताक्रुझ(प.), मुंबई-५४. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय,मुंबई,क्रॉफर्ड मार्केट समोर,
डी.एन.रोड, मुंबई-४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय,मुंबई,क्रॉफर्ड मार्केट समोर,
डी.एन.रोड, मुंबई-४०० ००१. ...... उत्तरवादी

२)श्री.देवाप्पा अण्णाप्पा गावडे,
अवर सचिव,वित्त विभाग(अल्प बचत),
नवीन प्रशासन भवन,८वा मजला, मुंबई-४०००३२. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(प्रशासन),
वित्त विभाग/प्रशासन-२,
मंत्रालय, मुंबई-३२.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
वित्त विभाग/प्रशासन-२,
मंत्रालय, मुंबई-३२. ...... उत्तरवादी

द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.०६.२०१०, ३०.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११,१८.५.२०११

अपिल क्र.६६४३-अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिल क्र.६७००-अपिलकर्ता,जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

# निर्णय

अपिल क्र.६६४३/०२ मध्ये अपिलकर्ता श्री.धुमाळ यांनी दि.६.५.२०१० रोजी(१२.५.२०१०) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय,मुंबई यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतली-

१)पो.नि.नंदकुमार धुमाळ हे गुन्हे शाखेत कार्यरत असतांना दि.१.४.२००७ ते दि.५.९.२००७ या कालावधीमध्ये त्यांच्या गोपनीय अहवालात लिहिण्यात आलेले प्रतिकूल गोपनीय शेरे त्यांना मा. सह पोलीस आयुक्त(प्रशासन),बृहन्मुंबई यांनी त्यांचे दि.१२.३.०९ चे ज्ञापनाद्वारे दि.१६.३.०९ रोजी कळविले होते हे बरोबर आहे काय?

२) उपरोक्त शे-यामुळे व्यथित होऊन पो.नि.धुमाळ यांनी दि.९.५.०९ चे अभिवेदन मा.पोलीस आयुक्त, कक्ष-१, गोपनीय शाखा यांना मुदतीत सादर केले होते हे बरोबर आहे काय?

३)या अभिवेदनावरुन प्रतिवदेन अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.चंदनशिवे,आ.गु.शा आणि पुनर्विलोकन अधिकारी पोलीस उप अयुक्त डॉ.श्री.उगले (आ.गु.शा.) यांचेकडून अहवाल मागविण्यात आले होते काय?

४)सहाय्यक पोलीस आयुक्त चंदनशिवे,आ.गु.शा.आणि पोलीस उप आयुक्त डॉ.श्री.उगले यांनी मा.पोलीस आयुक्त, मुंबई यांना या प्रकरणी अहवाल सादर केले आहेत काय? असल्यास त्या अहवालाच्या प्रती पो.नि.धुमाळ यांना पुरविण्यात याव्यात.

५)या प्रकरणी संबंधित गोपनीय शाखेचे संस्करण अधिकारी यांनी वेळोवेळी वरिष्ठांना सादर केलेल्या टिप्पणीची प्रत पो.नि.धुमाळ यांना पुरविण्यात यावी.

६)पो.नि.धुमाळ यांनी मा.पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांनी प्रतिकूल शेरे काढून टाकण्याबाबत दिलले दि.९.५.०९ चे अभिवेदनाची सद्यस्थिती काय आहे याची पो.नि.धुमाळ यांना माहिती देण्यात यावी.

२. सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२८.५.२०१० रोजी त्यांच्या माहितीच्या संदर्भात मुद्देनिहाय पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.१५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१५.६.२०१० रोजी देण्यात आला असून शासकीय माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती/दिलेले उत्तर योग्य आहे या कारणास्तव अपील निकाली काढण्यात आले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपिल क्र.६७७०/०२ मध्ये अपीलकर्त्यांनी दि.८.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी/अवर सचिव प्रशा.-२ वित्त विभाग यांचेकडे गोपनीय अहवाल कालावधी सन २००६-०७ ते २००९-१०

१)श्री.दे.आ.गावडे, अवर सचिव यांचे उक्त कालावधीतील वित्त विभाग सर्व प्रमाणपत्रांसह गोपनीय अहवालाच्या झेरॉक्स प्रती

२) सन २००९-२०१० या वर्षातील दि.२५.१.२००९ ते दि.३१.३.२०१० या कालावधीतील गोपनीय अहवालांचे संस्करण केलेल्या व घेतलेल्या निर्णयाचे संबंधित नस्तीमधील सर्व टिप्पणी विभाग, पत्रव्यवहार विभाग,निर्देशपत्रासह छायांकित प्रती.

३) दि.२५.११.२००९ ते दि.३१.३.२०१० या कालावधीत ephemoval Roll(कच्चे टिपण) ठेवले असल्यास त्याच्या प्रती

माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदर अर्जाचे अनुषंगाने दि.६.१०.२०१० रोजी कलम ८(१)(जे) अनुसार माहिती देता येत नाही असे कळविल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दि.७.१०.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपील फेटाळण्यात आले असल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपिलकर्ता श्री.धुमाळ यांनी आयोगाकडे युक्तीवाद करतांना तसेच द्वितीय अपीलामध्ये लेखी कारण दिलेले आहे त्यात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांना शास्ती करावी अशी विनंती केली आहे. तसेच गोपनीय शाखेने रु.१००००/- नुकसान भरपाई द्यावी अशीही मागणी केली आहे. तोंडी युक्तीवाद करतांना त्यांनी असे सांगितले की, त्यांनी गोपनीय अहवालाच्या संदभात जी माहिती मागीतली आहे ती त्यांचे गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे योग्य नसल्यामुळे व पुनर्विलोकन अधिकारी यांनी कोणतेही उत्तर दिलेले नसल्यामुळे किंवा त्याबाबत कोणताही निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी सदरची माहिती मागीतलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता श्री.नंदकुमार धुमाळ यांनी मागीतलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने मुद्दा क्र.४ व ५ अन्वये त्यांच्या स्वतःच्या गोपनीय अहवालाच्या अनुषंगाने करण्यात आलेला पत्रव्यवहार व संस्करण अधिकारी यांनी वेळोवेळी वरिष्ठांना सादर केलेल्या टिप्पण्यांच्या प्रतींची केलेली मागणी उघड करण्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित नसल्याने तसेच सदर माहिती ही उघड केल्यास संबंधीत शासकीय कर्मचारी व गोपनीय अहवाल लिहिणारे अधिकारी व त्यासंबंधी कार्यवाही करणारे अधिकारी यांच्यामध्ये नाहक कटुता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तसेच संबंधितांमधील विश्वासाला तडा जाण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने मुद्दा क्र.४ व ५ बाबतची माहिती अधिनियमाच्या कलम ८(१)(ञ)मधील तरतुदीच्या अनुषंगाने ज्या सरकारी,कार्मिक,लोक शिकायत तथा पेन्शन मंत्रालय(कार्मिक और प्रशिक्षण विभाग) यांचे परिपत्रक क्र.१०/२०/२००६/आई.आर. दि.२१.९.२००७ च्या अनुषंगाने नाकारण्यात आलेली आहे. तसेही कोणतेही व्यापक जन हित नसल्यामुळे भविष्यामध्ये गोपनीय अहवाल जर प्रकट केले तर संस्करण अधिकारी हे गोपनीय अहवाल वस्तुनिष्ठ लिहिण्यास धजावणार नाहीत व ती एक औपचारिकता राहील. त्यावर अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, एखाद्या अधिका-याने आकसाने जर गोपनीय अहवाल प्रतिकूल लिहिलेले असतील तर त्याबाबत निवेदन केल्यानंतर योग्य तो निर्णय देणे आवश्यक होते परंतु त्या निवेदनावरसुध्दा कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी ही माहिती मागीतलेली आहे.

५.	अपीलकर्ता श्री.गावडे यांनीसुध्दा त्यांचे गोपनीय अहवाल कारण नसतांना प्रतिकूल दिलेले असल्याने व ephemeral roll ठेवले असल्यास त्याची कारणे त्यांना कळवणे आवश्यक असल्याने गोपनीय अहवाल,प्रतिवेदन व पर्नविलोकन अधिका-यांनी दिलेल्या टिप्पण्या इ. मिळणेचा हक्क आहे व ते नाकारता येणार नाही असा आयोगापुढे युक्तीवाद केला.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या अपील क्र.७८२१/अपील क्र.२००८/२३४५/०२ मधील निर्णयाचा आधार घेतलेला आहे.

६.	शासकीय कर्मचारी/अधिकारी हे सार्वजनिक सेवक आहेत. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३११ प्रमाणे शासकीय कर्मचारी किंवा अधिकारी यांना त्यांच्या सेवेच्या संदर्भात संरक्षण देण्यात आलेले आहे. त्यामुळे कोणत्याही अधिका-यास/कर्मचा-यास त्याच्याविरध्द असलेल्या आरोपांच्या संदर्भात वाजवी संधी दिल्याशिवाय तसेच चौकशी केल्याशिवाय शासकीय सेवेतून बडतर्फ किंवा निलंबित करता येत नाही व त्यामुळे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या संदर्भात त्यांच्या सेवेच्या प्रत्येक वर्षी त्यांचे योग्य मुल्य मापन होण्याच्यादृष्टीने वरिष्ठ अधिका-यांनी गोपनीय अहवाल लिहिण्याची  तरतूद संबंधीत नियमांमध्ये करण्यात आली आहे. गोपनीय अहवाल लिहिण्याची तरतूद जर नसेल तर अर्थातच कोणत्याही शासकीय कर्मचा-याच्या कामकाजाचे मुल्यमापन होऊ शकणार नाही व सेवेत संरक्षण असल्यामुळे वरिष्ठांचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण असणार नाही. त्याकरीता शासकीय कर्मचारी/अधिकारी यांच्या कामकाजाचे मुल्यमापन करुन त्यांचे गोपनीय अहवाल कसे लिहावेत, जन करुन ठेवावेत व त्यांचे संस्करण करणे याबाबत सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक सीएफआर-१२९५/प्र.क्र.३६/९५/तेरा, दि.१ फेब्रुवारी,१९९६, परिपत्रक क्र.सीएफआर-१२०८/प्र.क्र.६०/२००८/तेरा, दि.२ जुलै,२००८व इतर अनुषंगिक शासन निर्णयांमधील सविस्तर तरतुदींन्वये शासनाने वेळोवेळी निदेश दिलेले आहेत.सदर शासन निर्णयामध्ये अशी तरतूद आहे की, ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालांची प्रतवारी '-ब' अथवा 'क' आहे, अशी प्रतवारी संबंधितांना लेखी कळवावी, तसेच ज्यांची पतवारी 'अ' आहे त्यांना तोंडी कळवावे व 'अ+' प्रतवारी संबंधितांना लेखी कळवावी. याचाच अर्थ ज्यांची प्रतवारी सामान्य आहे किंवा ज्यांचे काम,खराब नाही किंवा उत्कृष्ट अथवा अत्युत्कृष्ट नाही परंतु ज्या प्रतवारीमुळे त्यांच्या भविष्यकालीन सेवेमध्ये अडचणी उद्‌भवत नाहीत असे शेरे, संबंधितांना कळविण्याचे बंधन नाही. म्हणजेच गोपनीय अहवालातील प्रतवारी, संबंधित अधिकारी/कर्मचा-यांस घातक नसेल तर अशी प्रतवारी कळविण्याचे बंधन नाही.

७.	प्रचलित कार्यप्रणालीनुसार कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचा-यांचे सर्वसाधारण कामकाजाचे मुल्यमापन करुन दरवर्षी गोपनीय अहवाल लिहितात. सदरचे गोपनीय अहवाल हा त्या अधिकारी/कर्मचा-याच्या शासकीय सेवेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा अभिलेख आहे. गोपनीय अहवाल याचा अर्थ सदरचे मुल्यमापन गोपनीय आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा युक्तीवाद करतांना असे सांगितले की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा शर्ती, महाराष्ट्र नागरी सेवा नियम मधील अनेकविध तरतुदींस अधीन राहून नियमित केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने लिहिण्यात आलेले गोपनीय अहवाल हे

गोपनीयच ठेवणे कार्यालयाच्या हिताच्यादृष्टीने आवश्यक असते. अर्जदार अधिकारी/कर्मचारी कार्यालयाचाच भाग असल्यामुळे व ते कार्यालयात कार्यरत असल्यामुळे त्यांच्या वैयक्तिक बाबींसंबंधीची सदरच्या गोपनीय अहवालाच्या अथवा वर नमुद कार्यालयीन कामकाजाच्या निर्णयाच्या प्रतींची माहिती प्रकट केल्याने अर्जदाराच्या वैयक्तिक हिताचे संवर्धन होते, तथापि, संदर्भिय अधिनियमात वैयक्तिक हिताची माहिती प्रकट करणे बंधनकारक नाही. सदरचे अहवाल प्रकट केल्याने कोणतेही सार्वजनिक हित साध्य होत नाही. त्याचप्रमाणे अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवाशर्ती विषयक माहिती मागविणे यात सार्वजनिक लोकहित दिसून येत नाही. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या उपरोक्त सेवाविषयक बाबी विशेषत: गोपनीय अहवालासंबंधी माहिती प्रकट केल्याने कार्यालयातील संबंधित कर्मचारी व गोपनीय अहवाल लिहिणारे अधिकारी यांच्या वैयक्तिक संबंधांमध्ये बाधा निर्माण होते व त्याचा परिणाम कार्यालयातील कामकाजावर होतो.कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींची माहिती प्रकट केल्याने संबंधित अधिकारी/कर्मचारी त्या व्यक्तिगत माहितीचा गैरवापर करुन वरिष्ठ अधिका-यांवर तक्रारीद्वारे दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये कोणतेही आम जनतेचे हित नसून, निव्वळ संबंधित अधिकारी/कर्मचारी त्यांचा व्यक्तिगत स्वार्थी हेतू साध्य करुन कार्यालयीन वातावरण बिघडवू शकतात आणि कार्यालयीन कामकाजामध्ये असहकार निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात.

८. संबंधित अधिनियमांतर्गत गोपनीय अहवालविषयक माहिती अधिकारी/कर्मचा-यांना देण्याची पध्दत प्रचलित झाल्यास, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणा-या प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिका-यांवर सर्वच अधिकारी/कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहितांना दडपण राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे तक्रार होईल या भितीपोटी अधिकारी/कर्मचा-यांच्या कामाचे योग्य ते मल्यमापन न हाता गोपनीय अहवाल लिहिले जातील. त्यामुळे गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या शासन निर्णय, परिपत्रकांचे अनुपालन होणार नाही आणि अनुपालन न झाल्याने त्यास संबंधित प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकारीच जबाबदार राहतील आणि कर्मचा-यांच्या नुकसानीस असे अधिकारी/कर्मचारी जबाबदार राहतील. गोपनीय अहवालासंबंधी माहिती उघड झाल्याने आणि कायालयातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या वा इतर कर्मचा-यांच्या गोपनीय अहवालांच्या प्रती किंवा कार्यालयीन पत्रव्यवहाराच्या प्रती देत राहिल्यास, कार्यालयीन कामांमध्ये अडथळे येण्याची शक्यता आहे व त्यातून अधिकारी/कर्मचा-यांची एकमेकांविरुध्दची मते कलुष्ति होण्याचे प्रकार वाढीस लागतील आणि त्यातून आपापसात वाद निर्माण होतील आणि त्याचा विपरित परिणाम कार्यालयीन कामकाजावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

९. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये जी माहिती 'गोपनीय असेल'(म्हणजे वर्जित प्रयोजनांमध्ये मोडत असेल) जी माहिती सार्वजनिक हिताला बाधक असेल, अथवा जी माहिती दिल्यामुळे दुस-या कोणाच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा संकोच होईल असे त्या माहिती अधिका-यास वाटले तर ती माहिती देणे त्याच्यावर बंधनकारक नाही.

१०.	वरील सर्व मुद्यांचा विचार करतांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींचा विचार करणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम ३ अन्वये सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार असेल अशी तरतूद आहे. परंतु अधिनियमाच्या प्रास्ताविकामध्ये "ज्याअर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच, शासनाचे कामकाज कार्यक्षमरीत्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे या बाबींनाही बाध येण्याची शक्यता आहे;

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शांची परमोच्चता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे;"

असे नमूद केले असल्यामुळे अधिनियमाच्या कलम ८(१) प्रमाणे या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नागरीकाला (क) ते (झ)प्रमाणे माहिती पुरविण्याचे आबंधन असणार नाही. याचा अर्थ माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद करण्यात आला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिलेले उत्तर भारत सरकारच्या दि.२१.९.२००७ रोजीच्या परिपत्रकाच्या आधारे दिलेले आहे व त्या परिपत्रकात अधिनियमाच्या कलम ८(१)(ञ)च्या तरतुदींचा उल्लेख केलेला आहे. सदर तरतुदींमध्ये 'जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोक हिताच्यादृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिति, जन माहिती अधिकारी किंवा अपील प्राधिका-यांची खात्री पटली असेल,ती खेरीज करुन, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधांशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगीबाबतीत विनाकारण हस्तक्षेप करेल, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती' प्रकट करता येणार नाही अशी तरतूद आहे. गोपनीय अहवालामध्ये शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची वर्तणूक, कार्यक्षमता,चारित्र्य यांच्या वस्तुस्थितीचे मुल्यमापन करणे अपेक्षित असते व त्यामुळेच सदरच्या अहवालास गोपनीय अहवाल असे म्हटले आहे. ऑफीशियल सिक्रेट्स ॲक्ट १९२३, माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींप्रमाणे संपूर्णपणे निरसित केलेले नाही. कलम ८(२)मध्ये सार्वजनिक प्राधिकरणाची माहिती प्रकट करण्यासंदर्भात व्यापक जन हित व वैयक्तिक हित यांचा विचार करुन जन माहिती अधिका-यास स्वेच्छाधिकार दिलेले आहेत व त्यावरुन तसेच प्रस्ताविकातील तरतुदींवरुन कार्यालयाची कार्यक्षमता जर टिकवून ठेवायची असेल तर काही संवेदनक्षम माहिती ही गोपनीय राखणे आवश्यक असते व गोपनीय अहवाल संवेदनक्षम अशी माहिती आहे. परंतु त्यातही सदरचे गोपनीय अहवाल प्रकट करण्यास व्यापक सार्वजनिक हित असल्यासच ते प्रकट करणे आवश्यक राहील. परंतु गोपनीय अहवाल संबंधित कर्मचा-यास प्रकट करणे यामध्ये कोणत्याही प्रकारचे व्यापक जन हीत आहे असे म्हणता येणार नाही. गोपनीय अहवालात प्रतिकुल शेरे असल्यास त्याविरुध्द निवेदन करण्याची तरतूद असल्यामुळे त्या निवेदनाच्या माध्यमातूनच त्या अधिका-यास किंवा कर्मचा-यास न्याय मिळवून घेता येतो. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने गोपनीय अहवालाच्या संदर्भात निर्णय देतांना गोपनीय अहवालाच्या संदर्भातील अंतिम शेरे(entries) उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे असा निर्णय दिलेला आहे. प्रतिवेदन अधिकारी किंवा पुर्नविलोकन अधिका-यांनी ज्या टिप्पण्या कर्मचा-याच्या संदर्भात

केलेल्या असतात Ephemeral Roll ठेवलेले असतात त्या उपलब्ध करुन द्याव्यात असे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात दिसून येत नाही. संविधानाच्या तरतुदींप्रमाणे शासकीय कर्मचारी व अधिकारी यांनी अनुच्छेद ३११ प्रमाणे त्यांच्या सेवे संदर्भात संरक्षण दिलेले असल्यामुळे जरी गोपनीय अहवालातील प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिका-यांचे अभिप्राय हे प्रकट केले तर भविष्यात प्रतिवेदन अधिकारी किंवा पुनर्विलोकन अधिकारी हे वस्तुनिष्ठ अहवाल लिहितीलच असे नाही त्यामुळे अधिकारी किंवा कर्मचारी यांचे संदर्भात कार्यालयीन शिस्त पाळण्याच्या संदर्भात किंवा कामकाजाच्या संदर्भात, कार्यक्षमतेच्या संदर्भात वरिष्ठ अधिका-यांचे कोणतेही नियंत्रण रहाणार नाही. वस्तुनिष्ठ अभिप्राय असल्यास त्यातून वाद व कटुताच निर्माण होईल व त्यामुळे शासनाचे काम कार्यक्षमरित्या चालण्याच्या संदर्भात संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे ही बाब कार्यक्षमतेशी निगडीत असल्याने प्रास्ताविकेत माहिती प्रकट करणे व संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे यात ताळमेळ राखणे आवश्यक असल्याने असे गोपनीय अहवालातील अभिप्राय प्रकट करण्याने कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक हित साधणार नसल्याने प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिका-यांचे अभिप्राय प्रकट करण्यास अधिनियमाचे कलम ८(१)(ञ)प्रमाणे अपवाद करणेच आवश्यक आहे. मात्र अपिलकर्ता श्री.धुमाळ यांनी जे निवेदन दिलेले आहे त्या निवेदनाचे संदर्भात झालेला निर्णय हा अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे अपिलकर्ता यांची दोनही अपीले निकाली काढण्यास पात्र आहेत.

**आदेश**

**१) अपील क्रमांक ६६४३/०२ व ६७००/०२ ही दोन्ही अपीले निकाली काढण्यांत येत आहेत.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ४.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/७६०/अपील क्रमांक ६६४०/२०११/०२**

**श्री. मोहम्मद इशाक अली,**
**६,मराठा मंदिर मार्ग, वडगामा हाऊस,**
**तळमजला, मुंबई सेंट्रल(पूर्व), मुंबई-४०० ००८. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**मध्य प्रादेशिक विभाग(परिमंडळ-३१),**
**बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड, भायखळा,मुंबई-४०००२७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**मध्य प्रादेशिक विभाग(परिमंडळ-३१),**
**बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड, भायखळा,मुंबई-४०००२७.**

**श्री.शहानवाज सरफराज खान,**
**२१, टेमकर स्ट्रीट,दुसरा माळा, रुम नं.५ व ६,**
**नागपाडा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १४.०१.२०११**
**सुनावणीचा दिनांक : ८.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२०.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, मध्य मुंबई, बावला कंपाऊंड,मुबई यांच्याकडे अर्ज करुन श्री.शहानवाज सरफराज खान यांचा पोलीस स्टेशनमध्ये गोडाऊन - ४३-४५ सत्तारवाला, मोरलँड रोड,मुंबई मध्ये कब्जा व भाडेकरु म्हणून दाखवण्यासाठी त्यांनी जी कागदपत्र दाखल केलेली आहेत त्यांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात, माहितीचा कालावधी १ फेब्रुवारी-२००९ ते अर्जाच्या तारखेपर्यंत, तसेच माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद करुन माहिती मागीतली आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२७.८.२०१० रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, नागपाडा पोलीस ठाणे यांनी माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांना कळविल्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती

असल्यामुळे व माहिती देण्यास अधिनियमाच्या कलम ११(१) अन्वये शहानवाज खान यांनी माहिती देण्यास नकार दिला असल्यामुळे सदरची माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.२०.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय २५.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, श्री.शहानवाज खान हे अपिलकर्ता यांच्या मालकीच्या गोडाऊनमध्ये भाडेकरु आहेत व तेथे त्यांचा कब्जा आहे अशाप्रकारची कागदपत्र सादर केलेली आहेत. परंतु शहानवाज खान हे फरारी असून त्यांचा सदरच्या गोडाऊन संदर्भात कोणत्याही प्रकारचा संबंध नाही व त्यामुळे सदरची माहिती त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये मागीतली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती त्रयस्थ पक्षाने गुन्हयाच्या तपासाच्या संदर्भात पोलीसांकडे दाखल केलेली असल्यामुळे व ती त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्रयस्थ पक्षास विचारणा करण्यात आली होती. परंतु त्रयस्थ पक्ष म्हणून श्री.शहनवाज सर्फराज खान यांनी शहनवाज सर्फराज खान नावाचे विद्युत बिल,महानगरपालिकेचा गुमास्ता परवाना,लाईट भाडे पावती,सी.टी.सिव्हील कोर्टातील ए.सी. सुट १५५०/०९ ची प्रत सादर करण्यात आली होती ती अपिलकर्ता यांना देण्यास त्यांची हरकत आहे. सदरच्या कागदपत्रांचा गैरवापर होऊ शकतो असे त्यांनी लेखी लिहून दिले असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही व प्रथम अपीलामध्येसुध्दा तोच निर्णय कायम ठेवण्यात आला होता. राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सुनावणीस आल्यानंतर त्रयस्थ पक्षाशी संबंधीत माहिती मागीतली असली तरी राज्य माहिती आयोगानुसुध्दा अधिनियमाच्या कलम १९(४) अन्वये त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे बंधनारक असल्यामुळे त्रयस्थ पक्ष श्री.शहनवाज सर्फराज खान यांना आयोगापुढे उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी ९ मे,२०११ रोजी नोटीस पाठवण्यात आली होती. आज दि.८.६.२०११ रोजी सदरचे अपील सुनावणीस ठेवण्यात आले होते. परंतु आज श्री.शहनवाज सर्फराज खान हे आयोगाच्या कार्यालयात उपस्थित नाहीत व त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा किंवा माहिती उपलब्ध करुन देऊ नये याकरीता हरकत घेतल्याचे सादर केलेले नाही व त्यामुळे नोटीसमध्ये म्हटल्याप्रमाणे सुनावणीसाठी आपण उपस्थित न राहिल्यास आपले म्हणणे काहीही नाही असे समजून उपलब्ध कागदपत्रांचा विचार करुन निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले असल्यामुळे श्री.शहनवाज सर्फराज खान यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे त्यांच्या जबाबावरुन वर्णन लक्षात घेता त्यांनी सार्वजनिक कागदपत्र दाखल केलेली आहेत असे दिसून यते. विद्युत बील किंवा गुमास्ता परवाना,लाईट भाडे पावती व सिटी सिव्हील कोर्टातील एस.सी. सुट १५५०/०९ ची प्रत हे सर्व सार्वजनिक अभिलेखे असल्यामुळे ते उपलब्ध करुन देण्यास कोणतीच हरकत असण्याचे कारण नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

<u>आदेश</u>

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.२०.८.२०१० च्या अर्जात मागीतलेली माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी व त्याची पोच घेण्यात यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक ९.५.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३८९/अपील क्रमांक ६७२२/२०१०/०२**

**श्री. यतीन एन. शहा,**
**नवीन नगर-१, टँक लेन,**
**अकबरअलीच्या मागे, म्यनिसिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ(प.), मंबई-४०००५४. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(निष्कासन) यांचे कार्यालय,**
**म्हाडा भवन, तळमजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपजिल्हाधिकारी(निष्कासन) यांचे कार्यालय,**
**म्हाडा भवन, तळमजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१०.१.२०१० रोजी त्यांनी दि.२८.२.०८ रोजी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती उपजिल्हाधिकारी(ENC) बांद्रा यांच्याकडे मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.६.२.२०१० रोजी मुद्दा क्र.१ मध्ये चंद्रा प्रभू जैन देरासर ट्रस्ट बांद्रा(प.) यांनी अनधिकृत पक्के बांधकाम केलेले आहे असे नमूद केले असून सदर बांधकाम हे दुरुस्तीचे असल्याने दुरुस्ती परवानगी बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून दिली जाते या कार्यालयाकडून दिली जात नाही.तसेच संबंधित स्ट्रक्चरबाबत आवश्यक त्या माहितीकरीता या

कार्यालयात आल्यास ती उपलब्ध करुन देता येइल असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२०.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.३.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.शशांक रॉय हे उपस्थित होते व त्यांना याबाबतच्या माहितीची संचिका अवलोकनार्थ दाखविण्यात आली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असूनसुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसते.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी आयोगापुढे जी तक्रार केलेली आहे त्या तक्रारीच्या संदर्भात तसेच माहितीच्या अर्जाच्या संदर्भात त्यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच त्यांचे प्रतिनिधी श्री.शशांक रॉय हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर होते व त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. श्री.शरद वसंत मदने याच्या तक्रारीबाबत आवश्यक ती संपूर्ण संचिका त्यांना दाखविण्यात आली तसेच त्यांना दि.३१.३.२०१० रोजी ही बाब कळविण्यात आली व दि.१४.४.०८ रोजी याबद्दलची माहितीही त्यांना देण्यात आली होती व त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामळे सदरचे अपील निकाली काढण्यात यावे अशी त्यांनी आयोगापुढे विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे केलेला युक्तीवाद व दाखल केलेली कागदपत्र यांचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.शशांक रॉय यांना तसेच अपिलकर्ता यांनादेखील माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ८.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३९४/अपील क्रमांक ६७२३/२०१०/०२**

**श्री. यतीन एन. शहा,**
**नवीन नगर-१, टँक लेन,**
**अकबरअलीच्या मागे, म्युनिसिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ(प.), मंबई-४०००५४. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/वेस्ट वार्ड,**
**मार्टीन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/वेस्ट वार्ड,**
**मार्टीन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक**
**सुनावणीचा दिनांक : ८.६.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.६.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर निर्धारक अधिकारी,एच/वेस्ट वार्ड,सेंट मार्टिन्स रोड,बांद्रा(प.) यांच्याकडे पत्र क्र.सहाय्यक करनिर्धारक व संकलक/बांद्रा एच(प.)/म.मा.अधिकार-५५५५/०९-१० यामध्ये नमूद केलेले Total १७८ Malmatta between the numbering from HW ३५०० to HW ३६०० च्या संदर्भात त्यांची नावे,संपूर्ण पत्ते इत्यादी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद कलेले दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१९.३.२०१० रोजी अर्जातील अ.क्र.१ व २ बाबत असे कळविण्यात आले की, आपण मागीतलेली १९६९ ते २००९ पर्यंतचे निरिक्षण उतारे व प्रथम करनिर्धारण दिनांक हे फक्त गेल्या १५ वर्षाचे उपलब्ध आहेत. १५ वर्षापूर्वीचा जुना अभिलेख जतन केला जात नाही. त्यामुळे १९९४-९५ ते २००८-०९ पर्यंतचे निरिक्षण उतारे रु.२३०/- शेडयुल फी(प्रति वर्ष प्रति मालमत्ता) भरुन मिळेल. म्हणजे रु.६,०७,२००(१७६ X २३० X १५ वर्ष = ६,०७,२००/- निरिक्षण उतारा) व रु.५७२७००(१६६X२३०X१५वर्ष = ५७२७००/- प्रथम करनिर्धारण दिनांक) एकूण रु.११,७९,९००/- असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.५.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.निरंक रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना परिपत्रकाची माहिती देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना परिपत्रकाची माहिती दि.८.६.२०१० रोजी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महानगरपालिकेकडून जी फी ठरविण्यात आली होती त्या फी प्रमाणे आकारणी केलेली असल्यामुळे तसे अपिलकर्ता यांना कळविण्यात आले होते. परंतु दि.१८.९.२०१० रोजी पूर्वीचे परिपत्रक रद्द करण्यात येऊन माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग यांना दि.२९.७.२०१० रोजी सुधारित शुल्क आकारणी संदर्भात जी मार्गदर्शक तत्वे लागू केलेली आहेत त्याप्रमाणे खर्चाची आकारणी करण्यात येईल व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविण्यात आले. असे असल्यास अपिलकर्ता यांनी मागीतलेली १७८ मालमत्तेच्या संदर्भात कर निर्धारणाच्या संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध असतील ती पृष्ठ संख्या X प्रति पृष्ठ रु.२ प्रमाणे परिपत्रकाची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच मुमाआ/नोंदणी क्र.२०११/७१/तक्रार २५/२०१०, मुमाआ/अपील क्र.६३३६/२०१०, मुमाआ/नोंदणी क्र.५०१४४/अपील ६३३६ मध्ये दि.३१.३.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे आकारणी करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दि.६.३.२०१० च्या अर्जातील १७८ मालमत्तेच्या संदर्भात कर निर्धारणाच्या संदर्भात जे कागदपत्र उपलब्ध असतील त्यांची पृष्ठ संख्या X २ या प्रमाणे व प्रमाणित करुन देण्याकरीताची फी याप्रमाणे दि.१८.९.२०१० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकाप्रमाणे तसेच मुमाआ/नोंदणी क्र.२०११/७१/तक्रार क्र.२५/२०१०, मुमाआ/अपील क्र.६३३६/२०१०, मुमाआ/नोंदणी क्र.५०१४४/ अपील ६३३६ मध्ये दि.३१.३.२०११ रोजी**

दिलेल्या निर्णयाप्रमाणे आकारणी करावी. खर्चाचा भरणे करणेबाबत कळवावे व परिपत्रकाची माहिती द्यावी व खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक ८.६.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३९९/अपील क्रमांक ६७२४/२०१०/०२**

**श्री. यतीन एन. शहा,**
**नवीन नगर-१, टँक लेन,**
**अकबरअलीच्या मागे, म्युनिसिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ(प.), मंबई-४०००५४. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री छत्रपती शिवाजी महाराज बिल्डिंग,**
**फोर्ट, मुबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी(मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री छत्रपती शिवाजी महाराज बिल्डिंग,**
**फोर्ट, मुबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक**
**सुनावणीचा दिनांक : ८.६.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी १७.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वार्ड ऑफीसर(इस्टेट्स) यांच्याकडे सांताक्रुझ परिसरात आत्तापर्यंत किती झोपडपट्टी धारकांना पर्यायी कायम स्वरुपी जागा दिल्या अशाप्रकारची एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमूद कले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.१७.३.२०१० रोजी माहितीच्या अधिकारामध्ये साहित्य स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देण्यात येत असून प्रश्नावली स्वरुपाची माहिती देण्यात येत नाही. त्यानुसार सनातन/लाडलीबाई चाळ/खोटवाडी येथील नस्ती स्वरुपाची कागदपत्रे या कार्यालयात उपलब्ध असून सदर कागदपत्रांची पडताळणी या कार्यालयात येऊन करावी. सदर पडताळणीकरीता प्रती तास रु.५/- व आवश्यक असलेल्या कागदपत्रांची प्रती प्रत २/-रु. कार्यालयीन शुल्क कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत भरुन घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. अपिलकर्ता यांचे यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.५.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२८.४.२०१० रोजी

अपिलकर्ता यांना कळविण्यात आला.परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत,उत्तरवादी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही प्रश्नोत्तराच्या स्वरुपातील आहे व अतिशय व्यापक प्रमाणात आहे. निश्चित अशी कोणत्याही मालमत्तेच्या संदर्भात किंवा झोपडपट्टीच्या संदर्भात त्यांनी माहिती मागीतलेली नाही व निश्चित असा कालावधीसुध्दा दिलेला नाही त्यामुळे जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे त्या माहितीच्या संदर्भात त्यांनी निरिक्षण करावे व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांना मुदतीत कळविण्यात आले होते. परंत त्यांनी निरिक्षण न करता प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता ती मोघम स्वरुपाची माहिती असून कोणताही निश्चित कालावधी दिलेला नसल्यामुळे ती अतिशय विस्तृत व व्यापक प्रमाणात आहे असे दिसते. यास्तव जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा योग्यरित्या कळविले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ८.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३८२/अपील क्रमांक ६७२१/२०१०/०२**

**श्री. अमित एन. शहा,**
**ए-५,ओम जय आराधना को.ऑप.हौ.सो.लि.,**
**एन.बी. रोड,सोमवारी बाजार,मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,**
**इमारत प्रस्ताव,प.ऊ.-२, महापालिका इमारत, सी विंग,**
**संस्कृती कॉंप्लेक्स,९० फूट डी.पी.रोड,सेंट लॉरेन्स शाळेजवळ,**
**कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्य.अभियंता,**
**इमारत प्रस्ताव,प.ऊ.-२, महापालिका इमारत, सी विंग,**
**संस्कृती कॉंप्लेक्स,९० फूट डी.पी.रोड,सेंट लॉरेन्स शाळेजवळ,**
**कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ८.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.४.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.व प्र.)(W/S),महानगरपालिका बिल्डिंग सी विंग, संस्कृती कॉंप्लेक्स,लॉरेन्स स्कुल जवळ,कांदिवली(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन Inspection of Complete Builing file C.T.S.No.८३४, Om Jai Aradhana C.H.S. Ltd., N.B.Road, Somwari Bazar, Malad(W), Mumbai-६४ च्या संदर्भात आयओडी, सीसी, ओसी, वगैरे बाबत

माहिती मागीतलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.१६.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव किंवा अभिलेख आढळून येत नाही असे कळविलेले दिसून येते.त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असा निष्कर्ष काढून माहितीचा अधिकार अधिनियम २००९ च्या तरतुदीप्रमाणे २० वर्षापर्यंतची माहिती मिळू शकते व मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात कोणताही प्रस्ताव किंवा कागदपत्र नाहीत असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या संस्थेकडे मालमत्ता पत्रक आहे. त्यावर नारायण द्वारकानाथ दाते वगैरेंच्या नावे सदरची मालमत्ता दाखविण्यात आलेली आहे. सदनिका धारकांकडून महानगरपालिका कर वसुल करते. नगर भूमापन नकाशाची प्रतही त्यांनी दाखल केली होती परंतु त्यांना माहिती उपलब्ध नाही असेच सांगण्यात आले व त्याबाबतही २० वर्षांपर्यंतची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे मिळते असा निष्कर्ष प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता यांनी काढलेला आहे. वास्तविक अशी कोणतीही तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम-०५ च्या अधिनियमात नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरची माहिती १९७३ची आहे व त्यांनी जो सीटीएस नंबर दिलेला आहे व जी कागदपत्र दिलेली आहेत त्यावरुन सर्वे विभागामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रे किंवा अभिलेखे त्या इमारतीच्या संदर्भात आढळून येत नाहीत. माहिती उपलब्ध असल्यास नाकारण्याचे काहीही कारण नाही. असे असले तर २० वर्षांच्या वरील माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात म्हटलेले आहे ते अधिनियमाच्या तरतुदींशी धरुन नाही. २० वर्षांवरील माहिती उपलब्ध करुन देता येत नाही अशी कोणतीही तरतूद अधिनियमात नाही. माहिती जोपर्यंत कायम स्वरुपाची असेल तर ती कितीही वर्षाची असली तरी उपलब्ध करुन द्यावी लागते. अधिनियमाच्या कलम ८(१) प्रमाणे माहिती प्रकट करण्यास अपवाद करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्या कलमामधील पोटकलम (१)च्या खंड(क)(ग) आणि (झ)च्या तरतुदींच्या अधीन राहून, म्हणजेच या तरतुदींप्रमाणे जर माहिती प्रकट करण्यास अपवाद केलेला असेल तर ती माहिती २० वर्षापर्यंत प्रकट करता येणार नाही. मात्र २० वर्षे झालेली असल्यास कोणतीही माहिती ही गोपनीय रहाणार नाही असा त्याचा अर्थ आहे.त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या तरतुदीचा चुकीचा अर्थ लावलेला आहे. असे असले तरी बृहन्मुंबईमध्ये इमारत उभी आहे, त्यात गाळेधारक आहेत, पाण्याची देयके देतात,मालमत्ता करसुध्दा देतात व त्या इमारतीच्या संदर्भात कोणत्या प्रकारची कागदपत्र इमारत व प्रस्ताव विभागात आढळून येत नाहीत हे अनाकलनीय आहे व याबाबत संपूर्ण चौकशी करणे अपरिहार्य आहे. त्यामुळे या तीनही विभागांच्या संपर्कातून चौकशी करुन

अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून मा.आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर इमारत सीटीएस नं.८३४, ओम जय आराधना को.ऑप.हौ.सो.लि.,एन.बी. रोड,सोमवारी बाजार, मालाड(प.), मुंबई-६४ च्या संदर्भात जर पाणीपुरवठा देयके वसुल केली जातात,मालमत्ता कर घेतला जातो तर या संदर्भातील इमारत बांधकामाच्या आयओडी,सीसी,ओसीच्या संदर्भात कारवाई झालेली आहे किंवा नाही याबद्दलची चौकशी करण्याचे आदेश देऊन त्यापमाणे माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**

**दिनांक ८.६.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/१३७३/अपील क्रमांक ६७४१/०२**
**क्रमांक-मुमाआ/१३७२/अपील क्रमांक ६७४२/०२**
**क्रमांक-मुमाआ/१३७५/अपील क्रमांक ६७४३/०२**
**क्रमांक-मुमाआ/१३७६/अपील क्रमांक ६७४४/०२**
**क्रमांक-मुमाआ/१३६७/अपील क्रमांक ६७४५/०२**
**क्रमांक-मुमाआ/१३६८/अपील क्रमांक ६७४६/०२**

**श्री. रमेश झाडे व इतर,**
**राष्ट्रीय गुणवत्ता मंच, २/७०४,श्री शाश्वत कॉंप्लेक्स,**
**प्लेझंट पार्क, मिरा रोड, जिल्हा-ठाणे-४०११०७.** ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**(अपील क्रमांक ६७४१ /अपील क्रमांक ६७४२)**
**प्रथम अपीलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार,**
**मुंबई विद्यापीठ, रुम नं.१०९, विद्यापीठ इमारत,**
**फोर्ट कॅंपस, एम.जी.रोड, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार(कॉनकोल सेक्शन),**
**मुंबई विद्यापीठ, रुम नं.१०९, विद्यापीठ इमारत,**
**फोर्ट कॅंपस, एम.जी.रोड, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार(पीआरओ),**
**मुंबई विद्यापीठ, रुम नं.१०९, विद्यापीठ इमारत,**
**फोर्ट कॅंपस, एम.जी.रोड, मुंबई-४०००३२.**

**(अपील क्रमांक ६७४३ /अपील क्रमांक ६७४४)**
**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, नाथीबाई ठाकरसी रोड,**
**चर्चगेट, मुंबई-४०००२०.**

**जन माहिती अधिकारी,**
**एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, नाथीबाई ठाकरसी रोड,**
**चर्चगेट, मुंबई-४०००२०.**

**(अपील क्रमांक ६७४५ /अपील क्रमांक ६७४६)**
**प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक, म.वि.वि.म.,**
**स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,**
**नांदेड.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव,**
**स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,**
**नांदेड.** ...... **उत्तरवादी**

## <u>निर्णय</u>

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १४.६.२०११**
**अपिल क्र.६७४१/६७४२-अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**
**अपिल क्र.६७४३/६७४४-अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित**
**अपिल क्र.६७४५/६७४६-अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी वरील सर्व अपीलांमध्ये अनुक्रमे २०.६.२०१०,२१.६.२०१०, २२.६.२०१०,२१.६.२०१०,२१.६.२०१०,२२.६.२०१० रोजी माहिती अधिकारी, मुंबई विद्यापीठ, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ व स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांच्याकडे अर्ज करुन

१)i)महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.संकिर्ण-२००९/(३२७/०९)/विशि-१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई दि.१७ मे,२०१० व ii)२००६ ते आजपावेतो १)विद्यापीठास पत्र प्राप्त झाले असल्यास त्याबाबतचा विभागाचा आवक नंबर(इनवर्ड नंबर) देण्यात यावा,

२)पत्र (दि.१७ मे,२०१०) मिळाल्यापासून पहिल्या १० दिवसात त्यावर केलेली कार्यवाही,शेरा, इत्यादी बाबी देण्यात याव्यात व ३)वरील पत्रावर कार्यवाही करणे आपल्या विभागावर/विद्यापीठावर बंधनकारक आहे काय किंवा कसे तसेच i)दि.११.७.२००९ पासून ते आजपर्यंत अधिव्याख्याता पदी निवड झालेले Ph.D. धारक सर्व उमेदवारांचे नॉन नेट-सेट निवड समिती अहवाल,ii) दि.११.७.२००९ ते आजपावेतो १)आपल्या विद्यापीठात तसेच आपल्या विद्यापीठा अंतर्गत येणा-या संलग्नीत महाविद्यालयांमध्ये दि.११.७.२००९ ते आजपर्यंत अधिव्याख्याता पदी निवड झालेले Ph.D. धारक(नॉन नेट-सेट) उमेदवारांचे निवड समिती अहवाल देण्यात यावे २)वरील क्रमांक १ मध्ये निवड न केलेल्या पण मुलाखत दिलेल्या/मुलाखतीला बोलविलेल्या उमेदवारांचे नाव,शैक्षणिक अर्हता यासह माहिती देण्यात यावी

३)वरील Ph.D.धारक उमेदवाराच्या Ph.D. या UGCच्या १ जून,२००९ च्या नियमानुसार तंतोतंत जुळतात काय किंवा कसे याची माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते.

३)i)दि.६ मार्च,२००७ ते ११ जुलै,२००९ दरम्यान निवड झालेल्या एम.फील/पीएच.डी. पण नेट/सेट नसलेल्या अधिव्याख्यातांना(आपल्या विद्यापीठातील तसेच संलग्न महाविद्यालयातील)किती उमेदवारांना कायमस्वरुपी/परिविक्षाधिन मान्यता(ॲप्रुव्हल) देण्यात आली व त्यामागे कोणता महाराष्ट्र शासन निर्णय आहे? माहिती, नाव, महाविद्यालयाचे नाव, मान्यता क्रमांक यानुसार देण्यात यावी. ii) १२.७.२००९ नंतर नियुक्त झालेले व आपण मान्यता दिलेल्या (नॉन-नेट/सेट)उमेदवारांची पीएच.डी.,युजीसी च्या १.६.२००९च्या नियमासोबत तंतोतंत जुळतात किंवा कसे माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी,मुंबई विद्यापीठ,जन माहिती अधिकारी एस.एन.डी.टी. विद्यापीठ व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांनी कोणत्याही प्रकारची माहिती ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी अनुक्रमे दि.१५.८.२०१०,२०.८.२०१०,२०.८.२०१०,२०.११.२०१०,१५,८,२०१०,२०.८.२१० रोजी प्रथम अपीले दाखल केली. प्रथम अपीलांचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी, मुंबई विद्यापीठ यांनी दि.१२.१०.२०१० रोजी दिला असून जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. प्रथम अपीलीय अधिकारी एस.एन.डी.टी.महाविद्यालय यांनी प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय दिलेला दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांनी दि.८.११.२०१० रोजी निर्णय दिलेला असून मागणी केल्यानुसार माहिती विद्यापीठात संग्रहित स्वरुपात उपलब्ध नसल्यामुळे माहिती अधिकारी यांनी सदर माहिती सर्व संलग्न महाविद्यालयांना अपिलार्थी यांना देण्याबाबत विद्यापीठाचे परिपत्रक दि.३१.७.२०१० अन्वये कळवून सदरच्या परिपत्रकाची प्रत अपिलार्थी यांना पाठविली असल्यामुळे प्राप्त परिस्थितीत माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याची कार्यवाही केलेली आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे ६ द्वितीय अपीले दाखल केली आहेत.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, नेट-सेट उमेदवारांना कोणत्याही महाविद्यालयामध्ये किंवा विद्यापीठामध्ये नियुक्ती दिली जात नाही तर पीएच.डी. धारकांना नियुक्ती दिली जाते. शासनाचे जे परिपत्रक आहे त्या परिपत्रकाची कोणतीही दखल घेतली जात नाही व त्यामुळेच ही माहिती सर्व विद्यापीठांकडून मागविण्यात आलेली आहे. मुंबई विद्यापीठाकडून त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती तर उपलब्ध झालेली नाहीच परंतु प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा अद्यापपर्यंत उपलबध करुन दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनीही कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार अद्यापपर्यंत केलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी,मुंबई विद्यापीठ यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध

करुन दिलेली नाही हे खरे आहे. परंतु जी माहिती उपलब्ध आहे ती अतिशय विस्तृत व व्यापक प्रमाणात उपलब्ध आहे त्यामुळे संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे हे सर्वस्वी अशक्य आहे.

जन माहिती अधिकारी एस.एन.डी.टी. महाविद्यालय हे आज सुनावणीस उपस्थित नाहीत परंतु त्यांनी दि.३१.५.२०११ रोजी आयोगाकडे लेखी खुलासा सादर केलेला आहे. वास्तविक आज सुनावणीच्यावेळेस जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. प्रथम अपीलीय अधिकारीसुध्दा उपस्थित राहिलेले नाहीत व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्र दाखल केलेली नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशामध्ये अपिलकर्ता यांचा माहितीचा अर्ज दि.१.७.२०१० रोजी प्राप्त झाल्यानंतर दि.२९.७.२०१० अन्वये माहिती तयार असल्याचे व संबंधित माहितीसाठी फी रु.५९०/- मात्र प्रति प्रत रु.२/- याप्रमाणे २९५ प्रतींसाठी विद्यापीठाचे कार्यालयात भरण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यानंतर अर्जदाराचे प्रथम अपील झाले त्यावेळेस सुध्दा पुन्हा माहितीपोटी रु.५९०/- मात्र विद्यापीठाकडे भरण्यासाठी कुरीअरने पत्र पाठवले होते. त्याची पोचपावती त्यांनी जोडलेली आहे. परंतु संबंधित रक्कम अर्जदाराने न भरल्यामुळे माहिती देण्यात आली नाही असे नमूद केले आहे. त्याकरीता त्यांनी दि.२९.७.२०१० व १७.९.२०१० रोजी पाठविलेल्या दोन्हीही पत्रांच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. त्यावरुन अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत कार्यवाही केलेली दिसून येते. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना कोणतेही पत्र अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही. मात्र कुरीअरसंदर्भात जे पत्र उपलब्ध झालेले आहे ते पत्र प्रथम अपील निर्णयानंतर उपलब्ध झालेले आहे. त्यामुळे सदरची माहिती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्याकडे संपूर्ण संकलीत केलेल्या स्वरुपात माहिती उपलब्ध नाही तर ३७० महाविद्यालये आहेत या सर्व महाविद्यालयांमध्ये ज्या नियुक्त्या झालेल्या आहेत त्या नियुक्तीच्या संदर्भात प्रत्येक महाविद्यालयाची माहिती तपासून माहिती उपलब्ध करुन द्यावी लागेली असती. परंतु माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला असता तर सार्वजनिक प्राधिकरणाची प्रशासकीय यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागली असती किंवा दैनंदिन कामकाज बाजूला ठेवून ती माहिती उपलब्ध करुन देणे शक्य झाले नसते म्हणून दि.३१.७.२०१० रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ यांना अपिलकर्ता यांचा अर्ज हस्तांतरीत करुन माहिती प्रत्येक महाविद्यलयाने उपलब्ध करुन द्यावी याकरीता कळविण्यात आले होते व तसे अपिलकर्ता यांनाही कळविण्यात आले होते. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे पत्र त्यांना मिळालेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पत्र पाठविल्याची जावक नोंदवहीतील नोंद या आयोगापुढे सादर केलेली आहे. त्यावरुन सदरचे पत्र त्यांना पाठविले असावे असे गृहित धरण्यास हरकत नाही. परंतु या सर्व माहितीच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, निवड समितीच्या संदर्भातील सर्व पत्रव्यवहार व नंतर मान्यतेस आलेला अहवाल हा विद्यापीठाकडे

उपलब्ध असतो व त्यामुळे विद्यापीठाप्रमाणेच ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे हे मान्य केले असल्यामुळे ती त्यांना देणे आवश्यक आहे.

माहिती ही ज्या सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असते व ती उपलब्ध आहे असे मान्य केल्यानंतर ती केवळ विस्तृत प्रमाणात आहे व त्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल वगैरे कारणे देता येणार नाहीत.जन माहिती अधिकारी, मुंबई विद्यापीठ यांनी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नसल्यामुळे त्यांनी संपूर्ण माहिती अपिलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.एस.एन.डी.टी.विद्यापीठाने विहित मुदतीत खर्चाचा भरणा करावे असे पत्र दिलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करुन त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांनी जरी प्राचार्य,सर्व संलग्न महाविद्यालये यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविलेले असले तरी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनीही दिलेले पत्र योग्य आहे असा निर्णय दिलेला असला तरी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे असे मान्य केले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी मागीतलेली सर्व माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता वरील सर्व अपीले मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आदेश

**१) अपील क्र.६७४१/०२ व ६७४२/०२ मान्य करण्यात येत असून जन माहिती अधिकारी,मुंबई विद्यापीठ यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२०.६.२०१० व २१.६.२०१० च्या अर्जांमध्ये मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) अपिल क्र.६७४३/०२ व ६७४४/०२ मान्य करण्यात येत असले तरी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने माहितीकरीता रु.५९०/- खर्चाचा भरणा करावा असे त्यांना विहित मुदतीत कळविलेले असल्यामुळे त्यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**३) अपिल क्र.६७४५/०२ व ६७४६/०२ मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२१.६.२०१० व २२.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची त्यांना नोंद घ्यावी.**

**४) सदर आदेशाची प्रत कुल सचिव,मुंबई विद्यापीठ, कुल सचिव,एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ व कुल सचिव,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**५) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक १४.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ाीर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०७२२/अपील क्रमांक ६७४८/०२**

**श्री.गोविंदप्रसाद आर.शर्मा,**
**ए-८/२२९, देव आशिष अपार्टमेंट, कॉलेज रोड,**
**धामणकर नाका, भिवंडी-४२१३०५ ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार,**
**रुम नं.१०७,१ ला मजला,**
**मुंबई विद्यापीठ, फोर्ट कँपस, फोर्ट, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार,मुंबई विद्यापीठ,**
**परिक्षा विभाग, एम.जे.फुले भवन,**
**विद्यानगरी, कालिना, सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-९८. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२५.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,मुंबई विद्यापीठ यांच्याकडे २८.४.२०१० रोजी ई-मेल ने केलेल्या तक्रारीच्या संदर्भात काय कार्यवाही केली अशी माहिती मागीतली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.६.७.२०१०

रोजी उप प्रबंधक यांनी त्यांची दि.२८.४.२०१० ची तक्रार प्राचार्य,भिवंडी निजामपूर नगरपालिका आर्ट्स,सायन्स आणि कॉमर्स कॉलेज,भिवंडी यांच्या अभिप्रायार्थ पाठविण्यात आली आहे तसेच अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२१.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत,जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी दि.२८.४.२०१० रोजी जी तक्रार केली होती ती भिवंडी निजामपूर नगरपालिका महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दि.१३.५.२०१० रोजी पाठविण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा दि.१९.६.२०१० रोजी त्यांना स्मरणपत्र पाठविण्यात आले होते व अपिलकर्ता यांनी माहितीचा अर्ज केल्यानंतरसुध्दा दि.१२.१०.२०१० रोजी प्राचार्य यांना त्या तक्रारीच्या संदर्भात त्यांनी अभिप्राय उपलब्ध करुन द्यावेत म्हणून कळविण्यात आले होते. परंतु अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारचे अभिप्राय उपलब्ध झालेले नसल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे मात्र अपिलकर्ता यांना वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीची माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तसेच प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपिलकर्ता हजर राहिलेले नसल्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय देता आलेला नाही असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. आजही अपिलकर्ता गैरहजर आहेत व त्यांनी त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर केलेले नाही. द्वितीय अपील मेमोमध्येसुध्दा त्यांनी कोणत्याही प्रकारचे विवेचन दिलेले नाही यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५.६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६६२/अपील क्रमांक ६७४७/०२**

**श्री.अशोक भाग्या जाबरे,**
**पारसनाथ के. दुबे, चाळ नं.१,**
**खो.क्र.६, पोटमाळा, मजासवाडी,ठाकूर नगर जवळ,**
**जोगेश्वरी(पूर्व), मुंबई-४०००६०. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार ठाणे,**
**तहसिलदार कार्यालय, ठाणे विभाग,**
**ठाणे(पश्चिम).**

**जन माहिती अधिकारी तथा तलाठी, कोलशेत,**
**तहसिलदार कार्यालय, ठाणे विभाग,**
**ठाणे(पश्चिम). ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.३०.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,तलाठी सजा कोलशेत,तहसिलदार कार्यालय.ठाणे(प.) यांच्याकडे गाव कोलशेत(ठाणे) विभाग येथील जागा श्रीमती फुमा फ.पटेल हिचे नावे असून जागेचे वारसदार श्री.ॲस्पेंडियर जमशेद इराणी सदर प्रॉपर्टी कामासाठी अर्जदार १)श्री.प्रमोद भास्कर राणे २)श्री.अनंत मधुकर कांबळी ३)श्री.ठाणेकर ४)श्री.ॲस्पेंडीयर ज. इराणी यांनी अर्जान्वये माहिती मागीतली होती. तरी या सर्व अर्जांच्या प्रती मिळाव्यात इ. माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.२.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपिलकर्ता हजर राहिलेले नाहीत म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्जात नमूद केलेल्या व्यक्तींनी माहिती अर्ज केलेले असतील तर ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्जात नमूद केलेल्या व्यक्तींनी संबंधित कालावधीमध्ये कोणतेही माहितीचे अर्ज केलेले नाहीत व ही बाब अपिलकर्ता यांना वारंवार सांगितलेली आहे. अपिलकर्ता यांनी सुध्दा ही बाब मान्य केली आहे. तसेच अपिलकर्ता यांना लेखी उत्तरसुध्दा देण्यात आलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, वरील व्यक्ती सोडून चेऊलकर व इतर यांनी तसे अर्ज दिलेले असतील तर त्या अर्जांच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. त्यावर जन माहिती अधिकारनी यांनी आयोगाकडे असे सांगितले की, त्या व्यतिरिक्त त्यांनी नावे दिली तर त्या संदर्भात तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन दिली जाईल. परंतु अर्जात नमूद केलेल्या व्यक्तींनी संबंधीत कालावधीमध्ये म्हणजे १.१.२०१० ते ३१.३.२०१० पर्यंत माहिती मागीतलेली नाही व त्यामुळे ती माहिती देता आलेली नाही. यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५.६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७०७/अपील क्रमांक ६७५०/०२**

**श्री.फ्रान्सीस व्हिन्सेंट सोरेस,**
**सोरेस हाऊस,ग्राऊंड फ्लोअर, पटेल पाखाडी,**
**वर्सोवा, मुंबई-४०००६१ ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**(परिमंडळ-९),**
**हिल रोड,बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त(पश्चिम नियंत्रण कक्ष),**
**(परिमंडळ-९),**
**कार्टर रोड,बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २५.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**

**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.७.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्याकडे त्यांनी दि.२०.२.२०१० रोजी डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या संदर्भात काय कार्यवाही केली याबाबतची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३१.७.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.२३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती समाधानकारक दिलेली असल्यामुळे अपील फेटाळलेले आहे असा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्याविरुध्द चॅप्टर केस दाखल केलेली होती व त्यांनी सुध्दा टोनी पीटर व इतर यांच्या संदर्भात तक्रार दाखल केली होती. परंतु त्या तक्रारीप्रमाणे कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही म्हणून त्यांनी ही माहिती मागीतली होती. यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांची तक्रार ही माहितीचा अर्ज येईपर्यंत प्राप्त झालेली नव्हती. दि.२६.६.२०१० रोजी सिनिअर इन्सपेक्टर ऑफ पोलीस,वर्सोवा पोलीस स्टेशन यांनी अर्जदार यांनी २८.१.२०१० रोजी दिलेल्या जबाबानुसार टोनी पीटर व इतर ४ इसमांच्यावर सीआरपीएस-१४९ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे व त्या सर्व कारवाईची कागदपत्र अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५.६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६९३/अपील क्रमांक ६७४९/०२**

**श्री.अश्विन पी.परमार,**
**पाली परेरावाडी, १६वा व ३०वा रस्ता जंक्शन,**
**शिवसागर हॉटेलसमोर, बांद्रा(प.),**
**मुंबई-४०००५०. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**(परिमंडळ-९),**
**हिल रोड, बांद्रा(प.),मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**(परिमंडळ-९), कार्टर रोड,**
**बांद्रा(प.),मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१५.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,कार्टर रोड,बांद्रा(प.), यांच्याकडे एसआरए स्कीमच्या संदर्भात परेरावाडी,सीटीएस

नं.F/६५० व F/६५२ of १६th & ३०th Rd., बांद्रा(प.)च्या संदर्भात दि.७.१२.०९ रोजी १२ लोकांच्याविरुध्द FIR नं.४७४/२००९ मध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती ४ मुद्यांमध्ये मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२०.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.८.१२.२०१० रोजी दिलेला दिसून येतो. परंतु बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई येथे नोंदविलेल्या FIR No.४७४/२००९ च्या संदर्भात प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती मागीतली होती व समाधानकारक उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना सदर माहितीच्या संदर्भात माहितीचा अर्ज केल्यानंतर कार्यवाही करण्यात आलेली आहे असे आयोगापुढे सांगितले मात्र त्यावेळेस ही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जो अर्ज केला आहे त्या अर्जामध्ये गु.र.क्र. ४७४/०९ बाबत एफआयआर दाखल झालेला होता व या गुन्हयाचा तपास चालू असल्याने तसेच अर्जदार सदर गुन्हयातील फिर्यादि अथवा आरोपी नव्हते त्यामुळे अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती गुन्हयाच्या तपासावर परिणाम होऊ नये म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८(१)(ज) अन्वये माहिती नाकारण्यात आलेली होती. सदर गुन्हयातील तपासी अधिकारी यांनी सदर गुन्हयाचा तपास पूर्ण करुन एकूण १३ आरोपीतांविरुध्द मा.९वे न्यायालय,बांद्रा(पूर्व), मुंबई यांचे न्यायालयात दि.२९.१.२०११ रोजी दोषारोपपत्र सादर केलेले असून त्याची प्रत अर्जदार यांचे वडील व इतर स्थानिक रहिवाशी यांना मा.उच्च न्यायालयाचे आदेशाने देण्यात आलेली आहे. अपिलकर्ता यांनीसुध्दा सदर माहिती नंतर उपलब्ध झाली असे आयोगाकडे सांगितले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५.६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०७००/अपील क्रमांक ६७५२/२०११/०२**

**श्री. शिवप्रसाद यादव,**
**श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,**
**पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**मामलेदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**मामलेदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी,इमारत विभाग,पी(नॉर्थ),लिबर्टी गार्डन, मालाड(प.) यांच्याकडे अर्ज करुन मराठा बेकरी, मुरगन मेडीकल के पीछे, पोलीस चौकी के आगे गौतम बुद्ध रोड, वरलाई गाँव,ओरलेम चर्च मालाड(प.) च्या बांधकामाची माहिती तसेच भारत

बिल्डिंग मटेरियल दुकानाच्या समोर १५०० चौ.फूट रेड्डी कंपाऊंड मधील अनधिकृत बांधकामाबाबत दि.२१.८.२०१० रोजी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय उपलब्ध माहिती १० दिवसाच्या आत, अपिलार्थींना उचित शुल्क भरुन देण्यात यावी असा दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली आहे ती अनधिकृत बांधण्यात आलेल्या बांधकामाबाबतची माहिती आहे व त्या संदर्भात कार्यवाही केली आहे काय? याबद्दलची विचारणा त्यांनी केली आहे. परंतु त्याबद्दल कोणतीही माहिती त्यांना दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्र उपलब्ध असून १० दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असे जन माहिती अधिकारी यांनी कबूल करुनही व आदेश देऊनही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी आज सुनावणीस गैरहजर आहेत व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्र आयोगाकडे दाखल केलेली नाहीत त्यामुळे ते शास्तीस पात्र आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले असूनसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणूनही ते शास्तीस पात्र आहेत. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हे आदेश मिळाल्यापासून अपिलकर्ता यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द तक्रार आल्यास रु.२५,०००/- ची शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) द्वितीय अपीलाच्या सुनावणीस आयोगापुढे हजर न राहिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश देऊनसुध्दा कागदपत्र दाखल केलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत करावा. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश देण्यात येतील.**

**३)अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १५.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०७०३/अपील क्रमांक ६७५५/०२
क्रमांक-मुमाआ/५०७०१/अपील क्रमांक ६७५३/०२

श्री. शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप-प्रमुख अभियंता(इ.प्र.),
बृहन्मुंबई महानगरपालिका, उपप्रमुख अभियंता(इमारत प्रस्ताव)प.उ.-दोन,
महापालिका इमारत, सी विंग, संस्कृती कॉंप्लेक्स,९० फूट डी.पी.रोड,
सेंट लॉरेन्स शाळेजवळ, कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०१. (अपील क्र.६७५५)

जन माहिती अधिकारी तथा उप-अभियंता(इ.प्र.)पी विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका, उपप्रमुख अभियंता(इमारत प्रस्ताव)प.उ.-दोन,
महापालिका इमारत, सी विंग, संस्कृती कॉंप्लेक्स,९० फूट डी.पी.रोड,
सेंट लॉरेन्स शाळेजवळ, कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०१. (अपील क्र.६७५५)

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप-प्रमुख अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
स.व प. तरण तलावाजवळ, महात्मा गांधी छेद क्र.२, कांदिवली(प.),

**मुंबई-४०००६७.(अपील क्र.६७५३)**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**स.व प. तरण तलावाजवळ, महात्मा गांधी छेद क्र.२, कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७. (अपील क्र.६७५३,अपील क्र.६७५५) ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२८.७.२०१० रोजी दोन अर्जांच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी,इमारत विभाग,पी(नॉर्थ),लिबर्टी गार्डन,मालाड(प.) व आर(साऊथ),कांदिवली(प.) यांच्याकडे भ्रमण ध्वनी टॉवरच्या संदर्भात एकूण ११ मुद्यांबाबत माहिती मागीतलेली दिसून येते व आर/साऊथ, कांदिवली(प.) सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१६.८.२०१० व २०.८.२०१० रोजी मागीतलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात आहे व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणाची म्हणजेच त्यांच्या कार्यालयाची यंत्रणा दैनंदिन कामकाज बाजूला ठेवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही. तरीसुध्दा अपिलकर्ता यांनी विशिष्ट प्रकरणांची माहिती द्यावी किंवा अपिलकर्ता यांनी उपलब्ध असलेल्या अभिलेख्यांचे निरिक्षण करावे व त्यातून आवश्यक प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात व त्याकरीता त्यांनी प्रतींच्या संदर्भात खर्चाचा भरणा करणेबाबत कळविलेले आहे. परंतु त्यानंतर अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न करता व निरिक्षणही न घेता दि.१६.९.२०१० रोजी दोन प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१६.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे तसेच ते विहित मुदतीत दिलेले असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी हे गोडाऊनमध्ये घेऊन जातात व तेथील सर्वच नस्त्या निरिक्षणाकरीता देतात व त्यातून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे सांगतात. जन माहिती अधिकारी आज गैरहजर आहेत त्यामुळे अपिलकर्ता यांनी अर्जात मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता माहिती ही अमर्यादित व विस्तृत प्रमाणात आहे हे निश्चित आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन

घ्यावयाची झाल्यास ती २ प्रकारे उपलब्ध करुन घेता येईल-१) जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करावा हे विहित मुदतीत कळविलेले आहे परंतु संपूर्ण मागीतलेल्या माहितीची पृष्ठे किती होतील ते कळविलेले नाही. मात्र व्यापक प्रमाणात माहिती असल्यामुळे नेमकी पृष्ठ संख्या कळवून त्याप्रमाणे पृष्ठ संख्या कमी जास्त झाल्यास खर्च कमी जास्त करुन छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. २) अपिलकर्ता यांनी नस्त्यांचे निरिक्षण करावे व त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्याव्यात.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(ञ)प्रमाणे माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या केलेलीआहे. त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली माहिती ज्यामध्ये दस्तऐवज,अभिलेखे,कागदपत्र यांची तपासणी करणे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे. त्यामुळे जर माहिती निश्चित मागीतलेली असेल तर त्याबाबत एकूण पृष्ठ संख्या कळवल्यानंतर खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन घेता येते परंतु मोघम व अमर्याद कालावधीची माहिती मागीतलेली असेल तर निरिक्षण करणे आवश्यक असते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांची दोन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात अंदाजे किती पृष्ठ संख्या होईल त्याप्रमाणे प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे एकूण खर्चाचा आकडा व पृष्ठ संख्या कळवावी. सदर खर्चाचा भरणा केल्यानंतर अपिलकर्ता यांना पोस्टाचा खर्च घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास अपिलकर्ता यांना निरिक्षणाकरीता भ्रमण ध्वनी टॉवरच्या संदर्भातील नस्त्या निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात याव्यात व त्यातून अपिलकर्ता यांनी आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक १५.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०६९९/अपील क्रमांक ६७५१/२०११/०२

श्री. शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**मामलेदार वाडी,लिबर्टी गार्डन, मालाड(प.)**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**मामलेदार वाडी,लिबर्टी गार्डन, मालाड(प.)**
**मुंबई-४०००६४. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,इमारत विभाग, पी(नॉर्थ),मुंबई महानगरपालिका कार्यालय यांच्याकडे अर्ज करुन वर्तमानपत्रात आलेल्या बातमीच्या आधारे अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात एकूण १३ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२१.९.२०१० रोजी Regarding M.G.Masala, Gala No.१, Pathanwadi च्या संदर्भात माहिती उपलब्ध आहे व इतर मुद्यांबाबत माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून उपलब्ध माहिती १० दिवसाच्या आत अपिलार्थीना उचित शुल्क भरुन देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, वर्तमानपत्रात अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात जी माहिती प्रसिध्द झाली होती त्या माहितीच्या आधारे त्यांनी कार्यालयात माहिती मागीतली होती. परंतु सदर माहिती त्यांना मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी ज्या मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली आहे ती माहिती एम.जी.मसाला,गाळा नं.१,पठाणवाडी च्या व्यतिरिक्त कोणत्याही मुद्यांची माहिती या कार्यालयात अभिलेख्यांच्या स्वरुपात उपलब्ध नाही व त्याकरीता २१.९.२०१० रोजी माहितीचे शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांना कळविण्यात आले होते. सदरचे पत्र मिळाल्याचे अपिलकर्ता यांनी मान्य केले परंतु माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेल्यानंतर ती

माहिती उपलब्ध होत नाही किंवा माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही किंवा सुरक्षा रक्षक कार्यालयात सोडत नाहीत या कारणास्तव त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करणेबाबत अपिलकर्ता यांना कळविले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. मात्र त्याकरीता अपिलकर्ता यांना एकूण पृष्ठे किती आहेत व प्रति पृष्ठ २/-प्रमाणे एकूण किती खर्च येतो ही बाब कळविणे आवश्यक होते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना कळविण्यात यावे व त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करुन अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत एकूण पृष्ठ संख्या व प्रति पृष्ठ रु.२/- याप्रमाणे किती खर्च येईल ते अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये कळविण्यात यावे व खर्चाचा भरणा केल्यानंतर अपिलकर्ता यांच्याकडून पोस्टाचा खर्च घेऊन त्यांना छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना सदर आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक १५.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७०२/अपील क्रमांक ६७५४/०२**

**श्री. शिवप्रसाद यादव,**

**श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,**
**पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१.** ..... **अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**स.व प. तरण तलावाजवळ,महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२,**
**कांदिवली(प.), मुंबई-४०००६७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**स.व प. तरण तलावाजवळ,महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२,**
**कांदिवली(प.), मुंबई-४०००६७.** ...... **उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.५.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,इमारत व कारखाने विभाग, आर(द.) विभाग,कांदिवली(प.) यांच्याकडे अर्ज करुन दुकानांच्याबाहेर मोकळया व्हरांडयावर अतिक्रमण करुन शटर ग्रील लावून दुकाने बंदिस्त केल्याच्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२७.८.२०१० रोजी उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२०.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.१९.१०.२०१० रोजी देण्यात आला असून श्री.सी.के. आंबेडकर, जन माहिती अधिकारी व दुय्यम अभियंता(इ.व का.) आर/द यांनी अपिलकाराने मागीतलेल्या माहितीबाबत काय कारवाई करण्यात आली आहे त्याच्या प्रती अपिलकारास विनामुल्य देण्यात याव्यात. सहा.अभि.(इ.व का.) यांच्याशी संबंधित विषय सहा.अभियंता(इ.व का.) हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडे प्रत पाठविण्यात यावी व तसे उत्तर अपिलकारास देण्यात यावे. रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत वरिष्ठ निरिक्षक(अनुज्ञापन) हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांना एक प्रत देण्यात यावी व त्या खात्याशी संबंधित बाबींचे उत्तर

अपिलकारास देण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. मात्र त्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली आहे त्या माहितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध नाही असे जन माहितीअधिकारी यांनी कळविले आहे. तसेच त्यांच्या कार्यालयाने दुकानदारांना कोणत्याही प्रकारच्या परवानग्या दिलेल्या नाहीत त्यामुळे ती माहिती उपलब्ध नाही परंतु त्यांच्याविरुध्द कारवाई सुरु करण्यात आलेली आहे असे कळविले आहे. परंतु त्याबद्दलसुध्दा काहीही माहिती त्यांनी दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले असूनसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की,अपिलकर्ता यांनी दुकानदारांनी अनधिकृतरित्या दुकानाबाहेरील भाग बंद केलेला असेल तर त्याबाबतची माहिती मागीतलेली आहे परंतु महानगरपालिका अशाप्रकारे परवानगी देत नसल्यामुळे त्याबद्दलची माहिती कार्यालयात उपलब्ध नसते. परंतु तक्रार आल्यास त्या तक्रारीच्या संदर्भात कारवाई मात्र केली जाते. असे असल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी याबाबत कार्यालयातील अभिलेख्यांच्या संदर्भात माहिती घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक असते. परंतु तशी माहिती न घेता त्यांनी हवी असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहेत. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील कामकाजाबद्दल काहीही माहिती नाही असे दिसून येते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानंतर आपणास हवी असलेली माहिती आपण कार्यालयात येऊन विनामुल्य प्राप्त करुन घेऊ शकता असे पुन्हा दि.२७.१०.२०१० रोजी अपिलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. यावरुन पुन्हा जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ. व का.) आर(द.) विभाग यांच्याकडे माहिती उपलब्ध असूनसुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील यास्तव अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हे आदेश मिळाल्या पासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.५.८.२०१० च्या अर्जाप्रमाणे मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास व जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द तक्रार आल्यास त्यांच्याविरुध्द रु.२५,०००/-ची शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १५.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील क्रमांक-मुमाआ/५०७१२/अपील क्रमांक ६७५७/०२**

**श्री. जगदिश विश्वनाथ सावंत,**
**सहयाद्री अपार्टमेंट सोसायटी,ई १/६,**

**अे-९, सेक्टर-१४,**
**नविन पनवेल, पिन-४१०२०६. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२) पूर्व उपनगरे, मुंबई,**
**कक्ष क्र.२०१, कोकण भवन,**
**२रा मजला, नवी मुंबई-४००६१४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक(एस विभाग),**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२) पूर्व उपनगरे, मुंबई,**
**कक्ष क्र.२०१, कोकण भवन,**
**२रा मजला, नवी मुंबई-४००६१४. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १६.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.७.७.२०१० रोजी सहाय्यक उपनिबंधक,सहकारी संस्था एस विभाग, कोकण भवन यांच्याकडे अर्ज करुन त्यांच्या दि.३१.१०.०९,७.१२.०९,८.२.२०१०,१२.४.२०१० या तारखांना केलेल्या अर्जांच्या संदर्भात काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.१८.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि.१३.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांच्या अर्जास शासकीय माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर दि.७.८.२०१० ची प्रत अपिलकर्ता यांना त्वरित उपलब्ध करुन द्यावी व अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करुन त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती एक महिन्यात उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपल दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी दि.७.७.२०१० रोजी त्यांना माहिती दिली असे जे सांगितले ते चुकीचे आहे. त्यांना दि.७.८.१०

रोजीचे पत्र U.P.C. ने मिळालेले आहे. सदरचे पत्र ७.७.२०१० रोजी पाठविण्यात आलेले नाही. यावरुन त्यांच्या माहितीच्या दि.७.७.२०१० च्या अर्जाप्रमाणे ३० दिवसाच्या आत कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दि.७.७.२०१० रोजीच पत्र पाठविले होते परंतु जावक नोंदवहीची तपासणी केली असता असे दिसून येते की, जावक नोंदवहीमध्ये अतिरिक्त जागेवर त्याबाबतची नोंद करण्यात आलेली आहे व पत्र मुदतीत पाठविलेले आहे असे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. यावरुन अपिलकर्ता यांचे म्हणणे योग्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे युक्तीवाद करतांना असेही सांगितले की, त्यांच्या अर्जावर दि.९.३.२०१० रोजी कारवाई केलेली आहे. चेअरमन,सचिव,कॉम्पटन ग्रीव्हज एम्प्लॉईज को.ऑप.क्रे.सो.लि.,कांजूर मार्ग(पूर्व) यांच्या संदर्भात ती तक्रार होती व त्या तक्रारीच्या संदर्भात दि.९.३.२०१० रोजी त्यांना पत्र पाठविले होते. परंतु संबंधित को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीकडून कोणतेही उत्तर त्यावेळेस प्राप्त झाले नव्हते. आतामात्र त्यांच्याकडून उत्तर प्राप्त झालेले आहे. असे असल्यास अपिलकर्ता यांना माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

एकूणच कागदपत्रांचे अवलोकन केले असता दि.७.७.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती देण्याचे पत्र त्याच दिवशी देण्यात आले आहे हे दाखविण्याचा जो प्रयत्न आयोगापुढे करण्यात आला आहे व जावक नोंदवहीमध्ये त्याची जशी नोंद घेतलेली आहे ते सर्वस्वी चुकीचे आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयातसुध्दा दि.७.८.२०१० असाच उल्लेख करण्यात आलेला आहे व त्यामुळे दि.७.७.२०१० रोजी असे पत्र पाठविले गेले नाही हे निश्चित आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे अशाप्रकारे अर्जदाराची दिशाभूल करणे व आयोगाची सुध्दा दिशाभूल करणे याबाबत योग्य ती चौकशी होऊन संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता यांच्या दि.७.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत पत्र दिल्याचे जे दाखविण्यात आले आहे त्याबद्दल उपनिबंधक,सहकारी संस्था यांनी योग्य ती चौकशी करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १६.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७१६/अपील क्रमांक ६७५९/२०११/०२**

**श्री. जितेंद्र पसाड,**
**बायो टेक्नो लॅब, २८८/९० डॉ.सी.एच.स्ट्रीट,**
**कार्टर हाऊस समोर, धोबीतलाव, मरीन लाईन्स,**

**मुंबई-२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था(३), मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९, तळ मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(पी विभाग),**
**३१५, ए-१ बिल्डिंग, वडाळा ट्रक टर्मिनल,**
**वडाळा, मुंबई-४०००३७. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १६.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन जनविकास को.ऑप.हौ.सो.संदर्भात From A file I want the following zerox copies from your records- १) Zerox copy of last page of anyone promoter’s agreement where both are signed.(only one)
२) Zerox copy of Power of Attorney of Prabha
३) Zerox copy of member’s list
४) Zerox copy of O.C.which was received from BMC
५)Zerox copy of police complaint/FIR,if file is not traceable or stolen
अशी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.४.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(III) यांनी दि.१६.११.२०१० रोजी दिलेला असून उपनिबंधक,सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई यांनी अर्जदाराला जनविकास को.ऑप.हौ.सो.लि. या संस्थेची अ धारिका तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी तसेच आवश्यकता वाटल्यास अ-

धारिकेतील कागदपत्रांच्या सत्यप्रती पुरवाव्यात असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्या आदेशांच्या प्रमाणेसुध्दा संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली ती त्यांना अपूर्ण मिळालेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली ती जनविकास को-ऑपरेटीव्ह हौ.सो.लि.यांच्याकडे मागीतली होती व प्रथम अपील मात्र त्यांनी उपनिबंधक,सहकारी संस्था यांच्याकडे केले. त्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरच त्यांना दि.२३.९.२०१० च्या पत्रान्वये अ धारिकेतील कागदपत्र आवश्यक त्या फीचा भरणा करुन या कार्यालयात समक्ष येऊन प्राप्त करुन घ्यावीत असे कळविलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अ-धारिकेतील कागदपत्रांच्या सत्यप्रती पुरविण्याबाबत आदेश दिले होते. या संदर्भात आयोगाचेसुध्दा द्वितीय अपील क्र.६३९३/१० यामध्ये माहिती देण्याचे आदेश झालेले आहेत. त्यानंतर अपिलकर्ता यांना दि.२३.२.२०११ रोजी कागदपत्रांची तपासणी दिली असून माहितीच्या अधिकारा अंतर्गत अर्जातील मुद्यांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे व तसा अहवाल आयोगाकडे दि.७.३.२०११ रोजी पाठविण्यात आला होता. त्याचप्रमाणे दि.२८.२.२०११ चे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ८९(अ) अन्वये दिलेल्या आदेशान्वये दि.१५.३.२०११ रोजी दफतर तपासणी लावण्यात आली होती व त्यास अनुसरुन कागदपत्र दिल्याबाबत सदर दिवशीचा रोजनामा केलेला आहे. दफतर तपासणीच्यावेळी अर्जदार हे सभासद नसून संस्थेच्या रेकॉर्डप्रमाणे सदनिका क्र.१/९ ही त्यांच्या वडिलांच्या नावावर असल्याचे दिसून आले आहे. याबाबत अर्जदार यांना विचारणा केली असता त्यांनी गीफ्ट डीड नोंदणीकृत केलेले नसल्याचे नमूद केले आहे. सदर गीफ्ट डीडची नोंदणी न केल्याने संस्था त्यांना सभासद करुन घेण्यास तयार नाही. त्यामुळे ते वेगवेगळया प्राधिकरणाकडे तक्रार करीत आहेत. यावरुन अपिलकर्ता यांना आत्तापर्यंत सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष आयोगास काढावा लागतो. असे असले तरी अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती अपूर्ण मिळालेलीआहे. त्याकरीता त्यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अ धारिकांची तपासणी द्यावी व त्यातून त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १६.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७१३/अपील क्रमांक ६७५८/०२**

**श्री. वासुदेव डी.पिळगांवकर,**
**राम-नाथ प्रसाद, १८वा रस्ता,**
**खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पी/उत्तर विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालीका आयुक्त पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालीका आयुक्त पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १६.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन त्यांच्याविरुध्द दि.२७.१.२०१० रोजी सहाय्यक अभियंता यांनी कलम ३५४ प्रमाणे नोटीस नं . ACPN/BF-३२/३५४/२६४/०९-१० ही कशाच्या आधारावर काढण्यात आली याबद्दलची कागदपत्र त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मागणी केलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१४.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२६.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती दिलेली असून अपिलात तथ्य रहात नाही अपील निकाली काढण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु मिळालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली होती ती त्यांच्याविरुध्द दि.१७.६.२०१० रोजी जी नोटीस इश्यू केलेली होती त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु त्यांनी दि.२७.१.२०१० रोजी जी नोटीस इश्यु केलेली आहे ती नोटीस कशाच्या आधारावर इश्यु केलेली आहे त्याबद्दलची माहिती मागीतलेली आहे व ती माहिती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात अभिलेख्यांची तपासणी करावी व आवश्यक तो खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविण्यात आले होते,व त्याप्रमाणे त्यांना माहितीसुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु पुन्हा अपिलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध झाली ती त्यांनी मागीतलेली माहिती नव्हती. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२३.२.२०१० च्या अर्जात सहाय्यक अभियंता पी/एन वार्ड, मालाड(प.), मुंबई यांनी कलम ३५४ प्रमाणे नोटीस नं. ACPN/BF-३२/३५४/२६४/०९-१० दि.२७.१.२०१० च्या संदर्भात सदर नोटीस कोणत्या कागदपत्रांच्या आधारे काढण्यात आली आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १६.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७०६/अपील क्रमांक ६७५६/०२**

**श्री. एम.जी. गांधी,**
**ए/२, सिंधी नगर, सासमिरा मार्ग,**
**वरळी बस डेपोसमोर, मुंबई-४०००३०. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एन.एम.जोशी मार्ग, मुंबई-४०००१३.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एन.एम.जोशी मार्ग, मुंबई-४०००१३. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २७.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १६.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.५.२०१० रोजी(प्राप्त दि.२४.५.२०११) जन माहिती अधिकारी तथा वार्ड ऑफीसर जी/साऊथ वार्ड,बीएमसी,एन.एम.जोशी मार्ग यांच्याकडे संजय सुवर्णा यांच्या संदर्भात भाडेपट्टी जी बदलून देण्यात आलेली आहे ती कोणत्या कागदपत्रांच्या आधारे बदलून देण्यात आलेली आहे त्या कागदपत्रांच्या प्रती तसेच अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. त्या संदर्भात अपिलकर्ता यांना दि.२३.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.१७.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२०.१०.२०१० रोजी देण्यात आलेला आहे. तरीसुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या इमारतीमध्ये भाडेकरु म्हणून संजय सुवर्णा रहावयास आलेले आहेत परंतु ते मूळ भाडेकरु नाहीत व त्यांनी संजय सुवर्णा यांना भाडेकरु म्हणून रहावयास परवानगी दिलेली आहे त्याकरीता ही माहिती त्यांनी जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मागीतलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी उत्तर देतांना Shri Sanjay Suvarna has submitted required documents hence tenancy transferred to his name असे उत्तर दिलेले आहे. त्यानंतर पुन्हा प्रथम अपीलाच्या नंतर मात्र The documents produced by Shri Sanjay Suvarna at the time of transfer of V.L.T. under reference in his name cannot be furnished to you as the said file papers are not available in the office record असे कळविलेले दिसून येते. यावरुन ही दोन्हीही उत्तरे विसंगत आहेत अशी अपिलकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार केली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने जे प्रथम उत्तर दिलेले आहे ते उत्तर नोंदवहीमध्ये ज्या नोंदी आहेत त्यावरुन दिलेले आहे. परंतु त्या संदर्भातील कागदपत्रांची जेव्हा मागणी करण्यात आली त्यावेळेस अभिलेखागारात विचारणा करण्यात आली व अभिलेखाकाराने त्या संदर्भात कोणतीही कागदपत्र उपलब्ध नाहीत असे कळविले असल्यामुळे अपिलकर्ता यांना पुन्हा त्याप्रमाणे उत्तर देण्यात आले आहे. त्यामुळे ही दोन्हीही उत्तरे विसंगत नाहीत. सदरची बाब ही १९८१ ची आहे व अभिलेखागारामध्ये जर कागदपत्र नाहीत तर ती नोंदवहीत कशाच्या आधारावर नोंदी केल्या गेल्या आहेत ते आज सांगता येणार नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांना महानगरपालिकेच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्या माहितीच्या आधारावर त्यांनी योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे स्वतंत्रपणे तक्रार करणे संयुक्तिक राहील यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**

**दिनांक १६.६.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७४२/अपील क्रमांक ६७७७/०२**

**श्री. ओमप्रकाश पनवार,**
**रुम नं.डी-१-१-२,सेक्टर-६,**
**नेरुळ, नवी मुंबई-४००७०६. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे कार्यालय,**

**सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड,**
**सी.एस.टी.स्टेशनसमोर, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी, संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे कार्यालय,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड,**
**सी.एस.टी.स्टेशनसमोर, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.८.२०१० रोजी जन माहितीअधिकारी,सहाय्यक संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या कार्यालयामध्ये एम.बी.बी.एस. प्रवेश घेतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास उमेदवार असे लिहून देतो की, ९० दिवसाच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्र तो सादर करेल व तसे न केल्यास माझी ॲडमिशन रद्द होऊ शकेल याची मला कल्पना आहे, ही तरतूद एमएच-सीईटी -२००२(Rules and Regulations for Admission to M.B.B.S.)प्रॉस्पेक्टस मध्ये कोणत्या पृष्ठावर आहे अशाप्रकारची माहिती अपिलकर्ता यांनी मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.२३.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१३.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पूर्वीच्या अर्जान्वये कळविलेली आहे म्हणून उत्तर पाठविलेले नाही. अपिलकर्ता यांच्या अर्जामध्ये नव्याने कोणतीही माहिती मागीतल्याचे दिसून येत नाही. त्यानंतरही अपिलकर्ता यांना सुनावणीस हजर रहावे असे आदेश दिल्यानंतर दि.२.११.२०१० रोजी पुन्हा प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व त्यामध्ये अपिलकर्ता यांनी मागीतलेले प्रतिज्ञापत्र भवितव्यात नस्तीमध्ये आढळून आल्यास किंवा संस्थेकडे मिळाल्यास त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास द्यावी. प्रतिज्ञापत्राचा नमुना माहिती पुस्तिकेतील कोणत्या पानावर आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य वाटते. त्याचप्रमाणे जात पडताळणी समितीने कु.प्रियंका पनवार यांच्या जात पडताळणी पत्राबाबत या कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती १ आठवडयाच्या कालावधीत अपिलकर्त्यास उपलब्ध करुन देतील अशाप्रकारचे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले दिसतात व नियमाप्रमाणे दि.१२.११.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, वैद्यकीय संचालनालयाने जे नियम २००२ मध्ये प्रसिध्द केले आहेत त्या नियमांमध्ये एम.बी.बी.एस.प्रवेश नियमानुसार प्रवेश घेतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास उमेदवार असे लिहून देतो की, ९० दिवसाच्या आत जातपडताळणी प्रमापणपत्र सादर करेल व तसे न केल्यास माझी ॲडमिशन रद्द होऊ शकेल याची मला कल्पना आहे. ही तरतूद कोणत्या नियमात आहे, कोणत्या पृष्ठावर आहे ते त्यांनी माहितीच्या अधिकारात विचारले होते परंतु अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी याबाबतचे नियमातील पृष्ठ किंवा कोणत्या पृष्ठावर सदर माहिती उपलब्ध आहे ही माहिती त्यांना दिलेली नाही. तसेच जे हमीपत्र आहे त्या हमीपत्राचा नमुनासुध्दा कोणत्या पृष्ठावर आहे तेही त्यांना दिलेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी एमएच-सीईटी-२००२ रुल्स अँड रेग्युलेशन्स फॉर ॲडमिशन टू एमबीबीए प्रॉस्पेक्ट्सची जी प्रत दिलेली आहे त्या प्रतीमधील पृष्ठ क्र.३९ व ४० या २ पृष्ठांवर सदरची तरतूद आहे. व ती खालीलप्रमाणे आहे-

**Annexure -B Constitutional Reservations(BC) या भागामध्ये The candidate should have claimed the constitutional reservation in the original application form. The candidate claiming constitutional reservation must submit caste validity certificate at the time of counseling/interview, failing which the category claim will not be granted. In case candidate is not in a position to produce caste validity certificate he/she should submit the proof that his/her claim for procuring caste validity certificate is pending with the caste scrutiny committee at the time of counseling/interview. The admission will be given provisionally subject to the decision of the caste scrutiny committee about the caste validity within a period of १२ weeks from the date of admission** असे आयोगाच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे पुन्हा सांगितले की, असे हमीपत्र दाखल करुन घेतले जाते त्यामध्ये ९० दिवसात जर जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नाही तर प्रवेश रद्द केला जाईल असे नमूद केले आहे. त्यामुळे सध्या आहे ती तरतूद व त्यांनी विचारली आहे ती तरतूद यात विसंगती दिसून येते व त्यामुळेच त्यांनी तशाप्रकारची तरतूद आहे काय अशी विचारणा केली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पुन्हा असे सांगितले की, नियमात जी तरतूद आहे ती तरतूद त्यांनी दिलेली आहे व त्यावरुन जरी नियमातील तरतूद व प्रत्यक्ष हमीपत्रातील तरतूद यामध्ये विसंगती असल्यास त्याप्रमाणे सक्षम अधिकारी किंवा मा.न्यायालयापुढे अपिलकर्ता यांना योग्य तो युक्तीवाद करता येईल. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, या संदर्भात आयोगाने अपिल क्र.५३०८/०२ निकाली काढले असून अपील क्र.५१६३/०२ हे सुध्दा निकाली काढण्यात आले आहे. असे असूनसुध्दा अपिलकर्ता यांनी माहितीचा अर्ज केला व त्यात तीच माहिती मागीतलेली आहे.

माञ प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.२३.८.२०१० रोजीच्या अर्जात जी माहिती मागीतलेली आहे त्यापेक्षा आणखी मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात ते अनाकलनीय आहे. तसेच प्रवेशाच्यावेळी जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास मागासवर्गातील विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्यात येणा-या हमी पत्राची प्रत दि.२३.८.२०१० च्या अर्जात मागीतलेली नसून सुध्दा त्याबद्दलचा मुद्दा आयोगाकडे सादर केलेल्या खुलाशात करण्यात आला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सुध्दा अर्जदाराने अर्जात काय माहिती मागीतली आहे याचा विचार न करता निर्णय देत असतात. परंतु अपिलकर्ता यांना एमएच-सीईटी-२००२(रुल्स अँड रेग्युलेशन्स फॉर ॲडमिशन टू एम.बी.बी.एस.)प्रॉसपेक्ट्सची प्रत उपलब्ध करुन दिलेली असून त्याबाबत मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात पृ.क्र.३९-४० वर संबंधित नियम असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १८.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७४३/अपील क्रमांक ६७७९/०२**

**श्री. गणेश बाबूभाय वर्मा,**
**गंगावाडी शिवसेना शाखा क्र.२,**

**आनंद मंगल बिल्डिंगमागे, घाटकोपर(प.),**
**मुंबई-४०००८६.** ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**कार्यकारी अभियंता(विशेष)एन विभाग यांचे कार्यालय,**
**३रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**कार्यकारी अभियंता(विशेष)एन विभाग यांचे कार्यालय,**
**३रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७७.** ...... **उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.६.२०११**
**अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता परिरक्षण एन विभाग, जवाहर रोड, घाटकोपर(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन सौ.सरस्वती गजानन भोसले(नगरसेविका-घाटकोपर विभाग) यांनी निवडणूक जिंकल्यानंतर नगरसेवक निधीचा फंड देण्यात येतो त्याचा वापर कोणकोणत्या कामाकरीता करण्यात आला, तसेच त्या कालावधीमध्ये कोणत्या स्वरुपाची कामे त्यांच्याकडून करण्यात आली याची सविस्तर माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१७.८.२०१० रोजी लागणारी माहिती प्राप्त करण्यासाठी एकूण पृ.१८० X२= रु.३६० इतक्या रकमेचा भरणा करावा तसेच मुद्दा क्र.२ च्या माहितीसाठी एकूण ३० पृष्ठांसाठी प्रती पृष्ठ रु.२ प्रमाणे रु.६० इतक्या रकमेचा भरणा करावा असे कळविण्यात आले होते. परंतु अपिलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिला, माहितीसाठी चलन बनवून देण्यास नकार दिला म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७.९.२०१० रोजी देण्यात आला असून मागीतलेली माहिती सन २००२ पासूनची असल्यामुळे माहिती देण्यासाठी किमान १

महिन्याचा कालावधी आवश्यक आहे. सहाय्यक अभियंता(परिरक्षण)एन विभाग यांनी कार्यवाही करावी असे आदेश देण्यात आलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात खर्चाचा भरणा केला होता परंतु माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांना त्यांच्या २३.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेल्या माहितीकरीता १७.८.२०१० रोजी रु.३६०+६० इतक्या रकमेचा भरणा करावा असे कळविण्यात आले होते व ते विहित मुदतीत कळविले होते. परंतु अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न करता प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७.९.२०१० रोजी देण्यात आला असून त्यात १ महिन्याचा कालावधी आवश्यक आहे असे आदेश देण्यात आले. खर्चाचा भरणा सुध्दा रु.१८०/- इतका करण्यात आलेला आहे व त्यानंतर अपिलकर्ता माहिती घेण्यास आलेले नाहीत. त्याकरीता त्यांना दि.१.१०.२०१० रोजी स्मरणपत्रसुध्दा पाठविले होते. त्यावर अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ते माहिती घेण्यासाठी गेले होते परंतु माहिती दिलेली नाही. परंतु दाखल केलेली कागदपत्र व तोंडी युक्तीवादावरुन अपिलकर्ता किंवा त्यांचे प्रतिनिधी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती घेण्यास गेलेलेच नाहीत असे दिसून येते व खर्चाचा भरणा सुध्दा त्यांनी मागितल्याप्रमाणे केलेला नाही. त्यातही माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ७(३) अन्वये जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करण्याकरीता जर पत्र दिले असेल तर त्यापत्राच्या तारखेपासून खर्चाचा भरणा करेपर्यंतचा कालावधी हा ३० दिवसाच्या कालावधीमधून वगळण्यात येतो. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पत्र दिले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १८.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०७४४/अपील क्रमांक ६७७८/०२**

**श्री. विजय के. चौहान,**
**२ए, सन अँड सी अपार्टमेंट्स,**
**रॉयल लेन जवळ, जुहूतारा रोड, सांताक्रुज(प.),**
**मुंबई-४०००४९.** ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त प्रबंधक,**
**लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त कार्यालय,**
**नवीन प्रशासन भवन, १ला मजला,**
**मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.प्रबंधक,**
**लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त कार्यालय,**
**नवीन प्रशासन भवन, १ला मजला,**
**मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २३.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.६.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१४.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रबंधक,लोक-आयुक्त आणि उपलोक-आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई यांचेकडे दि.२८.४.२०१० रोजीच्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भात तसेच लोकआयुक्त कार्यालयात विधी विभाग आहे का?तसेच कक्ष अधिकारी श्री.एस.आर.चव्हाण यांच्या संदर्भात त्यांच्या सेवेसंदर्भातील माहिती तसेच मा. न्यायालयात दाद मागून घ्याव्या अशा किती केसेस दिल्यात? इत्यादी एकूण १४ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२९.९.२०१० रोजी मुद्देनिहाय मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात कळविण्यात आले असून माहितीची एकूण पृष्ठ संख्या १५ असून प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे छायांकन शुल्क एकूण रु.३०/- आकारण्यात येईल तसेच मुद्दा क्र.३ ते ६ व ९ ते १३ अन्वये मागीतलेली माहिती दि.४.१०.२०१० पर्यंत उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व संबंधित कक्ष अधिकारी व सहाय्यक प्रबंधक यांना दि.२०.९.२०१० रोजी आदेशित करण्यात आले होते. तथापि, आपण मागीतलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती उपलब्ध करुन देण्यासाठी दि.१५.१०.२०१० पर्यंत मुदतवाढ देण्याची सर्व कक्ष अधिकारी व सहाय्यक प्रबंधक यांनी दि.२७.९.२०१० रोजी विनंती केली आहे. त्यानुसार त्यांची विनंती मान्य करण्यात आली असून त्यांना दि.१५.१०.२०१० पर्यंत आपण मागीतलेली माहिती न चुकता उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. त्याबाबतचे संबंधित कक्ष अधिकारी व सहाय्यक प्रबंधक यांच्या निवेदनाची प्रत व त्यांना देण्यात आलेल्या आदेशाची प्रत आपणास यासोबत माहितीसाठी पुरविण्यात येत आहे. उपरोक्त माहिती प्राप्त झाल्यावर मुद्दा क्र.१४ च्या अनुषंगाने आपण मागितलेली कागदपत्रे पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील व

त्याबाबत आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांनी दि.१५.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२६.१०.२०१० रोजी देण्यात आला असून सदरचे अपील फेटाळण्यात आले आहे त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही तसेच त्यांचे प्रथम अपीलही फेटाळण्यात आले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती आहे. त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात जो निर्णय झाला होता त्या संदर्भात त्यांना तो निर्णय मान्य नसल्यामुळे त्यांनी लोकआयुक्त कार्यालयातील इतर निर्णयांबद्दल सुमारे १९७२ पासूनची माहिती मागीतली होती. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहितीचे निश्चित असे वर्णन करणे आवश्यक असते. परंतु त्यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती विस्तृत व व्यापक प्रमाणात व मोघम अशी माहिती आहे. तसेच ती माहिती मागीतलेल्या स्वरुपात संकलीत करण्यात आलेली नाही व संकलीत केलीही जात नाही. तरीसुध्दा कक्ष अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले होते व ते मुदतीतच दिले होते. जी माहिती उपलब्ध आहे त्या माहितीकरीता खर्चाचा भरणा करणेबाबत मुदतीत कळविण्यात आले होते. अपिलकर्ता यांनी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले असल्यामुळेच त्यांनी माहिती ही १५.१०.२०१० रोजी म्हणजे ३०व्या दिवशी उपलब्ध करुन देता येईल असे कळविले होते व त्या दिवशी त्यांनी प्रत्यक्ष येऊन,खर्चाचा भरणा करुन कळविल्यानुसार माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे न करता दि.१५.१०.२०१० रोजी ३० दिवसाची मुदत संपण्याच्या आतच प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज जरी दि.१४.९.२०१० रोजी दाखल केलेला असला तरी तो प्रत्यक्षात तो नंतर मिळालेला आहे व दिनांक १५.१०.२०१० रोजी प्रस्तुत न झाल्यामुळे त्यांनी दि.२१.१०.२०१० रोजी सविस्तर पत्र पुन्हा पाठवून वर कळविलेला खर्च रु.३० व नंतर जी माहिती उपलब्ध झाली त्या संदर्भातील रु.१३४ चा भरणा करावा असे कळविण्यात आले होते. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांनी कार्यालयात किंवा जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क न साधता प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केले. त्य संदर्भातील संपूर्ण रोजनामा कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे जे अपील केलेले आहे त्या द्वितीय अपील मेमोमध्ये जी कारणे दिलेली आहेत त्या कारणांचा व मागीतलेल्या माहितीचा काहीही संबंध नाही.

अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमोचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१४.९.२०१०च्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली किंवा नाही याबद्दल त्यांनी कोणताही उल्लेख केलेला नाही. परंतु द्वितीय अपील मेमोमध्ये असंबध्द असे १९७१चा कायदा हा अंमलबजावणी करण्यास असमर्थ झाला आहे तसेच भ्रष्टाचार, अनियमिततेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही वगैरेवगैरे अशाप्रकारे कारण दिलेले दिसून येते.

यावरुन अपिलकर्ता यांनी या आयोगापुढे युक्तीवाद करतांना माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा मा.लोक-आयुक्त कार्यालयाच्या संदर्भात सर्वसाधारण तक्रारी करण्याचाच युक्तीवाद केला. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा तक्रारी करणेच योग्य वाटते असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांना जे पत्र दिले त्या पत्राची प्रतसुध्दा अपिलकर्ता यांना आयोगाच्या निदर्शनास आणणे आवश्यक वाटले नाही व त्या पत्राचे अवलोकन केले असता त्या पत्रात अत्यंत स्वयंस्पष्टपणे सहाय्यक प्रबंधक तथा जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात तपशीलवार कळविलेले आहे. अर्जदार ज्यावेळी अर्जामध्ये माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करतात त्यावेळेस अर्जदाराने कमीत कमी ३०व्या दिवशी तरी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. जन माहिती अधिकारी यांनी जर त्या दिवशी माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर अर्जदाराने आक्षेप घेणारे पत्र जन माहिती अधिकारी यांना देऊन त्या पत्राची प्रत आयोगाकडे पुरावा म्हणून सादर करणे आवश्यक असते. अन्यथा माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करावयाचे मात्र ३० दिवसात माहिती घेण्यासाठी जायचेच नाही व त्यानंतरही माहिती घेण्यास टाळाटाळ करुन प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करायचे व त्यामध्ये असंबध्द असे आरोप जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विरुध्द करावयाचे याचा त्या कार्यालयास वेठीस धरण्या पलीकडे कोणताही दुसरा अर्थ असू शकत नाही. अपिलकर्ता यांचा दि.१४.९.२०१० चा अर्ज हा त्या कार्यालयात दि.१८.९.२०१० रोजी प्राप्त झाला असे दिसून येते. याचा अर्थ दि.१८.९.२०१० पासून ३० दिवस हे १७.१०.२०१० पर्यंत पूर्ण होतात व जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.१०.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देणार असे त्यांना स्पष्टपणे कळविलेले होते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती घेण्यासाठी कार्यालयात व्यक्तीशः हजर राहणे आवश्यक होते.

असे असले तरी अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती अतिशय मोघम व व्यापक स्वरुपाची आहे व त्यामुळे अशाप्रकारची माहिती ही संकलीत करण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्यास त्या प्रकारची माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नसल्यास त्या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(ज) प्रमाणे माहिती निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन देणे असा पर्याय आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कळविलेले असल्यामुळे ती माहिती त्यांनी खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेतली नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १८.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०४३८/अपील क्र.६७३०/०२**
**मुमाआ.नो.क्र.५०४३८-अ/अपील क्र.६७३१/०२**

**श्री. अनिल गोयल**
**एफ २०१/२०२, व्हिस्परींग पाम्स,**
**अेक्सक्लुझिव्ह, लोखंडवाला टाउनशिप,**
**आकुर्ली रोड, कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता, इ.प्र. (प.उ.) II**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, २ रा मजला, सी विंग, ९० फूट रोड,**
**सेंट लॉरेन्स हायस्कूल जवळ, संस्कृति कॉप्लेक्स,**
**ठाकूर कॉप्लेक्स, कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इ.प्र. (प.उ), आर विभाग,**
**म्युनिसिपल गोडाउन बिल्डींग, ९० फूट रोड,**
**सेंट लॉरेन्स हायस्कूल जवळ, संस्कृति कॉप्लेक्स,**
**ठाकूर कॉप्लेक्स, कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १८.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ०७.०६.२०११**
**जन माहिती अधिकारी व अपिलकर्ता उपस्थित.**

अपीलकर्ता यांनी अपील क्र.६७३०/०२ मध्ये दि.१२.०८.२०१० रोजी कार्यकारी अभियंता, इ. व प. (W.S.) R विभाग उप मुख्य अभियंता (BP) W.S. कार्यालय, कांदिवली, (पू) यांचेकडे इमारत क्र.९ बिल्डींग ऑन सिटीएस नं.१७१ measuring ११२४३.० sqm तसेच सिटीएस नं.१७१/२, १७१/१०,

१७१/१०/१ इत्यादी up to १९५-B/१ in respect of which development rights granted to "Lokhandwala Construction Industry Private Ltd" च्या संदर्भामध्ये सन १९८४ पासून डी सी आर मधील रेग्युलेशन ३५(५), ३४, ४३, ५(१), ५(३) (iii) (iv) यांच्या संदर्भामध्ये ते रेग्युलेशन ६(८) पर्यंत प्रत्येक रेग्युलेशन प्रमाणे काय काय कार्यवाही केली आहे ती संपूर्ण माहिती व्यक्तीश: घेणार तसेच "in addition, undersigned would also like to personally peruse all written correspondence and sanctions/ approvals wrt the above project in all related files held by your department" असे नमुद केलेले आहेत. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना ०१.०९.२०१० रोजी आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये आपण कार्यालयात येउन सर्व कागदपत्रांचे निरीक्षण करावे तसेच निरीक्षण केल्यानंतर आवश्यक त्या कागदपत्रांचे खर्चाचा भरणा करुन आपल्याला माहिती उपलब्ध होईल असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात म्हटले असुन सुध्दा नस्त्यांचे निरीक्षण केले नाही मात्र त्यांनी दि.१३.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.१५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दि.०१.०९.२०१० रोजी दिलेले उत्तर योग्य आहे तसेच अपिलकर्ता यांचे विनंती प्रमाणेच त्याच्या आरर्किटेक यांना निरीक्षण करण्याची परवानगी मान्य केली आहे व निरीक्षणा अंती आवश्यकती कागदपत्रे खर्चाचा भरणा भरुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. मात्र त्यामध्ये त्यांनी निरीक्षण केलेले आहे याबद्दल मान्य केले असले तरी त्यांच्या वास्तुशास्त्रज्ञानी एकच दिवस निरीक्षण घेतले व त्या गर्भारपणामुळे येउन शकत नसल्यामुळे व त्यांना स्वत: ला तांत्रिक बाबी कळत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण् माहिती त्यांना कागदपत्रांच्या स्वरुपात विना मुल्य उपलब्ध करुन द्यावी असे कारण दिलेले आहे.

२.अपिलकर्ता यांनी अपील क्रमांक ६७३१/०२ मध्ये दि.२५.०६.२०१० रोजी (०६.०७.२०१० प्राप्त) जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इमारत व प्रस्ताव) यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितली: -

(a) Copy of the Agreement between Lokjandwala and the Bombay Gowrakshak Mandli executed on 13 Dec, 1984 to wards the Development plan of the area.

(b) Copy of approval LCIPL submitted plot layout plan and its approval by BMC vide order No.CHE/132/LOR dt 20.02.1989.

(d) Copy of approval Building Plan with all necessary details in COLOUR copy.

(e) Copy of Commencement certificate of bldg no.9 with approval terms and conditions.

(f) Copy of Completion certificate of bldg no.9.

(g) Property Tax levied-Building and flat wise.

(h) Water tax levied-Building and flat wise.

(i) Sewage tax levied-Building and flat wise.

(j) Permissible FSL in the zone and FSI approval given originally to LCIPL.

(k) FSI sanctioned for building no.9 and breakdown of its actual utilization by promoter / builder in bldg no.9. Any TDR utilized by LCIPL, and if so the details thereof.

(l) Sanctioned height of the buildings and width of adjacent roads.

(m) Additional FSI sanctioned under relevant sec of DCR.

(n) TDR sanctioned for the project and details of utilization of the same.

(o) No of tenements sanctioned originally.

(p) Denial of 'Open Area' of 15-25% of plot area of 10000 sqm contrary to DCR. Plz explain how the statutory requirements of open/amenity spaces is met in respect of Bldg no.9.

(r) Open spaces on the sides / rear and compliance with DCR.

(s) Keeping lesser head space/height in staircase contrary to DCR.

(t) Providing adequate recreational and amenity areas/spaces as per DCR.

(u) Provision of office room space of 20 sqm per bldg as per DCR.

(v) Provision of letter boxes in each building as per DCR.

(w) Approval of basement is restricted to twice the building plinth or the plot area, whichever is less as per CHE/1983/DPC of 04.02.1992.

(x) Non-provisioning of mandatory fire escape signs LIFT and STAIR Case.

(y) Copies of necessary Fire deptt approval, based on which the final OC was issued.

(z) Details and layout of the REFUGE areas and utilization. Accessibility of fire tenders in case of an eventuality.

(aa) Sanctioned and approvals of Minimum open spaces to be provided and actually provided as per DCR.

(bb) Non-adherence to DCR on mandatory provisioning of parking spaces along with the flats (based on areas) and promoter/builder arbitrarily charging Rs.4 lakh per parking space and giving a receipt of only Rs.25000/- and that too forcing the buyers to pay stamp duty but refusing to register the same. Action planned against LCIPL for the same. (Mumbai High Court order no 2182 of 2007 refers.)

(cc) Non-conveyance of the complete including the club house to the registered societies and illegally continuing possession and charging adhoc and arbitrary and discriminatory charges from the legal occupants and owners.

(dd) Nature of supervision, approvals, sanctions, waivers and number and details of site visit conducted by Shri Umesh Vartak Licensed Architect vide no.V/106/LS from the time of issue of commencement certificate to Occupation certificate, and subsequently if nay.

(ee) Nature of supervision, approvals, sanctions, Waivers and number and details of site visits conducted by Shri UM Joshi Licensed structural engineer vide no.STR/J/26 from the time of issue of commencement certificate to Occupation certificate, and subsequently if any.

(ff) Nature of supervision, approvals, sanctions, Waivers and number and details of site visits conducted by Shri PM Deshmukh Licensed site supervisor vide no.D/274/SS-1 from the time of issue of commencement certificate to Occupation certificate, and subsequently if any.

(gg) Action contemplated fro all the alleged shortcomings in the individual flats and the building as committed by LCIPL.

(hh) Is the supervision and subsequent checks by officials of MCGM over, after issuing occupation certificates to LCIPL.

(ii) While the BMC has issued a letter to LCIPL to discontinue the Water Canal around the common club house due shortage of water in Mumbai and spread of diseases rains, etc, the said drain continues and is full of water now. This has led to danger of water borne disease spread besides depriving the members of extra floor are, had LCIPL filled up this canal. Contrary to VDR, LCIPL continues to control the club house and has not handed over the same to its rightful and legal owners-The flat purchasers. Action planned on the same may also be informed.

(jj) Against DCR laid down, statutory minimum height difference inside the FLAT; below any BEAMS between the floor and beam as 2.40m, in some place reduced to 2.10, only. How was the same overlooked during construction and action contemplated against LCIPL including compensation to affected parties. Similar discrepancy in the enclosed staircases.

अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती विहित विस्तृत व प्रश्नोत्तरांच्या व विविध विभागांशी संबंधित असल्याने दि.०२.०८.२०१० रोजी त्यांना कार्यालयांत उपस्थित होउन अभिलेखाची पहाणी करुन आवश्यक त्या कागदपत्रांचा खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसते. परंतु अर्जदाराने दि.२९.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दि.१४.१०.२०१० रोजी अर्जदाराचे वतीने वास्तुविशारद श्रीमती प्रतिक्षा फेटवाल यांनी कार्यालयनी अभिलेखांचे निरीक्षण केले परतु त्यांना वेळेअभावी निरीक्षण प्रक्रिया पूर्ण झाली नाही असे समजण्यांत आले व अर्जदार श्री.अनिल गोयल हे उप प्रमुख अभियंत्याची प्रत्यक्ष भेट घेतील असे लेखी नमूद केले त्यामुळे दि.२७.१०.२०१० रोजी प्रथम अपीलाच्या सुनावणीत पुन्हा निरीक्षण प्रक्रिया पूर्ण करुन माहिती देण्याचे आदेश देण्यांत आले. त्याप्रमाणे त्यांना दि.२८.१०.२०१० रोजी पत्राव्दारे कळविण्यांत आले परंतु त्यांना उर्वरित यादी अग्रेषित केलेली नसून सुध्दा राज्य माहिती आयोगाकडे ब्दितीय अपील दाखल केले आहे.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी सर्व नस्त्यामधुन ती काढून द्यावी व विना मुल्य द्यावी.

४. जन माहिती अधिकारी यंानी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती अतिशय व्यापक प्रमाणात माहिती आहे व विस्तृत व प्रश्नोत्तरांच्या व अनेक विभागाशी संबंधित माहिती आहे. विकासकांनी किंवा वास्तुविशारद यांनी सादर केलेला व मंजूर केलेला आराखडा उपलब्ध करुन द्यावा असे म्हणणे सोपे आहे. परंतु एक इमारत जेव्हा बांधली जाते त्यावेळेस त्या इमारतीच्या संदर्भामध्ये जेव्हढी वर्ष कामकाज चालू असते तेव्हा वेळोवेळी विकासक किंवा वास्तुविशारद आराखडे हे सुधारित करत असतात. तसेच एक इमारतीच्या संदर्भामध्ये इतर अनेक विभागाचा सुध्दा संबंध येत असतो व त्या विभागाशी झालेला किंवा त्या विभागाकडून आलेला पत्र व्यवहार सुध्दा त्या नस्त्यामध्ये असतो. अशा प्रकारे एका इमारतीच्या संदर्भा मध्ये व त्यात असलेल्या सदनिकेच्या प्रमाणामध्ये

१० ते १२ नस्त्या तयार होत असतात. व त्यामध्ये पाच ते दहा हजार पृष्ठ असतात. व अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही १९८४ पासून मागितली आहे म्हणजे अतिशय जुनी माहिती आहे. त्या सर्व नस्त्या काढून त्यातून प्रत्येक पृष्ठ D.C. नियमाप्रमाणे तपासून त्याची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे हे अत्यंत जिकिरीचे आणि दैनंदिन कामकाज बाजूला ठेउन करण्याचे आहे व अशा प्रकारे कार्यालयामध्ये एकटा अपिलकर्ता यांचा अर्ज नसतो तर रोज १० ते १५ माहितीचे अर्ज दाखल झालेले असतात व त्यामुळे अतिशय व्यापक प्रमाणात माहिती असल्याने सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर वळवावी लागेल व दैनंदिन कामकाज सुध्दा होणार नाही व त्यामुळे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम २(ञ) प्रमाणे 'माहितीचा अधिकार' या संज्ञेमध्ये सार्वजनिक प्राधिकरणाचे नियंत्रणामध्ये असलेली माहिती व अभिलेख्याची तपासणी करणे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती घेणे हे अपेक्षित असल्यामुळे त्याप्रमाणे अर्जदारास कळविले जाते जेणे करुन अर्जदाराने स्वत: निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते व त्यानुसार अपिलकर्ता यांना ०१.०९.२०१० रोजी विहित मुदतीतच कळविण्यात आलेले होते. अर्जदार हे दोनही बाजूंनी तक्रार करतात. जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रे दिली तर अनावश्यक कागदपत्रे देतात अशी तक्रार करतात व निरीक्षण करावयांस सांगितले तर ती जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे अशा तक्रारी करतात व ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये सुध्दा स्पष्ट करण्यात आली होती व त्यानुसार अपिलकर्ता यांनी वास्तुविशारद घेउन निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेण्याचे मान्य केले होते तसेही त्यांच्या अर्जामध्ये सुध्दा संपूर्ण माहिती ही निरीक्षण करुनच उपलब्ध करुन घेणार असे नमूद केले आहे व त्याप्रमाणे त्यांनी निरीक्षण सुध्दा केले आहे व काही कागदपत्रे नमुद सुध्दा केली आहे. त्यांचे वास्तुशाविशारद नंतर येउ शकत नाही ही त्यांची अडचण आहे व तसे त्यांना निरीक्षण नको असेल तर या संपूर्ण नस्त्यांमध्ये जेवढी कागदपत्रे असतील त्या सर्वाचा प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे तसेच आराखडे याच्या संदर्भामध्ये जी फी ठरविली आहे त्या फी प्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तीक राहिल. तसेच त्यांच्या दि.२५.०६.२०१० चे अर्जात मोघम व अनेक विभागातील माहिती तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले आहेत.

५.त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना संपूर्ण १२ ते १४ नस्त्यांची निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेण्यास वेळ नाही तसेच त्यांचे वास्तुविशारद सुध्दा येउ शकत नाही व ते तांत्रिक बाबतीत अनभिज्ञ आहेत व अधिनियमाचे कलम ७ प्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. व त्यांना त्या इमारतीच्या संदर्भातील संपूर्ण कागदपत्रांची सुध्दा आवश्यक नाही व ते निरीक्ष्ंण ही करणार नाही. अर्जात मागितल्याप्रमाणे कागदपत्रे काढुन द्यावीत.

६.वास्तविक अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१२.०८.२०१० चे अर्जातच सर्व नस्त्यांचे निरीक्ष्ंण करणार असे नमूद केले आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीस सुध्दा त्यांना मान्य केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(ञ) मधील 'माहिती अधिकार' या संज्ञेची व्याख्यासुध्दा ते त्यांच्या सोई नुसार करतात अधिनियमाचे कलम ७(९) मध्ये मागितलेल्या माहितीकरीता शासकीय यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास माहिती असे तशी द्यावी असे नमूद आहे. याबाबत सुध्दा विचार करणे आवश्यक असते. अधिनियमाचे कलम ७(३) अन्वये खर्चाचा भरणा करावा अशी तरतूद आहे व त्याप्रमाणे संपूर्ण कागदपत्रांच्या संबधात खर्चाचा भरणा करावा हे सुध्दा त्यांना मान्य आहे असे दिसत नाही व ते जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचे संबंधात सुध्दा कळविले असून आयोगाकडे विना मुल्य माहिती मिळावी अशी मागणी करतात.

माहिती तयार करुन देता येत नाही. कागदपत्रांची छायांकित प्रतीच देणे अपेक्षित असते. जन माहिती अधिकारी यांचे कोणत्याही प्रकारणांतील निर्णय प्रक्रिये संदर्भात अभिप्राय 'माहिती' या व्याख्येप्रमाणे अपेक्षित नाहीत तसेच अधिनियमाचे कलम ५(१) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाचे सर्व शाखा, उपशाखांमध्ये त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी नियुक्त केलेले असल्याने अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक असते. हस्तांतराची तरतूद ही एका सार्वजनिक प्राधिकरणाकडून दुस-या सार्वजनिक प्राधिकरणाकडे आहे. एकाच अर्जात अनेक विषयांची शाखांची माहिती मागने अपेक्षित नाही. सार्वजनिक प्राधिकारणाने विषयदार / शाखावार उप कार्यालयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती प्रसिध्द केलेली आहे व त्यामुळे ज्यांना खरोखर माहितीची आवश्यकता आहे त्यांनी सार्वजनिक प्राधिकरणाची कार्यपध्दती समजून देउनच माहिती मागणे अपेक्षित असते. प्रत्येक अर्जदाराने आपआपल्या कल्पनेप्रमाणे माहिती मागणे अपेक्षित नाही.

७.वरील सर्व वस्तुस्थिती व अधिनियमाच्या तरतूदीचा विचार केल्यास जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार विकासकांनी वेळोवेळी सादर केलेले प्रस्ताव हे सुधारीत केले असतात व त्यापैकी काही दिल्यास पुन्हा अपूर्ण माहिती दिल्याचे आरोप होतात असे युक्तीवादात सांगितले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी एक तर संपूर्ण नस्त्यांच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेणे किंवा दुसरा पर्याय हा उपलब्ध असलेल्या नस्त्यांचे निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रे नमूद करुन त्यांच्या छायांकित प्रतीचा खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेणे असा आहे.

८.व त्या दृष्टीने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय व अपिलकर्ता यांनी सुध्दा नस्त्याच्या निरीक्षणा सुध्दा त्यांचे अर्जात नमूद केलेले असल्यामुळे सदचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०६३९/अपील क्र.६७३२/०२**
**मुमाआ.नो.क्र.५०६४१/अपील क्र.६७३३/०२**

**श्री.शंभुशरण सक्सेना**
**रू.नं.१०१४, मुळेबाई चाळ,**
**रामगडनगर, गोशाला रोड,**
**मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०.** **... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, टी वार्ड,**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, लाला देवीदयाल मार्ग,**
**मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता परिरक्षण, टी वार्ड,**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, लाला देवीदयाल मार्ग,**
**मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ.व.का)**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, लाला देवीदयाल मार्ग,**
**मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २४.११.२०१०**

**सुनावणीचा दिनांक ०७.०६.२०११**

**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपीलकर्ता यांनी अपील ६७३२ मध्ये जन माहिती अधिकारी, टी वार्ड यांचेकडे रस्त्यावर पेवर ब्लॉक्स त्या संदर्भामध्ये जानेवारी २००७ ते अर्जाच्या तारखेपर्यंत एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.०८.१०.२०१० रोजी माहिती अतिशय व्यापक

प्रमाणामध्ये आहे व तीन वर्षाच्या कालावधीतील माहिती असल्याने अनेक नस्त्याआहे व त्यामुळे निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती खर्चाचा भरणा करुन घ्याव्यात असे कळविलेले दिसून येते.

२. परतु अपिलकर्ता यांनी दि.१५.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.११.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी विहित शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला आहे. परंतु अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

३. अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हे उशिरा उपस्थित झाले. परंतु त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहितीच्या संदर्भात उत्तर देण्यात आले आहे तसेच प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणला जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

४. अपील क्र.६७३३ मध्ये अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, टी वार्ड यांचेकडे रामगड या झोपडपट्टी भागात अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये एकूण ५ मुद्यावंर १९९४ ते २०१० या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.०८.१०.२०१० रोजी माहिती व्यापक प्रमाणात आहे तसेच सन १९९४ पासून मागितलेली आहे त्यामुळे सर्व नस्त्यांचे निरीक्षण करावे व आवश्यक त्या कागदपत्रांचे प्रति पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलबध करुन घ्यावी. परंतु अपिलकर्ता यांनी दि.१८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.

५. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.११.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्त्यास मुळ अर्जात मागितलेली व इमारत व कारखाने विभागात कागदपत्र स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्त्याने विहित शुल्क भरल्यावर १५ दिवसांचे आत देण्यात यावी, असा निर्णय दिलेला असून सुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

६. अपिलकर्ता गैरहजर, उत्तरवादी हजर. जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्याने अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१.अपील क्र.६७३२/०२ व ६७३३ ही निकाली काढण्यांत येतात.**

**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत दयावी.** **Sd--**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०७.०६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.१२२१/क्र.अपील क्र.६७३५/०२**

**श्री.अशोक जेटीया,**
**सचिव, विकास व्हॅली को.ऑप.हौसिंग सोसा.,**
**१, अर्केडिआ, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१.** **... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी**
**लोणावळा नगरपरिषद,**
**तालुका-मावळ,**
**जि.पुणे ४१० ४०१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.नगररचनाकार**
**लोणावळा नगरपरिषद,**
**तालुका-मावळ,**
**जि.पुणे ४१० ४०१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०३.०१.२०११**

**सुनावणीचा दिनांक ०७.०६.२०११**

**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१३.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, लोणवळा म्युनिसिपल कॉन्सिल यांचेकडे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पुढील याचिका क्र.५७९२ of २००७ मधील आदेशाप्रमाणे लोनावळा म्युनिसिपल कॉन्सीलने दि.२३.०५.२००८ रोजी श्री.एम.एल.गुप्ता, विकास डेव्हलोपर यांना दिलेल्या पत्राप्रमाणे मुद्या क्र.A, B, C च्या संदर्भामध्ये काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती

मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की, सदर बाब ही विकास व्हॅली हौसींग सोसायटीच्या संदर्भात असून त्याबाबतची माहिती नगरपरिषदेच्या अभिलेखात नाही, तसेच या संदर्भातील माहिती ही माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे अंतर्गत येत नाही. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२९.१०.२०१० प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०९.१२.२०१० रोजी देण्यात आला असून संबंधित माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीची फेर तपासणी करुन त्यात उपलब्ध माहिती अपिलकर्त्यास ८ दिवसांच्या आत पुरवावी. तसेच मा.मुख्यधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे सदर प्रकरणी काय कार्यवाही केली असल्यास त्याबाबतची माहिती देण्यात यावी. तसेच सदरच्या कामामध्ये इमारत निरीक्षक तथा सहा.माहिती अधिकारी यांनी त्यांच्या संबंधिची माहिती अपिलकर्त्यास संबंधिची कागदपत्रे १ आठवडयाच्या आत पुरविण्याचे व्यवस्था करावी असे आदेश दिलेले दिसून येतात.

सदरच्या आदेशाच्या अनुषगाने दि.१६.१२.२०१० रोजी सहा.माहिती अधिकारी यांनी तत्कालीन मुख्यधिकारी यांनी दि.२३.०५.२००८ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे झालेल्या कार्यवाही बाबत माहिती नगरपरिषदेचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही व त्याबाबत पुढे कोणताही पत्र व्यवहार झालेला नसल्याने माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच दि.१८.१२.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध नाही असेच कळविलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नगरपरिषदेने पत्र लिहिले परंतु पुढील कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता जी माहिती अपेक्षित करित आहे त्या संदर्भातील जी ओपन स्पेस़ आहे ती सोसायटीच्या परिसरा अंतर्गत आहे व त्यामुळे विकासकांना पत्र देण्यापलिकडे नगरपरिषद कोणत्याही प्रकारची कार्यवाही ही विकासकाच्या विरुध्द करु शकत नाही व त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे नगरपरिषदेने दि.२३.०५.२००८ रोजी विकासक यांना पत्र दिलेले आहे. परंतु विकासकाच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येत नसल्याने कार्यवाही झाली नाही व अपिलकर्ता हे विकासका विरुध्द कार्यवाहीची अपेक्षा करित आहे. जी बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नाही व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी

सुध्दा माहिती उपलब्ध नाही व प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा कार्यवाही बाबतची माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अभिलेख्यामध्ये असलेली माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. तरी सुध्दा अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या दि.१३.०९.२०१० च्या अर्जामध्ये A,B,C असे जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबत मुद्येनिहाय कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश व्हावेत.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये कार्यवाही करण्याचे आदेश देता येत नाही किंवा गुणवत्तेच्या बाबत निर्णय सुध्दा देता येत नाही. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज च्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. सार्वजनिक प्राधिकरणाने कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. परंतु अपिलकर्ता यांची विनंती अंशत: मान्य करुन अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांची विनंती मान्य करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.१०.२०१० रोजी दिलेल्या उत्तराप्रमाणे मुद्येनिहाय उत्तर उपलब्ध करुन द्यावे.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी.क्र.१२२१/अपील क्र.६७३४/०२**

**श्री.चंद्रकांत बाबुराव पुजारी**
**४ अे/३०५, श्री.गुरूदत्त को.ऑ.हौ.सो.लि.,**
**देवरत्न नगर, सायन-चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार**
**तालुका दक्षिण सोलापूर,**
**जि.सोलापूर.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार**
**तालुका दक्षिण सोलापूर,**
**जि.सोलापूर.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १२.०१.२०११**

**सुनावणीचा दिनांक ०७.०६.२०११**

**अपिलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी गैरहजर, निवडणूक नायब तहसिलदार उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.३०.०९.२०१० रोजी जावक क्र. पुरवठा/कावीएसआर-६४, दि.०८.१०.२००९ चे पत्र युपीसी व्दारे कोणाच्या नावे, कोणत्या पत्यावर व कोणत्या पोष्टात टाकण्यात आले व याबद्दलची माहिती दि.०८.१०.२००९ ते दि.३१.१०.२००९ या कालावधीतील मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी त्याच दिवशी दि.३०.०९.२०१० रोजी अपिलीय प्राधिकारी यांचेकडे अर्ज

दाखल केला.  प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, पूर्वी दि.१६.०१.२०१० रोजी सदरच्या प्रकरणाच्या संदर्भात राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांचेकडे व्दितीय अपीलावर निर्णय झाला आहे व त्यामध्ये अपिलकर्त्यास केलेल्या पत्र व्यवहाराबाबत मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांनी जावक बारनिशीची एक प्रत सादर करावी असे आदेश दिले होते. त्याप्रमाणे दि.२७.०४.२०१० रोजी आयोगास सादर करण्यात आले व त्यात अपिलकर्ता यांना देउ केलेली माहिती घेतलेली नाही असे म्हटलेले आहे व त्यामुळे यांनी नायब तहसिलदार यांनी कोणत्या पत्रानुसार माहिती देउ केली ती माहिती आता मागितलेली आहे.

जन माहिती अधिकारी हया उपस्थित झालेल्या आहे पंरतु त्यांना निवासी नायब तहसिलदार यांचा अतिरिक्त भार दिलेला असल्याने व त्या पुण्याला कार्यालयीन कामकाजासाठी आलेल्या असल्याने त्यांना संबंधित अर्जाच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती तपासता आलेली नाही असे त्यांना आयोगापुढे सांगितले.  असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.३०.०९.२०१० रोजी दिलेल्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अभिलेख्याची तसेच जावक बारनिशीची तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार यांनी अपिलकर्ता यांच्या दि.३०.०९.२०१० च्या अर्जात मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास / नसल्यास त्याप्रमाणे स्पष्टपणे कळविण्यात यावे.**

**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०७.०६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०४३०/अपील क्र.६७२८/०२
मुमाआ.नो.क्र.५०४३१/अपील क्र.६७२९/०२

श्री. भरत गुर्जर
७ गझदर स्ट्रीट,
श्रीजी भवन, जे.एस.एस.रोड,
मुंबई ४०० ००२. ... अपिलार्थी

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी,
महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट,
१५, वा मजला, पर्यावरण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट,
१५, वा मजला, पर्यावरण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता (झोन-२)
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
रजनी महाल, ८९/९५, ताडदेव रोड,
ताडदेव, मुंबई ४०० ०३४. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (डी-१ डिव्ही)
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,

**रजनी महाल, ८९/९५, ताडदेव रोड,**
**ताडदेव, मुंबई ४०० ०३४.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलांचा दिनांक (नोंदणीचा दिनांक ०१.१२.२०१०) निरंक**
**सुनावणीचा दिनांक ०७.०६.२०११**
**अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी उपस्थित.**
**अपील क्र.६७२८ चे प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित,**
**अपील क्र.६७२९ चे प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

वरील दोन्ही अपीलांच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता गैरहजर आहे परंतु अपिलकर्ता यांनीच अपील क्र.६७२८/०२ मध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध झाली आहे असे लेखी दिलेले आहे. तसेच अपील क्र.६७२९/०२ मध्ये सुध्दा प्रथम अपीलाच्या सुनावणीतच पुनर्विकासाच्या संदर्भातील आवश्यकती माहिती उपलब्ध झाली आहे असे लेखी दिले असल्यामुळे व अर्जदाराची त्यावर सही असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही निकाली काढण्यास पात्र आहेत.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांची दोन्ही अपीले निकाली काढण्यांत येतात.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०४०२/अपील क्र.६७२६/०२**

**श्री.यतीन एन.शहा**
**नवीन नगर १, टँक लेन,**
**अकबरअलीच्यामागे, म्युन्सिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०५४.** **... अपिलार्थी**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.मनपा आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (पश्चिम उपनगरे)**
**मालमत्ता विभाग, बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक (नोंदणी दि.३०.११.२०१०)**

**सुनावणीचा दिनांक ०८.०६.२०११**

**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.निरंक (विभागात प्राप्त १२.०१.२०१०) रोजी जन माहिती अधिकारी, इस्ट्रेट विभाग एच / वेस्ट वार्ड, बांद्रा (प) यांचेकडे खोतवाडी टीपीएस-६, फायनल प्लॉट १०६, सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०५४ This land included 47 flats in on BMC had made surrey in year 1975, in the year 1985 therefore have meaning structure etc अशी माहिती एकूण ५ मुद्यांमध्ये मागितलेली

दिसून येते.  सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२७.०१.२०१० रोजी माहिती ही इस्ट्रेट विभागाकडे उपलब्ध नसून कॉलनी अधिकारी एच/वेस्ट वार्ड याचेकडे उपलब्ध असते व त्यामुळे अर्ज हा कॉलनी अधिकारी एच/वेस्ट यांचेकडे हस्तांतर केलेला आहे असे त्यांना कळविलेले दिसून येते.  असे असुन सुध्दा अपिलकर्ता यांनी दि.०२.०३.२०१० रोजी प्रथम अपील हे पुन्हा इस्टेट विभागाकडेच दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कार्यालय अधिक्षक, एच/वेस्ट यांनी सुनावणीस हजर रहावे असे कळविलेले दिसून येते.  परंतु निर्णय झालेला दिसून येत नाही व अपिलकर्ता यांनी मात्र प्रथम अपील हे इस्ट्रेट विभागाच्या अधिका-यांच्या विरुध्द दाखल केलेले दिसून येते व त्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून इस्ट्रेट विभागाच्या अधिका-यांनाच नोटीस काढण्यात आली आहे.  परंतु माहिती ज्या कॉलनी अधिकारी यांचेकडे आहे त्यांचे विरुध्द व्दितीय अपील मेमोमध्ये कोणताही संदर्भ दिला नसल्यामुळे त्यांना नोटीस काढण्यांत आलेली नाही व इस्ट्रेट विभागाच्या अधिका-यांनी अर्ज हा कॉलनी अधिका-यांकडे हस्तांतरीत केला आहे असे आयोगापुढे सांगितले.

२. अपिलकर्ता यांची आज आयोगापुढे एकूण ७ अपीले आहेत.  सात ही अपीलांमध्ये अपिलकर्ता यांनी माहितीच्या अर्जात प्रथम मेमोवर तसेच व्दितीय अपील मेमोवर कोणतीही तारीख घालण्यात आलेली नाही.  वास्तविक अपिलकर्ता हे स्वत: ॲडव्होकेट म्हणुन संभोधतात व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा मुळ गाभा हा प्रत्येक प्रक्रियेस मुदत घातलेली असल्यामुळे तारीख घालणे हे आवश्यक असताना ती न घालणे ही बाब अनाकलनीय आहे.  अपिलकर्ता हे वकील असल्याने माहिती ज्या विभागात किंवा शाखेत आहे त्यांचेकडे मागणे व त्यांचेकडे नसल्यास विभागाने हस्तांतर केलेल्या शाखेकडून किंवा विभागाकडून उपलब्ध करून घेणे किंवा हस्तांतरीत शाखेच्या जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे संपर्क साधणे व त्यांनाच व्दितीय अपीलात पक्षकार करणे आवश्यक असते.  हे माहिती नसने हे सुध्दा अनाकलनीय आहे व त्यामुळे आज मालमत्ता विभागाच्या अधिका-यांनी त्यांचेकडील अर्ज हस्तांतरीत केले आहे या शिवाय कोणतीही माहिती ते देउ शकले नाही व अपिलकर्ता सुध्दा गैरहजर असल्यामुळे व कोणत्याही प्रकारची निवेदन किंवा टिप्पणी सादर न केल्याने सदरचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी. **Sd--**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ०८.०६.२०११
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०४००/अपील क्र.६७२५/०२

श्री. श्री.यतीन एन.शहा
नवीन नगर १, टँक लेन,
अकबरअलीच्यामागे, म्युन्सिपल शाळेपुढे,
सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०५४ ... अपिलार्थी

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.मनपा आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),
मुंबई ४०० ०५०. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा परिरक्षण विभाग
बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),
मुंबई ४०० ०५०.

## निर्णय

**व्दितीय अपीलाचा दिनांक निरंक**
**सुनावणीचा दिनांक ०८.०६.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.निरंक (कार्यालयात प्राप्त ०५.०१.२०१०) रोजी जन माहिती अधिकारी, देखभाल दुरुस्ती, वेस्ट वार्ड यांचेकडे दि.११.०७.२००७ रोजी अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये लिओ एन्थोनी हाउस च्या संदर्भामध्ये तक्रार केली होती त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही केली अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार

यांच्या चार तक्रारींची कार्यवाहीची माहिती उपलब्ध झालेली नाही व तक्रारी सुध्दा आढळून येत नाही असे अर्जदाराचे प्रतिनिधी शशांक रॅाय यांना अवगत केले होते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी दि.निरंक (११.०२.२०१०) रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१८.०३.२०१० रोजी देण्यात आला असून देखभाल दुरूस्ती विभागाने कागदपत्रांची तपासणी करावी व माहिती उपलब्ध करून द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे दि.०५.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या चार ही तक्रारी या तपासणी अंती सुध्दा आढळून आलेल्या नाहीत. वैगरे त्यांना उत्तर दिलेले दिसून येते व त्याबद्‌दलचा अहवाल सुध्दा सादर केलेला दिसून येतो व त्यांना अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५९५/अपील क्र.६६४९/०२**

**श्री.अलनासिर अब्दुल्ला काझी**
**१०८२, उद्यमनगर, रत्नागिरी,**
**ता.जि.रत्नागिरी ४१५ ६३९.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी**
**रत्नागिरी विभाग, जि.रत्नागिरी.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी**
**रत्नागिरी विभाग, जि.रत्नागिरी.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०९.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ०८.०६.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, महसूल यांचेकडे रत्नागिरी महसूल उपविभागामध्ये समाविष्ट असलेल्या रत्नागिरी लांझा व राजापूर तालुक्यातील जातीच्या दाखल्याचे अर्ज प्रकरणी संबंधि मा.उप विभागीय अधिकारी, महसूल विभागाकडे येतात. त्यातील मुस्लीम दर्जी व इतर दाखल्याची तपासणी चालू आहे कळविण्यात आले आहे. त्या संदर्भात व मुस्लीम समाजातील इतर मागास प्रवर्ग समाज घटकांच्या संदर्भात सन २००१ ते माहे ऑगस्ट २००९ पर्यंत जातीचे दाखले देण्यात

आलेले असल्यास त्याबद्दलची संपूर्ण माहिती तीन मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषगाने दि.२२.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार यांनी मागितलेल्या कालावधीत दाखल्यांची संख्या हजारोमध्ये असल्याने व सदरच्या दाखल्याची संचिका दि.०२.०८.२०१० रोजी पाहण्यासाठी उपलब्ध करुन ठेवण्यात आलेल्या असल्यामुळे मुद्या क्र.२ व ३ ची माहिती अधिकृत संकतेस्थळावर उपलब्ध असल्यामुळे तसेच उपलब्ध स्थायी आदेश संचिकेमधून आपणास आवश्यक असलेले शासन निर्णय व परिपत्रके उपलब्ध करण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दि.३०.०१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकर्ता यांना पुन्हा दि.१३.०८.२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये एकूण रु.१७, १७०/- एवढी रक्कम खर्चाचा भरणा करावा या कारणास्तव पत्र दिलेले दिसून येते. तसेच दि.१७.०८.२०१० रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुध्दा खर्चाचा भरणा करावा म्हणुन निर्णय दिलेला दिसून येतो. मात्र अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता यांनी अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही असे कळवून आयोगाकडे लेखी खुलासा पाठविलेला आहे व त्यामध्ये वस्तुस्थिती दिलेली आहे परंतु सदरच्या रक्कमेची मागणी केलेली आहे त्यासंदर्भामध्ये न्याय मिळावा असे निवेदन केलेले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता हे दररोज तहसिल कचेरीत येतात. त्यांना माहितीचे निरिक्षण करा सांगितले तरी ते निरीक्षण करित नाही, खर्चाचा भरणा करावा तरी खर्चाचा भरणा करत नाही. मागितलेली माहिती ही २००१ पासून असल्यामुळे विस्तृत प्रमाणात ही माहिती आहे. त्यामुळे एकतर त्यांनी संपूर्ण अभिलेख्याचे निरीक्ष्ंण करावे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या किंवा अंदाजे ७ ते ८ हजार पृष्ठांच्या करिता प्रती पृष्ट रु.२/- प्रमाणे रु.१७१७०/- तरी भरावे. परंतु ते कोणताही पर्याय स्विकारत नाहीत व मधुन मधुन मागितलेल्या माहितीचे काय झाले असे मात्र विचारत असतात.

४. अपिलकर्ता यांनी मुस्लीम (गवळी) अशा जातीच्या दाखल्याची मागणी केली होती. परंतु तशा प्रकारे दाखला दिला गेला किंवा नाही तसेच नियमाने देता येतो किंवा नाही याबद्दल ही काहीही माहिती नसल्यामुळे त्यांनी मुस्लीम समाजातील इतर मागास प्रवर्ग समाज घटकांच्याकरिता दिलेल्या दाखल्यांची माहिती मागितलेली आहे. त्यात कोणतेही सार्वजनिक व्यापक हित नाही तर वैयक्तिक हितासाठी कार्यालयास वेठीस धरण्याचा प्रकार दिसतो.

५. वरील युक्तीवाद विचारात घेता व अपिलकर्ता यांनी त्यांच्या निवेदनात किंवा व्दितीय अपील मेमोमध्ये कोणतेही संयुक्तीक स्पष्टीकरण दिलेले नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०४०६/अपील क्र.६७२७/०२**

**श्री. यतीन एन.शहा**
**नवीन नगर १, टँक लेन,**
**अकबरअलीच्यामागे, म्युन्सिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०५४** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.मनपा आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (जल विभाग)**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक (नोंदणीचा दि.३०.११.२०१०) निरंक**
**सुनावणीचा दिनांक ०८.०६.२०११**
**जन माहिती अधिकारी यांच्यावतीने श्री.शुक्ला, दुय्यम अभियंता उपस्थित,**
**अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.निरंक (०५.०१.२०१०) रोजी जन माहिती अधिकारी तथा जल विभाग यांचकडे जल जोडणीच्या संदर्भामध्ये खोतवाडी, सांताक्रुझ (प) १९६० पासून संपूर्ण झोपडपट्टी परिसरात किती जोडण्या दिल्या तशी तपशिलात माहिती वर्ष निहाय उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती शिघ्र टपालाने मागितलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध न झाल्याने त्यांनी दि.निरंक (११.०२.२०१०) रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर असून त्यांचेवतीने श्री.शुक्ला, दुय्यम अभियंता उपस्थित आहे. परंतु श्री.शुक्ला यांना कार्यालयीन कामकाज पध्दतीची काही माहिती आहे असे दिसून येत नाही. परंतु त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०१.२०१० रोजी अपिलकर्ता यांना दिलेल्या पत्राची प्रत दाखल केलेली आहे. जी वकील असून सुध्दा अपिलकर्ता यांनी व्दितीय अपीलाच्या मेमोसोबत दाखल केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी जो परिसर दिलेला आहे तो आढळून येत नाही वैगरे असे उत्तर दिलेले दिसून येते. यावरुन जन माहिती अधिकारी यांना सुध्दा कामकाजाची काही माहिती आहे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी तर निर्णयच दिलेला दिसून येत नाही. परंतु प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी निरीक्षण करण्यास परवानगी दिली आहे व श्री.शशांक शॉय हे निरीक्षण करण्यात येणार आहे असे चार ओळीमध्ये नोटीसीच्या उलट बाजूस लिहिण्यात आलेले दिसून येते. यावरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूणच कामकाजाची कार्यपध्दती किती भोंगळ आहे हे दिसून येते व ही बाब आयुक्त महानगरपालिका यांचे निदर्शनास आणणे आवश्यक आहे.

३. असे असले तरी अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात जी माहिती मागितलेली आहे त्यात कोणत्याही निश्चित कागदपत्रांचे वर्णन केलेले नाही. तर मोघम अशी माहिती १९६० पासून मागितलेली दिसून येते. एखादया झोपडपट्टी परिसरामध्ये ५० वर्षामध्ये दरवर्षी किती जल जोडण्या दिल्या जातात किंवा त्या तोडल्या जातात वगैरेची माहिती मागणे म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचा गैरवापर आहे किंवा संबंधित विभागास विनाकारण वेठीस धरणे आहे असा काढावयास हरकत नाही व तसेही अपिलकर्ता स्वत: वकील असूनही अर्ज व अपील यांचेवर तारीख नमूद करित नाही व कोणत्याही कार्यालयात किंवा प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे किंवा व्दितीय अपीलात सुनावणीस किंवा माहिती घेण्यास व्यक्तीश: हजर राहत नाही व कोणी तरी एखादा शशांक रॉय हे त्या कामासाठी ते

नियुक्त करतात व अशा प्रकारे अनेक अर्ज अनेक विभागात करतात यावरुन ते स्वत: माहिती उपलब्ध करुन घेण्यास गंभीर आहे असे दिसून येत नाही व त्यांचे आयोगापुढील अनेक अपीलाच्या माध्यमातुन असे दिसून येते की, त्यांचे मागण्याचे कार्यपध्दतीत सार्वजनिक व्यापक हित आहे असे ही दिसून येत नाही. अशा अर्जदारांमुळे अनेक कार्यालयातील माहिती अधिकारी यांना त्यांचे दैनंदिन कामकाज करणे सुध्दा दुरापस्त झालेले आहे. तसेच जे खरोखर व्यापक सार्वजनिक जनहितासाठी प्रामाणिकपणे माहिती मागतात त्यांना मुदतीमध्ये किंवा योग्य वेळी माहिती ही उपलब्ध होउ शकत नाही व त्यांची अपीले सुध्दा लवकरात लवकर निकाली काढता येत नाहीत व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२. सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका यांना स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.**
**३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७१४/अपील क्र. ६७६०/०२**

**श्री.अजितकुमार पंजाबी**
**७७, महाराष्ट्र नगर नं.१,**
**स्लॅटर हाउस बस डेपोच्या बाजूला,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.पालिका आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**१ ला मजला, सेंट मार्टिन्स रोड,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**१ ला मजला, सेंट मार्टिन्स रोड,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १६.०६.२०११**
**अपिलकर्ता हजर, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.०३.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी एच / पश्चिम, महानगरपालिका (वसाहत) हिल रोड, बांद्रा (प), मुंबई यांचेकडे १९९५ पासून ते आज पर्यंत महाराष्ट्र नगर जुना स्लॉटर हॉउस कंम्पाउड बस डेपो जवळील झोपडपट्टीचे संपूर्ण फोटोपास तपासण्यात द्यावी, तपासणीचे पैसे

भरण्यास तयार आहे, माहिती टपाला व्दारे घेणार असे नमूद केले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार यांनी दि.०८०९.२०१० रोजी महाराष्ट्र नगर, स्लॉटर हॉउस येथील महानगरपालिकेच्या जागेवरील झोपडपटटी धारकास पात्रतेसापेक्ष ओळखपत्र देण्यात आली असून, त्या संबंधीचा अभिलेख या कार्यालयात उपलब्ध असून माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गतचे आकार भरल्यानंतर आपणास तपासण्यास देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपिलकर्ता यांनी दि.०६.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही त्यामुळे अपिलकर्ता यांनी व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता हजर असून युक्तीवाद करताना असे सांगितले की, ते ब-याच वेळा जन माहिती अधिकारी यांचेकडे शुल्क भरण्यास गेले होते. त्यांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य दिले नसल्याने शुल्क कोठे व किती भरावे याबद्दलची माहिती सुध्दा दिली नसल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. पंरतु प्रथम अपीलाचा निर्णय दिला नसल्याने त्यांना आयोगापुढे व्दितीय अपील दाखल करावे लागले आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे गैरहजर आहे व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे आयोगाकडे दाखल केली नाही किंवा गैरहजर राहण्याबद्दल व मुदती दाखल अर्ज दिला नाही. राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि.३०.०५.२०११ रोजी नोटीस निर्गमित करण्यात आली आहे. तिच नोटीस अपिलकर्ता यांना मिळते परंतु जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.पालिका आयुक्त यांना ती उपलब्ध होत नाही, हे अनाकलनीय आहे. यावरुन जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीच्या अमंलबजावणी बद्दल अनास्था दाखवणारे अधिकारी दिसून येतात. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये विना मुल्य तपासणी द्यावी. त्याकरिता**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कामकाजाच्या दिवसाची तारिख व वेळ लेखी कळवावी व त्यावेळेस उपस्थित राहून तपासणी करावी.

२. जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी (प्र), एच/पश्चिम हे आयोगाकडे आज हजर नसल्याने व कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केली नसल्याने त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या शिफारस करण्यात येते.

३.प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुध्दा आयोगाच्या नोटीसची कोणतीही दखल घेतली नसल्याने व कागदपत्रे दाखल केली नसल्याने त्यांचे विरुध्द सुध्दा प्रशासकीय कार्यवाही करावी.
४. सदरच्या निर्णयाची स्वतंत्र एक प्रत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पाठविण्यात यावी.
५.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.

**Sd--**
(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १६.०६.२०११
मुंबई
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७१५/अपील क्र. ६७६१ /०२**

**श्री.अजितकुमार पंजाबी**
**७७, महाराष्ट्र नगर नं.१,**
**स्लॅटर हाउस बस डेपोच्या बाजूला,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१. ... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.पालिका आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**१ ला मजला, सेंट मार्टिन्स रोड,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**१ ला मजला, सेंट मार्टिन्स रोड,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १६.०६.२०११**
**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.२७.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, एच/पश्चिम, हिल रोड, बांद्रा (प), मुंबई यांचेकडे वसाहत विभागात कार्यकारी अधिकारी श्री.मावळणकर या विभागात केव्हा रूजु झाले व त्यांच्या सेवेच्या संदर्भात संपूर्ण माहिती टपाला व्दारे घेणार अशी मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.२१.०९.२०१० रोजी कॉलनी विभागात काम करणारे अधिकारी श्री.ह.बा.मावळणकर हे

दि.२०.११.२००९ पासून एच/पश्चिम विभागात रुजु झाले आहेत. सदर कर्मचारी अधिकारी सेवेमध्ये केव्हा रुजु झाले, त्यांना पदोन्नती कशा प्रकारे मिळाली वगैरे बाबतची माहिती, त्यांचा सेवाभिलेख या कार्यालयात नसल्याने देता येणार नाही, विचारलेली अन्य माहिती या कार्यालयाशी संबंधित नसल्याने ती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांना दि.०६.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा संबंधित जन माहिती अधिकारी / कार्यालयीन अधिक्षक, एच/पश्चिम यांनी अपिलकाराचा अर्ज संबंधित खात्याकडे अग्रेषित करावा व अपिकारास सुधारित उत्तर द्यावे. त्याप्रमाणे दि.०३.१२.२०१० रोजी अपिलकर्ता यांना श्री.मावळणकर सेवेमध्ये कधी रुजु झाले त्याना पदोन्नती कशा प्रकारे मिळाली आणि ते महापालिका निवास स्थानात राहतात किंवा नाही याबाबतचे अभिप्राय त्यांच्या सेवा अभिलेखावरुन देण्यासाठी आपला अर्ज कार्यालय अधिक्षक, सार्वजनिक आरोग्य खाते, एफ/दक्षिण विभाग यांचेकडे पाठविण्यात आला आहे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे. त्यांनतर दि.२९.१२.२०१० रोजी प्रशासकीय अधिकारी, आस्थापना, सार्वजनिक आरोग्य खाते यांनी श्री.मावळणकर यांच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध करुन दिली ती अपिलकर्ता यांना दि.१८.०१.२०११ रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

२.अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मागितलेली माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिली आहे त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरची माहिती ही त्यांचे कार्यालयात उपलब्ध नव्हती, परंतु जन माहिती अधिकारी यांनीच ती त्यांच्याच कार्यालयात उपलब्ध नव्हती तर अधिनियमाचे कलम ६(३) प्रमाणे संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर करणे आवश्यक होते. त्याकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशाची वाट पाहण्यात काहीही कारण नव्हते. त्यामुळे आयुक्त महानगरपालिका यांनी महानगरपालिकेच्या अधिका-यांना माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीची ओळख करुन देणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते. परंतु माहिती उपलब्ध केली असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**२.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना स्वतंत्रपणे निर्णयाची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.**

**३.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.** **Sd-**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १६.०६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७१९/अपील क्र.६७६२/०२**

**श्री.भूषण भगवानदास घोडी (पटेल)**
**भगवानदास हाउस, सी-१६, चिंचोली बंदर रोड,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण,**
**कनेरी पोलीस स्टेशनच्या बाजूला,**
**एच.डी.आय.एल. बिल्डींगच्या मागे,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-२**
**झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण,**
**कनेरी पोलीस स्टेशनच्या बाजूला,**
**एच.डी.आय.एल. बिल्डींगच्या मागे,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २९.११.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १६.०६.२०११**

**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.२५.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, कनेरी पोलीस स्टेशनच्या बाजूला, एच.डी.आय.एल. बिल्डींगच्या मागे, गृहनिर्माण भवन,

बांद्रा यांचेकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या आधारे नर्मदा नगर, चिंचोली बंदर रोड, मालाड (प) बिल्डींग क्र.१३., १४, १५, १६ व १७ मध्ये फ्लॅट धारकाची नावा बरोबर यादी व सदर फ्लॅट झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे देण्यात आले आहे की नाही त्यांचे उत्तर या फ्लॅट धारकांना कोणाच्या समंतीने राहण्यास फ्लॅट देण्यात आले अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१९.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२.अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली ती त्यांच्या जागेसंबंधात आहे परंतु अद्याप सुध्दा जन माहिती अधिका-यांनी पत्र व्यवहार केला नाही, पूर्वी सुध्दा ही माहिती मागितली होती परंतु त्याही वेळेस माहिती दिली नाही.

३.त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांचा अर्ज हा दि.०१.०९.२०१० रोजी प्राप्त झाल्यानंतर दि.०५.१०.२०१० रोजीच्या पत्रान्वये कार्यालयात सदर धारिकेचे निरीक्षण करुन उपलब्ध माहिती चलनाने शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र अर्जदार यांनी या कार्यालयात संपर्क साधला नाही. तसेच अर्जदार यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या अपीलाच्या संबंधात अर्जदार हजर न राहिल्याने दि.३१.१२.२०१० रोजी अर्जदार यांना नियमानुसार शुल्क भरुन माहिती घेउन जाण्यास आदेश दिले आहेत. परंतु मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असून अर्जदार यांनी माहिती प्राप्त करुन घेतली नाही असे आयोगापुढे खुलासा दाखल केला आहे व तोंडी युक्तीवादात सुध्दा सांगितले, परंतु प्रत्यक्षात यांनी अर्जदारास पत्रे पाठविलेली होती किंवा नाही त्याबद्दली छायांकित प्रती किंवा पाठविल्याचा पुरावा आयोगापुढे सादर केलेला नाही. तसेच आयोगाने जावक नोंद वहीमध्ये नोंद आहे का याबद्दल पुरावा मागितला असता जावक वहीची बनावट प्रत तयार करुन त्यांची छायांकित प्रत आयोगाचे निर्दशास आणली ती अधिकृत जावक नोंद वहीची छायांकित प्रत असल्यांचा कोणताही पुरावा नाही तसेच अपिलकर्ता यांना पाठविलेल्या पत्रांच्या स्वरुपात त्यांचे नावापुढे कोणतीही नोंद नाही किंवा टिपण नाही व त्यावरुनच ती बनावट छायांकित प्रत आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे.

४.जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध आहे व ती पुरविण्यास तयार आहे असे आयोगास सांगितले मात्र माहितीचे कागदपत्रे १० ते १५ पृष्ठ आहे असे सांगितले. असे असल्यास नस्तीचे निरीक्षण करुन घेउन जाणे पृष्ठ संख्या न देता प्रती पृष्ठ रू.२/- भरणे असे मोघम कळविले असल्याने अधिनियम कलम ७(३) चे उल्लघन करणे असे आहे. त्यावरुन अपिलकर्ता यांना माहिती देण्याची टाळाटाळ झाली आहे व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही शिफारस करणे आवश्यक झाले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी सुध्दा प्रथम अपीलाचे निर्णय देत नाही किंवा कागदपत्रे सादर करत नाही व त्यांना सुध्दा समज देणे आवश्यक आहे. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत माहिती व्यक्तीशः किंवा पोस्टाने विना मुल्य देण्यात यावी.**

**२. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली असल्याने त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तंभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.**

**३. सदरच्या निर्णयाची एक प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी मुख्याधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, तळ मजला प्रशासकीय इमारत एच.डी.आय.एच. मागे, अनंत कानेकर मार्ग, बांद्रा (पू) यांचेकडे स्वतंत्र पाठविण्यात यावी.**

**४.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १६.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७२०/अपील क्र.६७६३/०२**

**श्री.सलीम एस.शेख**
**४०३, ब्लोसम को.हौ.सो,**
**प्लॉट नं.११, सेक्टर-३,**
**घनसोली, नवी मुंबई ४०० ७०१.** **... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २५.११.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १६.०६.२०११**

**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.१७.०५.२०१० जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक यांचेकडे मच्छीमार नगर, माहिम कोळी सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं.५, सीटीएस नं.१५०५, स्वामी विवेकानंद गार्डन जवळ, माहिम कॉजवे रोड च्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी बंध पत्र दाखल केलेले आहेत काय असल्यास प्रती देण्यात याव्यात. बंध पत्र नसल्यास काय कार्यवाही केली आणि बंध पत्रे दिले नसल्याने सदरची समिती ही अवैद्य ठरेल काय अशी विचारणा केलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१५.०७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले

दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२५.०८.२०१० रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यांनतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी पुर्वी दि.२०.०४.२०१० रोजी बंध पत्राची माहिती मागितलेली होती. परंतु त्यांना बंध पत्रे आढळून येत नाहीत असे कळविले असल्याने त्यांनी पुन्हा दि.१७.०५.२०१० रोजीचा माहितीचा अर्ज सादर केलेला आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयेगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.०३.०५.२०१० रोजी विहित मुदती उत्तर दिले आहे. मात्र दि.१७.०७.२०१० रोजीच्या अर्जात त्यांनी तीच माहिती मागितलेली होती म्हणून सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि.११.०६.२०१० रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली होती व त्यानंतर ही प्रथम अपीलांतील आदेशाप्रमाणे दि.०६.०९.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, ती त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सुध्दा ते माहितीचे पत्र मिळालेले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले आहे. मात्र त्यांचे युक्तीवादावरुन त्यांना कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या दोन्ही अर्जांच्या प्रमाणे व प्रथम अपिलाच्या आदेशा प्रमाणे माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिली असल्याने सदरचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १६.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७३३/अपील क्र.६७७०/०२**

**श्री.राकेशकुमार रोशन लाल जी सुराणा**
**प्लॉट नं.१६/T/५ रोड नं.१०,**
**बैंगनवाडी, गोवंडी, मुंबई ४०० ०४३.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-६),**
**४ था माळा, प्रशासकीय इमारत,**
**आर.सी.मार्ग, चेंबूर (पू), मुंबई ४०० ०७१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
**(पूर्व प्रादेशिक विभाग)**
**पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-६),**
**४ था माळा, प्रशासकीय इमारत,**
**आर.सी.मार्ग, चेंबूर (पू), मुंबई ४०० ०७१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १७.०६.२०११**
**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.०७.२०१० जन माहिती अधिकारी, पुर्व प्रादेशिक विभाग, सहा.आयुक्त पोलीस, चेंबूर यांचेकडे शिवाजी नगर पोलीस ठाणे की हद मे दि.१९.०९.२००९ को दि.२२.०९.२००९ के बाहरसे तपास करणे रिकवरी करणे, एवम गिर फतार करणे कोण-कोणसी पोलीस पथक आऐ और उन्होंने

कोणसी कार्यवाही की और पोलीस स्टेशन मे जो डायरी बनाई एवम जीन लोगो को सहायता के लिऐ भेजा उनकी झेरॉक्स माहिती मिलने हेतू प्रार्थना या संदर्भामध्ये त्यांनी एकूण ४ मुद्यांमध्ये तपशिलात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने शासकीय माहिती अधिकारी व सहा.पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर आपण केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजी नगर पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून अहवाल या कार्यालयात प्राप्त झाला शिवाजी नगर पोलीस ठाणे सन २००९ या वर्षीच्या ठाणे दैनंदिनी तपासली असता माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर २००९ महिन्यातील ठाणे दैनंदिनी क्र.१६/२००९ ही मिळून येत नाही. त्यामुळे आपणास माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१८.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०९.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता हजर नसले तरी अपिलकर्ता यांना माहिती मिळणे आवश्यक आहे. अपिलकर्ता यांनी मागणी केलेली माहितीच्या अभिलेखावर परत शोध घेउन संबंधितांकडून प्राप्त करुन घेउन देय माहिती अपिलकर्त्यास देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त यांना आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांना युक्तीवाद करताना असे सांगितले की, कोणत्याही गुन्हयांचा तपास करण्याच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीस पोलीसांना अटक करता येत नाही. तसेच एका पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातून दुस-या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात किंवा एका न्यायालयातुन दुस-या न्यायालयात आरोपी स्थलांतर करताना किंवा गुन्हयाचा तपास करताना प्रत्येक वेळेस पोलीस स्टेशन मध्ये नोंद होणे आवश्यक असते. परंतु तशी नोंद केली आहे किंवा नाही याबाबतची पडताळणी करण्यासाठी सदरची माहिती मागितली आहे. कारण त्याना स्वत: लाच पोलीसांनी विना कारण अटक केली होती.

३. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, शिवाजी नगर पोलीस ठाणे यांचेकडे दोन वेळा तपास केला असता पोलीस डायरी आढळून येत नाही असेच त्यांना कळविलेले आहे. म्हणुन त्यांना अपिलकर्ता यांना तसे कळविलेले आहे.

४ पोलीस डायरी CRPC कलम १७२ प्रमाणे अतिशय महत्वाचे असे दस्तऐवज आहे व पोलीस तपासी अधिका-यांने वेळोवेळी तपासाच्या संदर्भातील नोंदी त्यात केल्या असतात व त्यामुळे त्याबददलची डायरी ही उपलब्ध होत नसल्यास त्या डायरीच्यामध्ये ज्या गुन्हयाच्या तपासाच्या नोंदी आहे. त्या गुन्हयाच्या मा.न्यायालयात चौकशीच्या वेळेस तपासी अधिका-यास आवश्यकता वाटल्यास आठवण ताजी करण्यासाठी उपलब्ध होउ शकणार नाही. परिणामी न्यायालयातील पुराव्यावर त्याबाबतचा परिणाम होउ शकतो व त्यामुळे पोलीस डायरी शोध घेउन ही आढळून येत नाही. असे अपिलकर्ता यांना कळविणे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करणेच होय व पोलीस ठाण्यामधील पोलीस डायरी जर गहाळ होत असेल, तर त्या पोलीस ठाण्याच्या प्रमुखाला जबाबदार ठरणे आवश्यक राहिल. त्याकरिता पुन्हा पोलीस डायरीचा कसुन तपास घेउन सदरची डायरी गहाळ होण्यासाठी जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्याचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्याकरिता मा.पोलीस आयुक्त यांनी संबंधित पोलीस डायरीच्या गहाळ होण्याच्याबाबत चौकशीचे आदेश देउन पोलीस डायरी उपलब्ध झाल्यास अपिलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल व पोलीस डायरी गहाळ झाल्याच्या कारणी जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील ते अधिकारी/कर्मचारी त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे संयुक्तीक राहिल. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेल्या पोलीस डायरीच्या गहाळ होण्याच्या संदर्भामध्ये चौकशी आदेश देउन गहाळ होण्यासाठी जबाबदार होणा-या अधिका-यां/कर्मचा-यांवरती जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी**

**२.चौकशी अंती पोलीस डायरी आढळून आल्यास अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२१.०७.२०१० रोजीच्या अर्जातील दि.१९.०९.२००९ सकाळी ८.०० ते दि.२२.०९.२००९ रात्री २४.०० वाजे पर्यंत घेतलेल्या नोंदीची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य रजिस्ट्रर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.**

**३. सदरची निर्णयाची एक पत्र मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीच्या आदेशांत करीता स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**४.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**

**(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

**दिनांक १७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०७३२/अपील क्र.६७६९/०२

श्री.सुरेंद्र विष्णू मसूरकर
गायत्री भवन, रूम नं.७, १ ला मजला,
लिबर्टी गार्डन रोड नं.२, मालाड (प),
मुंबई ४०० ०६४. ... अपिलार्थी

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका,
पी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
मिठानगर, म्युन्सिपल स्कुल बिल्डींग,
गोरेगांव (प), मुंबई. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
पी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
मिठानगर, म्युन्सिपल स्कुल बिल्डींग,
गोरेगांव (प), मुंबई.

## निर्णय

व्दितीय अपीलाचा दिनांक ०२.१२.२०१०
सुनावणीचा दिनांक १७.०६.२०११
अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, मुख्य अभियंता (विकास आराखडा) यांचेकडे

1. What is the criteria for application of section 354 of the Mumbai Municipal Corporation Actor BMC Act, 354?
2. If building is in dilapidated, whether the Assistant Engineer of the concerned ward/department of the BMC can take notice of the same on his own? Or whether the said officers of BMC can take notice of the dilapidated condition of the structure if the same is brought to the notice of the said authority by the concerned tenants/landlords?
3. When the notice is issued under section 354 of the Mumbai Municipal Corporation Act or BMC Act 354 the notice is first issued to whom i.e. landlord/tenant? Or the said notice is pasted on the Building?
4. If such notice is issued by BMC to the landlord, what action is required to be taken on the same by the landlord? If no action is taken on such notice by the landlord, what action BMC can take against such landlord as per law?
5. What is the time limit available to the landlord as per law to take action on such notice?
6. If no repairs are undertaken by landlord even after issue of such notice, & if no action is taken by the concerned BMC officer/department on the said landlord, in such a situation, How & Where the tenant can lodge a complaint?

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही मुख्य अभियंता यांचे कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे सदरचा अर्ज दि.२५.०२.२०१० रोजी उप मुख्य अभियंता यांनी सहा.पालिका आयुक्त, पी/साउथ वार्ड यांचे कार्यालयात असल्यामुळे अर्ज त्या कार्यालयात हस्तांतर केलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१२.०३.२०१० रोजी सहाय्यक अभियंता, इमारत व कारखाने, पी/साउथ यांनी मागितलेली माहिती ही प्रश्नोत्तराच्या स्वरूपात असल्यामुळे देता येत नाही. तसेच माहिती ही कागदपत्राच्या स्वरूपात उपलब्ध करून देता येते असे सांगितले. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.०६.०४.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेली माहिती उचित शुल्क वसूल करुन ७ दिवसांत देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना खर्चाचा

भरणा करावा हे कळविण्यात आले. अपिलकर्ता हे चलन तयार करुन घेउन गेले परंतु अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता यांना युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात असली तरी ती उपलब्ध करुन देणेची तरतुद अधिनियमात आहे त्यामुळे ती नाकारण्यात येत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांनी महानगरपालिका अधिनियम कलम ३५४ प्रमाणे जर कार्यवाही करावयाची झाल्यास त्याबद्दलच्या सर्व तरतूदी हया अधिनियमातच दिलेल्या आहेत व अधिनियम हा प्रसिध्द केलेला असून सर्वत्र उपलब्ध असतो त्यामुळे त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. तरीही अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती प्रश्न विचारुन जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले आहे. परंतु जन माहिती अधिकारी हा कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत अभिप्राय देउ शकत नाही व तसेच अधिनियमात ही अपेक्षित नाही. त्याकरीता त्यांनी अधिनियमाचे कलम २(च) अन्वये माहितीची व्याख्या केली आहे त्याकडे आयोगाचे लक्ष वेधले 'माहिती' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्या असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, इ-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश इत्यादींचा समावेश होतो. तसेच कलम २(ञ) प्रमाणे "माहितीचा अधिकार" या संज्ञेची व्याख्या दिली आहे व त्यामध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली व त्याच्या नियंत्रणात असलेली व अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार आहे व त्यामध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे. दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे इत्यांदी अधिकाराचा समावेश होतो.

३. यावरुन कागदपत्रांच्या छायांकित प्रती घेणे म्हणजे कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य म्हणजे नस्तीमध्ये सदरच्या प्रकरणाबद्दल संबंधितांचे अभिप्राय घेण्यात आले असतील तर त्या अभिप्रायांच्या प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे.

४. माहिती अधिकारी हा माहिती पुरविणारा अधिकारी आहे. तो त्या प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील संबंधित असेलच असे नाही व त्यामुळे कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित नाही. तसेच कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणात अनेक शाखा उप

शाखा असल्यास त्या त्या स्थरावर जन माहिती अधिकारी हे नियुक्त करण्याची तरतूद अधिनियमाचे कलम ५ (१) प्रमाणे केली असून अधिनियम ६ प्रमाणे त्या संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे (ज्याच्या नियंत्रणात माहिती असते त्यांचेकडे) अर्ज करणे अपेक्षित असते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मुख्य अभियंता यांचे कार्यालयात माहितीचा अर्ज केला असला तरी त्या कार्यालयात ती माहिती नसल्यामुळे अर्जाचे हस्तांतर करण्या येउन विहित मुदतीत अपिलकर्ता यांना दि.१२.०३.२०१० रोजी उत्तर दिलेले आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र नाहीत. कोणत्याही कायद्याच्या तरतुदींचा अर्थ हा एखादा शब्द स्वतंत्रपणे वाचून लावता येत नाही तर त्या संदर्भातील सर्व तरतुदी एकत्रित वाचून तो लावणे अपेक्षित असते. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी काय चर्चा केली याबाबतचा उल्लेख त्यांच्या निर्णयात नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध असलेली द्यावी असा आदेश जो देण्यात आलेला आहे तो गांभिर्याने दिलेला दिसून येत नाही असे असले तरी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश दिलेला असला तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे परंतु अधिनियमाचे कलम ७(६) प्रमाणे ३० दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल तर ती विना मुल्य देण्याची तरतुद आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना ती माहिती त्या छायांकित प्रती विना मुल्य व्यक्तीश: उपलब्ध करुन द्याव्या हे संयुक्तीक राहिल. अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेल्या जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०७३१/अपील क्र.६७६८/०२

श्री.चेतन कोठारी
५२, ओसीऑनीक अपार्टमेंट,
डॉ.राजाबाली पटेल लेन ऑफ बी.देसाई रोड,
मुंबई ४०० ०२६. ... अपिलार्थी

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी
नाशिक पोलीस आयुक्त कार्यालय,
शरणपूर पोलीस चौकी जवळ,
एस.डी.एफ.सी.बँकेसमोर, शरणपूर रोड,
नाशिक ४२२ ००२. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक
नाशिक पोलीस आयुक्त कार्यालय,
शरणपूर पोलीस चौकी जवळ,
एस.डी.एफ.सी.बँकेसमोर, शरणपूर रोड,
नाशिक ४२२ ००२.

निर्णय

व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०

सुनावणीचा दिनांक १७.०६.२०११

अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.

अपिलकर्ता यांनी दि.२१.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचेकडे माजी पोलीस आयुक्त, नाशिक श्री.हिमांशु रॉय यांचे विरुध्द गेल्या १० वर्षात नाशिक मध्ये कार्यरत असताना किती तक्रारी किंवा गुन्हे दाखल झालेले होते याबद्दलची माहिती एकूण ४ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.०९.१०.२०१० रोजी त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती असल्यामुळे गैरअर्जदार श्री.हिमांशु रॉय यांना कलम ११(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली असून त्यांचेकडून उत्तर प्राप्त झाल्यावर कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर दि.२१.१०.२०१० रोजी पोलीस निरीक्षक, तक्रार निवारण कक्ष, पोलीस आयुक्त, नाशिक करिता यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती अपिलकर्ता यांना कळविण्यात आलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२३.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. परंतु अपिलकर्ता यांना पुन्हा सर्व कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन घेउन माहिती निरंक आहे. असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता हजर आहे. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, तत्कालीन पोलीस आयुक्त यांचेविरुध्द ब-याच तक्रारी दाखल झाल्या होत्या म्हणून माहिती मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अंतिमः दि.१७.०१.२०११ रोजी सहा.पोलीस आयुक्त विभाग २ पोलीस ठाण्यातून श्री.हिमांशु रॉय तत्कालीन पोलीस आयुक्त नाशिक शहर यांचेविरुध्द गेली १० वर्षात गुन्हे / तक्रारी अर्ज दाखल झाले काय याबाबत माहिती संकलित केली असता स.पो.आ विभाग २ चे हद्दितील पोलीस ठाणेकडून निरंक अहवाल प्राप्त झालेले आहेत असे आयोगाकच्या निदर्शनास आणले त्यावरुन अपिलकर्ता यांना मागिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर मिळाले असलेले असल्याने सदरचे अपिल हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

<u>आदेश</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

दिनांक १७.०६.२०११
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०७३६/अपील क्र.६७७१ व ६८३९/०२

श्री.महम्मद हमीद शेख
नेहरू नगर, चाळ क्र.५,
शॉप नं.११, संत ज्ञानेश्वर नगर,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. ... अपिलार्थी

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (दक्षता)
५ वा मजला, विस्तारीत इमारत,
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा प्रमुख्य अभियंता (दक्षता)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
प्रमुख अभियंता (दक्षता) यांचे कार्यालय,
अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प इमारत, एन.एम.जोशी मार्ग,
बकरीअड्डा, भायखळा (प), मुंबई ४०० ०११.

निर्णय

व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०
सुनावणीचा दिनांक १७.०६.२०११

**अपिलकर्ता सुनावणीसाठी काही कामामुळे उपस्थित राहिले नाहीत असे त्यांनी कार्यालयात प्रत्येक्ष येउन सांगितले. जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०२.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, प्रमुख्य अभियंता दक्षता अधिकारी यांचे कार्यालयामध्ये दि.०२.०१.२००९ ते दि.२०.११.२०१० पर्यंतच्या कालावधीतील उप मुख्र अभियंता (स्ट्रोमवॉटर ड्रेनेज) वेस्टर्न सबर्बस प.ज.वा. चकाला, अंधेरी, मुंबई दि.०२.०१.२००९ ते दि.२०.११.२०१०० पर्यंत निविधा उघडण्यात आल्या आहेत. त्या निविधा यांच्या चौक्या साईट अहवाल व आपल्या वरिष्ठ अधिकारी यांनी दिले तसेच त्यांच्या चौकीचे भाडे डिपॉझीट भरलेले चलन, पावती क्रमांक वार तसेच सर्व ठेकेदार किती आहेत. त्याचे अनुज्ञापन प्रमाणपत्र इंजिनिअर सह टेंडर पत्ते भरते वेळी ज्या अधिकारी यांनी स्विकार केला त्या अधिका-यांच्या सहिनिशी माहिती स्वरूपात द्यावी अशी माहिती टपाला व्दारे मागितलेली दिसून येते. सदरचा अर्ज हा दि.०५.०८.२०१० रोजी प्रमुख्य अभियंता दक्षता यांनी उप प्रमुख्य अभियंता (दक्षता) यांनी उप प्रमुख्य अभियंता (प्रर्जन्य जल वाहिन्या) पश्चिम उप नगरे कार्यालय यांच्या अख्यारीत येत असून सदरचा अर्ज त्या कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहे असे दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१३.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.२९.०९.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी केलेला अर्ज हा प्रर्जन्य जल वाहिन्या या कार्यालयामध्ये असल्याने त्या कार्यालयामध्ये पाठविण्यात आला होता असा निर्णय देउन अपीलाच्या आदेशाची प्रत उप प्रमुख्य अभियंता (प्रर्जन्य जल वाहिन्या) पश्चिम उपनगरे यांचेकडे पाठवून अपिलकर्त्याला हवी असलेली माहिती देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि.१९.१०.२०१० रोजी अपिलकर्ता यांना पुन्हा कळविण्यात आले व दि.३०.१०.२०१० रोजी उप प्रमुख्य अभियंता (प्रर्जन्य जल वाहिन्या) यांनी अपिलकर्ता यांना दि.०६.०९.२०१० रोजी संविस्त पत्र पाठविलेले आहे त्याप्रमाणे कार्यालयात येउन कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे हे स्पष्ट करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविल्याप्रमाणे कार्यालयास भेट देउन उपलब्ध असलेल्या कागदपत्राचे परिक्षण करुन निर्धारित शुल्काचा भरणा महापालिकेकडे केल्यानंतर त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्राप्त कराव्या हे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता उपस्थित झाले होते परंतु प्रत्येक्ष सुनावणीस आलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी हीच माहिती प्रर्जन्य जल वाहिन्या या विभागाकडे दि.२७.०४.२०१० रोजी सुध्दा मागितलेली होती. वास्तविक या अर्जाच्या संदर्भात त्यांना तपशिलामध्ये माहितीच्या संदर्भामध्ये कळविण्यात आले होते व प्रथम अपिलाचा सुध्दा निर्णय हा दि.२७.०७.२०१० रोजी देण्यात आला होता. तरी सुध्दा त्यांनी दक्षता विभागाकडे पुन्हा माहिती मागितली व प्रथम अपील सुध्दा त्या विभागाकडे केले व त्यानंतर ही राज्य माहिती आयोगाकडे पुन्हा व्दितीय अपील केले. सदरच्या अपिलाची सुनावणी ही राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालयात दि.०१.१२.२०१० रोजी झाली असे निदर्शनास आणण्यात आले. परंतु अपरिहार्य कारणामुळे निर्णय झालेला नसल्यामुळे माहिती एकच असल्यामुळे त्याही अपिलाची सुनावणी घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी विनंती केल्यामुळे त्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्यासंदर्भामध्ये प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२६.०७.२०१० रोजी देण्यात आला व एकच माहिती असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेल्या संपूर्ण माहितीचे निरीक्षण त्यांनी केले आहे व त्यास त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांचा खर्चाचा भरणा करणे सुध्दा त्यांना कळविलेले आहे परंतु त्यांनी अद्याप पर्यंत आवश्यक त्या खर्चाचा भरणा केला नाही व माहिती ही अतिशय विस्तृत प्रमाण असल्यामुळे व पृष्ठ संख्या ही जास्त असल्यामुळे त्यांना खर्चाचा भरणा केल्याशिवाय माहितीची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली नाही मात्र अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले आहे व लेखी खुलासा दिला आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील क्र.६७७१/०२ व ६८३९/०२ ही निकाली काढण्यास पात्र आहे.

<u>**आदेश**</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील क्र ६७७१/०२ व क्र.६८३९/०२ ही निकाली काढण्यांत येतात.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०७३७/अपील क्र.६७७२/०२

श्री.महम्मद हमीद शेख
नेहरु नगर, चाळ क्र.५,
शॉप नं.११, संत ज्ञानेश्वर नगर,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. ... अपिलार्थी

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग यांचे कार्यालय,
दुसरा मजला, जवाहर रोड,
घाटकोपर (पू), मुंबई ४०० ०७७. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग यांचे कार्यालय,
दुसरा मजला, जवाहर रोड,
घाटकोपर (पू), मुंबई ४०० ०७७.

निर्णय

व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०
सुनावणीचा दिनांक १८.०६.२०११
अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर.

अपिलकर्ता यांनी दि.३०.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अभिक्षक, एन/विभाग, घाटकोपर (पू) यांचेकडे कार्यकारी अभियंता श्री.जे.बी.गुप्ता यांचे संदर्भामध्ये तपशिलात टपाल व्दारे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना

दि.१३.०९.२०१० रोजी काही माहिती देण्यात आली व सेवा अभिलेखाची माहिती नगर अभियंता कार्यालयात असल्यामुळे त्यांचा अर्ज त्या कार्यालयाकडे हस्तांतर केला असे कळविण्यात आले. नगर अभियंता कार्यालयाने दि.०४.१०.२०१० रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.०८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२०.१०.२०१० रोजी देण्यात आला असून वाहनाच्या बद्दलची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात, त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अधिका-यांची बदली झाली म्हणजे त्यांची त्या त्या कालावधीतील माहिती ही एकत्रित पणे नसते तर त्या त्या कार्यालयात उपलब्ध असते व श्री.गुप्ता यांची माहिती ३ कार्यालयात असून ती त्या त्या कार्यालयातून उपलब्ध करुन द्यावयाची असल्याने विलंब झाला आहे मात्र माहिती सर्व उपलब्ध करुन दिली आहे. त्याबाबतची कागदपत्रे आयोगापुढे दाखल झालेली असल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १८.०६.२०११.**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७३८/अपील क्र.६७७३/०२**

**श्री.महम्मद हमीद शेख**
**नेहरु नगर, चाळ क्र.५,**
**शॉप नं.११, संत ज्ञानेश्वर नगर,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता**
**पाचवा मजला, विस्तारीत इमारत,**
**मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण)**
**कक्ष यांचे कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका, जे.बी.शाह,**
**म्युन्सिपल मार्केट इमारत, पहिला मजला, युसूफ मेहर अली रोड,**
**मस्जिद रेल्वे स्टेशनजवळ, मस्जिद (प), मुंबई ४०० ००९.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १८.०६.२०११**

**अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर.**

अपिलकर्ता यांनी दि.०१.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सनियंत्रण व नोंदणीकरण कक्ष यांचेकडे दि.०१.०३.२०१० ते दि.०१.०४.२०१२ या कालावधीची ए/विभाग हद्दीपासून ते पुर्व उपनगर टी/वॉर्ड हद्दीपर्यंत तसेच पश्चिम उपनगर आर/उत्तर वॉर्ड हद्दीपर्यंत आपल्या परिरक्षण खात्यामध्ये सिव्हील कामाची टेंडर किती लोकांना कोणकोणत्या कंपनींना कोणकोणत्या वॉर्डात विभागात दिलेले आहेत इत्यादी माहिती टपाला व्दारे घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने दि.०६.०९.२०१० रोजी सी.डब्ल्यू,सी., गार्डन, ट्रंचेस, डिसल्टींग टेंडरची या कामाच्या ठेकेदांराची माहिती महापालिकाचे खालील कार्यालयाशी संबंधित असून आपला अर्ज संबंधित कार्यालयास अग्रेषित केला आहे व परस्पर माहिती पाठविण्यासाठी कळविलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.०७.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी योग्य उत्तर दिले असल्यामुळे व संबंधित विभांगाकडे अर्जाचे हस्तांतरण केले असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. अपिलकर्ता यांनी त्यांचा अर्ज ज्या ज्या विभागाकडे हस्तांतर केला आहे त्या त्या विभागांच्या जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधणे आवश्यक होते व त्यांनी माहिती जर दिलेली नाही तर त्या त्या विभागातील प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे अपील दाखल करणे आवश्यक होते व राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा हस्तांतरीत विभागातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचा उल्लेख करुन व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक होते. म्हणजे राज्य माहिती आयोगाकडून हस्तांतरीत विभागातील अधिका-यांना नोटीस काढता आली असती व माहितीच्या संदर्भामध्ये हस्तांतरीत विभागातील जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देता आले असते. परंतु ज्या विभागाकडे माहिती उपलब्ध नाही व त्या विभागातील जन माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अर्जाचे हस्तांतरांची कार्यवाही ही योग्य मुदतीत केली असल्यामुळे व संबंधित अधिकारी आयोगाकडे हजर असल्यामुळे त्यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १८.०६.२०११.**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७३९/अपील क्र.६७७४/०२**

**श्री.अर्जुनलाल एम.छाब्रिया**
**बेले व्हिस्ता, फ्लॅट नं.१५,**
**३ रा मजला, लेक व एल.आय.सी.ऑफीसमोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी**
**यांचे कार्यालय, मुंबई अग्निशम दल, ई विभाग महापालिका कार्यालय,**
**ए.के.हफिझुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ४०० ००८. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी**
**यांचे कार्यालय, मुंबई अग्निशम दल, मरोळ,**
**अंधेरी (पू), मुंबई.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १८.०६.२०११**

**अपिलार्थी यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित आहे / प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०६.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, उप मुख्य अग्निशामक अधिकारी यांचे कार्यालयामध्ये त्यांना दि.२९.०७.२०१० रोजी गॅलेक्सी हाईट, बी विंग, लिंक रोड, बांगुरनगर सिग्नल जवळ, गोरेगांव (प), मुंबई च्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२७.०९.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने दि.०७.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२३.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.कापसे यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हे तर सांगण्यात आले परंतु अपिलकर्ता यांनी कार्यवाहीच्या

संदर्भामध्ये माहिती विचारली व त्या संदर्भात सुध्दा त्यांना स्पष्टपणे उत्तर दिलेले असून अपील निकाली काढण्यात आलेले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे व त्यामध्ये सुध्दा कार्यवाहीच्या संदर्भातच अपील दाखल करण्याचे कारण दाखविलेले आहे.

२. अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.कापसे यांनी अद्याप पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी कार्यावाही केली नाही असा युक्तीवाद केला.

३. अपिलकर्ता श्री.अर्जुनलाल छाब्रिया हे वकील आहे असे लिहितात व माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात कारवाई करुन मिळत नाही किंवा कारवाई केव्हा करण्यात येईल त्याबद्दल ही माहिती विचारता येत नाही. याबद्दल त्यांना माहिती असणे आवश्यक आहे. परंतु माहिती मिळाली असून सुध्दा निव्वळ कार्यवाही का केली नाही व केव्हा करुन मिळेल, या कारणास्तव प्रथम अपील व व्दितीय अपील दाखल करुन आयोगाचा सुध्दा वेळ त्यांनी घेतला व ज्यांना खरोखर माहितीची आवश्यक आहे अशांची अपील सुध्दा प्रलंबित राहतात. अपील मेमोमध्ये सुध्दा अनावश्यक असे अनेक परिच्छेदमध्ये वर्णन करुन अपील मेमो सादर केकला जातो. याबाबतची जाणीव न ठेवल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd---**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७४०/अपील क्र.६७७५/०२**

**श्री.रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज**
**घनश्यामदास चाळ, रुम.क्र.२,**
**संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई ४०० ०१७.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**(परिमंडळ-३) यांचे कार्यालय, मध्य प्रादेशिक विभाग,**
**बावला कंपाउंड, डॉ.बी.ए.रोड,**
**भायखळा (पू), मुंबई ४०० ०२७.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
**(मध्य नियंत्रण कक्ष)**
**(परिमंडळ-३) यांचे कार्यालय, मध्य प्रादेशिक विभाग,**
**बावला कंपाउंड, डॉ.बी.ए.रोड,**
**भायखळा (पू), मुंबई ४०० ०२७.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १८.०६.२०११**

**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी यांच्यावतीने पोलीस निरीक्षक, मध्य नियंत्रण कक्ष खुलाशासह उपस्थित आहेत, प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.३०.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, भायखळा (पू) यांचेकडे दि.२२.०३.२०१० च्या पत्रामध्ये अर्जदाराची पत्नी शिल्पा हिने घर सोडते वेळी रोख रक्कम घरात नसल्याबाबत सांगितले असलेले नमूद जबाब शिल्पा कोणत्या दिनांका अंतर्गत घेतले ते दिनांक व जबाब आणि शिल्पाने कोणत्या पोलीस अधिका-यांना सांगितले की, घरात रोख रक्कम नव्हती त्या अधिका-यांचे नाव, पदची माहिती मागितलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२२.१०.२०१०

रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, धारावी पोलीस ठाणे यांनी सहा.पोलीस आयुक्त यांचेकडे पाठविलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.०१.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२५.११.२०१० रोजी देण्यात आला असून, सदरचे अपील निकाली काढण्यांत आले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, जबाब घेताना जे जबाब म्हटले आहे त्याबद्दलची पुरावे त्यांनी मागितलेले आहे. परंतु माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे जी माहिती उपलब्ध असते ती मिळते, जी उपलब्ध नसते ती मिळू शकत नाही व अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही तपासातील गुणवत्तेच्या संदर्भात असल्याने व न्यायालयात युक्तीवाद करण्यासारखी असल्यामुळे ती उपलब्ध सुध्दा होणे शक्य नाही व त्यात कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित नाही, त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

<u>आदेश</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १८.०६.२०११.**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७४५/अपील क्र.६७८०/०२**

**श्री.विजय के.चौहान**
**२ ए, सन ॲण्ड सी अपार्टमेंट,**
**रॉयल लेन जवळ, जुहूतारा रोड,**
**सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०४९.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मुख्य अभियंता (Development plan) यांचे कार्यालय,**
**४ था मजला, ॲनेक्स बिल्डींग,**
**म्युन्सिपल हेड ऑफीस, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (डी.पी) II**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मुख्य अभियंता (Development plan) यांचे कार्यालय,**
**४ था मजला, ॲनेक्स बिल्डींग,**
**म्युन्सिपल हेड ऑफीस, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २३.११.२०१०**

**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**

**अपिलकर्ता अनुपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेवतीने उप प्रमुख अभियंता यांचा अधिभार असलेले कार्यासन अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यावतीने सहा.अभियंता खुलाशाह उपस्थित, जन माहिती अधिकारी (इ व प्र) (शहर) व जन माहिती अधिकारी (के/पश्चिम) उपस्थित आहेत.**

अपिलकर्ता यांनी दि.०९.०९.२०१० रोजी मुख्य अभियंता (पीआयओ) Development व Planning Department बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

I) Kindly furnish the list of all Records of Permanent Value (like IOD, CC, BCC etc.) that are preserved by your department.

II) Kindly furnish the list of all MCGM dept. under your jurisdiction along with the Address, Contact Nos. Name of Record Ofgficer and Dy Engineer.

III) Kindly furnish the different series in which the case files are maintained by your department at head office and at all Building Proposal & other departments under your jurisdiction.

IV) Kindly furnish in chronological order the list of all files, in each series maintained by the above mentioned departments.

V) Kindly furnish the list of all missing files along with the names of the then Record Officer and Dep. Engg.

VI) Kindly furnish the Annual Indiees of Public Records of all departments under your Jurisdiction from the time it is compiled till date.

सदरच्या माहितीचा कालावधी महानगरपालिका अस्तित्वात असल्यापासुन ते अर्जाच्या तारखेपर्यंत मागितलेली आहे व सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.२८.०९.२०१० रोजी उपमुख्य अभियंता यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा दि.०९.०९.२०१० रोजीचा अर्ज हा सदरची माहिती ही वेगवेगळया विभागातील असल्यामुळे E.E. (B.P.) CITY, E.E. (B.P.) W.S-I H & K, E.E. (B.P.) W.S-II P & R, E.E. (B.P.) E.S. यांचेकडे हस्तांतर केलेला आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१२.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी E.E. (B.P) (E.S.)-II यांनी आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्त्यांची निरीक्षण ११.०० ते ५.०० या काळात करावे व आवश्यक तो खर्चाचा भरणा करावा व त्यानंतर आवश्यक त्या कागदपत्रांच्या खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी त्यांचे समाधान न झाल्याने दि.१५.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०१.११.२०१० रोजी मुख्य अभियंता यांनी दिलेला असून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे.  सर्व संबंधित विभागाचे जन माहिती अधिकारी हे हजर आहेत. अपिलीय प्राधिकारी, मुख्य अभियंता हे हजर आहेत.

३. अपिलकर्ता यांनी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील मेमोमध्ये माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून कारण दिलेले आहे व माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून शास्ती लादावी अशी विनंती केली आहे.  तसेच इमारत व प्रस्ताव विभाग हे सर्वात भ्रष्टाचारी विभाग आहेत व २००० नस्त्या गहाळ झालेल्या आहेत हे वर्तमान पत्रातील लेखात दिले आहे असे त्यांनी अपील मेमोमध्ये म्हटले आहे.

४. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा संसदेने पारित केलेला कायदा आहे व कोणत्याही कायदयामध्ये ज्या तरतुदी केलेल्या असतात किंवा कार्यपध्दती दिलेली असते त्याची काटेकोरपणे सर्वांनी अमंलबजावणी करणे अपेक्षीत असते.  कोणत्याही प्रकारचे आरोप करुन अर्धन्यायीक पध्दतीने निर्णय होत नसतात.  माहितीचा अर्जामध्ये काय माहिती मागितली व ती मिळाली किंवा नाही, मिळाली असल्यास किंवा मिळाली नसल्यास त्या प्रकारची कारणे प्रथम अपीलात किंवा व्दितीय अपीलात देणे आवश्यक असते.  परंतु जन माहिती अधिकारी यांनी जी उत्तरे त्यांना दिलेली आहेत ती त्यांना मान्य आहेत किंवा नाही याबद्दल दोन्ही अपील मेमोंमध्ये कोणताही उल्लेख नाही.  कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदी या सर्व नागरींकांना सारख्याच लागू असतात.  मात्र माहितीच्या अधिकारामध्ये सर्व अपिलकर्ता / अर्जदारांची अशी समजुत आहे की त्यांना माहितीचा अधिकार मिळाला आहे व त्यामुळे कशाही प्रकारे माहिती मागितली तरी ती उपलब्ध झाली पाहिजे व दिली नाही म्हणजे शास्ती झाली पाहिजे.  परंतु अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे माहितीचा अर्ज आहे किंवा नाही, प्रथम अपील, व्दितीय अपील त्याप्रमाणे दाखल झालेले आहे किंवा नाही हे नैसर्गिक न्यायाचे तत्वाप्रमाणे तपासणे आवश्यक असते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या अर्जात जी माहिती मागितली आहे त्यासंदर्भामध्ये तपशिलात तपासणी करणे आवश्यक आहे.

५. अपिलकर्ता त्यांच्या दि.०९.०९.२०१० च्या अर्जात वर नमुद केल्याप्रमाणे अवलोकन केले असता त्यांनी कोणत्याही एका विशिष्ट प्रक्लपाबाबत किंवा इमारती बाबत माहिती मागितली नाही.  तर संपूर्ण बृहन्मुंबईतील महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिका अस्तित्वात असल्यापासुन इमारत

व प्रस्ताव या सर्व विभागातील इमारतींच्या बांधकामाच्या संदर्भातील म्हणजेच बृहन्मुंबईतील सर्वच इमारतींच्या बांधकामाच्या संदर्भातील तपशिलातील माहिती एकाच मुख्य कार्यालयामध्ये मुख्य अभियंता यांचेकडे मागितली आहे व ती सर्व मोघम स्वरूपातील असून अत्यंत विस्तृत प्रमाणात आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती उपलब्ध करून दयावयाची झाल्यास त्या संदर्भातील लाखो पृष्ठ होतील आणि प्रत्येक कार्यालयास त्यांचे दैनंदिन कामकाज बाजूला ठेवूनच सदरची माहिती उपलब्ध करून द्यावी लागेल असे ही त्यांनी आयोगाला सांगितले व तसेच मागितलेली माहिती ही मुख्य अभियंता यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसते. बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विस्तार व व्याप याचा विचार करता सदरची माहिती ही एकत्रित ठेवणे सुध्दा शक्य नाही व त्यामुळे त्या त्या विभागातील कार्यालयांमध्ये ती माहिती जतन केलेली असते व त्यामुळे मुख्य अभियंता यांचे कार्यालयातून अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि.२८.०९.२०१० रोजी सदरची माहिती ही ज्या, ज्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे त्या त्या कार्यालयामध्ये अर्जांचे हस्तांतर केलेले आहे असे कळविण्यात आले होते व त्याप्रमाणे त्या, त्या विभागातील जन माहिती अधिकारी यांनी अनुक्रमे दि.१२.१०.२०१०, २६.१०.२०१०, २८.१०.२०१० रोजी माहिती ही त्या, त्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे व संबंधित नस्तींचे निरीक्षण करून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करून घ्याव्यात असे कळविलेले होते. अपिलकर्ता यांचा दि.०९.०९.२०१० चा अर्जच मुळात मुख्य अभियंता यांचे कार्यालयामधुन जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि.२८.०९.२०१० रोजी प्राप्त झाला होता व त्यामुळे त्यानंतरच त्या माहितीचे स्वरुप पाहून त्याबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती व त्यामुळे अपिलकर्ता यांनी जरी दि.१५.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले होते तरी सदरचे अर्जाचे हस्तांतर झाल्यानंतरच त्या, त्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे खर्चाचा भरणा करून माहिती उपलब्ध करून घ्यावी. तसेच अपिलकर्ता यांनी ज्या स्वरूपात माहिती मागितली आहे त्या स्वरूपात माहितीच उपलब्ध नसते असे ही त्यांना कळविले होते ते आयोगाच्या निदर्शनास आणले.

६. मुख्य अभियंता यांनी किंवा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्चाचा भरणा करावा किंवा माहितीच्या संदर्भामध्ये जे कळविले होते

त्याबाबत मात्र अपिलकर्ता यांनी प्रथम अपील मेमोमध्ये किंवा व्दितीय अपील मेमोमध्ये त्यांना मान्य नसल्याचे कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही व तसे निवेदन सुध्दा त्यांनी आयोगापुढे दिलेले नाही.

७. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नागरीकास माहिती मागण्याचा अधिकार प्राप्त झाला असला तरी माहिती ही कशी व कोणती, किती मागावी याबाबत तपशिलात तरतुद नसली तरी अधिनियमाच्या सर्व कलमांचा एकत्रित विचार केल्यास माहितीचे म्हणजे कागदपत्राचे, दस्तऐवजांचे निश्चित वर्णन करणे आवश्यक आहे असे दिसून येते. अपिलकर्ता यांनी त्यांच्या व्दितीय अपील मेमोमध्ये कलम ४ प्रमाणे माहिती उपलब्ध नाही तसेच महाराष्ट्र पब्लिक रेकॉर्ड ॲक्ट २००५ व डिस्ट्रक्शन ऑफ रेकॉर्ड ॲक्ट १९१७ प्रमाणे माहिती उपलब्ध नाही असे नमूद केले आहे. परंतु महानगरपालिकेच्या त्या संपूर्ण विभागामध्ये त्यांना अभिलेख्यांचे दस्तऐवजांचे निरीक्षण करण्यासाठी कळविले असतांना सुध्दा व त्यांनी निरीक्षण केलेले नसतांना सुध्दा वरील प्रमाणे कलम ४ प्रमाणे किंवा इतर कायद्यांप्रमाणे माहिती उपलब्ध नाही असा त्यांनी निष्कर्ष काढलेला दिसून येतो. वास्तविक कलम ४ च्या पोट कलम २ मध्ये माहिती मिळविण्यासाठी ती इंटरनेटसह तसेच प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरुपात प्रसारित करण्यात येईल तसेच सर्व माहिती ही पोट कलम ४ प्रमाणे खर्चाचा विचार करुन उपलब्ध करुन देण्यात येईल अशा सर्व प्रकारच्या तरतुदी केल्या आहेत.

परंतु सदरच्या अधिनियमास पूर्व लक्षी प्रभाव दिला नाही व अपिलकर्ता यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका स्थापन झाल्यापासून सर्व कार्यक्षेत्रांतील इमारतींच्या संदर्भामध्ये जी माहिती मागितली आहे ती सर्व माहिती प्रसिध्द किंवा इंटरनेट /संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे शक्य आहे किंवा नाही त्याबाबतचा सुध्दा माहिती मागविताना विचार केलेला नाही. मात्र शास्तीची मागणी केली आहे. अधिनियमाच्या प्रास्ताविकेमध्ये "आणि ज्या अर्थी प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामध्ये अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच, शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधन संपत्तीचा इष्टतम वापर होणे, आणि संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे, याबाबींनाही बाध येण्याची शक्यता आहे." असे ही म्हटले आहे व त्यावरुनही मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ती उपलब्ध करुन देण्याच्या शक्यतेबद्‍दल विचार करणे आवश्यक असते. अधिनियमाचे कलम ७ (९) मध्ये "सार्वजनिक

प्राधिकरणांची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास, किंवा प्रस्तुत अभिलेख सुरक्षित ठेवण्याच्या किंवा जतन करण्याच्या दृष्टीने ते हानीकारक नसल्यास, माहिती ज्या स्वरुपात मागण्यात आली असेल त्याच स्वरूपात ती सर्वसाधारणपणे, पुरविण्यात येईल" अशी तरतुद आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दि.२८.१०.२०१० रोजी सुध्दा कळविलेले आहे व त्यानंतर दि.१२.०१.२०११ रोजी सुध्दा अपिलकर्ता यांना त्यांच्या एकूण सात मुद्यांच्या संदर्भामध्ये कळविण्यात आलेले दिसून येते.

८. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम २(च) प्रमाणे "माहिती" यांचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, इ-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दिपत्रके, आदेश, रोजवहया इत्यादीचा समावेश होतो असे म्हटले आहे व कलम २(झ) मध्ये "अभिलेख" या संज्ञेची व्याख्या केली आहे आणि त्यामध्ये

क) कोणताही दस्तऐवज, हस्तलिखीत व फाईल,

ख) एखाद्या एस्तऐवजाची कोणतीही मायक्रोफिल्म आणि प्रतीरुप प्रत यांचा समावेश होतो असे म्हटले आहे व

कलम २ (ञ) नुसार "माहितीचा अधिकार" याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे आणि त्यामध्ये, -

(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे,

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे,

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमूने घेणे, इत्यांदी याबाबतचा अधिकाराचा समावेश होतो."

यावरुन या सर्व तीनही व्याख्यांचे एकत्रित वाचन करुन व विचार करुनच माहितीच्या अर्जात मागितलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेणे आवश्यक असते व त्याप्रमाणे विचार केल्यास अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही निश्चितच मोघम स्वरुपाची व अतिशय विस्तृत प्रमाणात आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

९. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(१) प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण त्याच्या अख्यारितील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढया जास्तीत जास्त अधिका-यांना राज्य जन माहिती अधिकारी म्हणुन पदनिर्देशित करील अशा प्रकारची तरतुद आहे. ही तरतुद करतांना अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची जे बंधन घालण्यात आले आहे, त्या मर्यादेमुळेच माहिती जर ३० दिवसात उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास ज्या कार्यालयात माहिती उपलब्ध आहे त्याच कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त केल्यासच ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देता येईल असे अपेक्षित आहे. माहिती जर कनिष्ठ कार्यालयामध्ये उपलब्ध असेल आणि वरिष्ठ कार्यालयात ती मागितली तर ती ३० दिवसात उपलब्ध होईल असे नाही व त्यामुळेच सार्वजनिक प्राधिकरणातील ज्या ज्या स्तरावर जी जी माहिती उपलब्ध आहे त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी नियुक्त करण्याची तरतुद करण्यात आली आहे. त्यातही अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे त्या संबंधित माहिती अधिका-यांकडे अर्जदाराने अर्ज करावयाचा आहे तरच कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांत माहिती उपलब्ध होउ शकेल. त्याकरिता कलम ५, ६ व ७ या तिन्ही कलमांचे एकत्रित वाचन करुन अर्थ लावणे आवश्यक असते.

सदरच्या प्रकरणात अपिलकर्ता यांनी मात्र संपूर्ण बृहन्मुंबईतील महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेच्या स्थापनेपासूनची सर्व इमारतींच्या बांधकामाची माहिती तपशिलात मागणे हे अव्यवहार्य आहे व प्रास्ताविकेतील वर नमूद केलेल्या उद्दिष्ठांशी विसंगत आहे व महानगरपालिका सन १८८८ मध्ये स्थापन झाली तेव्हा पासूनची माहिती ही प्रसिध्द करणे किंवा संकेतस्थळावर प्रसिध्द करणे याबद्दल सुध्दा अधिनियमाचे कलम ४(४) च्या संदर्भात विचार केल्यास अव्यवहार्य आहे.

१०. अशा प्रकारे मोघम व अतिशय व्यापक प्रमाणात माहिती मागणे कोणतेही सार्वजनिक हित नाही. असे असले तरी सर्व जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता / अर्जदार यांना त्यांच्या विभागीय कार्यालयामध्ये उपस्थित होउन उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे, अभिलेखांचे, दस्तऐवजांचे निरीक्षण करुन व त्याचा खर्च भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे जे कळविलेले आहे ते अधिनियमाच्या तरतुदीशी

सुसंगत आहे.  परंतु तसे निरीक्षण न करता किंवा निरीक्षणाचा खर्च न भरता अपिलकर्ता यांनी त्या कार्य पध्दतीच्या बाबत कोणताही आक्षेप न घेता मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणुन किंवा महानगरपालिकेत फार भ्रष्टाचार आहे असे कारण देउन व्दितीय अपील दाखल करणे हे योग्य नसल्याने सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

<u>**आदेश**</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०६.२०११.**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७४७/अपील क्र.६७८१/०२**

**श्री.इंद्र बहादूर शर्मा**
**१०, शर्मा चाळ, अंधेरी-कुर्ला रोड,**
**कृष्णा नगर, मरोळ नाका,**
**अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**श्रीमती.परमेश्वरीदेवी दुर्गादत्त तिबरेवाला लायन्स,**
**जुहू कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स,**
**श्रीनिवास बागारका मार्ग, जे.बी.नगर,**
**अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**श्रीमती.परमेश्वरीदेवी दुर्गादत्त तिबरेवाला लायन्स,**
**जुहू कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स,**
**श्रीनिवास बागारका मार्ग, जे.बी.नगर,**
**अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०६.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी म्हणुन श्रीमती परवेश्वरदेवी दुर्गादत्त तिबरेवाला, लायन्स, जुहु कॉलेज आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स, जे.बी.नगर, अंधेरी (पू) यांचेकडे महाविद्यालयाच्या अल्पसंख्याकांच्या दर्ज्याच्या संबंधात जे Affidavit दाखल केले आहे तसेच संस्थेचे अद्यावत मेमोरंडम व नियमांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती पोष्टाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना उत्तर दिलेले आहे. सदरचे उत्तराने समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२३.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम

अपीलाच्या संदर्भामध्ये प्राचार्य यांनी महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये चौकशी केली असता सदरची बाब ही १९९०-१९९३ ची असल्यामुळे Affidavit ची प्रत उपलब्ध नाही. मुंबई विद्यापिठाकडून आलेल्या दि.०९.०६.१९९३ च्या पत्राची प्रत आपणास दिलेली आहे व त्या विद्यापिठाकडे ती माहिती उपलब्ध असण्याची शक्यता आहे. संस्थेच्या मेमोरंडमच्या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही व तसेच आपल्या अर्जामध्ये माहितीचा कालावधी हा शैक्षणीक वर्ष २०१० हा दिला आहे. त्यामुळे आपला अर्ज व अपील निकाली काढण्यात आला आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, सदरचे महाविद्यालय हे अल्पसंख्यांक दर्जा आहे या आधारावर प्रवेश देत आहे व त्यामुळेच खरोखर महाविद्यालयास अल्पसंख्यांक दर्जा आहे किंवा नाही हे जाणुन घेण्यासाठी त्यांच्या पत्रामध्ये अल्पसंख्यांक दर्जाच्या संदर्भामध्ये Affidavit केलेले आहे असे म्हटल्यामुळे त्यांनी Affidavit ची प्रत मागितली आहे. तसेच मेमोरंडम व नियम यावरुन संस्थेचा दर्जा कळू शकेल. परंतु दोन्ही प्रकारची माहिती ही जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी नाकारली आहे.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्या महाविद्यालयाच्या जन माहिती अधिकारी आहेत व महाविद्यालयातील शैक्षणीक बाबींच्या संदर्भामध्ये माहिती त्या देउ शकतात. महाविद्यालयास अल्पसंख्यांकांचा दर्जा आहे किंवा नाही ही बाब संस्थेच्या अखत्यारित येते. अल्पसंख्यांक दर्जा हा संस्थेस मिळतो व संस्था ही त्याबाबतचे संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे पत्र व्यवहार करते. तसेच अपिलकर्ता यांना सुध्दा मुंबई विद्यापिठाचे जे पत्र उपलब्ध करून दिले आहे ते पत्र मुंबई विद्यापिठाने संस्थेच्या सचिवास संबोधित केले आहे व त्यामुळे Affidavit ची प्रत असल्यास ती संस्थेच्या अभिलेख्यामध्ये मिळू शकेल. तरी सुध्दा महाविद्यालयाच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध असल्यास शोध घेउन देता येईल. मात्र संस्थेचे मेमोरंडम व नियम हे संस्थेकडूनच उपलब्ध होतील. संस्थेच्या कामकाजाची माहिती ही महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध नसते. तसेच महाविद्यालयातील माहिती अधिकारी व

प्राचार्य हे सुध्दा संस्थेचे सेवक असल्यामुळे संस्थेस माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देउ शकत नाही. मात्र सदरचा अर्ज हा संस्थेकडे हस्तांतरीत करता येईल. असे असल्याने सदरचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१.अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी म्हटल्याप्रमाणे उपरोक्त Affidavit ची प्रत महाविद्यालयाच्या अभिलेख्यांमध्ये शोध घेउन उपलब्ध झाल्यास अपिलकर्ता यांना विना मुल्य रजिष्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी व उपलब्ध नसल्यास सदरचा माहितीचा अर्ज हा संस्थेकडे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता हस्तांतरीत करावा. संस्थेने माहिती उपलब्ध न केल्यास अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल करावी.**

**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०६.२०११.**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७५५/अपील क्र.६७८७/०२**

**सौ.मंजुळा जगन्नाथ साटम,**
**२/२०४, स्वराज्य सहकारी गृहनिर्माण संस्था मार्या.,**
**सेनापती बापट मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०१३.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**
**(बृहन्मुंबई महानगरपालिका),**
**उप मुख्य अभियंता ग्राहक सेवा,**
**दुसरा मजला, परिवहन अभियांत्रिकी इमारत,**
**टिळक रोड, दादर (पू), मुंबई ४०० ०१४.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्राहक सेवा (जी/उत्तर)**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**
**(बृहन्मुंबई महानगरपालिका),**
**उप मुख्य अभियंता ग्राहक सेवा,**
**दुसरा मजला, परिवहन अभियांत्रिकी इमारत,**
**टिळक रोड, दादर (पू), मुंबई ४०० ०१४.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**
**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व प्रथम अपिलीय प्राधिकारी खुलाशासह उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२०.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी अंतर्गत गा-हाणे निवारण मंच, ग्राहक सेवा जी/उत्तर, बेस्ट उपक्रम, परिवाहन अभियांत्रिकी इमारत यांचेकडे ग्राहक क्र.७११-९३५०३१*७ तसेच यंत्रणा क्र.२१२५१४८ हा आहे. या संदर्भात केलेल्या विज जोडणी अर्जाची अधिकृत प्रत मागितलेली दिसू येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२०.१०.२०१० रोजी एकूण ७ प्रतींसाठी रू.१४/- च्या खर्चाचा भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.१४.१२.२०१० रोजी झाला. त्यानुसार दि.१५.१२.२०१० रोजी त्यांना हवी असलेल्या दस्तऐवज देण्यात आले आहे. परंतु तरी सुध्दा अपुरी व चुकीची माहिती दिली या कारणास्तव अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. त्यांनी अपुरी व चुकीची माहिती उपलब्ध झाली असे म्हटले आहे. परंतु ग्राहक क्र.७११-९३५-०३१*७ तसेच यंत्रणा क्र.२१२५१४८ हा आहे. वरील विज जोडणी संदर्भात अर्जाची अधिकृत प्रत मिळावी असे म्हटले आहे. परंतु अपिलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. ही दि.१५.१२.२०१० रोजी उपलब्ध केली आहे व त्यावर ग्राहक क्र. दिसून येतो. मात्र अपिलकर्ता यांनी व्दितीय अपील हे दि.०१.१२.२०१० रोजी केलेले आहे व त्यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७५१/अपील क्र.६७८४/०२**

**श्री.शिवदास अशोक भोईर**
**रा.वेहळे, ता.भिवंडी, जि.ठाणे. ... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**तहसिलदार भिवंडी यांचे कार्यालय,**
**ता.भिवंडी, जि.ठाणे. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार, भिवंडी यांचे कार्यालय,**
**ता.भिवंडी, जि.ठाणे.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०३.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उशीरा उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी तहसिलदार, भिवंडी कार्यालयामध्ये कै.सोराबजी मेहरबानजी यांच्या मृत्यु दाखल्याबाबत मा.तहसिलदार, भिवंडी यांनी एस.आर.क्र.५६०, दि.०९.०९.२००८ रोजी आदेश केलेला आहे. सदर आदेशाची प्रत देणे व तो दाखला कागदपत्रांच्या आधारे दिला त्याच्या प्रती देणे अशी माहिती स्वत: घेउन जाणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी दि.१८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला असून त्यामध्ये सदरचे मृत्युचे प्रकरण १० दिवसामध्ये शोध घेउन अर्जदार यांना माहिती पुरवावी असे आदेश दिलेले असून सुध्दा अपिलकर्ता यांना माहिती मिळाली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता यांचे तर्फे श्री.जितेंद्र आर.पाटील हे वकील हजर झाले. त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलार्थी हे भिवंडी येथील कै.सोराबजी मेहरबानजी भिवंडीवाला यांचे शेत जमिनीवर कुळ आहे कै.सोराबजी मेहरबानजी भिवंडीवाला हे मयत झाल्यावर जे वारस

लावण्यात आले आहे ते अनेक असुन कै.सोराबजी मेहरबानजीचे वारस नाही व त्यामुळे तत्कालीन तहसिलदार यांनी आदेश क्र.५६०, दि.०९.०९.२००८ प्रमाणे कोणत्या आधारावर वारस लावण्यात आले ती माहिती मागितली होती. परंतु नस्त्या उपलब्ध होत नाही असे कारण देउन किंवा सेतुकडे संपर्क साधावा असे कारण देउन माहिती उपलब्ध करून देण्याची टाळाटाळ करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, कार्यालय भिवंडी हे उशिराने उपस्थित झाले व त्यांनी आयोगाकडे तोंडी युक्तीवाद केला व युक्तीवाद करताना सांगितले की, तत्कालीन सेतु लिपीक व सध्या कार्यरत असलेले सेतु लिपीक यांना वेळोवेळी सुचना देउन माहिती शोधण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आज पर्यंत सदर प्रकरणाची संचिका उपलब्ध झाली नाही. २००८ मधील काही संचिका उपलब्ध होतात पंरतु ब-याच संचिका या गहाळ झाल्या आहेत असे ही त्यांनी सांगितले. तसे असल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेखे अधिनियम २००५ च्या कलम ९ प्रमाणे पोलीसांकडे एफ.आय.आर. दाखल करणे संयुक्तीक राहिल त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असुन हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत तहसिलदार भिवंडी यांनी सेतु कडील २००८ मधील संचिका गहाळ झाल्याच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००८ च्या तरतुदीप्रमाणे पोलीसांकडे एफ.आय.आर. दाखल करावे.**

**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७४९/अपील क्र.६७८२/०२**

**श्री.भगवान राम करिया**
**कोटेश्वर आशिष, ६ वा मजला, रू.नं.६०१,**
**जे.एन, रोड, मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप नियंत्रक**
**नियंत्रक वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**शासकीय कुटीर क्र.७,**
**फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.नियंत्रक**
**नियंत्रक वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**शासकीय कुटीर क्र.७,**
**फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**
**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी सह सहाय्यक आयुक्त, वजने व मापे यांचेकडे Appeal Report for missing stamp plate on railway platform scale machine e.g Eastern scale and northern passenger scale machine च्या संदर्भामध्ये त्यांनी दिलेले पत्र दि.२७.०४.२०१० रोजी व त्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची व पत्रव्यवहाराची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.०४.०८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. तसेही अपिलकर्ता यांनी आता पर्यंत अनेक अर्ज दाखल केले आहेत. व अनेक अपीले दाखल केलेली आहेत असे कागदपत्रांवरुन दिसून येते व त्यांना वेळोवेळी माहिती सुध्दा दिलेली आहे व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दि.१७.०९.२०१० रोजी दिलेला आहे. तरी सुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी आज पर्यंत या एकाच मुद्यांच्या संदर्भात अनेक वेळा माहिती मागितली आहे. त्यांना दि.०९.०७.२०१० रोजीच्या पत्रान्वये सुध्दा माहिती दिली आहे. अपिलकर्ता यांनी मेसर्स इस्टर्न स्केल कंपनी विरोधात का कारवाई केली नाही असा वेळोवेळी प्रश्न उपस्थित केला आहे. परंतु सदर कंपनी कडून उल्लंघन झाल्याचे आढळून आलेले नसल्याने कारवाई करण्यात आलेली नाही असे त्यांना सांगितले असताना तसेच उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई महानगर विभाग यांना तपासणी विषयी सुचित केल्याचे पत्र सुध्दा दाखविण्यात आले व पत्र व्यवहाराची नस्ती सुध्दा दाखविली व त्यामुळेच प्रथम अपील हे फेटाळण्यात आले होते व मुद्दा क्र.२ च्या संदर्भामधील शासकीय जन माहिती अधिकारी यांनी उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई महानगर विभाग यांना दि.३१.०३.२०१० रोजी दिलेल्या पत्राची प्रत दयावी असे आदेश दिले व त्या पत्राची प्रत सुध्दा दिलेली आहे. यावरुन या संदर्भातील सर्व माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.९७३/अपील क्र.६६५६/०२**

**श्री.डॉ.मोहन बिजूर**
**१ बी.सी.हाय पीक को.हौ.सो.,**
**२०-ए, एस.व्ही.रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५१.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था (३), पश्चिम उपनगरे,**
**कक्ष क्र.६९, गृहनिर्माण भवन,**
**तळ मजला, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५०.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक**
**सहकारी संस्था, के-पूर्व विभाग,**
**बि.नं.अ/१, रुम नं.३१५, ३ रा मजला, वडाळा ट्रक टर्मिनल,**
**आर.टी.ओ.जवळ, वडाळा (पू), मुंबई ४०० ०३७.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २३.०२.२०११**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१३.१२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी सस्था के/पूर्व वॉर्ड यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

a. Register of members in “I” form prescribed under Rules 32 of the Rules for the period Jan 2007 onwards till date.
b. List of Members in “J” form prescribed under Rule 33 of the Rules for the period Jan 2007 onwards till date.
c. Copy of the No Objection Certificate / permission give by society allowing the Damle family to occupy the flat no.3 & 4.
d. Status of “Damle” – whether Owner / Lessee, Tenant, etc as per Society records in relation to flat no.3 & 4 resp:

e. Details of previous owner, change of Ownership relating to flat no.3 & 4 since 1993 onwards.

f. Documents submitted for transmission of shares (relating to flat no.3) consequent upon please do the needful & oblige.

सदरची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक यांनी दि.२०.१२.२०१० रोजी अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये आपण मागितलेली माहिती ही संस्थेसंदर्भातील असल्यामुळे आपण संस्थेचे सभासद असल्यास आपण ती संस्थेस संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी व माहितीचा अधिकार २००५ मध्ये कलम २(च) मधील तरतुदीमध्ये उपलब्ध असलेली माहिती पुरविणे अभिप्रेत असून जेथे वेगळयाने माहितीचे संकलन, संशोधन पृथ:करण करणे आवश्यक आहे, अशा स्वरूपाची माहिती पुरविणे अभिप्रेत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.०५.०१.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०७.०२.२०११ रोजी देण्यात आला असून अपील फेटाळण्यात आलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ते संस्थेचे सभासद नसले तरी त्यांची दिवंगत पत्नी ही संस्थेची सभासद होती व त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने त्यांचे कब्जास कोणत्याही प्रकारे हरकत घेउ नये असे आदेश दिले आहे व त्यामुळे त्यांनी सभासदत्व का नाकारण्यात आले याबाबतची माहिती मागितली होती.

३. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता / अर्जदार हे संस्थेचे सभासद नाही. सहकारी संस्थेचे सभासद असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३२ प्रमाणे संस्थेची माहिती त्या कलमामध्ये दिलेल्या संदर्भामध्ये मागता येते. परंतु अपिलकर्ता हे संस्थेचे सभासद नाही व अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती माहिती संस्थास्तरावरील आहे व संस्था ही सदरची माहिती उपनिबंधक यांचेकडे कधीही पाठवित नाही व संस्थेने पाठवावी अशी तरतूद सुध्दा नाही. तसेच सहकारी गृह निर्माण संस्थेस शासनाचे अनुदान व सवलती दिल्या नसल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी सुध्दा त्या संस्थेस लागु होत नाहीत. त्यावर अपिलकर्ता यांनी

पुन्हा युक्तीवाद करताना सांगितले की, अधिनियमात कलम २(च) प्रमाणे जन माहिती अधिकारी किंवा सार्वजनिक प्राधिकरण हे अंमलात असलेल्या कायदयाच्या तरतुदीनुसार एखादया खाजगी निकायांशी संबंधित माहिती उपलब्ध करुन घेउ शकते तर त्या कागदपत्रांचा समावेश हा माहितीच्या व्याख्येत होतो व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सहकारी संस्थेकडून मागितलेली माहिती, माहिती या व्याख्येमध्ये उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु पुन्हा त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संस्थेला उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयात देणे बंधनकारक नसल्यामुळे ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कारवाई करुन सुध्दा उपलब्ध करुन देता येणार नाही व अपिलकर्ता हे सभासद सुध्दा नाही.

४. ज्या सहकारी संस्थेस शासनाकडून अनुदान उपलब्ध होत नाही किंवा कोणत्याही प्रकारची सवलत मिळाली नाही तर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागु होत नाही असा निर्णय मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिला आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २३.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०३२८/अपील क्र.६७८८/०२**

**श्री.सुरेश कमळाकर पाटील**
**१/६१, प्रकल्प सोसायटी,**
**जुनी एम.एच.बी.कॉलनी, गोराई रोड,**
**बोरीवली (प), मुंबई ४०० ०९१.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा करनिर्धारक व संकलक,**
**करनिर्धारक व संकलक खाते,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य इमारत,**
**तळ मजला, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप करनिर्धारक व संकलक,**
**करनिर्धारक व संकलक खाते,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य इमारत,**
**तळ मजला, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.११.२०१०**

**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**

**अपिलकर्ता उपस्थित. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२०.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, करनिर्धारक व संकलक यांचेकडे CHODE/ACT 2182 दि.१८.०५.२०१० नुसार (मा.स्पेशल कोर्ट, लाचलुचपत खाते, मुंबई यांच्या दि.३०.०४.२००७ च्या निकालानुसार) माझ्या विरुध्द लावण्यात आलेल्या आरोपातून निष्कलंक मुक्तता केल्यावर प्राथमिक चौकशी १९८७-८८ झाली असताना पुन्हा प्राथमिक चौकशी व तदनुसार खाते निहाय चौकशी आरंभिली असताना. खाते निहाय चौकशी बंद करुन आरोप पत्र मागे घेण्यात आले हे सत्य आहे काय इत्यादी माहिती एकूण सात मुदयांमध्ये मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी ०६.१२.१८८८ ते १२.०९.२००७ व १३.०९.२००७ ते आजतागायत (२०.०७.२०१०) असा आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.०९.०८.२०१० रोजी अपिलकर्ता यांना मुदये निहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून

येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२४.०८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२३.०९.२०१० रोजी देण्यात आला असून प्रश्न २(ब) बाबत चौकशी खात्यास सादर केलेल्या प्रस्तावाच्या व चौकशी खात्यातुन झालेल्या अभिप्रायांच्या व त्या अनुषंगाने संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रती तसेच प्रश्न ३(इ) संदर्भातील पदोन्नती समिती समोर अग्रेशित केलेल्या प्रस्तावाची छायांकित प्रत देण्याचे निर्देश देण्यात आले आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यानंतर अपिलकर्ता यांना दि.३०.०९.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली येते. पंरतु अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे व त्या व्दितीय अपील मेमोमध्ये त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भामध्ये अनियमितता झाली असल्यामुळे बँकेच्या दराने व्याज देण्याकरिता तसेच मानीव पदोन्नती देण्याकरिता व्दितीय अपील दाखल केले आहे असे कारण दिलेले आहे.

२. अपिलकर्ता यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भामध्ये निर्णय प्रक्रियेबद्दल युक्तीवाद केला व मागितलेली माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध झाली हे मात्र मान्य केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा अपिलकर्ता यांना त्यांनी मुद्दयेनिहाय मागिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये सर्व कागदपत्रे विहित मुदतीतच उपलब्ध करुन दिली आहे असे सांगितले.

३. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे माहिती ही कागदपत्रांच्या छायांकित प्रतींच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेमध्ये गुणवत्तेबाबत चौकशी करुन कारवाई करुन देण्याचे आदेश देणे हे अपेक्षित नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

<u>**आदेश**</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २३.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०२६४/अपील क्र.७०७०/०२**

**श्री.गुलाम वारीश शेख**
**रुम नं.२, घनश्यामदास कि चाळ,**
**काला किल्ला, धारावी, मुंबई ४०० ०१७.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**म्हाडा भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**म्हाडा भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक निरंक**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२०.०५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा यांचेकडे सन २००४ ते २००९ या कालावधीत आमदार सुरेश शेट्टी यांच्या मतदार संघामध्ये क्षेत्रात निवडून आल्यानंतर त्यांच्या फंडातून किती विकास कामे करण्यात आली. या संदर्भामध्ये एकूण ६ मुदयांमध्ये माहिती मागितली असून ती व्यक्तीश: घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.०८.०६.२०१० रोजी आपण मागितलेली माहिती संकलित करण्याचे काम सुरु आहे. संकलित करण्यात कालावधी लागण्याची शक्यता आहे. माहिती संकलित होताच आपणास निरीक्षणार्थ बोलविण्यात येईल. निरीक्षणाअंती आपणास जी माहिती आवश्यक आहे असे स्पष्ट कराल त्या माहितीच्या छायांकित प्रती प्रत रु.२/- प्रमाणे रक्कम अदा केल्यानंतर आपणास देण्यात येतील असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.३१.०७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.३०.०८.२०१० रोजी

देण्यात आला असून प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे अपील निकाली काढण्यांत आले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी उपस्थित राहू शकत नाही असे कळविले आहे, परंतु दि.१५.०६.२०११ रोजी लेखी युक्तीवाद आयोगाकडे दाखल केलेला आहे.  त्यामध्ये त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील काही नस्त्यांचे निरीक्षण केले आहे व गावावरुन परत आल्यावर उर्वरित अभिलेख्यांचे निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेईल असे म्हटलेले आहे.  मात्र निरीक्षण केल्यानंतर विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असे त्यांना अनुपस्थितीमध्ये जन माहिती अधिकारी यांना आदेश दयावेत असे म्हटले आहे.

३. परंतु अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२०.०५.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.०५.२०१० रोजी म्हणजे विहित मुदतीत मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये निरीक्षण करुन आवश्यकत्या कागदपत्रांचा प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे व अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती पाच वर्षाच्या कालावधीतील अतिशय विस्तृत प्रमाणात असल्यामुळे निरीक्षणास विलंब होणे हे ही अपरिहार्य असल्यामुळे व अपिलकर्ता हे स्वत: निरीक्षण अपूर्ण ठेउन गावी निघून गेले असल्याने विनामुल्य माहिती देण्याचे आदेश देता येणे योग्य होणार नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २३.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०३३८/अपील क्र.६४५०/०२**

**श्री.अर्जुनलाल एम.छाब्रिया**
**बेले व्हिस्ता, फ्लॅट नं.१५,**
**३ रा मजला, लेक व एल.आय.सी.ऑफीसमोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता यांच्यावतीने त्यांचे प्रतिनिधी उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग यांचेकडे दि.२३.०३.२०१० रोजी त्यांनी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये व कारवाईच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांने दि.२९.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिला नसल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता हे वकील असल्यामुळे व त्यांचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार माहिती मागवून देण्याचा व्यवयास आहे असे दिसते व त्यामुळे ते त्यांच्या अनेक अपीलांच्या सुनावणीसाठी स्वत: हजर न राहता कायम प्रतिनिधी पाठवत असतात. अपिलकर्ता यांचा माहितीचा अर्ज प्रथम अपील व व्दितीय अपीलामध्ये अनेक परिच्छेदामधून एकच माहिती पुन्हा पुन्हा पुनरावृत्ती करुन मागितलेली असते व त्यातून कारवाई करुन मिळण्याची सुध्दा मागणी असते. एकच तक्रार ते मंत्री महोदयांपासून तर संबंधित पोलीस स्टेशन पर्यंत जे अधिकारी असतील त्या सर्वांकडे दाखल केलेली असते. त्या सर्वांकडे दाखल केलेल्या एकच तक्रारीचा सर्व परिच्छेदांमध्ये उल्लेख असतो. त्यामुळे त्यांचे अर्ज

अपील हे अर्धन्यायीक तत्वा प्रमाणे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नसतात व त्यामुळेच प्रत्येक कार्यालयात सुध्दा त्यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये प्रक्रिया होण्यास विलंब तरी किंवा दुर्लक्ष तरी होते. माहिती मागण्याचा अधिकार मिळाला याचा अर्थ कोणत्याही स्वरुपात अर्ज, अपील दाखल करणे असे होत नाही. मागितलेल्या माहितीचे वर्णन किंवा कागदपत्रांचे वर्णन हे थोडक्यात करुन त्यांच्या छायांकित प्रती मागणे असे, सुटसुटीत अर्ज करणे अपेक्षित असते व त्यामुळे अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात एखादया माहिती अधिकारी यांनी दखलच घेतली नसेल तर त्यास दोषी धरता येणार नाही.

३. मात्र आयोगाची नोटीस गेल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित न राहणे हा आयोगाचा अवमान असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपीलाच्या सुनावणीस गैरहजर असल्याबाबत आयोगास खुलासा सादर करावा तसे न केल्यास शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**२. अपिलकर्ता यांच्या दि.२३.०८.२०१० च्या अर्जामध्ये उल्लेख केलेल्या दि.२३.०३.२०१० च्या तक्रारीच्या संदर्भात गृह विभाग, मंत्रालयात काय कार्यवाही झाली, याबाबतची माहिती अपिलकर्ता यांना कळविण्यात यावी.**

**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २३.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अवये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०१०/३००९/तक्रार क्र.१५८५/०१**

**श्री.एरॉल सिक्वेरा**
**३ ए, पृथी निवास, प्रभात कॉलनी,**
**सातांक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५. ... तक्रारदार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (इ व का)**
**महानगरपालिका, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५. ... उत्तरवादी**

**निर्णय**

**तक्रारीचा दिनांक २५.११.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १९.०४.२०११**

**तक्रारदार - हजर, जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.२१.१०.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) अन्वये अपील क्र.२०२०/७४७/०२ मधील दि.०८.०४.२०१० चे निर्णयातील आदेशाप्रमाणे अपिलकर्ता यास जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का), श्री.वि.जे.देसाई यांनी अपिलकारास माहिती पुरविलेली नाही. आयोगाच्या दि.१८.१२.२००८ च्या आदेशाचे पालन केले नाही. विलंबाबाबत श्री.देसाई यांना दि.१८.१२.२००८ च्या आदेशान्वये रू.१५,०००/- ची शास्ती लादलेली आहे त्या व्यतिरिक्त या आदेशान्वये रू.१०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदर ची रक्कम ही श्री.देसाई यांच्या वेतनातून दोन समान मासिक हप्त्यात वसूल करावे. सदर शास्तीची वसूली श्री.देसाई यांच्या मे २०१० पासून सुरु करावी असे आदेश दिलेले असताना माहिती दिली नाही म्हणुन व त्या आदेशांचे पालन केले नाही म्हणुन तक्रार केली आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी दि.२५.११.२०१० रोजी स्मरण पत्र दिले आहे. त्या संदर्भामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.वि.जे.देसाई यांचा आयोगाकडून खुलासा मागविण्यात आला होता. त्यामध्ये ऑगस्ट २००६ पासून नोव्हेंबर २००८ पर्यंत सहा.अभियंता (इ व का) विभागात एच/पूर्व विभागात कार्यरत होतो. सन २००८ पासून पदोन्नती पी/दक्षिण विभागात झाली असून सध्या पी/दक्षिण विभागात कार्यरत आहे. सन २००६/०८ पर्यंतच्या आलेल्या सर्व माहिती अधिकार अर्जाचा जन माहिती अधिकारी यांना त्यांने निपटारा केला होता. संबंधितांना आवश्यक माहिती पुरविली होती. एरॉल सिक्वेरा याची माहिती बाबत रू.१५, ०००/- दंड आकारण्यात आला होता. त्यानंतर सन

२००९ मध्ये याच प्रकरणात तक्रार केली होती. माहिती मागितलेली होती. एच/पूर्व विभागाचा कार्यरत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेली माहिती त्यांना दिली होती तरीही त्यांचे कडून रू.१०, ०००/- चा अतिरिक्त दंड आकारण्यात आला होता. सदर दंड मासिक वेतनातून वसूल करण्यात आला होता. याबाबत पुन्हा एकदा एरॉल सिक्वेरा यांनी तक्रार केली आहे. सन २००८ पासून पी/दक्षिण विभागात पदोन्नती झाली असल्यामुळे एच/पूर्व विभागाची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही तरीही सदर बाबतची माहिती माझ्याकडून मागितली जाते. एरॉल सिक्वेरा यांना वस्तुस्थिती माहिती असूनही ते वारंवार जाणिवपूर्वक आकस बुध्दीने माझ्यावर दोषारोप करतात. सदर बाबत कोणतीही माहिती हवी असल्यास अर्जदार एच/पूर्व विभागाच्या कार्यरत जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करून शकतात असा खुलासा दिलेला आहे. पुन्हा विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का), एच/पूर्व विभाग यांनी लेखी खुलासा दि.१८.०४.२०११ रोजी दाखल केलेला आहे. श्री.प्रफुल शहा, रा.ठिकाण रुम नं.७, ८ यांनी बाल्कनीमध्ये केलेल्या अनधिकृत बांधकामाचे या कार्यालयामार्फत दि.०२.०७.२०१० व सदर बाल्कनीस मनपा अधिनियम ३५१ अन्वये नोटीस क्र.स.आ.एच/पू/३५१/४४६/स.अ.(इ व का), दि.१८.१०.२०१० रोजी बजावून तसेच नोटीसीची मनपा चौकशी नुसार प्रक्रिया पुर्ण करुन दि.२५.०३.२०११ रोजी निष्कर्षनाची कारवाई स्थानिक पोलीस ठाण्याची मदत घेउन करण्यात आली आहे. तसेच सदर रुम नं.७ व ८ चे एकत्रिकरण केल्याबाबत सदर मालक / ताबेदार यावर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये ५३ (१) ची नोटीस बाजावून पुढील कारवाई करता स्थानिक पोलीस ठाणे या कार्यालयाचे पत्र दि.११.०३.२०११ अन्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच श्री.एरॉल सिक्वेरा यांच्या सदनिकेत होणा-या गळतीबाबत या कार्यालयातर्फे मनपा अधिनियम ३८१ अन्वये नोटीस सदर मालक/ताबेदारास बजावण्यात आली असून सदर नोटीस न्याय प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता पाठविण्यात आली आहे. तसेच एरॉल सिक्वेरा यांना योग्य उत्तरासह वेळोवेळी पत्र व्यवहार झाला असल्यामुळे सदर बाबतीत एरॉल सिक्वेरा यांनी केलेले आरोप व दावे निकालास खोटे असून श्री.प्र फुल शहा व एरॉल सिक्वेरा यांच्यात आपआपसातील वाद विवाद असल्यामुळे श्री. एरॉल सिक्वेरा हे महानगरपालिकेचा साधन म्हणुन वापर करित आहे. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.देसाई हे दि.०३.११.२००८ रोजी या कार्यालयातून पदोन्नतीमुळे बदली कार्यकारी अभियंता, पी/दक्षिण विभाग येथे झाली असल्यामुळे

त्यांच्यावर लादलेल्या शास्तीची या कार्यालयात सध्यपरिस्थिती माहिती उपलब्ध नसल्याचे कार्यालय अधिक्षक, एच/पूर्व यांच्या पत्रानुसार आढळते तर त्यांची वेतन आकारणी सध्या का.अ.पी./दक्षिण कार्यालयात केली असल्यामुळे सदर शास्तीची वसुली संबंधिची माहिती का.अ.पी/दक्षिण कार्यालयातूनच प्राप्त होउ शकेल.

२.याबाबत तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना याबद्दल कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतु विद्यमान माहिती अधिकारी यांनी जी कागदपत्रे आयोगाकडे सादर केली आहे त्या कागदपत्रांवरुन महानगरपालिकेने वेळोवेळी श्री.प्रफुल शहा यांचे संदर्भात कारवाई केली असे दिसून येते व त्या संदर्भातील कागदपत्रे सुध्दा तक्रारदार यांना वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेले दिसून येतात व तसेच तक्रारदार यांनी दि.०८.०४.२०१० रोजीच्या निर्णया संदर्भामध्ये तक्रार केली आहे असे जे म्हटले आहे की, त्यामध्ये त्यांना कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलबध करुन द्यावेत असे आदेश दिलेले नाहीत व तसेच तक्रारदार यांना वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला असल्यामुळे पुन्हा कागदपत्राचे निरीक्षक करुन देता येणार नाही. श्री.देसाई यांनी जरी त्याचे विरुध्द शास्तीची वसुली केली आहे असे म्हटलेले आहे तरीही त्या संदर्भातील माहिती ही का.अ.पी/दक्षिण कार्यालयातून उपलब्ध करुन घेउन सहा.अभियंता (इ व का), एच/पूर्व यांनी तक्रारदार यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार अशंत: मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असुन श्री.व्ही.जे.देसाई, सहा.अभियंता (इ व का) यांचेविरुध्द दि.१८.१२.२००८ च्या आदेशान्वये लादण्यात आलेली शास्तीची वसुलीच्या संदर्भात तसेच दि.०८.०४.२०१० रोजी लादण्यात आलेल्या शास्तीच्या वसुलीच्या संदर्भात सहा.अभियंता (इ व का), एच/पूर्व यांनी का.अ.पी/दक्षिण कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन घेउन तक्रारदार यांना कळवावी.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २०.०५.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५६९४/अपील क्र.६७९७/०२**

**श्री.प्रमोद एल.कदम**
**वर्सोवा अंधेरी, श्री साई को.हौ.सो.लि.,**
**प्लॉट नं.१६/डी-३, सरदार वल्लभ भाई पटेल नगर, अंधेरी (प),**
**मुंबई ४०० ०५३.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अवर सचिव (रस्ते-८)**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता**
**मुख्य अभियंता यांचे कार्यालय, मुंबई (सा.बां)**
**प्रादेशिक विभाग, २५, मर्झबान रोड, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २७.०६.२०११**
**अपिलकर्ता गैरहजर. जन माहिती अधिकारी उपस्थित (मंत्रालय),**
**जन माहिती अधिकारी उपस्थित (मुख्य अभियंता कार्यालय)**
**जन माहिती अधिकारी उपस्थित (का.अ.इमारत बांधकाम, मुलुंड)**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दाखल केलेले अपील हे त्यांच्या दि.०५.०७.२०१० रोजी दाखल केलेल्या माहितीच्या अर्जासंदर्भात असल्याने व त्याच अर्जासंदर्भात अपिलकर्ता यांनी अपील क्र.६७२७/०२ हे सुध्दा दाखल केलेले होते व त्या अपीलामध्ये दि.०५.०५.२०११ रोजी निर्णय झालेला असल्यामुळे पुन्हा त्याच अर्जासंदर्भातील व्दितीय अपीलात निर्णय करणे हे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यांत येते.

२. मात्र तरीही अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा हा दि.२५.०१.२०१० रोजी केलेला असून माहिती सुध्दा उपलब्ध करुन घेतलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.२१८६/अपील क्र.६७९५/०२**

**श्री.महेंद्र सी.म्हात्रे**
**एस/४३, प्रिंस व्हिला,**
**मालती कॉटेज, एरंगल गाव,**
**पो.मढ, मढ आयलंड,**
**मुंबई ४०० ०६१.** **... अपिलार्थी**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**(परिमंडळ-१२) शैलेंद्र नगर,**
**दहिसर, मुंबई ४०० ०६८.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
**उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,**
**कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १३.०४.२०११**

**सुनावणीचा दिनांक २७.०६.२०११**

**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर आहे.**

अपिलकर्ता यांनी दि.२८.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्याविरुध्द दि.३०.०६.२०१० रोजी दर्शनसिंग भाटीया यांनी दाखल केलेल्या तसेच दि.२७.०७.२०१० व दि.२९.०७.२०१० रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भातील झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२९.१०.२०१० रोजी मालवणी पोलीस स्टेशन कडून आलेली माहिती मुद्देनिहाय उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.०३.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.१८.१२.२०१० रोजी देण्यात आला असून नियमाने देय आहे ती माहिती पुरवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर दि.०४.०३.२०११ रोजी अपिलकर्ता यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मालवणी यांनी दिलेली माहिती पुरविण्यात आली व त्यामध्ये श्री.भाटीया यांनी त्यांचे तक्रारीची प्रत देण्यास हरकत

घेतलेली आहे असे कळविलेले आहे.  त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांचेविरुध्द जी तक्रार दाखल करण्यात आली व ज्या तक्रारीनुसार अटक करण्यात आली मात्र त्या संदर्भामध्ये त्यांना जामीन मिळालेला आहे.  याचा अर्थ अपिलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असती तर त्यांचे विरुध्द एन्टीसिपेटरी बेलच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देता आली असती व त्यांची अटक टाळता आली असती व यावरुन माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुनच त्याची अटक टाळणे शक्य झाले नाही कारण पुरावा असता तर त्यांना जामिन मिळाला नसता व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेंविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी अशी त्यांनी आयोगाकडे विनंती केली.  जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, श्री.भाटीया यांनी दाखल केलेली तक्रार ही त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्रयस्थ पक्ष म्हणुन श्री.भाटीया यांनी हरकत घेतल्यामुळे अपिलकर्ता यांना तसे कळविण्यात आले होते व तपासाच्या बाबत मात्र जो पर्यंत तपास पूर्ण होत नाही तो पर्यंत तपासावर कोणताही विपरीत परिणाम होउ नये म्हणुन अधिनियमाचे कलम ८(१) (ज) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले होते.

३. वास्तविक पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल झाल्यानंतर सदरची तक्रार ही सार्वजनिक अभिलेख्याचा भाग होते.  ती त्रयस्थ पक्षाची माहिती नाही.  त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी ती त्रयस्थपक्षाने गोपनीय म्हणुन जन माहिती अधिकारी यांनी प्रकट करु नये अशी कोणतीही अट घातलेली नसते व आलेल्या तक्रारीप्रमाणे चौकशी करावयाची असल्यामुळे ती सार्वजनिक अभिलेख्याचाच भाग होते. मात्र सदरच्या तक्रारीप्रमाणे तपास करणे आवश्यक असल्यामुळे तपासाच्या संदर्भात कोणताही विपरीत परिणाम होउ नये म्हणुन ती तक्रार तसेच तपासाची माहिती उपलब्ध करुन देणे यास अधिनियमाचे कलम ८(१) (ज) प्रमाणे प्रकट केल्यास अपवाद करता येईल व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ८(१) (ज) चा आधार घेतला असल्यास ते योग्य आहे.

४. मात्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, या संपूर्ण प्रकरणामध्ये तपास होउन दि.२३.०६.२०११ रोजी आरोप पत्र सादर केले गेले असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन

देण्यास त्यांची हरकत नाही.  त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना आयोगाचे समक्ष सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली असून अपिलकर्ता यांनी पोच सुध्दा दिलेली आहे म्हणुन सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

<u>**आदेश**</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०८२९/अपील क्र.६७८९/०२**

**श्री.राकेश मोहनलाल उपाध्याय**
**जानकीदास चाळ, काला किल्ला,**
**धारावी, मुंबई ४०० ०१७. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-३) यांचे कार्यालय,**
**मध्य प्रादेशिक विभाग, बावला कंपाउंड,**
**डॉ.बी.ए.रोड, भायखळा (पू), मुंबई ४०० ०२७. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
**(मध्य नियंत्रण कक्ष)**
**पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-३) यांचे कार्यालय,**
**मध्य प्रादेशिक विभाग, बावला कंपाउंड,**
**डॉ.बी.ए.रोड, भायखळा (पू), मुंबई ४०० ०२७.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.२२.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, प्रधान सचिव, गृह विभाग यांचेकडे त्यांच्या दि.१४.०५.२०१० च्या दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१०.०९.२०१० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ॲन्टॉप हिल यांनी सहा.माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त यांनी पाठविलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.१६.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. म्हणुन अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती ही विलंबाने प्राप्त झाली. श्री.नेटके यांनी खोटे सर्फिफिकेट मेस्त्री यांना दिले होते. एनसी देताना नेटके यांनी काही करार पत्र घेतले होते त्यांच्या प्रती त्यांना उपलब्ध करुन दयाव्यात. तसेच प्रधान सचिव कार्यालयात माहिती मागितली होती. तर त्यांनी ती माहिती देणे आवश्यक होते. तसेच जी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे त्यातुन त्यांनी काही प्रश्न आयोगापुढे उपस्थित केले आहेत.

३. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी प्रधान सचिव, गृह विभाग यांचेकडे जरी दि.१४.०५.२०१० रोजी तक्रार दाखल केली असली तरी सदरच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनकडे ती पाठविण्यात येते व त्यामुळे माहिती ही त्या संबधित पोलीस स्टेशनमध्ये उपलब्ध असते व त्यामुळे प्रधान सचिव, गृह विभाग यांचे कार्यालयातून सदरची माहिती ही उपलब्ध होउ शकत नसल्याने सदरचे अर्ज हे हस्तांतर करणे आवश्यक असते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांचा अर्ज त्यांचे कार्यालयामध्ये दि.१४.०८.२०१० रोजी प्राप्त झाला. कारण मंत्रालयीन विभागातून तो थेट संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर होउ शकत नाही. कारण मंत्रालयीन विभागामध्ये कनिष्ठ स्तरावर कोणत्या कार्यालयात माहिती उपलब्ध असेल याबाबतची कल्पना नसते व त्यामुळेच सदरचा अर्ज हा मुख्यालयाकडून पुन्हा हस्तांतर करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर होतो. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यांनी त्याबाबत पोच सुध्दा दिलेली आहे.

४. मात्र अपिलकर्ता यांनी जे मुददे उपस्थित केले आहे ते अर्थातच उपलब्ध झालेल्या माहितीच्या कागदपत्रामधुन गुणवत्तेच्या संदर्भात उपस्थित केलेले दिसून येतात. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या किंवा कार्यवाहीच्या संदर्भात, गुणवत्तेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करता येत नाही. तर जशी कार्यवाही झालेली आहे त्याप्रमाणे कागदपत्रे जे उपलब्ध असतील त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे व जन माहिती

अधिकारी यांनी ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २३.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.९०१/अपील क्र.६८०३/०२**

**श्री.वैद्य मधुकर किसनराव क्षीरसागर**
**सोमेश कॉलनी, कलामंदिर मागे, नांदेड**
**जि.नांदेड ४३१ ६०१.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (आयुर्वेद कक्ष),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (आयुर्वेद कक्ष),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २४.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २८.०६.२०११**
**अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.०६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव/कार्यासन अधिकारी यांचेकडे वैद्य मधुकर किसनराव क्षीरसागर यांचे राजिनामा परत घेण्याची विनंती नामंजुर करणेबाबत घडलेल्या अनियमिततेची माहिती मिळणे आणि १९७८ पासून नामनिर्देशन सहित सेवा कालावधी संलग्नित करुन प्रपाठक पदोन्नती, मानीव दिनांक व प्राध्यापक पदोन्नती देउन रुजू करणेबाबत शासन निर्णय काढण्याची माहिती मिळणेबाबत अर्ज केला. माहितीचा कालावधी सन १९७८ ते २०१० असा असून शिघ्र टपालाव्दारे माहिती घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सोबतच्या तपशिलामध्ये एकूण ८ मुद्ये उपस्थित केलेले दिसून येतात. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी दि.०९.०८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा मिळाला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे प्रस्तुत व्दितीय अपील दाखल केले आहे.

२.अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, अद्याप पर्यंत कोणतीही माहिती मिळाली नाही व कोणताही पत्र व्यवहार जन माहिती अधिकारी यांनी केला नाही. जन माहिती

अधिकारी आज गैरहजर आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जी कागदपत्रे दाखल केली आहे ती सर्व कागदपत्रे ही अपिलकर्ता यांनी दि.१६.११.२०१० रोजी दाखल केलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात असुन प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा त्याच अर्जाच्या संदर्भात आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांच्या दि.२३.०६.२०१० च्या अर्जाप्रमाणे काय कार्यवाही केली ही बाब आयोगाकडे सादर केली नाही व त्यामुळे दि.२३.०६.२०१० च्या अर्जाच्या संदर्भामध्ये झालेल्या कारवाई च्या बद्दल काहिहि माहिती आयोगापुढे सादर झाली नाही. अपिलकर्ता यांच्या अर्जामध्ये विश्लेषन करुन अभिप्राय मागितलेली दिसून येतात. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये गुणवत्तेबाबत जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागता येत नाही व तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या संदर्भात असलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले असल्याने सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांच्या संदर्भामध्ये वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे जे प्रकरण ज्या दिनांकापासून व वर्षापासून सुरू झाले आहे त्या नस्तीतील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिष्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात**

**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८.०६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५००३३/अपील क्र.६८०५/०२**
**मुमाआ.नो.क्र.५००३४/अपील क्र.६८०६/०२**

**श्री.वसंतराव भागुजी जाधव**
**७, युनायटेड हाउस, जे.के.सावंत मार्ग,**
**माहिम, मुंबई ४०० ०१६.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**प.डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ,**
**विद्यापीठ इमारत, प्लॉट नं.५०,**
**सेक्टर-१५, सी.बी.डी, बेलापूर,**
**नवी मुंबई ४०० ६१४.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**प.डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ,**
**विद्यापीठ इमारत, प्लॉट नं.५०,**
**सेक्टर-१५, सी.बी.डी, बेलापूर,**
**नवी मुंबई ४०० ६१४.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २८.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी रजिस्ट्रार, डी.वाय पाटील डिम्ड विद्यापिठ यांचेकडे दि.२६.०७.२०१० रोजी अर्ज करुन १. डी.वाय.पाटील (रामराव आदीक एज्युकेशन सोसायटी डी.वाय.पाटील इन्स्टिटयूट) सिडकोकडुन नेरुळ व सीबीडी बेलापूर येथे किती चौरस मिटर जागा मिळाली आहे. २. ती जागा किती वर्षाच्या लिज करारावर मिळाली आहे. तसेच प्रती वर्षी प्रती चौरस मिटर भाडे किती ३. नेरुळ येथे क्रिकेट स्टेडियम उभारताना ती जागा सिडकोकडून क्रिकेट स्टेडियमसाठी कि खेळाच्या मैदानासाठी मिळालेली आहे. ४.आय.पी.एल साठी नेरुळ येथील स्टेडियम भाडयाने देताना किती भाडे आकारले जाते (एका दिवसाचे किती व संपूर्ण मॅचचे किती) ५. नेरुळ येथील क्रिकेट स्टेडियमचे खालील कालावधीचे विज बिल किती दि.०१.०१.२००८ ते दि.३१.१२.२००८, दि.०१.०१.२००९ ते दि.३१.१२.२००९ आणि दि.०१.०१.२०१० ते दि.३०.०६.२०१०.

तसेच दि.२३.०७.२०१० च्या माहिती अर्जान्वये सन २००९-२०१०-२०११ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम वर्ष एम.बी.बी.एस.ला प्रवेश घेण्या-या विद्यार्थ्यांच्या संदर्भात तसेच एन.आर.आय.कोटयातून दिलेल्या प्रवेशांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

दोन्ही अर्जाच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांना अनुक्रमे दि.१२.०८.२०१० व दि.२१.०८.२०१० रोजी पद्मश्री डॉ डी.वाय पाटील विद्यापीठ हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी खाली येत नाही. तसेच अधिनियमाच्या कलम २(ज) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण सुध्दा नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु दोन्ही उत्तरांमुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी अनुक्रमे दि.०६.०९.२०१० व दि.१३.०९.२०१० रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली आहे. दोन प्रथम अपीलांच्या संदर्भात वरील प्रमाणेच निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन व्दितीय अपीले दाखल केलेली आहे.

दोन ही व्दितीय अपीलाच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी सांगितले की, डी.वाय.पाटील विद्यापीठ हे संसदेने पारित केलेल्या विद्यापीठ अनुदान कायदयाने स्थापन झाले आहे व त्यामुळे त्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात व त्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यावर विद्यापीठातील आलेल्या प्रतिनिधीने आयोगापुढे असे सांगितले की, राज्य माहिती आयोगाचे कोकण खंडपीठानी दिलेल्या निर्णयाप्रमाणे डी.वाय.पाटील डिम्ड विद्यापीठामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती झाली असून माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणतीही हरकत नाही. असे असल्यास अपिलकर्ता यांच्या दोनही अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सदरची दोन्ही अपीले ही मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांची अपील क्र ६८०५ व ६८०६ ही दोन्ही अपीले मंजूर करण्यात येत असून दि.२६.०७.२०१० व दि.२३.०७.२०१० च्या दोन्ही माहिती अर्जाच्या संदर्भामध्ये हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांना विनामूल्य रजिस्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी. **Sd--**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २८.०६.२०११
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.४७७३८/अपील क्र.६८०४/०२**

**श्री.प्रमोद गोविंद चोगले**
**१९-२, चोगले हाउस, एल.टी.रोड,**
**बाभई, बोरीवली (प), मुंबई ४०० ०९२. ... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त (बाजार)**
**म.ज्योतिबा फुले मंडई, १ ला मजला,**
**डी.एन.रोड, मुंबई ४०० ००१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अधिक्षक बाजार (प.उप)**
**३ रा मजला, आर.के.पाटकर मार्ग,**
**भाभा हॉस्पिटल जवळ, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २६.०३.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २८.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०३.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा.प्रबंधक बाजार (पश्चिम उपनगरे) यांचेकडे Information in respect of Zunka Bhakar Kendra (Kalpatru Charitable & Religious Trust Mumbai ) Act Municipal Market, S.V. Rd Borivali (W), Mumbai 92 च्या संदर्भात व्यक्तीश: माहिती घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.२०.११.२००९ रोजी मागितलेली माहिती कल्पतरु झुनका भाकर केंद्राच्या साक्षांकित केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रत्येक प्रतीस रु.२/- प्रमाणे शुल्क आकारुन सदर पत्र मिळतास ७ दिवसांच्या आत कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.०३.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु त्यानंतर मात्र अपिलकर्ता हे स्वत: दि.१४.१२.२००९ रोजी कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांना खर्चाचा भरणा करुन माहिती

उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु काही कागदपत्रे दि.०८.१२.२००९ रोजी कार्यवाही करता वरिष्ठाकडे सादर करण्यात आली असल्यामुळे त्यावेळी उपलब्ध होउ शकली नव्हती. त्याप्रमाणे पुन्हा अपिलकर्ता यांच्या अपीलाची सुनावणी दि.१७.१२.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावर निर्णयात आदेश नमूद केल्यानुसार दि.१२.०१.२०१० रोजी अपिलकर्ता यांना कळविण्यात आले व एकूण ६१ प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य माहिती देण्यात आली. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करताना मागितलेली माहिती दिली नाही व कलम ४ प्रमाणे सुध्दा माहिती ही प्रसिध्द केलेली नाही असे कारण देउन व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांचे वकील यांनी वकील पत्र दाखल न करता आयोगापुढे युक्तीवाद केला. त्यामध्ये त्यांनी कल्पतरू चॅरिटेबल व रिलीजीयस फोरम च्या संदर्भात माहिती दिली व कल्पतरू चॅरिटेबल व रिलीजीयस ट्रस्ट च्या संदर्भात माहिती दिली नाही व तसेच चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिली असा युक्तिवाद केला. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचेपुढे युक्तीवाद करताना सांगितले की कल्पतरू चॅरिटेबल व रिलीजीयस फोरम ही पुर्वीची संस्था होती व त्यानंतर ती कल्पतरू आणि चॅरिटेबल रिलीजीयस ट्रस्ट झाली असावी. कल्पतरू चॅरिटेबल व रिलिजीयस फोरम यांमध्ये सुध्दा श्री.प्रमोद गोविंद चोगले हे एक सदस्य आहेतच व सदरची कागदपत्रे ही त्यांचे कार्यालयाची नसून कल्पतरू चॅरिटेबल आणि रिलिजीयस ट्रस्टने सादर केलेल्या कागदपत्रांपैकीच आहे. त्यामुळे त्यासंदर्भात एकाच नस्तीमध्ये जी कागदपत्रे उपलब्ध आहेत ती सर्व कागदपत्रे अपिलकर्ता यांनी स्वत: निरीक्षण करुनच घेतली आहे व त्यामुळे दिशाभूल करुन देण्याचा किंवा चुकीची माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उदभवत नाही असे सांगितले.

३. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना जी सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिली आहे ती कल्पतरू चॅरिटेबल आणि रिलीजीयस ट्रस्टच्या संदर्भात आहेत. एकच दस्तऐवज हा फोरमच्या संदर्भात आहे. यावरुन फोरमचे ट्रस्टमध्ये रुपांतर झालेले असल्यामुळे पुर्वीचा संदर्भ म्हणुन श्री.चोगले यांनी दाखल केलेली कागदपत्रे दिसून येतात. यावरुन अपीलकर्ता यांना

कोणतीही दिशाभुल करणारी व चुकीची माहिती दिली नाही असा निष्कर्ष काढून सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे

<u>आदेश</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/१२५८/तक्रार क्र.२६४/०१**

**श्री.कैलास देवराम पाटील**
**७, भुषण कॉलनी,**
**विनोद भोजनालया समोर,**
**जळगांव.** **... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य**
**एस.एस.बी.टी.चे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय,**
**बांभोरी, जळगांव ४२५ ००१.** **... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक ३०.०६.२०११**
**तक्रारदार - गैरहजर,**
**जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.२१.०५.२०११ रोजी विना अनुदानीत महाविद्यालयांना म्हणजे ट्रस्ट यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असा निर्णय आपण दिला आहे. मात्र त्यापूर्वी अपील क्र.८५०२ मध्ये दि.०७.१०.२०१० रोजी माहिती द्यावी असा निर्णय दिला असल्यामुळे यात कोणता निर्णय योग्य आहे याबद्दल त्यांनी आयोगाकडेच तक्रार केलेली आहे. त्याच प्रमाणे त्यांनी त्याच दिवशी पुन्हा राज्य माहिती आयोगाचे कार्यालयावर आरोप करणारे असे पत्र लिहिले आहे व त्यामुळे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, बांभोरी या विद्यालयाला नोटीस काढून त्यांचे निर्णय मागविले होते. त्यामध्ये अपिलकर्ता यांना वेळोवेळी माहिती पुरविलेली आहे ती तारीख व पत्र क्रमांक हे त्यांनी आयोगापुढे सादर केले आहे. त्याचप्रमाणे रिट पिटिशन नं.५१३२/ २००८ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाने नगरयोग शिक्षण संस्था आणि त्या अंतर्गत असणारे यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ इजिनिअरींग हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(४) प्रमाणे पब्लीक ऍथोरीटी नसल्याने माहितीचा अधिकार २००५ हा विना अनुदानीत अभियांत्रिकी महाविद्यालयास लागू नसल्याचा महत्वपूर्व निकाल दिला आहे. असोसिएशन मॅनेजमेंट ऑफ अनऐडेड इंजिनिअरींग कॉलेजेस (महा) ही संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयाची संघटना आहे. सर्व सभासद महाविद्यालय ही कायम स्वरुपी विना अनुदानीत तत्वावर चालणारी आहे. त्यामुळे ही सर्व सभासद महाविद्यालये माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(H) प्रमाणे पब्लीक ऑथोरीटी नाही या कारणास्तव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या सर्व विना अनुदानीत अंभियांत्रिकी महाविद्यालयास लागू नसल्याचे स्पष्ट होते. या कारणास्तव माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत येणा-या अर्जाला उत्तर देणे इत्यादी कामे विना अनुदानीत अभियांत्रिकी महाविद्यालयांना बंधनकारक नाही. तसेच राज्य माहिति आयुक्त, नागपूर खंडपीठ यांनी संस्थेचे माजी कर्मचारी श्री.संजय सिनकर यांच्या अपीलात माहिति अधिकार विना अनुदानीत महाविद्यालयास लागू नसल्याचा निर्णय दिला आहे. अशा प्रकारचा खुलासा केला आहे.

२. राज्य माहिती आयेगाने सुरुवातीला महाविद्यालयांना त्यात (विना अनुदानीत) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू करुन माहिती दयावी म्हणून निर्णय दिले आहेत. परंतु यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ इंजिनिअरींग नगरयोग शिक्षण संस्था यांनी राज्य माहिती आयोगाच्या निर्णयास मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांचेकडे आव्हान दिलेले होते व मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी विना अनुदानीत महाविद्यालयांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नाही असा निर्णय दिला असल्यामुळे व जो पर्यंत तो निर्णय कायम आहे तो पर्यंत महाराष्ट्र राज्यामध्ये त्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्णय देणे बंधनकारक आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची संविधानीक व कायदेशीर तरतुदीची माहिती करुन न घेता आपल्याला लिहिता येते म्हणुन कोणत्याही प्रकारचे आरोप कोणत्याही संस्थेवर करणे ही प्रवृत्ती कायदयाचे राज्य न मानण्याचीच आहे व त्यामुळे सदरची तक्रार ही निकाली काढण्यात येते.

## <u>आदेश</u>

**१.तक्रारदार यांची तक्रार ही निकाली काढण्यांत येते.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३०.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/१०६६/तक्रार क्र.२११/०१**

**श्री.मोहम्मद अफजल**
**सी-५०८, आकार, कल्याण कॉम्प्लेक्स,**
**यारी रोड, अंधेरी (प), मुंबई ४०० ०६१.** **... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**इमारत प्रस्ताव विभाग (WS)**
**म्युनिसिपल ऑफीस, १ ला मजला,**
**आर.के.पाटकर मार्ग,**
**भाभा हॉस्पीटलच्या पुढे, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक २९.०६.२०११**
**तक्रारदार - हजर,**
**जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.१९.०५.२०११ रोजी जन माहिती अधिकारी इमारत व प्रस्ताव विभाग, (WS) बांद्रा (प) यांनी दि.१९.०३.२०११ च्या अर्जाच्या प्रमाणे दि.२३.०३.२०११ रोजी आयोगात तक्रार क्र.१५६/०१ मध्ये आयोगाने दिलेल्या निर्णयाच्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणुन अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केली आहे.

२. तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी जी माहिती दिली आहे ती अपूर्ण आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, तक्रारदार यांनी जी माहिती मागितली होती त्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ज्या इमारतीच्या संदर्भात भोगवटा प्रमाणपत्र दिले नाही व त्यांना मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५३ (A) प्रमाणे नोटीस दिलेली आहे. अशा सर्व इमारतींची माहिती दि.२६.०५.२०१० व दि.२८.०६.२०११ रोजी उपलब्ध करुन दिली आहे. त्यावर पुन्हा तक्रारदार यांनी आयोगास सांगितले की, भोगवटा प्रमाणपत्र हे अनेक इमारतींना दिलेले नसुन सुध्दा काही ठराविक इमारतींच्या संदर्भातच नोटीस दिलेली आहे याचा अर्थ विशिष्ट हेतू ठेउनच नोटीस दिली जाते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई मध्ये अनेक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. मात्र ज्या इमारतीच्या संदर्भामध्ये तक्रार येते त्याच इमारतीच्या संदर्भामध्ये नोटीस दिली

जाते. अन्यथा सर्व इमारतींना तशी नोटीस दिल्यास भोगवटा दाराना त्रास होण्याचा संभव असतो. परंतु तक्रारदार यांनी विशिष्ट इमारतींच्या संदर्भामध्ये जी नोटीस दिली आहे त्यामध्ये सुध्दा विकासकाच्या सदनिकेच्या संदर्भात नोटीस दिली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी पुन्हा आयोगास सांगितले की, त्या संदर्भात चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन दिली जाईल. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अशंत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत असून पॅराडाईस हाईट व्हिलेज ओशिवरा अंधेरी (प) या इमारतीमध्ये विकासकाच्या किंवा इतर दोन सदनिकांना कलम ३५३ (A) प्रमाणे नोटीस का दिलेली नाही याबाबतची चौकशी करुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३०.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/१०६७/तक्रार क्र.२१२/०१**

**श्री.मोहम्मद अफजल**
**सी-५०८, आकार, कल्याण कॉम्प्लेक्स,**
**यारी रोड, अंधेरी (प), मुंबई ४०० ०६१.** **... तक्रारदार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक २९.०६.२०११**

**तक्रारदार - हजर,**

**जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.१९.०५.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाने तक्रार क्र.१३८/०१ च्या दि.१९.०४.२०११ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) प्रमाणे तक्रार करण्यात आली आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही नगर विकास विभागाकडे उपलब्ध नसते तर ती माहिती उद्योग विभागाकडे उपलब्ध असते व महानगरपालिकेच्या संदर्भातील माहिती ही त्या त्या महानगरपालिकेकडे उपलब्ध असते.

३. तक्रारदार यांनी नगर विकास विभागाकडे दि.१५.०१.२०११ रोजी दिलेला माहितीचा अर्ज नोंद वहीमध्ये दि.१८.०१.२०११ रोजी नोंदण्यात आला आहे. परंतु त्यानंतर नोंदणी शाखेतील माहिती अधिकारी उ.ना.पाटील (कक्ष अधिकारी) यांनी नवि-२६ कक्षाकडे पाठविल्याचे दिसून येते. तथापी नवि-२६ कार्यासनाने सदर अर्ज स्विकारल्याबाबत कोणतीही पोच आढळून येत नाही व उ.ना.पाटील हे दि.२८.०२.२०११ पासून कार्यासनात अनुपस्थित आहे व त्यामुळे श्री.पाटील यांनी पुढे कोणती कार्यवाही केली याबाबत अभिलेखावर कोणतीही माहिती उपलब्ध नाही. तसेच राज्य माहिती आयोगाची दि.१९.०४.२०११ ची सुनावणीची नोटीस दि.२४.०३.२०११ रोजी नगर विकास विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येते. परंतु नवि-२६ कार्यासनाने सदर सुनावणी नोटीस त्यांचेशी संबंधित नसल्याने नोंदणी शाखेस परत केली. परंतु आता अर्जदाराच्या मुळ माहिती अर्जाची प्रत राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून

प्राप्त झाल्याने व मागितलेली माहिती ही उद्योग, उर्जा व कामगार विभागाशी संबंधित असल्याने त्या विभागाकडे अग्रेषित करण्यात आलेला आहे व मुद्दा क्र.२ व ३ विविध महानगरपालिकेशी संबंधित असल्याने त्यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी अग्रेषित करण्यात आला आहे व त्यामुळे नगर विकास विभागाकडून जाणिव पूर्वक कोणतेही दुलक्ष झाले नाही म्हणुन अर्जातील विषयाबाबत संदिग्धता असल्याने अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्याचे दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांचे खुलाशा वरुन नगर विकास विभागातील नोंदणी शाखेतील अधिकारी किंवा कर्मचारी हेच दोषी आढळून येतात. कोणताही अर्ज, तक्रार प्राप्त झाल्यानंतर ती विषयाप्रमाणे संबंधित शाखेकडे किंवा कार्यासनाकडे योग्य रितीने हस्तांतर करणे ही नोंदणी शाखेची जबाबदारी आहे व त्यामुळे नोंदणी शाखेतील अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाई आवश्यक आहे.

४. तक्रारदार यांचा माहितीचा अर्ज हा उद्योग विभागाकडे हस्तांतर केलेला असल्यामुळे उद्योग विभागाने त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. सध्याची तक्रार ही नगर विकास विभागाच्या विरुध्द असल्याने व उद्योग विभागाच्या संदर्भात कोणतीही माहिती नसल्याने नगर विकास विभागास नोटीस काढण्यात आली होती व त्यामुळे आज उद्योग विभागाचे अधिकारी उपस्थित नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी उद्योग विभागाकडून माहिती मिळाली नसल्यास आयोगाकडे त्या विभागाच्या माहिती अधिका-यांच्या विरुध्द माहितीचा अर्ज जोडून तक्रार करणे संयुक्तीक होईल. तसेच ज्या महानगरपालिकांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसेल त्या महानगरपालिकेच्या संदर्भात तक्रार करणे योग्य राहिल. मात्र सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही निकाली काढण्यांत येते.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३०.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/१२५९/तक्रार क्र.२६५/०१**

**श्री.अरूण पांडुरंग चौधरी**
**पांडुरंग २१, ब आनंदनगर,**
**पिंप्राळा रेल्वे गेट जवळ, जळगांव. ... तक्रारदार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,**
**चर्चगेट, मुंबई. ... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक ३०.०६.२०११**

**तक्रारदार - गैरहजर,**

**जन माहिती अधिकारी यांचेवतीने प्रथम अपिलीय प्राधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.२०.०५.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या दि.१०.०३.२०११ रोजी केलेल्या माहिती मागण्याच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दोन महिन्याचा कालावधी उलटून गेल्यावरही माहिती उपलब्ध केली नसल्यामुळे तक्रार दाखल केलेली आहे.

२. तक्रारदार गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. मात्र डॉ.मधु मदन, प्रबंधक व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे हजर आहेत.

३. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी हे आजारी असल्याने माहिती उपलब्ध करुन देउ शकले नाही. मात्र त्यांनी आयोगापुढे कोणताही लेखी खुलासा दिला नाही व याबद्दल त्यांना फारशी माहिती सुध्दा नाही असे त्यांनी सांगितले. मात्र विद्यापिठाच्या स्टॅटीव्ह प्रमाणे निवडणुक झाल्यानंतर एक महिन्याचे आत सदरच्या निवडणुकीच्या संदर्भातील कागदपत्रे नष्ट करण्याची तरतुद आहे व तक्रारदार यांनी मात्र दि.१०.०३.२०११ रोजी माहितीचा अर्ज केलेला आहे व त्यामुळे सदरची कागदपत्रे उपलब्ध असतीलच असे नाही.

४. असे असले तरी तक्रारदार यांच्या दि.११.०३.२०११ रोजीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जी वस्तुस्थिती आहे ती अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांचे आत अर्जदारास कळविणे बंधनकारक आहे व ते कळविलेले नसल्यामुळेच विद्यापिठ माहिती लपवित आहे असा

निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास टाळाटाळ करित असल्याची आयोगाची खात्री झाली असल्यामुळे त्यांचे विरूध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रू.५, ०००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्ती लादण्यापुर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकूण घेणे बंधनकारक आहे. त्याकरिता आयोगाचे कार्यालयातून दि.१४.०६.२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीकरिता सुनावणीचे वेळी आपणा विरूध्द केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० प्रमाणे शास्ती का लादण्यात येउ नये याबाबतचा लेखी खुलासा सादर करावा, जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीस व्यक्तीश: हजर रहावे, अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० प्रमाणे कारवाई करण्यात येईल व एकतर्फी निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी, अशी नोटीस देउन सुध्दा जन माहिती अधिकारी ते व्यक्तीश: आयोगापुढे उपस्थित झाले नाही. तसेच त्यांनी लेखी खुलासा सुध्दा दाखल केलेला नाही किंवा विद्यापीठाकडून सुध्दा कोणताही लेखी खुंलासा दाखल करण्यात आलेला नाही. यावरुन विद्यापीठच माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करित असल्याची आयोगाची खात्री झाली आहे व त्यामुळे अर्जदारास अधिनियमाचे १९(८) (ख) प्रमाणे रू.१०, ०००/- ची नुकसान भरपाई देणे आवश्यक झाले आहे. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१.तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत तक्रारदार यांना त्यांच्या दि.१०.०३.२०११ च्या अर्जाप्रमाणे माहिती विना मुल्य रजिस्ट्रर पोष्टाने उपलब्ध करून दयावी.**

**२. तक्रारदार यांच्या दि.१०.०३.२०१० च्या अर्जाप्रमाणे तक्रारदार यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करून दिली नसल्याने व आयोगापुढे ही ते उपस्थित न राहिल्याने व कोणताही लेखी खुलासा दाखल न केल्याने त्यांचे विरूध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रू.५, ०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसूली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करण्यात यावी व**

**"लेखाशिर्ष क्र.००७-इतर प्रशासनिक सेवा<br>६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८)<br>माहितीचा अधिकार (००७००१६-१)" मध्ये जमा करण्यात यावी.**

**३. तक्रारदार यांना त्यांच्या दि.१०.०३.२०११ च्या अर्जाप्रमाणे अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसाचे आत माहिती उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरण म्हणुन SNDT**

महिला विद्यापीठ यांनी अर्जदारास अधिनियमाचे कलम १९(८) (ख) प्रमाणे रू.१०, ०००/- नुकसान भरपाई देण्याचे आदेश देण्यात येतात.

४.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.

**Sd--**
(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३०.०६.२०११
मुंबई

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/१२६०/तक्रार क्र.२६६/०१**

**श्री.जेम्स थॉमस गॉडविन**
**फ्लॅट नं.१६, ३ रा मजला, युनियन हाउस नं.२,**
**मोगल लेन, एल.जे.रोड, माहिम, मुंबई ४०० ०१६. ... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, मुख्यालय-१,**
**मुंबई पोलीस मुख्यालय, क्रॉफर्ड मार्केट,**
**मुंबई ४०० ००१. ... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक ३०.०६.२०११**
**तक्रारदार - हजर, जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.१३.०६.२०११ रोजी त्यांचे दि.१८.०५.२०११ च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही ४८ तासात उपलब्ध करुन दिली नाही म्हणुन आयोगाकडे तक्रार केलेली आहे.

२. तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, बृहन्मुंबईतील सत्र न्यायालयाने ॲन्टीसिपेटरी बेल ॲप्लीकेशन नंबर ०१०१४२४/२०१० (सी आर नं.४११ of २०१० माहिम पोलीस स्टेशन) च्या संदर्भातील दि.२५.०१.२०११ च्या निर्णयामध्ये अर्जदारास म्हणजेच तक्रारदारास जामिन देण्यात आला आहे. परंतु तपासी अधिका-यांकडे ज्या ज्या वेळेस आवश्यक असेल त्या त्या वेळेस हजर राहाणे व तसे हजर न राहिल्यास जामिन रद्द होईल अशी अट घालण्यात आली आहे व त्यामुळेच तपासी अधिका-यांने बोलवणे असून सुध्दा तक्रारदार हजर राहून सुध्दा ते हजर झाले नाही असा प्रयत्न पोलीस ठाण्याचा दिसून येतो. जेणे करुन जामिन रद्द होउ शकतो. ते दि.२८.०९.२०१० रोजी अपीलाच्या सुनावणीस हजर होते, परंतु ते हजर नाहीत असे दाखविण्याचा प्रयत्न झाला आहे व म्हणुनच ती माहिती दि.१८.०५.२०११ रोजी

४८ तासामध्ये मिळावी कारण त्याचे स्वातंत्र्य धोक्यात आहे. असे त्यांना वाटते म्हणुन त्यांनी माहिती मागितली होती.

३. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अर्जदार श्री.जेम्स गॉडवीन यांनी त्यांच्या दि.१८.०५.२०११ च्या माहिती अधिकारा अंतर्गतच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती कलम ७(१) मधील तरतुदीनुसार स्वातंत्र्याशी निगडीत असल्याने ४८ तासांत पुरविण्याची विनंती केलेली होती. अर्जातील माहितीचे वर्णन विचारात घेता त्यात जीवित व स्वातंत्र्य धोक्यात आहे अशा माहितीचे स्वरूप दिसून येत नसल्याने तसेच अर्जदाराने त्यांना हवी असलेली माहिती त्यांच्या स्वातंत्र्याशी निगडीत असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जासोबत जोडलेला नव्हता. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराचे स्वातंत्र्य धोक्यात येण्याची कोणतीही शक्यता न दिसल्याने ४८ तास एवढया शिघ्रतेने माहिती पुरविण्याचे प्रयोजन दिसलेले नव्हते. तरी सुध्दा माहिती लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.०५.२०१० अन्वये स्विय सहाय्यक पोलीस उपायुक्त (मुख्यालय-१) यांचे कार्यालयात, छावणी अधिकारी, नागरी सुविधा केंद्र व प्रमुख लिपीक, कक्ष-२ (नोंदणी शाखा) यांना माहिती पुरविण्याकामी लेखी पत्राव्दारे कळविले होते. तसेच अर्जदाराच्या अर्जातील मुद्दा ९ बाबतची माहिती अन्य विभागाशी संबंधित असल्याने व त्यासाठी वेगळे माहिती अधिकारी असल्याने त्यांचा अर्ज शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (समन्वय) पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई यांना संबंधित मुद्दा क्र.९ बाबतची माहिती अर्जदारास परस्पर पुरविण्याकामी दि.२६.०५.२०११ रोजी कलम ६(३) (२) नुसार वर्ग करण्यात आला होता व अर्जदारास सुध्दा त्याबाबत कळविण्यात आले होते व त्या संदर्भामध्ये आयोगाने अर्जदाराने केलेल्या तक्रारीवर ४८ तासामध्ये मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता माहिती उपलब्ध करून देण्याची आवश्यकता नाही. मात्र अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांमध्ये मागितलेली माहिती उलपब्ध करून दयावी असे आदेश दिलेले असल्यामुळे तक्रारदार यांना दि.१४.०६.२०११ रोजी मुद्देनिहाय उत्तर दिले आहे. त्यांच्या अर्जातील मुद्दा A, B, C, F, K अन्वये दि.२८.०९.२०१० रोजी पोलीस आयुक्त कार्यालयात प्रवेश केलेल्या अभ्यागतांच्या नोंदी संबंधीची माहिती मागितली होती. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या प्रवेश

व्दारातील नागरी सुविधा केंद्र येथे सुरक्षेच्या कारणासाठी पोलीस आयुक्त कार्यालयात व गुन्हे शाखा, गुन्हा अन्वेषण विभाग येथे येणा-या सर्व अभ्यागतांची तपासणी करुन व त्यासंबंधिच्या नोंदी तयार करुन, त्यांना प्रवेश पास देउन प्रवेश दिला जातो. अभ्यागतांची माहिती उघड केल्यास गुन्हे प्रतिबंध, गुन्हे अन्वेषण आणि कायदा व सुव्यवस्था राबविण्यासाठी गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच गुन्हे अन्वेषणासाठी मिळालेली मदत उघड झाल्यास संबंधितांचे जीवित व सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता सुध्दा नाकारता येत नसल्याने अर्जदाराने मागितलेली मुद्‌दा A, B, C, F, K याबाबतची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८(१) (छ) अन्वये नाकारण्यात आली आहे. मात्र ती विहित मुदतीत पुरविण्यात आली आहे.

४.माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(१) अन्वये माहिती ३० दिवसांत उपलब्ध करुन दयावी अशी तरतुद आहे. मात्र जर मागितलेली माहिती, एखादया व्यक्तिचे जाणिव व स्वातंत्र्यासंबंधी असेल तर, विनंतीचा अर्ज मिळाल्यापासून ४८ तासांच्या आत ती देण्यात येईल अशीही तरतुद आहे. याचा अर्थ ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन देणे हा नियम आहे व विशिष्ट माहितीच्या संदर्भामध्ये ४८ तासामध्ये माहिती उपलब्ध करुन दयावी असे नमूद केलेले आहे हा अपवाद करण्यात आलेला आहे व त्यामुळे अपवादाच्या संदर्भामध्ये ४८ तासामध्ये माहिती का हवी आहे याबाबत कारणे देणे आवश्यक आहे व तशी कारणे किंवा पुरावा दिला नसल्यास जन माहिती अधिकारी यांनी स्वत: माहितीचे स्वरुप तपासून निर्णय घेणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय हा योग्य असल्याने ४८ तासांत माहिती दिलेली नाही याबद्‌दल जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत नाहीत.

त्यावर पुन्हा तक्रारदार यांनी आयोगास सांगितले की, त्यांना इतर अभ्यागतांच्याबाबत माहिती उपलब्ध करुन देता येत नसेल तर ते स्वत: उपस्थित होते किंवा नाही याबाबतची माहिती अभ्यागतांच्या नोंदीवरुन तसेच सी.सी.टी.व्ही असल्याने सी.सी.टी.व्ही चे फुटेज पाहून तक्रारदार त्यात दिसून आल्यास किंवा न आल्यास तशी त्यांना माहिती देणे संयुक्तीक राहिल. तक्रारदार यांनी त्याच दिवशी उपस्थित

राहण्याचा अर्ज दिला होता याबाबतची पोच सुध्दा त्यांनी आयोगापुढे दाखवली. त्याबाबतची ही जन माहिती अधिकारी यांनी तपासणी करुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार ही अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आत तक्रारदार यांना ते स्वतः दि.२८.०९.२०१० रोजी संबंधित कार्यालयात उपस्थित झाले होते किंवा नाही याबाबत अभ्यागत नोंद वही तपासून तसेच सी.सी.टी.व्ही चे फुटेज तपासून तसेच त्यांनी त्याच दिवशी दिलेल्या अर्जाची माहिती घेउन त्यांच्या स्वतः च्या उपस्थित राहण्याच्या संदर्भामध्ये लेखी कळवावे.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिाांक ३०.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/८७२/तक्रार क्र.२३०/०१**

**श्री.एस.के.नानगिया**
**७०४, गोल्डन चॅरिएट सह.गृह.संस्था (म)**
**१३३/सेक्टर ९, चारकोप, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७.** **... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (पोल-२),**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**तक्रारदार - हजर, जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी यांच्या तक्रार क्र.७१७/०१ च्या दि.०३.०५.२०१० रोजीच्या आयोगाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणुन दि.०७.०२.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

२. त्यावर जन माहिती अधिका-यांनी आयोगाकडे खुलासा दाखल करताना तक्रारदार यांना दि.३१.०३.२०११ रोजी मुद्दये निहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे सांगितले. परंतु तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती देउन माहिती देण्याचे टाळाटाळ केले आहे. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०३.०४.२००० नुसार लाचलुचपत प्रतिबंध विभागामार्फत सापळा प्रकरणी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची गृह विभागात छाननी करण्यात येउन अप्पर मुख्य सचिव (गृह) यांच्या पूर्व सहमतीने सदर प्रकरण आरोपी लोकसेवकांच्या संबंधित प्रशासकीय विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविली जातात. संबंधित प्रशासकीय विभागात प्रकरणाची सखोल छाननी करुन सक्षम

प्राधिकारी म्हणुन आरोपी लोकसेवकाविरुध्द मा.विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यास मंजूरी देण्याबाबत योग्य तो निर्णय घेतला जावून सदर निर्णय परस्पर लाचलुचपत प्रतिबंध विभागास कळविण्यात येतो. त्या पुढील कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून केली जाते. त्यामुळे एकदा या कार्यासनातून प्रकरण संबंधित विभागाकडे पाठविल्यानंतर पुन्हा सदर प्रकरणाशी या विभागाशी संबंध येत नाही. त्यामुळे याबद्दलची माहिती या कार्यासनात उपलब्ध नाही. दि.०१.०७.२०१० ते दि.२८.०२.२०११ दरम्यान एकूण ४९ प्रकरणे या कार्यासनांस प्राप्त झाले असून त्यापैकी ४४ प्रकरणे छाननी करून संबंधित विभागाकडे पाठविलेली आहेत. उर्वरित ५ प्रकरणावर कार्यवाही चालू आहे असेही सांगितले व तक्रारदार यांना सुध्दा कळविण्यात आले आहे. असे असुन सुध्दा तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची प्रकरणे ही हेतू पुरर्तसर प्रलंबित ठेवण्यात येतात व माहिती देण्याचे सुध्दा त्यामुळेच टाळाटाळ करण्यात येते. अशी शेकडो प्रकरणे वर्षानुवर्ष प्रलंबित आहे त्याबद्दल माहिती अधिकारी यांना शास्ती करावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. कोणत्याही शासनामध्ये प्रत्येक विभागाचे कामकाज हे संवंधिनाच्या कलम १६६ मा.राज्यपालांनी केलेल्या "शासनाचे कामकाजाचे नियम" प्रमाणे कामकाज होत असते. सदरच्या नियमांमध्ये प्रत्येक विभागास विषय वाटून दिलेले असतात. तसेच लोकसेवकांच्या संदर्भामध्ये कोणतीही कारवाई करावयाची झाल्यास ती सक्षम प्राधिकारी यांनी करावयाची असते व ते सक्षम प्राधिकारी हे त्या त्या प्रशासकीय विभागात असतात व त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना जी माहिती कळविलेली आहे ती नियमांचे पालन करुनच कळविलेली आहे. तसेच अर्जदारांने प्रकरणे प्रलंबित आहे म्हणुन शास्तीची विनंती केलेली आहे. या दोनही बाबत तक्रारदार यांनी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांच्या कामकाजासंबंधी माहिती उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्ज करते वेळेस कागदपत्रांच्या स्वरुपात जशी माहिती उपलब्ध असते तशी माहिती मिळते. कोणत्याही प्रकरणामध्ये निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये सार्वजनिक प्राधिकरणांस कारवाई किंवा कार्यवाही बाबतचे आदेश देण्याचे किंवा निर्णय प्रक्रिया होत नाही म्हणुन शास्ती करण्याची तरतुद

नाही व त्यामुळे तक्रारदार यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे ती योग्य असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही निकाली काढण्यांत येते.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३०.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/२९७६/तक्रार क्र.३६/०१**

**श्री.पृथ्वीराज विश्वास चव्हाण**
**अनुबंध २५, दौलत नगर,**
**संत एकनाथ जलकुंभाजवळ,**
**जळगांव.** **... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी (का.१७)**
**विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,**
**धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला,**
**८३, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८.** **... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक २०.०४.२०११**

**तक्रारदार - हजर,**

**जन माहिती अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय हजर आहे.**

**जन माहिती अधिकारी, विधी व न्याय विभाग हजर आहे.**

**जन माहिती अधिकारी, धर्मादाय आयुक्त कार्यालय हजर आहे.**

तक्रारदार यांनी दि.२८.०७.२०१० रोजी मुख्य सचिव कार्यालयाचे माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(१) प्रमाणे केलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणुन राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.११.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केली आहे.

२. तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दि.२८.०७.२०१० रोजी मुख्य सचिव कार्यालयातील माहिती अधिकारी यांना जळगावं पर्यटन विकास व खानदेश महोत्सव ट्रस्ट, जळगांव संस्थेचे विश्वस्थ असलेल्या शासकीय अधिका-यांनी शासनाचे किंवा सक्षम अधिका-यांची पूर्व परवानगी

वा मंजूरी घेणेबाबत माहे सप्टेंबर २००९ ते २५ जुलै २०१० या कालावधीतील माहिती मागितली होती. जळगांव पर्यटन विकास व खानदेश महोत्सव ट्रस्ट, जळगांव या संस्थेचे विश्वस्थ श्री.कुणाल कुमार, तत्कालीन जिल्हाधिकारी जळगांव, ट्रस्टचे अध्यक्ष श्री.डॉ.रामस्वामी एन, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगांव ट्रस्टचे उपाध्यक्ष श्री.रामनाथ सोनावणे, आयुक्त महानगरपालिका, जळगांव ट्रस्टचे विश्वस्थ तरी उपरोक्त शासकीय अधिका-यांनी सदर ट्रस्टचे विश्वस्त तसेच पदाधिकारी होण्याआधी ट्रस्टची नोंदणी दि.०३.१०.२००९ आहे. केंद्र शासनाकडून, राज्य शासनाकडून वा इतर कुणाच्या सक्षम अधिका-यांकडून (ज्यांना शासनाने प्रधिकृत केले आहे) परवानगी किंवा मजूंरी घेतली आहे काय? असल्यास त्यांच्या बाबतीतील अर्ज व परवानगी आदेशाची या कागदपत्रांची प्रमाणित प्रत मिळावी. तशी परवानगी घेतली नसल्यास पत्राव्दारे कळविण्यात यावे व परवानगी दिलेली असल्यास संपूर्ण कागदपत्रे व संचिका अवलोकनार्थ मिळावी. सदर ट्रस्ट च्या कामकाजासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचा कार्यालय म्हणुन व सरकारी कर्मचा-यांचा ट्रस्टच्या कामासाठी वापर करण्याची परवानगी मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना दिलेली असल्यास त्यांची प्रमाणित प्रत मिळावी अशी माहिती मागितलेली होती. परंतु अवर सचिव तथा राज्य जन माहिती अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय यांनी सदरचा अर्ज हा विधि व न्याय विभागाशी संबंधित आहे या कारणास्तव त्या विभागात दि.०२.०८.२०१० रोजी हस्तांतर करुन त्याप्रमाणे त्यांना स्वत: कळवून मुख्य सचिव हे माहिती अधिकारी नाहीत ही बाब स्पष्ट करण्यात येत आहे असे कळविले. त्यांनतर दि.१८.०८.२०१० रोजी कार्यासन अधिकारी तथा माहिती अधिकारी विधी व न्याय विभाग यांनी त्यांचा मुळ अर्ज हा धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयात पाठविण्यात येत आहे असे कळविले व त्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविले. माहिती अधिकारी धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयाने सदरचा अर्ज दि.०९.०९.२०१० रोजी माहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव यांचेकडे पाठवला व तक्रारदार यांना त्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे कळविले. अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव यांनी दि.२२.०९.२०१० रोजी मागितलेली माहिती या कार्यालयाशी संबंधित नाही. त्यामुळे अशी माहिती उपलब्ध नाही असे माहिती अधिकारी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना कळविले. परिणामी त्यांना कोणत्याही कार्यालयातून अदयाप माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन त्यांनी माहिती आयोगाकडे तक्रार केली. जन माहिती अधिकारी तथा अवर

सचिव, मुख्य सचिव यांचे कार्यालय यांनी आयोगाकडे लेखी खुलासा सादर करताना अर्जदाराने मागितलेल्या माहितीचा विषय विधी व न्याय विभाग यांचे अधिनस्त कार्यालयामार्फत हाताळण्यात येत असल्यांच्या धारणेस्तव संबंधित विभागाशी परस्पर संपर्क करण्याविषयी कळविण्यात आले होते. अपिलार्थीच्या मुद्दयांशी मुख्य सचिवांचे कार्यालय पूर्णत: सहमत नाही. अर्जातील विषय धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाशी निगडीत असल्याने कोणत्याही विश्वस्त संस्थेची कार्यवाही व त्याकरिता हाताळण्यात येत असलेली विहित कार्यपध्दती अथवा नोंदणी करण्यासाठी अनुज्ञेय कागदपत्रांची पुर्तता त्यांची तपासणी/छाननी करुन पात्रता निश्चित करण्याचे अधिकार धर्मादाय आयुक्त अथवा संबंधित कार्यालयाच्या प्राधिका-यांस असल्याची या कार्यालयाची धारणा असल्यानेंच सदरचा अर्ज विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला होता. कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, विधी व न्याय विभाग यांनी सदर विषय व त्यांचे दस्तऐवज हे धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संबंधित असल्याने प्रस्तुत अर्जदारांला माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे हस्तांतर केला होता असे नमुद केले आहे. त्यावर पुन्हा तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तीनही अधिकारी हे शासकीय अधिकारी आहेत व त्यात दोन अधिकारी हे आय.ए.एस अधिकारी आहे व शासकीय सेवेच्या नियमाप्रमाणे शासकीय सेवेच्या व्यतिरिक्त सामाजिक संघटना किंवा विश्वस्त संस्था यांचेवर पदाधिकारी म्हणुन काम करावयाचे असल्यास शासनाची परवानगी घेणे आवश्यक असते व त्यामुळे एक सर्व साधारण समज म्हणुन या तीन ही अधिका-यांनी शासनाची म्हणजे मुंबई येथे असलेल्या मुख्य माहिती आयुक्त यांच्या माध्यमातून किंवा सामान्य प्रशासन विभागाकडून अर्ज करुन परवानगी घेतलेली असावी म्हणुन मुख्य सचिव यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितली होती. मला असे वाटते की अशी परवानगी देण्याचा धर्मादाय आयुक्त यांना अधिकार नसावा व त्यामुळे त्यांचेकडे मी माहिती मागितली नाही. वास्तविक मुख्य सचिव यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी माझ्या अर्जाचे वाचन केले असते तर व त्यांना प्रशासनाची माहिती असती तर त्यांनी सदरचा अर्ज हा सामान्य प्रशासन विभागाकडे जो विभाग शासकिय सेवेच्या संदर्भामध्ये नियंत्रण करणारा विभाग आहे त्यांचेकडे हस्तांतर केला असता. परंतु त्या प्रकारचे कोणत्याही प्रकारची आकलन न करुन घेता त्यांचा अर्ज हा विधी व न्याय विभाग, धर्मादाय आयुक्त व जळगांव येथील अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय पाठविण्यात

आला. मी जळगांव येथील रहिवासी असल्याने मला ती माहिती जळगांव येथील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात सुध्दा मागता आली असती. माझ्या माहिती प्रमाणे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय हे शासन नाही म्हणुन मी त्या कार्यालयात माहिती न मागता शासनाकडे माहिती मागितली व त्यातुन काहीही निष्पन्न झाले नाही.

३. मात्र माहिती अधिकारी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाने राज्य माहिती आयोग कार्यालयाकडे जो खुलासा पाठविलेला आहे तो पुढील प्रमाणे आहे.

"सदर पदाधिका-यांना न्यासाचे विश्वस्त होण्यासाठी केंद्र शासनाकडून, राज्य शासनाकडून इतर कोणत्या अधिका-याकडून (ज्यांना शासनाने प्राधिकृत केले आहे) परवानगी दिली अगर मंजूरी दिली त्याबाबतची माहिती हवी होती व अशी माहिती या विभागाकडे नसल्याने अर्जदारास जळगांव कार्यालयाने लेखी कळविले आहे.

जळगांव पर्यटन व खानदेश महोत्सव ट्रस्ट, जळगांव या न्यासाची ट्रस्ट डीडच्या माध्यमातून व दि.१६.०७.२००९ रोजी ठराव मंजूर करुन नोंदणी करण्यासाठी दि.३१.०७.२००९ रोजी सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांच्या कार्यालयात प्रस्ताव दाखल केला. सदर अर्जाचा चौकशी क्र.७२२/९ असा आहे. सदर प्रकरणामध्ये चौकशी करुन मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २० अन्वये सदर ट्रस्ट नोंदणी प्रमाणपत्र ई ११७५ (जळगांव) दि.०३.१०.२००९ रोजी नोंदविण्यात आला असे दुरध्वनीव्दारे विचारणा केल्यानंतर माहिती प्राप्त झाली. सदर आदेश न्यायिक स्वरुपाचे असल्याने त्याबाबत माहिती अधिका-यांना कोणतेही भाष्य करता येत नाही. अर्जदाराने मागितलेली माहिती या विभागाशी संबंधित नसल्याने तक्रार दप्तरी दाखल करणेस विनंती आहे."

४. तक्रारदार यांचा युक्तीवाद व गैरतक्रार यांचे लेखी युक्तीवाद यावरुन असे दिसून येते की, कोणत्याही शासकीय अधिका-यांस सामाजिक संघटना किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्थेवर कामे करावयाचे असल्यास सेवा शर्तीच्या व शर्तीच्या नियमाप्रमाणे शासनाची परवानगी घेणे आवश्यक असते व अखिल भारतीय प्रशासकीय सेवा किंवा राज्यातील सेवा याच्या संदर्भातील याचें अधिकारी यांना सुध्दा शासनाची परवानगी घेणे बंधनकारक असल्याने सदरची माहिती ही शासनाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. सार्वजनिक विश्वस्त नोंदणी कार्यालय यांचेकडे ती माहिती परवानगी घेतल्यास असे किंवा घेतली नसल्यास

ते कार्यालय त्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची विचारणा करेलच असे नाही व त्यामुळे सदरचा अर्ज हा जन माहिती अधिकारी मुख्य सचिव कार्यालय यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे हस्तांतर केला असता तर त्यांचेकडे माहिती उपलब्ध असल्यास तक्रारदार यांना ती त्याच वेळेस उपलब्ध झाली असती. पुन्हा असा अर्ज सामान्य प्रशासन विभागाकडे हस्तांतर केल्यास तक्रारदार यांना माहिती मिळेल असे नाही. त्यामुळे सदरच्या अर्जा प्रमाणे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव मुख्य सचिव कार्यालय यांनी सामान्य प्रशासन विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घेउन ती तक्रारदार यांना पुरविणे संयुक्तीक राहिल. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, मुख्य सचिव कार्यालय यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत तक्रारदार यांना सामान्य प्रशासन विभागाकडून माहिती उपलब्ध करून घेउन तक्रारदार यांना विना मुल्य रजिस्ट्रर पोस्टाने पुरविण्यात यावी.**

**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २०.०५.२०११**
**मुंबई**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.१०/अपील क्र.६८०८/०२**

**श्री.सुदेश श्रीकांत साळगांवकर**
**बी/५७, १ माळा, मेघवाडी,**
**डॉ.एस.एस.राव रोड, लालबाग,**
**मुंबई ४०० ०१२.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त (मालमत्ता)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहा.आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत,**
**दुसरा मजला, पलटन रोड,**
**मुंबई ४०० ००१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहा.आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत,**
**दुसरा मजला, पलटन रोड,**
**मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०७.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ३०.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२८.०६.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी, आयुक्त महानगरपालिका यांचेकडे त्यांनी दि.०४.०३.२०१० रोजी आयुक्तांना डॉ.एस.एस.राव रोड, लालबाग, मेघवाडी येथील भूखंड क्र.सी.एस.क्र.११८ च्या भूखंडाबाबत भेट मिळण्याबाबत अर्ज केला होता. त्या अर्जा संदर्भात संपूर्ण माहिती मिळावी. तसेच कलम ४ प्रमाणे दस्तऐवजाच्या सर्व प्रती व्यक्तीश: उपलब्ध करुन मिळाव्यात. अर्जाच्या अनुषगांने अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.१२.०८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी आयुक्तांची भेट मागितली होती व अदयाप पर्यंत काहीही माहिती मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक (आयुक्त) यांनी दि.१३.०७.२०१० रोजी अपिलकर्ता यांना सदर पत्र या कार्यालयातील नोंद वहयामध्ये शोध घेतला असता नोंद वहयामध्ये नोंद झालेली दिसून येते नाही. तथापी आपल्या माहितीच्या अधिकारा अंतर्गच्या अर्जातील नमूद केलेल्या विषयावरुन आपला अर्ज प्रमुख अभियंता (विकास नियोजन) / सहा.आयुक्त, एफ/दक्षिण/सहा.आयुक्त (मालमत्ता) यांचेकडे अग्रेषित करुन आपणास हवी असलेली माहिती परस्पर देण्याचे कळविण्यात आले आहे. तसेच महानगरपालिकेत विविध खात्यात जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांची नेमणुक झाली असून त्याची संपूर्ण माहिती महापालिकेच्या www.msgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे असे कळविलेले होते. त्यानंतर अर्जदारास दि.१३.०८.२०१० रोजी पत्र पाठवून उपरोक्त भूखंडावर विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अन्वये मा.जगदंबा सहकारी संस्थेने सादर केलेल्या पुर्नविकासाची कागदपत्रे या कार्यालयात उपलब्ध असून सदर कागदपत्रांच्या छायांकित प्रती आवश्यक शुल्क भरुन उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविण्यात आले होते. परंतु अर्जदार माहिती घेण्यासाठी कार्यालयात हजर झाले नाही. प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये अपिलकर्ता यांनी सुनावणी समाधान कारक झाल्याचे लिहून दिल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती दि.०७.१०.२०१० व दि.०७.१२.२०१० रोजी देण्यात आलेल्या आहेत व तशी पोच ही त्यांनी दिलेली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८.०६.२०११,**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०३०९/अपील क्र.६७९०/०२**

**श्री.कमलेश चंद्रकांत नायक**
**शॉप क्र.२०, कामा नाझा भरवाड चाळ,**
**नॅशनल हाईवे जवळ, मालाड (पू), मुंबई ४०० ०९७.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.निबंधक**
**सहाकरी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी (श्रेणी-२)**
**सहाकरी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता यांना काही अपरिहार्य कारणामुळे सुनावणीसाठी उपस्थित राहता येणार नाही असे त्यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे., जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१२.०३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-२ यांचेकडे १९९५ ते २०१० या कालावधीतील चार्ल्स ग्रुप को.हौ.सो.मर्या. एस.आर.ए. डेप्युटी सी.इ/५४/पी.एन/पी.एल/एल.ओ.आय. धनजीवाडी मालाड (पू), मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारी (१०) च्यासंदर्भामध्ये परिपत्र २२ नुसार बांधकामाची खालील विषयी माहिती पहिजे यासाठी अर्ज केला होता. ९०० मोफत घर घेतलेला भाव वादी लिस्ट एस.आर.ए. इमारत नं.१, ३, ४ ब, ५ अ, ८ अ, ११ सी, ११ ब तसेच बंधपत्राची माहिती प्रमाणित करुन पाहिजे असे मागितले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.०६.०४.२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध आहे घेउन जावे असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कळविले होते. अर्जदार माहिती घेण्यास दि.०४.०६.२०१० रोजी कार्यालयात आले असता त्यांना सदर माहितीची ९४ पृष्ठांचे व रु.१८८/- चे चलन दिले त्याचा भरणा अर्जदार यांनी दि.२१.०६.२०१० रोजी

करुन सदरची माहिती प्राप्त करुन घेतली मात्र प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०५.०८.२०१० रोजी देण्यात आला असून ज्या इमारतीची वाटप यांदी कार्यालयात उपलब्ध नाही परंतु संस्था पातळीवर वाटप झाले आहे त्याबाबत संस्थेस सदरची यादी अर्जदार यांना उपलब्ध करुन देउन त्यांची एक प्रत कार्यालयात सादर करण्यास सुचना देण्यात याव्यात असे आदेश दिलेले दिसून येतात व त्याप्रमाणे दि.१२.०८.२०१० रोजी उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आली. परंतु तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. माहिती दिलेली नाही असे कारण दिलेले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही असे त्यांनी कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे सांगितले. अर्जदार यांच्या मागणी नुसार संस्थेच्या बंधपत्राची माहिती कार्यालयास उपलब्ध नसल्याने संस्थेविरुध्द दि.२१.०७.२००८ रोजीच्या आदेशानुसार संस्थेची व्यवस्थापक समिती बरखास्त करुन प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. त्यावर संस्थेने अपील केले होते अपील हे फेटाळण्यात आले व डी.आर.पाटील यांची प्रशासक म्हणुन नियुक्ती झाली आहे. यावरुन अपिलकर्ता यांना संपूर्ण माहिती मिळाली असल्याने ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे निकली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७५२/अपील क्र.६७८५/०२**

**श्री. इस्माईल खामिसा अहमद,**
**६० फीट रोड, प्रजापती सहकारी उत्पादक मंडळ लि.च्या मागे,**
**खामिसा अहमद चाळ, कुंभारवाडा, धारावी,**
**मुंबई ४०० ०१७.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त (मालमत्ता)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहा. आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत,**
**२ रा मजला, पलटन रोड, मुंबई ४०० ००१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता) लेखा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहा. आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत,**
**२ रा मजला, पलटन रोड, मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०३.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०२.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा आयुक्त (मालमत्ता) यांचेकडे अर्ज करुन सन १९३९ मध्ये बी.एम.सी. खमीसा अहमद यांना व्हिएनटी प्लॉट नं.१२५ व १२६ चे वाटप केले होते ती सर्व कागदपत्रे अपिलकर्ता यांनी मागितलेली दिसून येतात. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१४.०७.२०१० रोजी माहिती उपलब्ध आहे रु.१५५/- चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.३१.०७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०६.०९.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी सदरची कागदपत्रे प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता),

जी/उत्तर विभाग यांचेकडे इतर कागदपत्रे उपलब्ध करण्यासाठी पाठवावे असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यानंतर दि.२१.०९.२०१० रोजी प्रथम अपीलाचे निर्णय पाठविण्यात आले आहे असे अपिलकर्ता यांना कळविण्यात आले होते. परंतु त्यानंतर माहिती उपलबध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना ॲग्रीमेंट ची प्रत मिळाली व इतर कागदपत्रे मिळाली नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की सदरची कागदपत्रे वॉर्ड विभागात उपलब्ध आहेत. त्यामुळे अपिलकर्ता याना विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वॉर्ड मधुन कागदपत्रे उपलब्ध करुन घेउन पुरविणे संयुक्तीक राहिल. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता) यांनी वॉर्ड कडून माहिती घेउन विना मुल्य अपिलकर्त्यास पुरविण्यात यावी.**

**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/३२२/अपील क्रमांक ६६४३/२०११/०२**
**क्रमांक-मुमाआ/५०६९२/अपील क्रमांक ६७००/२०११/०२**

**१)श्री. नंदकुमार माधवराव धुमाळ,**
**पोलीस अधि.वसाहत, खो.क.७, १ला मजला,**
**पोद्दार आंतरराष्ट्रीय स्कूल व विद्युत कार्यालयाजवळ,**
**एस.व्ही. रोड, सांताक्रुझ(प.), मुंबई-५४. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,मुंबई,क्रॉफर्ड मार्केट समोर,**
**डी.एन.रोड, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,मुंबई,क्रॉफर्ड मार्केट समोर,**
**डी.एन.रोड, मुंबई-४०० ००१. ...... उत्तरवादी**

**२)श्री.देवाप्पा अण्णाप्पा गावडे,**
**अवर सचिव,वित्त विभाग(अल्प बचत),**
**नवीन प्रशासन भवन,८वा मजला, मुंबई-४०००३२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(प्रशासन),**
**वित्त विभाग/प्रशासन-२,**
**मंत्रालय, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**वित्त विभाग/प्रशासन-२,**
**मंत्रालय, मुंबई-३२. ...... उत्तरवादी**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.०६.२०१०, ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११,१८.५.२०११**
**अपिल क्र.६६४३-अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपिल क्र.६७००-अपिलकर्ता,जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

## निर्णय

अपिल क्र.६६४३/०२ मध्ये अपिलकर्ता श्री.धुमाळ यांनी दि.६.५.२०१० रोजी(१२.५.२०१०) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय,मुंबई यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतली-

१)पो.नि.नंदकुमार धुमाळ हे गुन्हे शाखेत कार्यरत असतांना दि.१.४.२००७ ते दि.५.९.२००७ या कालावधीमध्ये त्यांच्या गोपनीय अहवालात लिहिण्यात आलेले प्रतिकूल गोपनीय शेरे त्यांना मा. सह पोलीस आयुक्त(प्रशासन),बृहन्मुंबई यांनी त्यांचे दि.१२.३.०९ चे ज्ञापनाद्वारे दि.१६.३.०९ रोजी कळविले होते हे बरोबर आहे काय?

२) उपरोक्त शे-यामुळे व्यथित होऊन पो.नि.धुमाळ यांनी दि.९.५.०९ चे अभिवेदन मा.पोलीस आयुक्त, कक्ष-१, गोपनीय शाखा यांना मुदतीत सादर केले होते हे बरोबर आहे काय?

३)या अभिवेदनावरुन प्रतिवदेन अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.चंदनशिवे,आ.गु.शा आणि पुनर्विलोकन अधिकारी पोलीस उप अयुक्त डॉ.श्री.उगले (आ.गु.शा.) यांचेकडून अहवाल मागविण्यात आले होते काय?

४)सहाय्यक पोलीस आयुक्त चंदनशिवे,आ.गु.शा.आणि पोलीस उप आयुक्त डॉ.श्री.उगले यांनी मा.पोलीस आयुक्त, मुंबई यांना या प्रकरणी अहवाल सादर केले आहेत काय? असल्यास त्या अहवालाच्या प्रती पो.नि.धुमाळ यांना पुरविण्यात याव्यात.

५)या प्रकरणी संबंधित गोपनीय शाखेचे संस्करण अधिकारी यांनी वेळोवेळी वरिष्ठांना सादर केलेल्या टिप्पणीची प्रत पो.नि.धुमाळ यांना पुरविण्यात यावी.

६)पो.नि.धुमाळ यांनी मा.पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांनी प्रतिकूल शेरे काढून टाकण्याबाबत दिलले दि.९.५.०९ चे अभिवेदनाची सद्यस्थिती काय आहे याची पो.नि.धुमाळ यांना माहिती देण्यात यावी.

२. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२८.५.२०१० रोजी त्यांच्या माहितीच्या संदर्भात मुद्देनिहाय पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.१५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१५.६.२०१० रोजी देण्यात आला असून शासकीय माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती/दिलेले उत्तर योग्य आहे या कारणास्तव अपील निकाली काढण्यात आले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपिल क्र.६७७०/०२ मध्ये अपीलकर्त्यांनी दि.८.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी/अवर सचिव प्रशा.-२ वित्त विभाग यांचेकडे गोपनीय अहवाल कालावधी सन २००६-०७ ते २००९-१०

१)श्री.दे.आ.गावडे, अवर सचिव यांचे उक्त कालावधीतील वित्त विभाग सर्व प्रमाणपत्रांसह गोपनीय अहवालाच्या झेरॉक्स प्रती

२) सन २००९-२०१० या वर्षातील दि.२५.१.२००९ ते दि.३१.३.२०१० या कालावधीतील गोपनीय अहवालांचे संस्करण केलेल्या व घेतलेल्या निर्णयाचे संबंधित नस्तीमधील सर्व टिप्पणी विभाग, पत्रव्यवहार विभाग,निर्देशपत्रासह छायांकित प्रती.

३) दि.२५.११.२००९ ते दि.३१.३.२०१० या कालावधीत ephemoval Roll(कच्चे टिपण) ठेवले असल्यास त्याच्या प्रती

माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदर अर्जाचे अनुषंगाने दि.६.१०.२०१० रोजी कलम ८(१)(जे) अनुसार माहिती देता येत नाही असे कळविल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दि.७.१०.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपील फेटाळण्यात आले असल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपिलकर्ता श्री.धुमाळ यांनी आयोगाकडे युक्तीवाद करतांना तसेच द्वितीय अपीलामध्ये लेखी कारण दिलेले आहे त्यात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांना शास्ती करावी अशी विनंती केली आहे. तसेच गोपनीय शाखेने रु.१००००/- नुकसान भरपाई द्यावी अशीही मागणी केली आहे. तोंडी युक्तीवाद करतांना त्यांनी असे सांगितले की, त्यांनी गोपनीय अहवालाच्या संदभात जी माहिती मागीतली आहे ती त्यांचे गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे योग्य नसल्यामुळे व पुर्नविलोकन अधिकारी यांनी कोणतेही उत्तर दिलेले नसल्यामुळे किंवा त्याबाबत कोणताही निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी सदरची माहिती मागीतलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता श्री.नंदकुमार धुमाळ यांनी मागीतलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने मुद्दा क्र.४ व ५ अन्वये त्यांच्या स्वतःच्या गोपनीय अहवालाच्या अनुषंगाने करण्यात आलेला पत्रव्यवहार व संस्करण अधिकारी यांनी वेळोवेळी वरिष्ठांना सादर केलेल्या टिप्पण्यांच्या प्रतींची केलेली मागणी उघड करण्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित नसल्याने तसेच सदर माहिती ही उघड केल्यास संबंधीत शासकीय कर्मचारी व गोपनीय अहवाल लिहिणारे अधिकारी व त्यासंबंधी कार्यवाही करणारे अधिकारी यांच्यामध्ये नाहक कटुता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तसेच संबंधितांमधील विश्वासाला तडा जाण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने मुद्दा क्र.४ व ५ बाबतची माहिती अधिनियमाच्या कलम ८(१)(ञ)मधील तरतुदीच्या अनुषंगाने ज्या सरकारी,कार्मिक,लोक शिकायत तथा पेन्शन मंत्रालय(कार्मिक और प्रशिक्षण विभाग) यांचे परिपत्रक क्र.१०/२०/२००६/आई.आर. दि.२१.९.२००७ च्या अनुषंगाने नाकारण्यात आलेली आहे. तसेही कोणतेही व्यापक जन हित नसल्यामुळे भविष्यामध्ये गोपनीय अहवाल जर प्रकट केले तर संस्करण अधिकारी हे गोपनीय अहवाल वस्तुनिष्ठ लिहिण्यास धजावणार नाहीत व ती एक औपचारिकता राहील. त्यावर अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, एखाद्या अधिका-याने आकसाने जर गोपनीय अहवाल प्रतिकूल लिहिलेले असतील तर त्याबाबत निवेदन केल्यानंतर योग्य तो निर्णय

देणे आवश्यक होते परंतु त्या निवेदनावरसुध्दा कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी ही माहिती मागीतलेली आहे.

५. अपीलकर्ता श्री.गावडे यांनीसुध्दा त्यांचे गोपनीय अहवाल कारण नसतांना प्रतिकूल दिलेले असल्याने व ephemeral roll ठेवले असल्यास त्याची कारणे त्यांना कळवणे आवश्यक असल्याने गोपनीय अहवाल,प्रतिवेदन व पर्नविलोकन अधिका-यांनी दिलेल्या टिप्पण्या इ. मिळणेचा हक्क आहे व ते नाकारता येणार नाही असा आयोगापुढे युक्तीवाद केला.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या अपील क्र.७८२१/अपील क्र.२००८/२३४५/०२ मधील निर्णयाचा आधार घेतलेला आहे.

६. शासकीय कर्मचारी/अधिकारी हे सार्वजनिक सेवक आहेत. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३११ प्रमाणे शासकीय कर्मचारी किंवा अधिकारी यांना त्यांच्या सेवेच्या संदर्भात संरक्षण देण्यात आलेले आहे. त्यामुळे कोणत्याही अधिका-यास/कर्मचा-यास त्याच्याविरध्द असलेल्या आरोपांच्या संदर्भात वाजवी संधी दिल्याशिवाय तसेच चौकशी केल्याशिवाय शासकीय सेवेतून बडतर्फ किंवा निलंबित करता येत नाही व त्यामुळे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या संदर्भात त्यांच्या सेवेच्या प्रत्येक वर्षी त्यांचे योग्य मुल्य मापन होण्याच्यादृष्टीने वरिष्ठ अधिका-यांनी गोपनीय अहवाल लिहिण्याची तरतूद संबंधीत नियमांमध्ये करण्यात आली आहे. गोपनीय अहवाल लिहिण्याची तरतूद जर नसेल तर अर्थातच कोणत्याही शासकीय कर्मचा-याच्या कामकाजाचे मुल्यमापन होऊ शकणार नाही व सेवेत संरक्षण असल्यामुळे वरिष्ठांचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण असणार नाही. त्याकरीता शासकीय कर्मचारी/अधिकारी यांच्या कामकाजाचे मुल्यमापन करुन त्यांचे गोपनीय अहवाल कसे लिहावेत, जन करुन ठेवावेत व त्यांचे संस्करण करणे याबाबत सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक सीएफआर-१२९५/प्र.क्र.३६/९५/तेरा, दि.१ फेब्रुवारी,१९९६, परिपत्रक क्र.सीएफआर-१२०८/प्र.क्र.६०/२००८/तेरा, दि.२ जुलै,२००८व इतर अनुषंगिक शासन निर्णयांमधील सविस्तर तरतुदींन्वये शासनाने वेळोवेळी निदेश दिलेले आहेत.सदर शासन निर्णयामध्ये अशी तरतूद आहे की, ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालांची प्रतवारी '-ब' अथवा 'क' आहे, अशी प्रतवारी संबंधितांना लेखी कळवावी, तसेच ज्यांची पतवारी 'अ' आहे त्यांना तोंडी कळवावे व 'अ+' प्रतवारी संबंधितांना लेखी कळवावी. याचाच अर्थ ज्यांची प्रतवारी सामान्य आहे किंवा ज्यांचे काम,खराब नाही किंवा उत्कृष्ट अथवा अत्युत्कृष्ट नाही परंतु ज्या प्रतवारीमुळे त्यांच्या भविष्यकालीन सेवेमध्ये अडचणी उद्‌भवत नाहीत असे शेरे, संबंधितांना कळविण्याचे बंधन नाही. म्हणजेच गोपनीय अहवालातील प्रतवारी, संबंधित अधिकारी/कर्मचा-यांस घातक नसेल तर अशी प्रतवारी कळविण्याचे बंधन नाही.

७. प्रचलित कार्यप्रणालीनुसार कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचा-यांचे सर्वसाधारण कामकाजाचे मुल्यमापन करुन दरवर्षी गोपनीय अहवाल लिहितात. सदरचे गोपनीय अहवाल हा त्या अधिकारी/कर्मचा-याच्या शासकीय सेवेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा अभिलेख आहे. गोपनीय अहवाल याचा अर्थ सदरचे मुल्यमापन गोपनीय आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा युक्तीवाद करतांना असे सांगितले की, शासकीय

अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा शर्ती, महाराष्ट्र नागरी सेवा नियम मधील अनेकविध तरतुदींस अधीन राहून नियमित केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने लिहिण्यात आलेले गोपनीय अहवाल हे गोपनीयच ठेवणे कार्यालयाच्या हिताच्यादृष्टीने आवश्यक असते. अर्जदार अधिकारी/कर्मचारी कार्यालयाचाच भाग असल्यामुळे व ते कार्यालयात कार्यरत असल्यामुळे त्यांच्या वैयक्तिक बाबींसंबंधीची सदरच्या गोपनीय अहवालाच्या अथवा वर नमुद कार्यालयीन कामकाजाच्या निर्णयाच्या प्रतींची माहिती प्रकट केल्याने अर्जदाराच्या वैयक्तिक हिताचे संवर्धन होते, तथापि, संदर्भिय अधिनियमात वैयक्तिक हिताची माहिती प्रकट करणे बंधनकारक नाही. सदरचे अहवाल प्रकट केल्याने कोणतेही सार्वजनिक हित साध्य होत नाही. त्याचप्रमाणे अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवाशर्ती विषयक माहिती मागविणे यात सार्वजनिक लोकहित दिसून येत नाही. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या उपरोक्त सेवाविषयक बाबी विशेषत: गोपनीय अहवालासंबंधी माहिती प्रकट केल्याने कार्यालयातील संबंधित कर्मचारी व गोपनीय अहवाल लिहिणारे अधिकारी यांच्या वैयक्तिक संबंधांमध्ये बाधा निर्माण होते व त्याचा परिणाम कार्यालयातील कामकाजावर होतो.कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींची माहिती प्रकट केल्याने संबंधित अधिकारी/कर्मचारी त्या व्यक्तिगत माहितीचा गैरवापर करुन वरिष्ठ अधिका-यांवर तक्रारीद्वारे दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये कोणतेही आम जनतेचे हित नसून, निव्वळ संबंधित अधिकारी/कर्मचारी त्यांचा व्यक्तिगत स्वार्थी हेतू साध्य करुन कार्यालयीन वातावरण बिघडवू शकतात आणि कार्यालयीन कामकाजामध्ये असहकार निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात.

८. संबंधित अधिनियमांतर्गत गोपनीय अहवालविषयक माहिती अधिकारी/कर्मचा-यांना देण्याची पध्दत प्रचलित झाल्यास, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणा-या प्रतिवेदन/पुर्नविलोकन अधिका-यांवर सर्वच अधिकारी/कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहितांना दडपण राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे तक्रार होईल या भितीपोटी अधिकारी/कर्मचा-यांच्या कामाचे योग्य ते मल्यमापन न हाता गोपनीय अहवाल लिहिले जातील. त्यामुळे गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या शासन निर्णय, परिपत्रकांचे अनुपालन होणार नाही आणि अनुपालन न झाल्याने त्यास संबंधित प्रतिवेदन/पुर्नविलोकन अधिकारीच जबाबदार राहतील आणि कर्मचा-यांच्या नुकसानीस असे अधिकारी/कर्मचारी जबाबदार राहतील. गोपनीय अहवालासंबंधी माहिती उघड झाल्याने आणि कायालयातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या वा इतर कर्मचा-यांच्या गोपनीय अहवालांच्या प्रती किंवा कार्यालयीन पत्रव्यवहाराच्या प्रती देत राहिल्यास, कार्यालयीन कामांमध्ये अडथळे येण्याची शक्यता आहे व त्यातून अधिकारी/कर्मचा-यांची एकमेकांविरुध्दची मते कलुष्ति होण्याचे प्रकार वाढीस लागतील आणि त्यातून आपापसात वाद निर्माण होतील आणि त्याचा विपरित परिणाम कार्यालयीन कामकाजावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

९. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये जी माहिती 'गोपनीय असेल'(म्हणजे वर्जित प्रयोजनांमध्ये मोडत असेल) जी माहिती सार्वजनिक हिताला बाधक असेल, अथवा जी

माहिती दिल्यामुळे दुस-या कोणाच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा संकोच होईल असे त्या माहिती अधिका-यास वाटले तर ती माहिती देणे त्याच्यावर बंधनकारक नाही.

१०. वरील सर्व मुद्यांचा विचार करतांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींचा विचार करणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम ३ अन्वये सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार असेल अशी तरतूद आहे. परंतु अधिनियमाच्या प्रास्ताविकामध्ये "ज्याअर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच, शासनाचे कामकाज कार्यक्षमरीत्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे या बाबींनाही बाध येण्याची शक्यता आहे;

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शांची परमोच्चता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे;"

असे नमूद केले असल्यामुळे अधिनियमाच्या कलम ८(१) प्रमाणे या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नागरीकाला (क) ते (झ)प्रमाणे माहिती पुरविण्याचे आबंधन असणार नाही. याचा अर्थ माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद करण्यात आला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिलेले उत्तर भारत सरकारच्या दि.२१.९.२००७ रोजीच्या परिपत्रकाच्या आधारे दिलेले आहे व त्या परिपत्रकात अधिनियमाच्या कलम ८(१)(ञ)च्या तरतुदींचा उल्लेख केलेला आहे. सदर तरतुदींमध्ये 'जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोक हिताच्यादृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिति, जन माहिती अधिकारी किंवा अपील प्राधिका-यांची खात्री पटली असेल,ती खेरीज करुन, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधांशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगीबाबतीत विनाकारण हस्तक्षेप करेल, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती' प्रकट करता येणार नाही अशी तरतूद आहे. गोपनीय अहवालामध्ये शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची वर्तणूक, कार्यक्षमता,चारित्र्य यांच्या वस्तुस्थितीचे मुल्यमापन करणे अपेक्षित असते व त्यामुळेच सदरच्या अहवालास गोपनीय अहवाल असे म्हटले आहे. ऑफीशियल सिक्रेट्स ॲक्ट १९२३, माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींप्रमाणे संपूर्णपणे निरसित केलेले नाही. कलम ८(२)मध्ये सार्वजनिक प्राधिकरणाची माहिती प्रकट करण्यासंदर्भात व्यापक जन हित व वैयक्तिक हित यांचा विचार करुन जन माहिती अधिका-यास स्वेच्छाधिकार दिलेले आहेत व त्यावरुन तसेच प्रस्ताविकातील तरतुदींवरुन कार्यालयाची कार्यक्षमता जर टिकवून ठेवायची असेल तर काही संवेदनक्षम माहिती ही गोपनीय राखणे आवश्यक असते व गोपनीय अहवाल संवेदनक्षम अशी माहिती आहे. परंतु त्यातही सदरचे गोपनीय अहवाल प्रकट करण्यास व्यापक सार्वजनिक हित असल्यासच ते प्रकट करणे आवश्यक राहील. परंतु गोपनीय अहवाल संबंधित कर्मचा-यास प्रकट करणे यामध्ये कोणत्याही प्रकारचे व्यापक जन हीत आहे असे म्हणता येणार नाही. गोपनीय अहवालात प्रतिकुल शेरे असल्यास त्याविरुध्द निवेदन करण्याची तरतूद असल्यामुळे त्या निवेदनाच्या माध्यमातूनच त्या अधिका-यास किंवा कर्मचा-यास न्याय मिळवून घेता येतो. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने गोपनीय अहवालाच्या संदर्भात निर्णय देतांना गोपनीय अहवालाच्या

संदर्भातील अंतिम शेरे(entries) उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे असा निर्णय दिलेला आहे. प्रतिवेदन अधिकारी किंवा पुनर्विलोकन अधिका-यांनी ज्या टिप्पण्या कर्मचा-याच्या संदर्भात केलेल्या असतात Ephemeral Roll ठेवलेले असतात त्या उपलब्ध करुन द्याव्यात असे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात दिसून येत नाही. संविधानाच्या तरतुदींप्रमाणे शासकीय कर्मचारी व अधिकारी यांनी अनुच्छेद ३११ प्रमाणे त्यांच्या सेवे संदर्भात संरक्षण दिलेले असल्यामुळे जरी गोपनीय अहवालातील प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिका-यांचे अभिप्राय हे प्रकट केले तर भविष्यात प्रतिवेदन अधिकारी किंवा पुनर्विलोकन अधिकारी हे वस्तुनिष्ठ अहवाल लिहितीलच असे नाही त्यामुळे अधिकारी किंवा कर्मचारी यांचे संदर्भात कार्यालयीन शिस्त पाळण्याच्या संदर्भात किंवा कामकाजाच्या संदर्भात, कार्यक्षमतेच्या संदर्भात वरिष्ठ अधिका-यांचे कोणतेही नियंत्रण रहाणार नाही. वस्तुनिष्ठ अभिप्राय असल्यास त्यातून वाद व कटुताच निर्माण होईल व त्यामुळे शासनाचे काम कार्यक्षमरित्या चालण्याच्या संदर्भात संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे ही बाब कार्यक्षमतेशी निगडीत असल्याने प्रास्ताविकेत माहिती प्रकट करणे व संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे यात ताळमेळ राखणे आवश्यक असल्याने असे गोपनीय अहवालातील अभिप्राय प्रकट करण्याने कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक हित साधणार नसल्याने प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिका-यांचे अभिप्राय प्रकट करण्यास अधिनियमाचे कलम ८(१)(ञ)प्रमाणे अपवाद करणेच आवश्यक आहे. मात्र अपिलकर्ता श्री.धुमाळ यांनी जे निवेदन दिलेले आहे त्या निवेदनाचे संदर्भात झालेला निर्णय हा अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे अपिलकर्ता यांची दोनही अपीले निकाली काढण्यास पात्र आहेत.

## आदेश

**१) अपील क्रमांक ६६४३/०२ व ६७००/०२ ही दोन्ही अपीले निकाली काढण्यांत येत आहेत.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ४.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/७६०/अपील क्रमांक ६६४०/२०११/०२**

**श्री. मोहम्मद इशाक अली,**
**६,मराठा मंदिर मार्ग, वडगामा हाऊस,**
**तळमजला, मुंबई सेंट्रल(पूर्व), मुंबई-४०० ००८. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**मध्य प्रादेशिक विभाग(परिमंडळ-३१),**
**बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड, भायखळा,मुंबई-४०००२७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**मध्य प्रादेशिक विभाग(परिमंडळ-३१),**
**बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड, भायखळा,मुंबई-४०००२७.**

**श्री.शहानवाज सरफराज खान,**
**२१, टेमकर स्ट्रीट,दुसरा माळा, रुम नं.५ व ६,**
**नागपाडा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १४.०१.२०११**
**सुनावणीचा दिनांक : ८.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२०.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, मध्य मुंबई, बावला कंपाऊंड,मुबई यांच्याकडे अर्ज करुन श्री.शहानवाज सरफराज खान यांचा पोलीस स्टेशनमध्ये गोडाऊन - ४३-४५ सत्तारवाला, मोरलँड रोड,मुंबई मध्ये कब्जा व भाडेकरु म्हणून दाखवण्यासाठी त्यांनी जी कागदपत्र दाखल केलेली आहेत त्यांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात, माहितीचा कालावधी १ फेब्रुवारी-२००९ ते अर्जाच्या तारखेपर्यंत, तसेच माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन माहिती मागीतली आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता

यांना दि.२७.८.२०१० रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, नागपाडा पोलीस ठाणे यांनी माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांना कळविल्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे व माहिती देण्यास अधिनियमाच्या कलम ११(१) अन्वये शहानवाज खान यांनी माहिती देण्यास नकार दिला असल्यामुळे सदरची माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.२०.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय २५.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, श्री.शहानवाज खान हे अपिलकर्ता यांच्या मालकीच्या गोडाऊनमध्ये भाडेकरु आहेत व तेथे त्यांचा कब्जा आहे अशाप्रकारची कागदपत्र सादर केलेली आहेत. परंतु शहानवाज खान हे फरारी असून त्यांचा सदरच्या गोडाऊन संदर्भात कोणत्याही प्रकारचा संबंध नाही व त्यामुळे सदरची माहिती त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये मागीतली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती त्रयस्थ पक्षाने गुन्हयाच्या तपासाच्या संदर्भात पोलीसांकडे दाखल केलेली असल्यामुळे व ती त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्रयस्थ पक्षास विचारणा करण्यात आली होती. परंतु त्रयस्थ पक्ष म्हणून श्री.शहनवाज सर्फराज खान यांनी शहनवाज सर्फराज खान नावाचे विद्युत बिल,महानगरपालिकेचा गुमास्ता परवाना,लाईट भाडे पावती,सी.टी.सिव्हील कोर्टातील ए.सी. सुट १५५०/०९ ची प्रत सादर करण्यात आली होती ती अपिलकर्ता यांना देण्यास त्यांची हरकत आहे. सदरच्या कागदपत्रांचा गैरवापर होऊ शकतो असे त्यांनी लेखी लिहून दिले असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही व प्रथम अपीलामध्येसुध्दा तोच निर्णय कायम ठेवण्यात आला होता. राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सुनावणीस आल्यानंतर त्रयस्थ पक्षाशी संबंधीत माहिती मागीतली असली तरी राज्य माहिती आयोगानुसुध्दा अधिनियमाच्या कलम १९(४) अन्वये त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे बंधनारक असल्यामुळे त्रयस्थ पक्ष श्री.शहनवाज सर्फराज खान यांना आयोगापुढे उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी ९ मे,२०११ रोजी नोटीस पाठवण्यात आली होती. आज दि.८.६.२०११ रोजी सदरचे अपील सुनावणीस ठेवण्यात आले होते. परंतु आज श्री.शहनवाज सर्फराज खान हे आयोगाच्या कार्यालयात उपस्थित नाहीत व त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा किंवा माहिती उपलब्ध करुन देऊ नये याकरीता हरकत घेतल्याचे सादर केलेले नाही व त्यामुळे नोटीसमध्ये म्हटल्याप्रमाणे सुनावणीसाठी आपण उपस्थित न राहिल्यास आपले म्हणणे काहीही नाही असे समजून उपलब्ध कागदपत्रांचा विचार करुन निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले असल्यामुळे श्री.शहनवाज सर्फराज खान यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे त्यांच्या जबाबावरुन वर्णन लक्षात घेता त्यांनी सार्वजनिक कागदपत्र दाखल केलेली आहेत असे दिसून यते. विद्युत बील किंवा गुमास्ता परवाना,लाईट भाडे पावती व सिटी सिव्हील कोर्टातील एस.सी. सुट १५५०/०९ ची प्रत हे

सर्व सार्वजनिक अभिलेखे असल्यामुळे ते उपलब्ध करुन देण्यास कोणतीच हरकत असण्याचे कारण नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.२०.८.२०१० च्या अर्जात मागीतलेली माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी व त्याची पोच घेण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ९.५.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३८९/अपील क्रमांक ६७२२/२०१०/०२**

**श्री. यतीन एन. शहा,**
**नवीन नगर-१, टँक लेन,**
**अकबरअलीच्या मागे, म्यनिसिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ(प.), मंबई-४०००५४. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(निष्कासन) यांचे कार्यालय,**
**म्हाडा भवन, तळमजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपजिल्हाधिकारी(निष्कासन) यांचे कार्यालय,**
**म्हाडा भवन, तळमजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक**
**सुनावणीचा दिनांक : ९.५.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१०.१.२०१० रोजी त्यांनी दि.२८.२.०८ रोजी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती उपजिल्हाधिकारी(ENC) बांद्रा यांच्याकडे मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.६.२.२०१० रोजी मुद्दा क्र.१ मध्ये चंद्रा प्रभू जैन देरासर ट्रस्ट बांद्रा(प.) यांनी अनधिकृत पक्के बांधकाम केलेले आहे असे नमूद केले असून सदर बांधकाम हे

दुरुस्तीचे असल्याने दुरुस्ती परवानगी बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून दिली जाते या कार्यालयाकडून दिली जात नाही.तसेच संबंधित स्ट्रक्चरबाबत आवश्यक त्या माहितीकरीता या कार्यालयात आल्यास ती उपलब्ध करुन देता येइल असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२०.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.३.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.शशांक रॉय हे उपस्थित होते व त्यांना याबाबतच्या माहितीची संचिका अवलोकनार्थ दाखविण्यात आली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असूनसुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसते.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी आयोगापुढे जी तक्रार केलेली आहे त्या तक्रारीच्या संदर्भात तसेच माहितीच्या अर्जाच्या संदर्भात त्यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच त्यांचे प्रतिनिधी श्री.शशांक रॉय हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर होते व त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. श्री.शरद वसंत मदने याच्या तक्रारीबाबत आवश्यक ती संपूर्ण संचिका त्यांना दाखविण्यात आली तसेच त्यांना दि.३१.३.२०१० रोजी ही बाब कळविण्यात आली व दि.१४.४.०८ रोजी याबद्दलची माहितीही त्यांना देण्यात आली होती व त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामळे सदरचे अपील निकाली काढण्यात यावे अशी त्यांनी आयोगापुढे विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे केलेला युक्तीवाद व दाखल केलेली कागदपत्र यांचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.शशांक रॉय यांना तसेच अपिलकर्ता यांनादेखील माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ८.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३९४/अपील क्रमांक ६७२३/२०१०/०२**

**श्री. यतीन एन. शहा,**
**नवीन नगर-१, टँक लेन,**
**अकबरअलीच्या मागे, म्युनिसिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ(प.), मंबई-४०००५४. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/वेस्ट वार्ड,**
**मार्टीन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/वेस्ट वार्ड,**
**मार्टीन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक**
**सुनावणीचा दिनांक : ८.६.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.६.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर निर्धारक अधिकारी,एच/वेस्ट वार्ड,सेंट मार्टिन्स रोड,बांद्रा(प.) यांच्याकडे पत्र क्र.सहाय्यक करनिर्धारक व संकलक/बांद्रा एच(प.)/म.मा.अधिकार-५५५५/०९-१० यामध्ये नमूद केलेले Total १७८ Malmatta between the numbering from HW ३५०० to HW ३६०० च्या संदर्भात

त्यांची नावे,संपूर्ण पत्ते इत्यादी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद कलेले दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१९.३.२०१० रोजी अर्जातील अ.क्र.१ व २ बाबत असे कळविण्यात आले की, आपण मागीतलेली १९६९ ते २००९ पर्यंतचे निरिक्षण उतारे व प्रथम करनिर्धारण दिनांक हे फक्त गेल्या १५ वर्षाचे उपलब्ध आहेत. १५ वर्षापूर्वीचा जुना अभिलेख जतन केला जात नाही. त्यामुळे १९९४-९५ ते २००८-०९ पर्यंतचे निरिक्षण उतारे रु.२३०/- शेडयुल फी(प्रति वर्ष प्रति मालमत्ता) भरुन मिळेल. म्हणजे रु.६,०७,२००(१७६ X २३० X १५ वर्ष = ६,०७,२००/- निरिक्षण उतारा) व रु.५७२७००(१६६X२३०X१५वर्ष = ५७२७००/- प्रथम करनिर्धारण दिनांक) एकूण रु.११,७९,९००/- असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.५.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.निरंक रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना परिपत्रकाची माहिती देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना परिपत्रकाची माहिती दि.८.६.२०१० रोजी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महानगरपालिकेकडून जी फी ठरविण्यात आली होती त्या फी प्रमाणे आकारणी केलेली असल्यामुळे तसे अपिलकर्ता यांना कळविण्यात आले होते. परंतु दि.१८.९.२०१० रोजी पूर्वीचे परिपत्रक रद्द करण्यात येऊन माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग यांना दि.२९.७.२०१० रोजी सुधारित शुल्क आकारणी संदर्भात जी मार्गदर्शक तत्वे लागू केलेली आहेत त्याप्रमाणे खर्चाची आकारणी करण्यात येईल व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविण्यात आले. असे असल्यास अपिलकर्ता यांनी मागीतलेली १७८ मालमत्तेच्या संदर्भात कर निर्धारणाच्या संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध असतील ती पृष्ठ संख्या X प्रति पृष्ठ रु.२ प्रमाणे परिपत्रकाची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच मुमाआ/नोंदणी क्र.२०११/७१/तक्रार २५/२०१०, मुमाआ/अपील क्र.६३३६/२०१०, मुमाआ/नोंदणी क्र.५०१४४/अपील ६३३६ मध्ये दि.३१.३.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे आकारणी करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दि.६.३.२०१० च्या अर्जातील १७८ मालमत्तेच्या संदर्भात कर निर्धारणाच्या संदर्भात जे कागदपत्र उपलब्ध असतील त्यांची पृष्ठ संख्या X २ या प्रमाणे व प्रमाणित करुन देण्याकरीताची फी याप्रमाणे दि.१८.९.२०१० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या**

परिपत्रकाप्रमाणे तसेच मुमाआ/नोंदणी क्र.२०११/७१/तक्रार क्र.२५/२०१०, मुमाआ/अपील क्र.६३३६/२०१०, मुमाआ/नोंदणी क्र.५०१४४/ अपील ६३३६ मध्ये दि.३१.३.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे आकारणी करावी. खर्चाचा भरणे करणेबाबत कळवावे व परिपत्रकाची माहिती द्यावी व खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक ८.६.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३९९/अपील क्रमांक ६७२४/२०१०/०२**

**श्री. यतीन एन. शहा,**
**नवीन नगर-१, टँक लेन,**
**अकबरअलीच्या मागे, म्युनिसिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ(प.), मंबई-४०००५४. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री छत्रपती शिवाजी महाराज बिल्डिंग,**
**फोर्ट, मुबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी(मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री छत्रपती शिवाजी महाराज बिल्डिंग,**
**फोर्ट, मुबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक**
**सुनावणीचा दिनांक : ८.६.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी १७.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वार्ड ऑफीसर(इस्टेट्स) यांच्याकडे सांताक्रुझ परिसरात आत्तापर्यंत किती झोपडपट्टी धारकांना पर्यायी कायम स्वरुपी जागा दिल्या अशाप्रकारची एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमूद कले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.१७.३.२०१० रोजी माहितीच्या अधिकारामध्ये साहित्य स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देण्यात येत असून प्रश्नावली स्वरुपाची माहिती देण्यात येत नाही. त्यानुसार सनातन/लाडलीबाई चाळ/खोटवाडी येथील नस्ती स्वरुपाची कागदपत्रे या कार्यालयात उपलब्ध असून सदर कागदपत्रांची पडताळणी या कार्यालयात येऊन करावी. सदर पडताळणीकरीता प्रती तास रु.५/- व आवश्यक असलेल्या कागदपत्रांची प्रती प्रत २/-रु. कार्यालयीन शुल्क कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत भरुन घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. अपिलकर्ता यांचे यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.५.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२८.४.२०१० रोजी

अपिलकर्ता यांना कळविण्यात आला.परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत,उत्तरवादी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही प्रश्नोत्तराच्या स्वरुपातील आहे व अतिशय व्यापक प्रमाणात आहे. निश्चित अशी कोणत्याही मालमत्तेच्या संदर्भात किंवा झोपडपट्टीच्या संदर्भात त्यांनी माहिती मागीतलेली नाही व निश्चित असा कालावधीसुध्दा दिलेला नाही त्यामुळे जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे त्या माहितीच्या संदर्भात त्यांनी निरिक्षण करावे व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांना मुदतीत कळविण्यात आले होते. परंत त्यांनी निरिक्षण न करता प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता ती मोघम स्वरुपाची माहिती असून कोणताही निश्चित कालावधी दिलेला नसल्यामुळे ती अतिशय विस्तृत व व्यापक प्रमाणात आहे असे दिसते. यास्तव जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा योग्यरित्या कळविले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ८.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०३८२/अपील क्रमांक ६७२१/२०१०/०२**

**श्री. अमित एन. शहा,**
**ए-५,ओम जय आराधना को.ऑप.हौ.सो.लि.,**
**एन.बी. रोड,सोमवारी बाजार,मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,**
**इमारत प्रस्ताव,प.ऊ.-२, महापालिका इमारत, सी विंग,**
**संस्कृती कॉंप्लेक्स,९० फूट डी.पी.रोड,सेंट लॉरेन्स शाळेजवळ,**
**कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्य.अभियंता,**
**इमारत प्रस्ताव,प.ऊ.-२, महापालिका इमारत, सी विंग,**
**संस्कृती कॉंप्लेक्स,९० फूट डी.पी.रोड,सेंट लॉरेन्स शाळेजवळ,**
**कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ८.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.४.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.व प्र.)(W/S),महानगरपालिका बिल्डिंग सी विंग, संस्कृती कॉंप्लेक्स,लॉरेन्स स्कुल जवळ,कांदिवली(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन Inspection of Complete Builing file C.T.S.No.८३४, Om Jai Aradhana C.H.S. Ltd., N.B.Road, Somwari Bazar, Malad(W), Mumbai-६४ च्या संदर्भात आयओडी, सीसी, ओसी, वगैरे बाबत

माहिती मागीतलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.१६.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव किंवा अभिलेख आढळून येत नाही असे कळविलेले दिसून येते.त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असा निष्कर्ष काढून माहितीचा अधिकार अधिनियम २००९ च्या तरतुदीप्रमाणे २० वर्षापर्यंतची माहिती मिळू शकते व मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात कोणताही प्रस्ताव किंवा कागदपत्र नाहीत असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या संस्थेकडे मालमत्ता पत्रक आहे. त्यावर नारायण द्वारकानाथ दाते वगैरेंच्या नावे सदरची मालमत्ता दाखविण्यात आलेली आहे. सदनिका धारकांकडून महानगरपालिका कर वसुल करते. नगर भूमापन नकाशाची प्रतही त्यांनी दाखल केली होती परंतु त्यांना माहिती उपलब्ध नाही असेच सांगण्यात आले व त्याबाबतही २० वर्षांपर्यंतची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे मिळते असा निष्कर्ष प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता यांनी काढलेला आहे. वास्तविक अशी कोणतीही तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम-०५ च्या अधिनियमात नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरची माहिती १९७३ची आहे व त्यांनी जो सीटीएस नंबर दिलेला आहे व जी कागदपत्र दिलेली आहेत त्यावरुन सर्व विभागामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रे किंवा अभिलेखे त्या इमारतीच्या संदर्भात आढळून येत नाहीत. माहिती उपलब्ध असल्यास नाकारण्याचे काहीही कारण नाही. असे असले तर २० वर्षांच्या वरील माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात म्हटलेले आहे ते अधिनियमाच्या तरतुदींशी धरुन नाही. २० वर्षांवरील माहिती उपलब्ध करुन देता येत नाही अशी कोणतीही तरतूद अधिनियमात नाही. माहिती जोपर्यंत कायम स्वरुपाची असेल तर ती कितीही वर्षाची असली तरी उपलब्ध करुन द्यावी लागते. अधिनियमाच्या कलम ८(१) प्रमाणे माहिती प्रकट करण्यास अपवाद करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्या कलमामधील पोटकलम (१)च्या खंड(क)(ग) आणि (झ)च्या तरतुदींच्या अधीन राहून, म्हणजेच या तरतुदींप्रमाणे जर माहिती प्रकट करण्यास अपवाद केलेला असेल तर ती माहिती २० वर्षापर्यंत प्रकट करता येणार नाही. मात्र २० वर्षे झालेली असल्यास कोणतीही माहिती ही गोपनीय रहाणार नाही असा त्याचा अर्थ आहे.त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या तरतुदीचा चुकीचा अर्थ लावलेला आहे. असे असले तरी बृहन्मुंबईमध्ये इमारत उभी आहे, त्यात गाळेधारक आहेत, पाण्याची देयके देतात,मालमत्ता करसुध्दा देतात व त्या इमारतीच्या संदर्भात कोणत्या प्रकारची कागदपत्र इमारत व प्रस्ताव विभागात आढळून येत नाहीत हे अनाकलनीय आहे व याबाबत संपूर्ण चौकशी करणे अपरिहार्य आहे. त्यामुळे या तीनही विभागांच्या संपर्कातून चौकशी करुन

अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून मा.आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर इमारत सीटीएस नं.८३४, ओम जय आराधना को.ऑप.हौ.सो.लि.,एन.बी. रोड,सोमवारी बाजार, मालाड(प.), मुंबई-६४ च्या संदर्भात जर पाणीपुरवठा देयके वसुल केली जातात,मालमत्ता कर घेतला जातो तर या संदर्भातील इमारत बांधकामाच्या आयओडी,सीसी,ओसीच्या संदर्भात कारवाई झालेली आहे किंवा नाही याबद्दलची चौकशी करण्याचे आदेश देऊन त्यापमाणे माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ८.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/१३७३/अपील क्रमांक ६७४१/०२**
**क्रमांक-मुमाआ/१३७२/अपील क्रमांक ६७४२/०२**
**क्रमांक-मुमाआ/१३७५/अपील क्रमांक ६७४३/०२**
**क्रमांक-मुमाआ/१३७६/अपील क्रमांक ६७४४/०२**
**क्रमांक-मुमाआ/१३६७/अपील क्रमांक ६७४५/०२**
**क्रमांक-मुमाआ/१३६८/अपील क्रमांक ६७४६/०२**

**श्री. रमेश झाडे व इतर,**
**राष्ट्रीय गुणवत्ता मंच, २/७०४,श्री शाश्वत कॉम्प्लेक्स,**
**प्लेझंट पार्क, मिरा रोड, जिल्हा-ठाणे-४०११०७.** ..... अपिलकर्ता

**<u>विरुध्द</u>**

**(अपील क्रमांक ६७४१ /अपील क्रमांक ६७४२)**
**प्रथम अपीलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार,**
**मुंबई विद्यापीठ, रुम नं.१०९, विद्यापीठ इमारत,**
**फोर्ट कँपस, एम.जी.रोड, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार(कॉनकोल सेक्शन),**
**मुंबई विद्यापीठ, रुम नं.१०९, विद्यापीठ इमारत,**
**फोर्ट कँपस, एम.जी.रोड, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार(पीआरओ),**
**मुंबई विद्यापीठ, रुम नं.१०९, विद्यापीठ इमारत,**
**फोर्ट कँपस, एम.जी.रोड, मुंबई-४०००३२.**

**(अपील क्रमांक ६७४३ /अपील क्रमांक ६७४४)**
**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, नाथीबाई ठाकरसी रोड,**
**चर्चगेट, मुंबई-४०००२०.**

**जन माहिती अधिकारी,**
**एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, नाथीबाई ठाकरसी रोड,**
**चर्चगेट, मुंबई-४०००२०.**

**(अपील क्रमांक ६७४५ /अपील क्रमांक ६७४६)**
**प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक, म.वि.वि.म.,**
**स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,**
**नांदेड.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव,**
**स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,**
**नांदेड.** ...... उत्तरवादी

## <u>निर्णय</u>

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १४.६.२०११**
**अपिल क्र.६७४१/६७४२-अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**
**अपिल क्र.६७४३/६७४४-अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित**
**अपिल क्र.६७४५/६७४६-अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी वरील सर्व अपीलांमध्ये अनुक्रमे २०.६.२०१०,२१.६.२०१०, २२.६.२०१०,२१.६.२०१०,२१.६.२०१०,२२.६.२०१० रोजी माहिती अधिकारी, मुंबई विद्यापीठ, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ व स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांच्याकडे अर्ज करुन

१)i)महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.संकिर्ण-२००९/(३२७/०९)/विशि-१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई दि.१७ मे,२०१० व ii)२००६ ते आजपावेतो १)विद्यापीठास पत्र प्राप्त झाले असल्यास त्याबाबतचा विभागाचा आवक नंबर(इनवर्ड नंबर) देण्यात यावा,

२)पत्र (दि.१७ मे,२०१०) मिळाल्यापासून पहिल्या १० दिवसात त्यावर केलेली कार्यवाही,शेरा, इत्यादी बाबी देण्यात याव्यात व ३)वरील पत्रावर कार्यवाही करणे आपल्या विभागावर/विद्यापीठावर बंधनकारक आहे काय किंवा कसे तसेच i)दि.११.७.२००९ पासून ते आजपर्यंत अधिव्याख्याता पदी निवड झालेले Ph.D. धारक सर्व उमेदवारांचे नॉन नेट-सेट निवड समिती अहवाल,ii) दि.११.७.२००९ ते आजपावेतो १)आपल्या विद्यापीठात तसेच आपल्या विद्यापीठा अंतर्गत येणा-या संलग्नीत महाविद्यालयांमध्ये दि.११.७.२००९ ते आजपर्यंत अधिव्याख्याता पदी निवड झालेले Ph.D. धारक(नॉन नेट-सेट) उमेदवारांचे निवड समिती अहवाल देण्यात यावे २)वरील क्रमांक १ मध्ये निवड न केलेल्या पण मुलाखत दिलेल्या/मुलाखतीला बोलविलेल्या उमेदवारांचे नाव,शैक्षणिक अर्हता यासह माहिती देण्यात यावी

३)वरील Ph.D.धारक उमेदवाराच्या Ph.D. या UGCच्या १ जून,२००९ च्या नियमानुसार तंतोतंत जुळतात काय किंवा कसे याची माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते.

३)i)दि.६ मार्च,२००७ ते ११ जुलै,२००९ दरम्यान निवड झालेल्या एम.फील/पीएच.डी. पण नेट/सेट नसलेल्या अधिव्याख्यातांना(आपल्या विद्यापीठातील तसेच संलग्न महाविद्यालयातील)किती उमेदवारांना कायमस्वरुपी/परिविक्षाधिन मान्यता(ॲप्रुव्हल) देण्यात आली व त्यामागे कोणता महाराष्ट्र शासन निर्णय आहे? माहिती, नाव, महाविद्यालयाचे नाव, मान्यता क्रमांक यानुसार देण्यात यावी. ii) १२.७.२००९ नंतर नियुक्त झालेले व आपण मान्यता दिलेल्या (नॉन-नेट/सेट)उमेदवारांची पीएच.डी.,युजीसी च्या १.६.२००९च्या नियमासोबत तंतोतंत जुळतात किंवा कसे माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते.

सदरच्या अर्जांच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी,मुंबई विद्यापीठ,जन माहिती अधिकारी एस.एन.डी.टी. विद्यापीठ व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांनी कोणत्याही प्रकारची माहिती ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी अनुक्रमे दि.१५.८.२०१०,२०.८.२०१०,२०.८.२०१०,२०.११.२०१०,१५,८,२०१०,२०.८.२१० रोजी प्रथम अपीले दाखल केली. प्रथम अपीलांचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी, मुंबई विद्यापीठ यांनी दि.१२.१०.२०१० रोजी दिला असून जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. प्रथम अपीलीय अधिकारी एस.एन.डी.टी.महाविद्यालय यांनी प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय दिलेला दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांनी दि.८.११.२०१० रोजी निर्णय दिलेला असून मागणी केल्यानुसार माहिती विद्यापीठात संग्रहित स्वरुपात उपलब्ध नसल्यामुळे माहिती अधिकारी यांनी सदर माहिती सर्व संलग्न महाविद्यालयांना अपिलार्थी यांना देण्याबाबत विद्यापीठाचे परिपत्रक दि.३१.७.२०१० अन्वये कळवून सदरच्या परिपत्रकाची प्रत अपिलार्थी यांना पाठविली असल्यामुळे प्राप्त परिस्थितीत माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याची कार्यवाही केलेली आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे ६ द्वितीय अपीले दाखल केली आहेत.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, नेट-सेट उमेदवारांना कोणत्याही महाविद्यालयामध्ये किंवा विद्यापीठामध्ये नियुक्ती दिली जात नाही तर पीएच.डी. धारकांना नियुक्ती दिली जाते. शासनाचे जे परिपत्रक आहे त्या परिपत्रकाची कोणतीही दखल घेतली जात नाही व त्यामुळेच ही माहिती सर्व विद्यापीठांकडून मागविण्यात आलेली आहे. मुंबई विद्यापीठाकडून त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती तर उपलब्ध झालेली नाहीच परंतु प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा अद्यापपर्यंत उपलबध करुन दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनीही कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार अद्यापपर्यंत केलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी,मुंबई विद्यापीठ यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध

करुन दिलेली नाही हे खरे आहे. परंतु जी माहिती उपलब्ध आहे ती अतिशय विस्तृत व व्यापक प्रमाणात उपलब्ध आहे त्यामुळे संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे हे सर्वस्वी अशक्य आहे.

जन माहिती अधिकारी एस.एन.डी.टी. महाविद्यालय हे आज सुनावणीस उपस्थित नाहीत परंतु त्यांनी दि.३१.५.२०११ रोजी आयोगाकडे लेखी खुलासा सादर केलेला आहे. वास्तविक आज सुनावणीच्यावेळेस जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. प्रथम अपीलीय अधिकारीसुध्दा उपस्थित राहिलेले नाहीत व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्र दाखल केलेली नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशामध्ये अपिलकर्ता यांचा माहितीचा अर्ज दि.१.७.२०१० रोजी प्राप्त झाल्यानंतर दि.२९.७.२०१० अन्वये माहिती तयार असल्याचे व संबंधित माहितीसाठी फी रु.५९०/- मात्र प्रति प्रत रु.२/- याप्रमाणे २९५ प्रतींसाठी विद्यापीठाचे कार्यालयात भरण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यानंतर अर्जदाराचे प्रथम अपील झाले त्यावेळेस सुध्दा पुन्हा माहितीपोटी रु.५९०/- मात्र विद्यापीठाकडे भरण्यासाठी कुरीअरने पत्र पाठवले होते. त्याची पोचपावती त्यांनी जोडलेली आहे. परंतु संबंधित रक्कम अर्जदाराने न भरल्यामुळे माहिती देण्यात आली नाही असे नमूद केले आहे. त्याकरीता त्यांनी दि.२९.७.२०१० व १७.९.२०१० रोजी पाठविलेल्या दोन्हीही पत्रांच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. त्यावरुन अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत कार्यवाही केलेली दिसून येते. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना कोणतेही पत्र अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही. मात्र कुरीअरसंदर्भात जे पत्र उपलब्ध झालेले आहे ते पत्र प्रथम अपील निर्णयानंतर उपलब्ध झालेले आहे. त्यामुळे सदरची माहिती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्याकडे संपूर्ण संकलीत केलेल्या स्वरुपात माहिती उपलब्ध नाही तर ३७० महाविद्यालये आहेत या सर्व महाविद्यालयांमध्ये ज्या नियुक्त्या झालेल्या आहेत त्या नियुक्तीच्या संदर्भात प्रत्येक महाविद्यालयाची माहिती तपासून माहिती उपलब्ध करुन द्यावी लागेली असती. परंतु माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला असता तर सार्वजनिक प्राधिकरणाची प्रशासकीय यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागली असती किंवा दैनंदिन कामकाज बाजूला ठेवून ती माहिती उपलब्ध करुन देणे शक्य झाले नसते म्हणून दि.३१.७.२०१० रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ यांना अपिलकर्ता यांचा अर्ज हस्तांतरीत करुन माहिती प्रत्येक महाविद्यलयाने उपलब्ध करुन द्यावी याकरीता कळविण्यात आले होते व तसे अपिलकर्ता यांनाही कळविण्यात आले होते. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे पत्र त्यांना मिळालेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पत्र पाठविल्याची जावक नोंदवहीतील नोंद या आयोगापुढे सादर केलेली आहे. त्यावरुन सदरचे पत्र त्यांना पाठविले असावे असे गृहित धरण्यास हरकत नाही. परंतु या सर्व माहितीच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, निवड समितीच्या संदर्भातील सर्व पत्रव्यवहार व नंतर मान्यतेस आलेला अहवाल हा विद्यापीठाकडे

उपलब्ध असतो व त्यामुळे विद्यापीठाप्रमाणेच ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे हे मान्य केले असल्यामुळे ती त्यांना देणे आवश्यक आहे.

माहिती ही ज्या सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असते व ती उपलब्ध आहे असे मान्य केल्यानंतर ती केवळ विस्तृत प्रमाणात आहे व त्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल वगैरे कारणे देता येणार नाहीत.जन माहिती अधिकारी, मुंबई विद्यापीठ यांनी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नसल्यामुळे त्यांनी संपूर्ण माहिती अपिलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.एस.एन.डी.टी.विद्यापीठाने विहित मुदतीत खर्चाचा भरणा करावे असे पत्र दिलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करुन त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांनी जरी प्राचार्य,सर्व संलग्न महाविद्यालये यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविलेले असले तरी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनीही दिलेले पत्र योग्य आहे असा निर्णय दिलेला असला तरी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे असे मान्य केले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी मागीतलेली सर्व माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता वरील सर्व अपीले मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आदेश

**१) अपील क्र.६७४१/०२ व ६७४२/०२ मान्य करण्यात येत असून जन माहिती अधिकारी,मुंबई विद्यापीठ यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२०.६.२०१० व २१.६.२०१० च्या अर्जामध्ये मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) अपिल क्र.६७४३/०२ व ६७४४/०२ मान्य करण्यात येत असले तरी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने माहितीकरीता रु.५९०/- खर्चाचा भरणा करावा असे त्यांना विहित मुदतीत कळविलेले असल्यामुळे त्यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**३) अपिल क्र.६७४५/०२ व ६७४६/०२ मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२१.६.२०१० व २२.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची त्यांना नोंद घ्यावी.**

**४) सदर आदेशाची प्रत कुल सचिव,मुंबई विद्यापीठ, कुल सचिव,एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ व कुल सचिव,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**५) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १४.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ ार्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०७२२/अपील क्रमांक ६७४८/०२**

**श्री.गोविंदप्रसाद आर.शर्मा,**
**ए-८/२२९, देव आशिष अपार्टमेंट, कॉलेज रोड,**
**धामणकर नाका, भिवंडी-४२१३०५ ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार,**
**रुम नं.१०७,१ ला मजला,**
**मुंबई विद्यापीठ, फोर्ट कँपस, फोर्ट, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार,मुंबई विद्यापीठ,**
**परिक्षा विभाग, एम.जे.फुले भवन,**
**विद्यानगरी, कालिना, सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-९८. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२५.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,मुंबई विद्यापीठ यांच्याकडे २८.४.२०१० रोजी ई-मेल ने केलेल्या तक्रारीच्या संदर्भात काय कार्यवाही केली अशी माहिती मागीतली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.६.७.२०१०

रोजी उप प्रबंधक यांनी त्यांची दि.२८.४.२०१० ची तक्रार प्राचार्य,भिवंडी निजामपूर नगरपालिका आर्ट्स,सायन्स आणि कॉमर्स कॉलेज,भिवंडी यांच्या अभिप्रायार्थ पाठविण्यात आली आहे तसेच अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२१.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत,जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी दि.२८.४.२०१० रोजी जी तक्रार केली होती ती भिवंडी निजामपूर नगरपालिका महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दि.१३.५.२०१० रोजी पाठविण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा दि.१९.६.२०१० रोजी त्यांना स्मरणपत्र पाठविण्यात आले होते व अपिलकर्ता यांनी माहितीचा अर्ज केल्यानंतरसुध्दा दि.१२.१०.२०१० रोजी प्राचार्य यांना त्या तक्रारीच्या संदर्भात त्यांनी अभिप्राय उपलब्ध करुन द्यावेत म्हणून कळविण्यात आले होते. परंतु अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारचे अभिप्राय उपलब्ध झालेले नसल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे मात्र अपिलकर्ता यांना वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीची माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तसेच प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपिलकर्ता हजर राहिलेले नसल्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय देता आलेला नाही असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. आजही अपिलकर्ता गैरहजर आहेत व त्यांनी त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर केलेले नाही. द्वितीय अपील मेमोमध्येसुध्दा त्यांनी कोणत्याही प्रकारचे विवेचन दिलेले नाही यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५.६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६६२/अपील क्रमांक ६७४७/०२**

**श्री.अशोक भाग्या जाबरे,**
**पारसनाथ के. दुबे, चाळ नं.१,**
**खो.क्र.६, पोटमाळा, मजासवाडी,ठाकूर नगर जवळ,**
**जोगेश्वरी(पूर्व), मुंबई-४०००६०. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार ठाणे,**
**तहसिलदार कार्यालय, ठाणे विभाग,**
**ठाणे(पश्चिम).**

**जन माहिती अधिकारी तथा तलाठी, कोलशेत,**
**तहसिलदार कार्यालय, ठाणे विभाग,**
**ठाणे(पश्चिम). ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.३०.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,तलाठी सजा कोलशेत,तहसिलदार कार्यालय.ठाणे(प.) यांच्याकडे गाव कोलशेत(ठाणे) विभाग येथील जागा श्रीमती फुमा फ.पटेल हिचे नावे असून जागेचे वारसदार श्री.ॲस्पेंडियर जमशेद इराणी सदर प्रॉपर्टी कामासाठी अर्जदार १)श्री.प्रमोद भास्कर राणे २)श्री.अनंत मधुकर कांबळी ३)श्री.ठाणेकर ४)श्री.ॲस्पेंडीयर ज. इराणी यांनी अर्जान्वये माहिती मागीतली होती. तरी या सर्व अर्जाच्या प्रती मिळाव्यात इ. माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.२.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपिलकर्ता हजर राहिलेले नाहीत म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्जात नमूद केलेल्या व्यक्तींनी माहिती अर्ज केलेले असतील तर ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्जात नमूद केलेल्या व्यक्तींनी संबंधित कालावधीमध्ये कोणतेही माहितीचे अर्ज केलेले नाहीत व ही बाब अपिलकर्ता यांना वारंवार सांगितलेली आहे. अपिलकर्ता यांनी सुध्दा ही बाब मान्य केली आहे. तसेच अपिलकर्ता यांना लेखी उत्तरसुध्दा देण्यात आलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, वरील व्यक्ती सोडून चेऊलकर व इतर यांनी तसे अर्ज दिलेले असतील तर त्या अर्जाच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. त्यावर जन माहिती अधिकारनी यांनी आयोगाकडे असे सांगितले की, त्या व्यतिरिक्त त्यांनी नावे दिली तर त्या संदर्भात तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन दिली जाईल. परंतु अर्जात नमूद केलेल्या व्यक्तींनी संबंधीत कालावधीमध्ये म्हणजे १.१.२०१० ते ३१.३.२०१० पर्यंत माहिती मागीतलेली नाही व त्यामुळे ती माहिती देता आलेली नाही. यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक १५.६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील क्रमांक-मुमाआ/५०७०७/अपील क्रमांक ६७५०/०२**

**श्री.फ्रान्सीस व्हिन्सेंट सोरेस,**
**सोरेस हाऊस,ग्राऊंड फ्लोअर, पटेल पाखाडी,**
**वर्सोवा, मुंबई-४०००६१ ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**(परिमंडळ-९),**
**हिल रोड,बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त(पश्चिम नियंत्रण कक्ष),**
**(परिमंडळ-९),**
**कार्टर रोड,बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २५.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**

**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.७.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्याकडे त्यांनी दि.२०.२.२०१० रोजी डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या संदर्भात काय कार्यवाही केली याबाबतची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३१.७.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.२३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती समाधानकारक दिलेली असल्यामुळे अपील फेटाळलेले आहे असा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्याविरुध्द चॅप्टर केस दाखल केलेली होती व त्यांनी सुध्दा टोनी पीटर व इतर यांच्या संदर्भात तक्रार दाखल केली होती. परंतु त्या तक्रारीप्रमाणे कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही म्हणून त्यांनी ही माहिती मागीतली होती. यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांची तक्रार ही माहितीचा अर्ज येईपर्यंत प्राप्त झालेली नव्हती. दि.२६.६.२०१० रोजी सिनिअर इन्सपेक्टर ऑफ पोलीस,वर्सोवा पोलीस स्टेशन यांनी अर्जदार यांनी २८.१.२०१० रोजी दिलेल्या जबाबानुसार टोनी पीटर व इतर ४ इसमांच्यावर सीआरपीएस-१४९ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे व त्या सर्व कारवाईची कागदपत्र अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**Sd--**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १५.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६९३/अपील क्रमांक ६७४९/०२**

**श्री.अश्विन पी.परमार,**
**पाली परेरावाडी, १६वा व ३०वा रस्ता जंक्शन,**
**शिवसागर हॉटेलसमोर, बांद्रा(प.),**
**मुंबई-४०००५०.** ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**(परिमंडळ-९),**
**हिल रोड, बांद्रा(प.),मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**(परिमंडळ-९), कार्टर रोड,**
**बांद्रा(प.),मुंबई-४०००५०.** ...... **उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१५.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,कार्टर रोड,बांद्रा(प.), यांच्याकडे एसआरए स्कीमच्या संदर्भात परेरावाडी,सीटीएस

नं.F/६५० व F/६५२ of १६$^{th}$ & ३०$^{th}$ Rd., बांद्रा(प.)च्या संदर्भात दि.७.१२.०९ रोजी १२ लोकांच्याविरुध्द FIR नं.४७४/२००९ मध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती ४ मुद्यांमध्ये मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२०.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.८.१२.२०१० रोजी दिलेला दिसून येतो. परंतु बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई येथे नोंदविलेल्या FIR No.४७४/२००९ च्या संदर्भात प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती मागीतली होती व समाधानकारक उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना सदर माहितीच्या संदर्भात माहितीचा अर्ज केल्यानंतर कार्यवाही करण्यात आलेली आहे असे आयोगापुढे सांगितले मात्र त्यावेळेस ही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जो अर्ज केला आहे त्या अर्जामध्ये गु.र.क्र. ४७४/०९ बाबत एफआयआर दाखल झालेला होता व या गुन्हयाचा तपास चालू असल्याने तसेच अर्जदार सदर गुन्हयातील फिर्यादि अथवा आरोपी नव्हते त्यामुळे अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती गुन्हयाच्या तपासावर परिणाम होऊ नये म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८(१)(ज) अन्वये माहिती नाकारण्यात आलेली होती. सदर गुन्हयातील तपासी अधिकारी यांनी सदर गुन्हयाचा तपास पूर्ण करुन एकूण १३ आरोपीतांविरुध्द मा.९वे न्यायालय,बांद्रा(पूर्व), मुंबई यांचे न्यायालयात दि.२९.१.२०११ रोजी दोषारोपपत्र सादर केलेले असून त्याची प्रत अर्जदार यांचे वडील व इतर स्थानिक रहिवाशी यांना मा.उच्च न्यायालयाचे आदेशाने देण्यात आलेली आहे. अपिलकर्ता यांनीसुध्दा सदर माहिती नंतर उपलब्ध झाली असे आयोगाकडे सांगितले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**Sd--**
**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १५.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/५०७००/अपील क्रमांक ६७५२/२०११/०२**

**श्री. शिवप्रसाद यादव,**
**श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,**
**पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**मामलेदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**मामलेदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी,इमारत विभाग,पी(नॉर्थ),लिबर्टी गार्डन, मालाड(प.) यांच्याकडे अर्ज करुन मराठा बेकरी, मुरगन मेडीकल के पीछे, पोलीस चौकी के आगे गौतम बुद्ध रोड, वरलाई गाँव,ओरलेम चर्च मालाड(प.) च्या बांधकामाची माहिती तसेच भारत

बिल्डिंग मटेरियल दुकानाच्या समोर १५०० चौ.फूट रेड्डी कंपाऊंड मधील अनधिकृत बांधकामाबाबत दि.२१.८.२०१० रोजी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय उपलब्ध माहिती १० दिवसाच्या आत, अपिलार्थींना उचित शुल्क भरुन देण्यात यावी असा दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली आहे ती अनधिकृत बांधण्यात आलेल्या बांधकामाबाबतची माहिती आहे व त्या संदर्भात कार्यवाही केली आहे काय? याबद्दलची विचारणा त्यांनी केली आहे. परंतु त्याबद्दल कोणतीही माहिती त्यांना दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्र उपलब्ध असून १० दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असे जन माहिती अधिकारी यांनी कबूल करुनही व आदेश देऊनही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी आज सुनावणीस गैरहजर आहेत व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्र आयोगाकडे दाखल केलेली नाहीत त्यामुळे ते शास्तीस पात्र आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले असूनसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणूनही ते शास्तीस पात्र आहेत. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हे आदेश मिळाल्यापासून अपिलकर्ता यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द तक्रार आल्यास रु.२५,०००/- ची शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) द्वितीय अपीलाच्या सुनावणीस आयोगापुढे हजर न राहिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश देऊनसुध्दा कागदपत्र दाखल केलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत करावा. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश देण्यात येतील.**

**३)अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १५.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०७०३/अपील क्रमांक ६७५५/०२
क्रमांक-मुमाआ/५०७०१/अपील क्रमांक ६७५३/०२

श्री. शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप-प्रमुख अभियंता(इ.प्र.),
बृहन्मुंबई महानगरपालिका, उपप्रमुख अभियंता(इमारत प्रस्ताव)प.उ.-दोन,
महापालिका इमारत, सी विंग, संस्कृती कॉंप्लेक्स,९० फूट डी.पी.रोड,
सेंट लॉरेन्स शाळेजवळ, कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०१. (अपील क्र.६७५५)

जन माहिती अधिकारी तथा उप-अभियंता(इ.प्र.)पी विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका, उपप्रमुख अभियंता(इमारत प्रस्ताव)प.उ.-दोन,
महापालिका इमारत, सी विंग, संस्कृती कॉंप्लेक्स,९० फूट डी.पी.रोड,
सेंट लॉरेन्स शाळेजवळ, कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०१. (अपील क्र.६७५५)

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप-प्रमुख अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
स.व प. तरण तलावाजवळ, महात्मा गांधी छेद क्र.२, कांदिवली(प.),

**मुंबई-४०००६७.(अपील क्र.६७५३)**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**स.व प. तरण तलावाजवळ, महात्मा गांधी छेद क्र.२, कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७. (अपील क्र.६७५३,अपील क्र.६७५५) ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२८.७.२०१० रोजी दोन अर्जांच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी,इमारत विभाग,पी(नॉर्थ),लिबर्टी गार्डन,मालाड(प.) व आर(साऊथ),कांदिवली(प.) यांच्याकडे भ्रमण ध्वनी टॉवरच्या संदर्भात एकूण ११ मुद्यांबाबत माहिती मागीतलेली दिसून येते व आर/साऊथ, कांदिवली(प.) सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१६.८.२०१० व २०.८.२०१० रोजी मागीतलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात आहे व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणाची म्हणजेच त्यांच्या कार्यालयाची यंत्रणा दैनंदिन कामकाज बाजूला ठेवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही. तरीसुध्दा अपिलकर्ता यांनी विशिष्ट प्रकरणांची माहिती द्यावी किंवा अपिलकर्ता यांनी उपलब्ध असलेल्या अभिलेख्यांचे निरिक्षण करावे व त्यातून आवश्यक प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात व त्याकरीता त्यांनी प्रतींच्या संदर्भात खर्चाचा भरणा करणेबाबत कळविलेले आहे. परंतु त्यानंतर अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न करता व निरिक्षणही न घेता दि.१६.९.२०१० रोजी दोन प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१६.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे तसेच ते विहित मुदतीत दिलेले असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी हे गोडाऊनमध्ये घेऊन जातात व तेथील सर्वच नस्त्या निरिक्षणाकरीता देतात व त्यातून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे सांगतात. जन माहिती अधिकारी आज गैरहजर आहेत त्यामुळे अपिलकर्ता यांनी अर्जात मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता माहिती ही अमर्यादित व विस्तृत प्रमाणात आहे हे निश्चित आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन

घ्यावयाची झाल्यास ती २ प्रकारे उपलब्ध करुन घेता येईल-१) जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करावा हे विहित मुदतीत कळविलेले आहे परंतु संपूर्ण मागीतलेल्या माहितीची पृष्ठे किती होतील ते कळविलेले नाही. मात्र व्यापक प्रमाणात माहिती असल्यामुळे नेमकी पृष्ठ संख्या कळवून त्याप्रमाणे पृष्ठ संख्या कमी जास्त झाल्यास खर्च कमी जास्त करुन छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. २) अपिलकर्ता यांनी नस्त्यांचे निरिक्षण करावे व त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्याव्यात.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(ञ)प्रमाणे माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या केलेलीआहे. त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली माहिती ज्यामध्ये दस्तऐवज,अभिलेखे,कागदपत्र यांची तपासणी करणे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे. त्यामुळे जर माहिती निश्चित मागीतलेली असेल तर त्याबाबत एकूण पृष्ठ संख्या कळवल्यानंतर खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन घेता येते परंतु मोघम व अमर्याद कालावधीची माहिती मागीतलेली असेल तर निरिक्षण करणे आवश्यक असते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांची दोन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात अंदाजे किती पृष्ठ संख्या होईल त्याप्रमाणे प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे एकूण खर्चाचा आकडा व पृष्ठ संख्या कळवावी. सदर खर्चाचा भरणा केल्यानंतर अपिलकर्ता यांना पोस्टाचा खर्च घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास अपिलकर्ता यांना निरिक्षणाकरीता भ्रमण ध्वनी टॉवरच्या संदर्भातील नस्त्या निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात याव्यात व त्यातून अपिलकर्ता यांनी आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक १५.६.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०६९९/अपील क्रमांक ६७५१/२०११/०२**

**श्री. शिवप्रसाद यादव,**
**श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,**
**पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**मामलेदार वाडी,लिबर्टी गार्डन, मालाड(प.)**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**मामलेदार वाडी,लिबर्टी गार्डन, मालाड(प.)**
**मुंबई-४०००६४. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,इमारत विभाग, पी(नॉर्थ),मुंबई महानगरपालिका कार्यालय यांच्याकडे अर्ज करुन वर्तमानपत्रात आलेल्या बातमीच्या आधारे अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात एकूण १३ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२१.९.२०१० रोजी Regarding M.G.Masala, Gala No.१, Pathanwadi च्या संदर्भात माहिती उपलब्ध आहे व इतर मुद्यांबाबत माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून उपलब्ध माहिती १० दिवसाच्या आत अपिलार्थींना उचित शुल्क भरुन देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, वर्तमानपत्रात अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात जी माहिती प्रसिध्द झाली होती त्या माहितीच्या आधारे त्यांनी कार्यालयात माहिती मागीतली होती. परंतु सदर माहिती त्यांना मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी ज्या मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली आहे ती माहिती एम.जी.मसाला,गाळा नं.१,पठाणवाडी च्या व्यतिरिक्त कोणत्याही मुद्यांची माहिती या कार्यालयात अभिलेख्यांच्या स्वरुपात उपलब्ध नाही व त्याकरीता २१.९.२०१० रोजी माहितीचे शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांना कळविण्यात आले होते. सदरचे पत्र मिळाल्याचे अपिलकर्ता यांनी मान्य केले परंतु माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेल्यानंतर ती

माहिती उपलब्ध होत नाही किंवा माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही किंवा सुरक्षा रक्षक कार्यालयात सोडत नाहीत या कारणास्तव त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करणेबाबत अपिलकर्ता यांना कळविले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. मात्र त्याकरीता अपिलकर्ता यांना एकूण पृष्ठे किती आहेत व प्रति पृष्ठ २/-प्रमाणे एकूण किती खर्च येतो ही बाब कळविणे आवश्यक होते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना कळविण्यात यावे व त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करुन अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत एकूण पृष्ठ संख्या व प्रति पृष्ठ रु.२/- याप्रमाणे किती खर्च येईल ते अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये कळविण्यात यावे व खर्चाचा भरणा केल्यानंतर अपिलकर्ता यांच्याकडून पोस्टाचा खर्च घेऊन त्यांना छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना सदर आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक १५.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७०२/अपील क्रमांक ६७५४/०२**

**श्री. शिवप्रसाद यादव,**

**श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,**
**पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**स.व प. तरण तलावाजवळ,महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२,**
**कांदिवली(प.), मुंबई-४०००६७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**स.व प. तरण तलावाजवळ,महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२,**
**कांदिवली(प.), मुंबई-४०००६७. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १५.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.५.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,इमारत व कारखाने विभाग, आर(द.) विभाग,कांदिवली(प.) यांच्याकडे अर्ज करुन दुकानांच्याबाहेर मोकळया व्हरांडयावर अतिक्रमण करुन शटर ग्रील लावून दुकाने बंदिस्त केल्याच्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२७.८.२०१० रोजी उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२०.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.१९.१०.२०१० रोजी देण्यात आला असून श्री.सी.के. आंबेडकर, जन माहिती अधिकारी व दुय्यम अभियंता(इ.व का.) आर/द यांनी अपिलकाराने मागीतलेल्या माहितीबाबत काय कारवाई करण्यात आली आहे त्याच्या प्रती अपिलकारास विनामुल्य देण्यात याव्यात. सहा.अभि.(इ.व का.) यांच्याशी संबंधित विषय सहा.अभियंता(इ.व का.) हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडे प्रत पाठविण्यात यावी व तसे उत्तर अपिलकारास देण्यात यावे. रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत वरिष्ठ निरिक्षक(अनुज्ञापन) हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांना एक प्रत देण्यात यावी व त्या खात्याशी संबंधित बाबींचे उत्तर

अपिलकारास देण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. मात्र त्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली आहे त्या माहितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध नाही असे जन माहितीअधिकारी यांनी कळविले आहे. तसेच त्यांच्या कार्यालयाने दुकानदारांना कोणत्याही प्रकारच्या परवानग्या दिलेल्या नाहीत त्यामुळे ती माहिती उपलब्ध नाही परंतु त्यांच्याविरुध्द कारवाई सुरु करण्यात आलेली आहे असे कळविले आहे. परंतु त्याबद्दलसुध्दा काहीही माहिती त्यांनी दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले असूनसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की,अपिलकर्ता यांनी दुकानदारांनी अनधिकृतरित्या दुकानाबाहेरील भाग बंद केलेला असेल तर त्याबाबतची माहिती मागीतलेली आहे परंतु महानगरपालिका अशाप्रकारे परवानगी देत नसल्यामुळे त्याबद्दलची माहिती कार्यालयात उपलब्ध नसते. परंतु तक्रार आल्यास त्या तक्रारीच्या संदर्भात कारवाई मात्र केली जाते. असे असल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी याबाबत कार्यालयातील अभिलेख्यांच्या संदर्भात माहिती घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक असते. परंतु तशी माहिती न घेता त्यांनी हवी असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहेत. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील कामकाजाबद्दल काहीही माहिती नाही असे दिसून येते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानंतर आपणास हवी असलेली माहिती आपण कार्यालयात येऊन विनामुल्य प्राप्त करुन घेऊ शकता असे पुन्हा दि.२७.१०.२०१० रोजी अपिलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. यावरुन पुन्हा जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ. व का.) आर(द.) विभाग यांच्याकडे माहिती उपलब्ध असूनसुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील यास्तव अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हे आदेश मिळाल्या पासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.५.८.२०१० च्या अर्जाप्रमाणे मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास व जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द तक्रार आल्यास त्यांच्याविरुध्द रु.२५,०००/-ची शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १५.६.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील क्रमांक-मुमाआ/५०७१२/अपील क्रमांक ६७५७/०२

श्री. जगदिश विश्वनाथ सावंत,
सहयाद्री अपार्टमेंट सोसायटी,ई १/६,

**अे-९, सेक्टर-१४,**
**नविन पनवेल, पिन-४१०२०६. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२) पूर्व उपनगरे, मुंबई,**
**कक्ष क्र.२०१, कोकण भवन,**
**२रा मजला, नवी मुंबई-४००६१४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक(एस विभाग),**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२) पूर्व उपनगरे, मुंबई,**
**कक्ष क्र.२०१, कोकण भवन,**
**२रा मजला, नवी मुंबई-४००६१४. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १६.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.७.७.२०१० रोजी सहाय्यक उपनिबंधक,सहकारी संस्था एस विभाग, कोकण भवन यांच्याकडे अर्ज करुन त्यांच्या दि.३१.१०.०९,७.१२.०९,८.२.२०१०,१२.४.२०१० या तारखांना केलेल्या अर्जांच्या संदर्भात काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.१८.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि.१३.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांच्या अर्जास शासकीय माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर दि.७.८.२०१० ची प्रत अपिलकर्ता यांना त्वरित उपलब्ध करुन द्यावी व अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करुन त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती एक महिन्यात उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपल दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी दि.७.७.२०१० रोजी त्यांना माहिती दिली असे जे सांगितले ते चुकीचे आहे. त्यांना दि.७.८.१०

रोजीचे पत्र U.P.C. ने मिळालेले आहे. सदरचे पत्र ७.७.२०१० रोजी पाठविण्यात आलेले नाही. यावरुन त्यांच्या माहितीच्या दि.७.७.२०१० च्या अर्जाप्रमाणे ३० दिवसाच्या आत कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दि.७.७.२०१० रोजीच पत्र पाठविले होते परंतु जावक नोंदवहीची तपासणी केली असता असे दिसून येते की, जावक नोंदवहीमध्ये अतिरिक्त जागेवर त्याबाबतची नोंद करण्यात आलेली आहे व पत्र मुदतीत पाठविलेले आहे असे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. यावरुन अपिलकर्ता यांचे म्हणणे योग्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे युक्तीवाद करतांना असेही सांगितले की, त्यांच्या अर्जावर दि.९.३.२०१० रोजी कारवाई केलेली आहे. चेअरमन,सचिव,कॉम्पटन ग्रीव्हज एम्प्लॉईज को.ऑप.क्रे.सो.लि.,कांजूर मार्ग(पूर्व) यांच्या संदर्भात ती तक्रार होती व त्या तक्रारीच्या संदर्भात दि.९.३.२०१० रोजी त्यांना पत्र पाठविले होते. परंतु संबंधित को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीकडून कोणतेही उत्तर त्यावेळेस प्राप्त झाले नव्हते. आतामात्र त्यांच्याकडून उत्तर प्राप्त झालेले आहे. असे असल्यास अपिलकर्ता यांना माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

एकूणच कागदपत्रांचे अवलोकन केले असता दि.७.७.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती देण्याचे पत्र त्याच दिवशी देण्यात आले आहे हे दाखविण्याचा जो प्रयत्न आयोगापुढे करण्यात आला आहे व जावक नोंदवहीमध्ये त्याची जशी नोंद घेतलेली आहे ते सर्वस्वी चुकीचे आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयातसुध्दा दि.७.८.२०१० असाच उल्लेख करण्यात आलेला आहे व त्यामुळे दि.७.७.२०१० रोजी असे पत्र पाठविले गेले नाही हे निश्चित आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे अशाप्रकारे अर्जदाराची दिशाभूल करणे व आयोगाची सुध्दा दिशाभूल करणे याबाबत योग्य ती चौकशी होऊन संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता यांच्या दि.७.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत पत्र दिल्याचे जे दाखविण्यात आले आहे त्याबद्दल उपनिबंधक,सहकारी संस्था यांनी योग्य ती चौकशी करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १६.६.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक-मुमाआ/५०७१६/अपील क्रमांक ६७५९/२०११/०२

श्री. जितेंद्र पसाड,
बायो टेक्नो लॅब, २८८/९० डॉ.सी.एच.स्ट्रीट,
कार्टर हाऊस समोर, धोबीतलाव, मरीन लाईन्स,

**मुंबई-२.** ..... **अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था(३), मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९, तळ मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(पी विभाग),**
**३१५, ए-१ बिल्डिंग, वडाळा ट्रक टर्मिनल,**
**वडाळा, मुंबई-४०००३७.** ...... **उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १६.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन जनविकास को.ऑप.हौ.सो.संदर्भात From A file I want the following zerox copies from your records- १) Zerox copy of last page of anyone promoter's agreement where both are signed.(only one)

२) Zerox copy of Power of Attorney of Prabha

३) Zerox copy of member's list

४) Zerox copy of O.C.which was received from BMC

५)Zerox copy of police complaint/FIR,if file is not traceable or stolen

अशी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.४.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(III) यांनी दि.१६.११.२०१० रोजी दिलेला असून उपनिबंधक,सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई यांनी अर्जदाराला जनविकास को.ऑप.हौ.सो.लि. या संस्थेची अ धारिका तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी तसेच आवश्यकता वाटल्यास अ-

धारिकेतील कागदपत्रांच्या सत्यप्रती पुरवाव्यात असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्या आदेशांच्या प्रमाणेसुध्दा संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली ती त्यांना अपूर्ण मिळालेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली ती जनविकास को-ऑपरेटीव्ह हौ.सो.लि.यांच्याकडे मागीतली होती व प्रथम अपील मात्र त्यांनी उपनिबंधक,सहकारी संस्था यांच्याकडे केले. त्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरच त्यांना दि.२३.९.२०१० च्या पत्रान्वये अ धारिकेतील कागदपत्र आवश्यक त्या फीचा भरणा करुन या कार्यालयात समक्ष येऊन प्राप्त करुन घ्यावीत असे कळविलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अ-धारिकेतील कागदपत्रांच्या सत्यप्रती पुरविण्याबाबत आदेश दिले होते. या संदर्भात आयोगाचेसुध्दा द्वितीय अपील क्र.६३९३/१० यामध्ये माहिती देण्याचे आदेश झालेले आहेत. त्यानंतर अपिलकर्ता यांना दि.२३.२.२०११ रोजी कागदपत्रांची तपासणी दिली असून माहितीच्या अधिकारा अंतर्गत अर्जातील मुद्यांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे व तसा अहवाल आयोगाकडे दि.७.३.२०११ रोजी पाठविण्यात आला होता. त्याचप्रमाणे दि.२८.२.२०११ चे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ८९(अ) अन्वये दिलेल्या आदेशान्वये दि.१५.३.२०११ रोजी दफतर तपासणी लावण्यात आली होती व त्यास अनुसरुन कागदपत्र दिल्याबाबत सदर दिवशीचा रोजनामा केलेला आहे. दफतर तपासणीच्यावेळी अर्जदार हे सभासद नसून संस्थेच्या रेकॉर्डप्रमाणे सदनिका क्र.१/९ ही त्यांच्या वडिलांच्या नावावर असल्याचे दिसून आले आहे. याबाबत अर्जदार यांना विचारणा केली असता त्यांनी गीफ्ट डीड नोंदणीकृत केलेले नसल्याचे नमूद केले आहे. सदर गीफ्ट डीडची नोंदणी न केल्याने संस्था त्यांना सभासद करुन घेण्यास तयार नाही. त्यामुळे ते वेगवेगळया प्राधिकरणाकडे तक्रार करीत आहेत. यावरुन अपिलकर्ता यांना आत्तापर्यंत सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष आयोगास काढावा लागतो. असे असले तरी अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती अपूर्ण मिळालेलीआहे. त्याकरीता त्यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अ धारिकांची तपासणी द्यावी व त्यातून त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १६.६.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७१३/अपील क्रमांक ६७५८/०२**

**श्री. वासुदेव डी.पिळगांवकर,**
**राम-नाथ प्रसाद, १८वा रस्ता,**
**खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पी/उत्तर विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालीका आयुक्त पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालीका आयुक्त पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १६.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन त्यांच्याविरुध्द दि.२७.१.२०१० रोजी सहाय्यक अभियंता यांनी कलम ३५४ प्रमाणे नोटीस नं . ACPN/BF-३२/३५४/२६४/०९-१० ही कशाच्या आधारावर काढण्यात आली याबद्दलची कागदपत्र त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मागणी केलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१४.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२६.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती दिलेली असून अपिलात तथ्य रहात नाही अपील निकाली काढण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु मिळालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली होती ती त्यांच्याविरुध्द दि.१७.६.२०१० रोजी जी नोटीस इश्यू केलेली होती त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु त्यांनी दि.२७.१.२०१० रोजी जी नोटीस इश्यु केलेली आहे ती नोटीस कशाच्या आधारावर इश्यु केलेली आहे त्याबद्दलची माहिती मागीतलेली आहे व ती माहिती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात अभिलेख्यांची तपासणी करावी व आवश्यक तो खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविण्यात आले होते,व त्याप्रमाणे त्यांना माहितीसुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु पुन्हा अपिलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध झाली ती त्यांनी मागीतलेली माहिती नव्हती. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२३.२.२०१० च्या अर्जात सहाय्यक अभियंता पी/एन वार्ड, मालाड(प.), मुंबई यांनी कलम ३५४ प्रमाणे नोटीस नं. ACPN/BF-३२/३५४/२६४/०९-१० दि.२७.१.२०१० च्या संदर्भात सदर नोटीस कोणत्या कागदपत्रांच्या आधारे काढण्यात आली आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक १६.६.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७०६/अपील क्रमांक ६७५६/०२**

**श्री. एम.जी. गांधी,**
**ए/२, सिंधी नगर, सासमिरा मार्ग,**
**वरळी बस डेपोसमोर, मुंबई-४०००३०. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एन.एम.जोशी मार्ग, मुंबई-४०००१३.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एन.एम.जोशी मार्ग, मुंबई-४०००१३. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २७.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १६.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.५.२०१० रोजी(प्राप्त दि.२४.५.२०११) जन माहिती अधिकारी तथा वार्ड ऑफीसर जी/साऊथ वार्ड,बीएमसी,एन.एम.जोशी मार्ग यांच्याकडे संजय सुवर्णा यांच्या संदर्भात भाडेपट्टी जी बदलून देण्यात आलेली आहे ती कोणत्या कागदपत्रांच्या आधारे बदलून देण्यात आलेली आहे त्या कागदपत्रांच्या प्रती तसेच अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. त्या संदर्भात अपिलकर्ता यांना दि.२३.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.१७.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२०.१०.२०१० रोजी देण्यात आलेला आहे. तरीसुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या इमारतीमध्ये भाडेकरु म्हणून संजय सुवर्णा रहावयास आलेले आहेत परंतु ते मूळ भाडेकरु नाहीत व त्यांनी संजय सुवर्णा यांना भाडेकरु म्हणून रहावयास परवानगी दिलेली आहे त्याकरीता ही माहिती त्यांनी जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मागीतलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी उत्तर देतांना Shri Sanjay Suvarna has submitted required documents hence tenancy transferred to his name असे उत्तर दिलेले आहे. त्यानंतर पुन्हा प्रथम अपीलाच्या नंतर मात्र The documents produced by Shri Sanjay Suvarna at the time of transfer of V.L.T. under reference in his name cannot be furnished to you as the said file papers are not available in the office record असे कळविलेले दिसून येते. यावरुन ही दोन्हीही उत्तरे विसंगत आहेत अशी अपिलकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार केली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने जे प्रथम उत्तर दिलेले आहे ते उत्तर नोंदवहीमध्ये ज्या नोंदी आहेत त्यावरुन दिलेले आहे. परंतु त्या संदर्भातील कागदपत्रांची जेव्हा मागणी करण्यात आली त्यावेळेस अभिलेखागारात विचारणा करण्यात आली व अभिलेखाकाराने त्या संदर्भात कोणतीही कागदपत्र उपलब्ध नाहीत असे कळविले असल्यामुळे अपिलकर्ता यांना पुन्हा त्याप्रमाणे उत्तर देण्यात आले आहे. त्यामुळे ही दोन्हीही उत्तरे विसंगत नाहीत. सदरची बाब ही १९८१ ची आहे व अभिलेखागारामध्ये जर कागदपत्र नाहीत तर ती नोंदवहीत कशाच्या आधारावर नोंदी केल्या गेल्या आहेत ते आज सांगता येणार नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांना महानगरपालिकेच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्या माहितीच्या आधारावर त्यांनी योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे स्वतंत्रपणे तक्रार करणे संयुक्तिक राहील यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक १६.६.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७४२/अपील क्रमांक ६७७७/०२**

**श्री. ओमप्रकाश पनवार,**
**रुम नं.डी-१-१-२,सेक्टर-६,**
**नेरुळ, नवी मुंबई-४००७०६. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे कार्यालय,**

**सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड,**
**सी.एस.टी.स्टेशनसमोर, मुंबई-४०००01.**

**जन माहिती अधिकारी, संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे कार्यालय,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड,**
**सी.एस.टी.स्टेशनसमोर, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.६.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.८.२०१० रोजी जन माहितीअधिकारी,सहाय्यक संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या कार्यालयामध्ये एम.बी.बी.एस. प्रवेश घेतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास उमेदवार असे लिहून देतो की, ९० दिवसाच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्र तो सादर करेल व तसे न केल्यास माझी ॲडमिशन रद्द होऊ शकेल याची मला कल्पना आहे, ही तरतूद एमएच-सीईटी -२००२(Rules and Regulations for Admission to M.B.B.S.)प्रॉस्पेक्टस मध्ये कोणत्या पृष्ठावर आहे अशाप्रकारची माहिती अपिलकर्ता यांनी मागीतलेली दिसून येते. सदरची मााहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.२३.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१३.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पूर्वीच्या अर्जान्वये कळविलेली आहे म्हणून उत्तर पाठविलेले नाही. अपिलकर्ता यांच्या अर्जामध्ये नव्याने कोणतीही माहिती मागीतल्याचे दिसून येत नाही. त्यानंतरही अपिलकर्ता यांना सुनावणीस हजर रहावे असे आदेश दिल्यानंतर दि.२.११.२०१० रोजी पुन्हा प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व त्यामध्ये अपिलकर्ता यांनी मागीतलेले प्रतिज्ञापत्र भवितव्यात नस्तीमध्ये आढळून आल्यास किंवा संस्थेकडे मिळाल्यास त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास द्यावी. प्रतिज्ञापत्राचा नमुना माहिती पुस्तिकेतील कोणत्या पानावर आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य वाटते. त्याचप्रमाणे जात पडताळणी समितीने कु.प्रियंका पनवार यांच्या जात पडताळणी पत्राबाबत या कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती १ आठवडयाच्या कालावधीत अपिलकर्त्यास उपलब्ध करुन देतील अशाप्रकारचे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले दिसतात व नियमाप्रमाणे दि.१२.११.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, वैद्यकीय संचालनालयाने जे नियम २००२ मध्ये प्रसिध्द केले आहेत त्या नियमांमध्ये एम.बी.बी.एस.प्रवेश नियमानुसार प्रवेश घेतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास उमेदवार असे लिहून देतो की, ९० दिवसाच्या आत जातपडताळणी प्रमापणपत्र सादर करेल व तसे न केल्यास माझी ॲडमिशन रद्द होऊ शकेल याची मला कल्पना आहे. ही तरतूद कोणत्या नियमात आहे, कोणत्या पृष्ठावर आहे ते त्यांनी माहितीच्या अधिकारात विचारले होते परंतु अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी याबाबतचे नियमातील पृष्ठ किंवा कोणत्या पृष्ठावर सदर माहिती उपलब्ध आहे ही माहिती त्यांना दिलेली नाही. तसेच जे हमीपत्र आहे त्या हमीपत्राचा नमुनासुध्दा कोणत्या पृष्ठावर आहे तेही त्यांना दिलेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी एमएच-सीईटी-२००२ रुल्स अँड रेग्युलेशन्स फॉर ॲडमिशन टू एमबीबीए प्रॉस्पेक्ट्सची जी प्रत दिलेली आहे त्या प्रतीमधील पृष्ठ क्र.३९ व ४० या २ पृष्ठांवर सदरची तरतूद आहे. व ती खालीलप्रमाणे आहे-

**Annexure -B Constitutional Reservations(BC) या भागामध्ये The candidate should have claimed the constitutional reservation in the original application form. The candidate claiming constitutional reservation must submit caste validity certificate at the time of counseling/interview, failing which the category claim will not be granted. In case candidate is not in a position to produce caste validity certificate he/she should submit the proof that his/her claim for procuring caste validity certificate is pending with the caste scrutiny committee at the time of counseling/interview. The admission will be given provisionally subject to the decision of the caste scrutiny committee about the caste validity within a period of १२ weeks from the date of admission** असे आयोगाच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे पुन्हा सांगितले की, असे हमीपत्र दाखल करुन घेतले जाते त्यामध्ये ९० दिवसात जर जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नाही तर प्रवेश रद्द केला जाईल असे नमूद केले आहे. त्यामुळे सध्या आहे ती तरतूद व त्यांनी विचारली आहे ती तरतूद यात विसंगती दिसून येते व त्यामुळेच त्यांनी तशाप्रकारची तरतूद आहे काय अशी विचारणा केली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पुन्हा असे सांगितले की, नियमात जी तरतूद आहे ती तरतूद त्यांनी दिलेली आहे व त्यावरुन जरी नियमातील तरतूद व प्रत्यक्ष हमीपत्रातील तरतूद यामध्ये विसंगती असल्यास त्याप्रमाणे सक्षम अधिकारी किंवा मा.न्यायालयापुढे अपिलकर्ता यांना योग्य तो युक्तीवाद करता येईल. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, या संदर्भात आयोगाने अपिल क्र.५३०८/०२ निकाली काढले असून अपील क्र.५१६३/०२ हे सुध्दा निकाली काढण्यात आले आहे. असे असूनसुध्दा अपिलकर्ता यांनी माहितीचा अर्ज केला व त्यात तीच माहिती मागीतलेली आहे.

मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.२३.८.२०१० रोजीच्या अर्जात जी माहिती मागीतलेली आहे त्यापेक्षा आणखी मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात ते अनाकलनीय आहे. तसेच प्रवेशाच्यावेळी जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास मागाससंवर्गातील विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्यात येणा-या हमी पत्राची प्रत दि.२३.८.२०१० च्या अर्जात मागीतलेली नसून सुध्दा त्याबद्दलचा मुद्दा आयोगाकडे सादर केलेल्या खुलाशात करण्यात आला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सुध्दा अर्जदाराने अर्जात काय माहिती मागीतली आहे याचा विचार न करता निर्णय देत असतात. परंतु अपिलकर्ता यांना एमएच-सीईटी-२००२(रुल्स अँड रेग्युलेशन्स फॉर ॲडमिशन टू एम.बी.बी.एस.)प्रॉसपेक्ट्सची प्रत उपलब्ध करुन दिलेली असून त्याबाबत मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात पृ.क्र.३९-४० वर संबंधित नियम असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**

**दिनांक १८.६.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०७४३/अपील क्रमांक ६७७९/०२**

**श्री. गणेश बाबूभाय वर्मा,**
**गंगावाडी शिवसेना शाखा क्र.२,**

**आनंद मंगल बिल्डिंगमागे, घाटकोपर(प.),**
**मुंबई-४०००८६.** ..... **अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**कार्यकारी अभियंता(विशेष)एन विभाग यांचे कार्यालय,**
**३रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**कार्यकारी अभियंता(विशेष)एन विभाग यांचे कार्यालय,**
**३रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७७.** ...... **उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.६.२०११**
**अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता परिरक्षण एन विभाग, जवाहर रोड, घाटकोपर(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन सौ.सरस्वती गजानन भोसले(नगरसेविका-घाटकोपर विभाग) यांनी निवडणूक जिंकल्यानंतर नगरसेवक निधीचा फंड देण्यात येतो त्याचा वापर कोणकोणत्या कामाकरीता करण्यात आला, तसेच त्या कालावधीमध्ये कोणत्या स्वरुपाची कामे त्यांच्याकडून करण्यात आली याची सविस्तर माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१७.८.२०१० रोजी लागणारी माहिती प्राप्त करण्यासाठी एकूण पृ.१८० X२= रु.३६० इतक्या रकमेचा भरणा करावा तसेच मुद्दा क्र.२ च्या माहितीसाठी एकूण ३० पृष्ठांसाठी प्रती पृष्ठ रु.२ प्रमाणे रु.६० इतक्या रकमेचा भरणा करावा असे कळविण्यात आले होते. परंतु अपिलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिला, माहितीसाठी चलन बनवून देण्यास नकार दिला म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७.९.२०१० रोजी देण्यात आला असून मागीतलेली माहिती सन २००२ पासूनची असल्यामुळे माहिती देण्यासाठी किमान १

महिन्याचा कालावधी आवश्यक आहे. सहाय्यक अभियंता(परिरक्षण)एन विभाग यांनी कार्यवाही करावी असे आदेश देण्यात आलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात खर्चाचा भरणा केला होता परंतु माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांना त्यांच्या २३.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेल्या माहितीकरीता १७.८.२०१० रोजी रु.३६०+६० इतक्या रकमेचा भरणा करावा असे कळविण्यात आले होते व ते विहित मुदतीत कळविले होते. परंतु अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न करता प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७.९.२०१० रोजी देण्यात आला असून त्यात १ महिन्याचा कालावधी आवश्यक आहे असे आदेश देण्यात आले. खर्चाचा भरणा सुध्दा रु.१८०/- इतका करण्यात आलेला आहे व त्यानंतर अपिलकर्ता माहिती घेण्यास आलेले नाहीत. त्याकरीता त्यांना दि.१.१०.२०१० रोजी स्मरणपत्रसुध्दा पाठविले होते. त्यावर अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ते माहिती घेण्यासाठी गेले होते परंतु माहिती दिलेली नाही. परंतु दाखल केलेली कागदपत्र व तोंडी युक्तीवादावरुन अपिलकर्ता किंवा त्यांचे प्रतिनिधी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती घेण्यास गेलेलेच नाहीत असे दिसून येते व खर्चाचा भरणा सुध्दा त्यांनी मागितल्याप्रमाणे केलेला नाही. त्यातही माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ७(३) अन्वये जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करण्याकरीता जर पत्र दिले असेल तर त्यापत्राच्या तारखेपासून  खर्चाचा भरणा करेपर्यंतचा कालावधी हा ३० दिवसाच्या कालावधीमधून वगळण्यात येतो. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पत्र दिले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १८.६.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०७४४/अपील क्रमांक ६७७८/०२

श्री. विजय के. चौहान,
२ए, सन अँड सी अपार्टमेंट्स,
रॉयल लेन जवळ, जुहूतारा रोड, सांताक्रुज(प.),
मुंबई-४०००४९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त प्रबंधक,**
**लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त कार्यालय,**
**नवीन प्रशासन भवन, १ला मजला,**
**मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.प्रबंधक,**
**लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त कार्यालय,**
**नवीन प्रशासन भवन, १ला मजला,**
**मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २३.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १८.६.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१४.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रबंधक,लोक-आयुक्त आणि उपलोक-आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई यांचेकडे दि.२८.४.२०१० रोजीच्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भात तसेच लोकआयुक्त कार्यालयात विधी विभाग आहे का?तसेच कक्ष अधिकारी श्री.एस.आर.चव्हाण यांच्या संदर्भात त्यांच्या सेवेसंदर्भातील माहिती तसेच मा. न्यायालयात दाद मागून घ्याव्या अशा किती केसेस दिल्यात? इत्यादी एकूण १४ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२९.९.२०१० रोजी मुद्देनिहाय मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात कळविण्यात आले असून माहितीची एकूण पृष्ठ संख्या १५ असून प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे छायांकन शुल्क एकूण रु.३०/- आकारण्यात येईल तसेच मुद्दा क्र.३ ते ६ व ९ ते १३ अन्वये मागीतलेली माहिती दि.४.१०.२०१० पर्यंत उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व संबंधित कक्ष अधिकारी व सहाय्यक प्रबंधक यांना दि.२०.९.२०१० रोजी आदेशित करण्यात आले होते. तथापि, आपण मागीतलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती उपलब्ध करुन देण्यासाठी दि.१५.१०.२०१० पर्यंत मुदतवाढ देण्याची सर्व कक्ष अधिकारी व सहाय्यक प्रबंधक यांनी दि.२७.९.२०१० रोजी विनंती केली आहे. त्यानुसार त्यांची विनंती मान्य करण्यात आली असून त्यांना दि.१५.१०.२०१० पर्यंत आपण मागीतलेली माहिती न चुकता उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. त्याबाबतचे संबंधित कक्ष अधिकारी व सहाय्यक प्रबंधक यांच्या निवेदनाची प्रत व त्यांना देण्यात आलेल्या आदेशाची प्रत आपणास यासोबत माहितीसाठी पुरविण्यात येत आहे. उपरोक्त माहिती प्राप्त झाल्यावर मुद्दा क्र.१४ च्या अनुषंगाने आपण मागितलेली कागदपत्रे पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील व

त्याबाबत आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांनी दि.१५.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२६.१०.२०१० रोजी देण्यात आला असून सदरचे अपील फेटाळण्यात आले आहे त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही तसेच त्यांचे प्रथम अपीलही फेटाळण्यात आले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती आहे. त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात जो निर्णय झाला होता त्या संदर्भात त्यांना तो निर्णय मान्य नसल्यामुळे त्यांनी लोकआयुक्त कार्यालयातील इतर निर्णयांबद्दल सुमारे १९७२ पासूनची माहिती मागीतली होती. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहितीचे निश्चित असे वर्णन करणे आवश्यक असते. परंतु त्यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती विस्तृत व व्यापक प्रमाणात व मोघम अशी माहिती आहे. तसेच ती माहिती मागीतलेल्या स्वरुपात संकलीत करण्यात आलेली नाही व संकलीत केलीही जात नाही. तरीसुध्दा कक्ष अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले होते व ते मुदतीतच दिले होते. जी माहिती उपलब्ध आहे त्या माहितीकरीता खर्चाचा भरणा करणेबाबत मुदतीत कळविण्यात आले होते. अपिलकर्ता यांनी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले असल्यामुळेच त्यांनी माहिती ही १५.१०.२०१० रोजी म्हणजे ३०व्या दिवशी उपलब्ध करुन देता येईल असे कळविले होते व त्या दिवशी त्यांनी प्रत्यक्ष येऊन,खर्चाचा भरणा करुन कळविल्यानुसार माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे न करता दि.१५.१०.२०१० रोजी ३० दिवसाची मुदत संपण्याच्या आतच प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज जरी दि.१४.९.२०१० रोजी दाखल केलेला असला तरी तो प्रत्यक्षात तो नंतर मिळालेला आहे व दिनांक १५.१०.२०१० रोजी प्रस्तुत न झाल्यामुळे त्यांनी दि.२१.१०.२०१० रोजी सविस्तर पत्र पुन्हा पाठवून वर कळविलेला खर्च रु.३० व नंतर जी माहिती उपलब्ध झाली त्या संदर्भातील रु.१३४ चा भरणा करावा असे कळविण्यात आले होते. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांनी कार्यालयात किंवा जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क न साधता प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केले. त्य संदर्भातील संपूर्ण रोजनामा कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे जे अपील केलेले आहे त्या द्वितीय अपील मेमोमध्ये जी कारणे दिलेली आहेत त्या कारणांचा व मागीतलेल्या माहितीचा काहीही संबंध नाही.

अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमोचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१४.९.२०१०च्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली किंवा नाही याबद्दल त्यांनी कोणताही उल्लेख केलेला नाही. परंतु द्वितीय अपील मेमोमध्ये असंबध्द असे १९७१चा कायदा हा अंमलबजावणी करण्यास असमर्थ झाला आहे तसेच भ्रष्टाचार, अनियमिततेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही वगैरेवगैरे अशाप्रकारे कारण दिलेले दिसून येते.

यावरुन अपिलकर्ता यांनी या आयोगापुढे युक्तीवाद करतांना माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा मा.लोक-आयुक्त कार्यालयाच्या संदर्भात सर्वसाधारण तक्रारी करण्याचाच युक्तीवाद केला. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा तक्रारी करणेच योग्य वाटते असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांना जे पत्र दिले त्या पत्राची प्रतसुध्दा अपिलकर्ता यांना आयोगाच्या निदर्शनास आणणे आवश्यक वाटले नाही व त्या पत्राचे अवलोकन केले असता त्या पत्रात अत्यंत स्वयंस्पष्टपणे सहाय्यक प्रबंधक तथा जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात तपशीलवार कळविलेले आहे. अर्जदार ज्यावेळी अर्जामध्ये माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करतात त्यावेळेस अर्जदाराने कमीत कमी ३०व्या दिवशी तरी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. जन माहिती अधिकारी यांनी जर त्या दिवशी माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर अर्जदाराने आक्षेप घेणारे पत्र जन माहिती अधिकारी यांना देऊन त्या पत्राची प्रत आयोगाकडे पुरावा म्हणून सादर करणे आवश्यक असते. अन्यथा माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करावयाचे मात्र ३० दिवसात माहिती घेण्यासाठी जायचेच नाही व त्यानंतरही माहिती घेण्यास टाळाटाळ करुन प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करायचे व त्यामध्ये असंबध्द असे आरोप जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विरुध्द करावयाचे याचा त्या कार्यालयास वेठीस धरण्या पलीकडे कोणताही दुसरा अर्थ असू शकत नाही. अपिलकर्ता यांचा दि.१४.९.२०१० चा अर्ज हा त्या कार्यालयात दि.१८.९.२०१० रोजी प्राप्त झाला असे दिसून येते. याचा अर्थ दि.१८.९.२०१० पासून ३० दिवस हे १७.१०.२०१० पर्यंत पूर्ण होतात व जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.१०.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देणार असे त्यांना स्पष्टपणे कळविलेले होते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती घेण्यासाठी कार्यालयात व्यक्तीशः हजर राहणे आवश्यक होते.

असे असले तरी अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती अतिशय मोघम व व्यापक स्वरुपाची आहे व त्यामुळे अशाप्रकारची माहिती ही संकलीत करण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्यास त्या प्रकारची माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नसल्यास त्या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(ज) प्रमाणे माहिती निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन देणे असा पर्याय आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कळविलेले असल्यामुळे ती माहिती त्यांनी खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेतली नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १८.६.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०४३८/अपील क्र.६७३०/०२**
**मुमाआ.नो.क्र.५०४३८-अ/अपील क्र.६७३१/०२**

**श्री. अनिल गोयल**
**एफ २०१/२०२, व्हिस्परींग पाम्स,**
**अेक्सक्लुझिव्ह, लोखंडवाला टाउनशिप,**
**आकुर्ली रोड, कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१. ... अपिलार्थी**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता, इ.प्र. (प.उ.) II**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, २ रा मजला, सी विंग, ९० फूट रोड,**
**सेंट लॉरेन्स हायस्कूल जवळ, संस्कृति कॉप्लेक्स,**
**ठाकूर कॉप्लेक्स, कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इ.प्र. (प.उ), आर विभाग,**
**म्युनिसिपल गोडाउन बिल्डींग, ९० फूट रोड,**
**सेंट लॉरेन्स हायस्कूल जवळ, संस्कृति कॉप्लेक्स,**
**ठाकूर कॉप्लेक्स, कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १८.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ०७.०६.२०११**
**जन माहिती अधिकारी व अपिलकर्ता उपस्थित.**

अपीलकर्ता यांनी अपील क्र.६७३०/०२ मध्ये दि.१२.०८.२०१० रोजी कार्यकारी अभियंता, इ. व प. (W.S.) R विभाग उप मुख्य अभियंता (BP) W.S. कार्यालय, कांदिवली, (पू) यांचेकडे इमारत क्र.९ बिल्डींग ऑन सिटीएस नं.१७१ measuring ११२४३.० sqm तसेच सिटीएस नं.१७१/२, १७१/१०,

१७१/१०/१ इत्यादी up to १९५-B/१ in respect of which development rights granted to "Lokhandwala Construction Industry Private Ltd" च्या संदर्भामध्ये सन १९८४ पासून डी सी आर मधील रेग्युलेशन ३५(५), ३४, ४३, ५(१), ५(३) (iii) (iv) यांच्या संदर्भामध्ये ते रेग्युलेशन ६(८) पर्यंत प्रत्येक रेग्युलेशन प्रमाणे काय काय कार्यवाही केली आहे ती संपूर्ण माहिती व्यक्तीश: घेणार तसेच "in addition, undersigned would also like to personally peruse all written correspondence and sanctions/ approvals wrt the above project in all related files held by your department" असे नमुद केलेले आहेत. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना ०१.०९.२०१० रोजी आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये आपण कार्यालयात येउन सर्व कागदपत्रांचे निरीक्षण करावे तसेच निरीक्षण केल्यानंतर आवश्यक त्या कागदपत्रांचे खर्चाचा भरणा करून आपल्याला माहिती उपलब्ध होईल असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात म्हटले असुन सुध्दा नस्त्यांचे निरीक्षण केले नाही मात्र त्यांनी दि.१३.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.१५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दि.०१.०९.२०१० रोजी दिलेले उत्तर योग्य आहे तसेच अपिलकर्ता यांचे विनंती प्रमाणेच त्याच्या आरर्किटेक यांना निरीक्षण करण्याची परवानगी मान्य केली आहे व निरीक्षणा अंती आवश्यकती कागदपत्रे खर्चाचा भरणा भरुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. मात्र त्यामध्ये त्यांनी निरीक्षण केलेले आहे याबद्दल मान्य केले असले तरी त्यांच्या वास्तुशास्त्रज्ञानी एकच दिवस निरीक्षण घेतले व त्या गर्भारपणामुळे येउन शकत नसल्यामुळे व त्यांना स्वत: ला तांत्रिक बाबी कळत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण् माहिती त्यांना कागदपत्रांच्या स्वरुपात विना मुल्य उपलब्ध करून द्यावी असे कारण दिलेले आहे.

२.अपिलकर्ता यांनी अपील क्रमांक ६७३१/०२ मध्ये दि.२५.०६.२०१० रोजी (०६.०७.२०१० प्राप्त) जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इमारत व प्रस्ताव) यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितली: -

(a) Copy of the Agreement between Lokjandwala and the Bombay Gowrakshak Mandli executed on 13 Dec, 1984 to wards the Development plan of the area.

(b) Copy of approval LCIPL submitted plot layout plan and its approval by BMC vide order No.CHE/132/LOR dt 20.02.1989.

(d) Copy of approval Building Plan with all necessary details in COLOUR copy.

(e) Copy of Commencement certificate of bldg no.9 with approval terms and conditions.

(f) Copy of Completion certificate of bldg no.9.

(g) Property Tax levied-Building and flat wise.

(h) Water tax levied-Building and flat wise.

(i) Sewage tax levied-Building and flat wise.

(j) Permissible FSL in the zone and FSI approval given originally to LCIPL.

(k) FSI sanctioned for building no.9 and breakdown of its actual utilization by promoter / builder in bldg no.9. Any TDR utilized by LCIPL, and if so the details thereof.

(l) Sanctioned height of the buildings and width of adjacent roads.

(m) Additional FSI sanctioned under relevant sec of DCR.

(n) TDR sanctioned for the project and details of utilization of the same.

(o) No of tenements sanctioned originally.

(p) Denial of 'Open Area' of 15-25% of plot area of 10000 sqm contrary to DCR. Plz explain how the statutory requirements of open/amenity spaces is met in respect of Bldg no.9.

(r) Open spaces on the sides / rear and compliance with DCR.

(s) Keeping lesser head space/height in staircase contrary to DCR.

(t) Providing adequate recreational and amenity areas/spaces as per DCR.

(u) Provision of office room space of 20 sqm per bldg as per DCR.

(v) Provision of letter boxes in each building as per DCR.

(w) Approval of basement is restricted to twice the building plinth or the plot area, whichever is less as per CHE/1983/DPC of 04.02.1992.

(x) Non-provisioning of mandatory fire escape signs LIFT and STAIR Case.

(y) Copies of necessary Fire deptt approval, based on which the final OC was issued.

(z) Details and layout of the REFUGE areas and utilization. Accessibility of fire tenders in case of an eventuality.

(aa) Sanctioned and approvals of Minimum open spaces to be provided and actually provided as per DCR.

(bb) Non-adherence to DCR on mandatory provisioning of parking spaces along with the flats (based on areas) and promoter/builder arbitrarily charging Rs.4 lakh per parking space and giving a receipt of only Rs.25000/- and that too forcing the buyers to pay stamp duty but refusing to register the same. Action planned against LCIPL for the same. (Mumbai High Court order no 2182 of 2007 refers.)

(cc) Non-conveyance of the complete including the club house to the registered societies and illegally continuing possession and charging adhoc and arbitrary and discriminatory charges from the legal occupants and owners.

(dd) Nature of supervision, approvals, sanctions, waivers and number and details of site visit conducted by Shri Umesh Vartak Licensed Architect vide no.V/106/LS from the time of issue of commencement certificate to Occupation certificate, and subsequently if nay.

(ee) Nature of supervision, approvals, sanctions, Waivers and number and details of site visits conducted by Shri UM Joshi Licensed structural engineer vide no.STR/J/26 from the time of issue of commencement certificate to Occupation certificate, and subsequently if any.

(ff) Nature of supervision, approvals, sanctions, Waivers and number and details of site visits conducted by Shri PM Deshmukh Licensed site supervisor vide no.D/274/SS-1 from the time of issue of commencement certificate to Occupation certificate, and subsequently if any.

(gg) Action contemplated fro all the alleged shortcomings in the individual flats and the building as committed by LCIPL.

(hh) Is the supervision and subsequent checks by officials of MCGM over, after issuing occupation certificates to LCIPL.

(ii) While the BMC has issued a letter to LCIPL to discontinue the Water Canal around the common club house due shortage of water in Mumbai and spread of diseases rains, etc, the said drain continues and is full of water now. This has led to danger of water borne disease spread besides depriving the members of extra floor are, had LCIPL filled up this canal. Contrary to VDR, LCIPL continues to control the club house and has not handed over the same to its rightful and legal owners-The flat purchasers. Action planned on the same may also be informed.

(jj) Against DCR laid down, statutory minimum height difference inside the FLAT; below any BEAMS between the floor and beam as 2.40m, in some place reduced to 2.10, only. How was the same overlooked during construction and action contemplated against LCIPL including compensation to affected parties. Similar discrepancy in the enclosed staircases.

अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती विहित विस्तृत व प्रश्नोत्तरांच्या व विविध विभागांशी संबंधित असल्याने दि.०२.०८.२०१० रोजी त्यांना कार्यालयांत उपस्थित होउन अभिलेखाची पहाणी करुन आवश्यक त्या कागदपत्रांचा खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसते. परंतु अर्जदाराने दि.२९.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दि.१४.१०.२०१० रोजी अर्जदाराचे वतीने वास्तुविशारद श्रीमती प्रतिक्षा फेटवाल यांनी कार्यालयनी अभिलेखांचे निरीक्षण केले परतु त्यांना वेळेअभावी निरीक्षण प्रक्रिया पूर्ण झाली नाही असे समजण्यांत आले व अर्जदार श्री.अनिल गोयल हे उप प्रमुख अभियंत्याची प्रत्यक्ष भेट घेतील असे लेखी नमूद केले त्यामुळे दि.२७.१०.२०१० रोजी प्रथम अपीलाच्या सुनावणीत पुन्हा निरीक्षण प्रक्रिया पूर्ण करुन माहिती देण्याचे आदेश देण्यांत आले. त्याप्रमाणे त्यांना दि.२८.१०.२०१० रोजी पत्राव्दारे कळविण्यांत आले परंतु त्यांना उर्वरित यादी अग्रेषित केलेली नसून सुध्दा राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी सर्व नस्त्यामधुन ती काढून द्यावी व विना मुल्य द्यावी.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती अतिशय व्यापक प्रमाणात माहिती आहे व विस्तृत व प्रश्नोत्तरांच्या व अनेक विभागाशी संबंधित माहिती आहे. विकासकांनी किंवा वास्तुविशारद यांनी सादर केलेला व मंजूर केलेला आराखडा उपलब्ध करुन द्यावा असे म्हणणे सोपे आहे. परंतु एक इमारत जेव्हा बांधली जाते त्यावेळेस त्या इमारतीच्या संदर्भामध्ये जेव्हढी वर्ष कामकाज चालू असते तेव्हा वेळोवेळी विकासक किंवा वास्तुविशारद आराखडे हे सुधारित करत असतात. तसेच एक इमारतीच्या संदर्भामध्ये इतर अनेक विभागाचा सुध्दा संबंध येत असतो व त्या विभागाशी झालेला किंवा त्या विभागाकडून आलेला पत्र व्यवहार सुध्दा त्या नस्त्यामध्ये असतो. अशा प्रकारे एका इमारतीच्या संदर्भा मध्ये व त्यात असलेल्या सदनिकेच्या प्रमाणामध्ये

१० ते १२ नस्त्या तयार होत असतात. व त्यामध्ये पाच ते दहा हजार पृष्ठ असतात. व अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही १९८४ पासून मागितली आहे म्हणजे अतिशय जुनी माहिती आहे. त्या सर्व नस्त्या काढून त्यातून प्रत्येक पृष्ठ D.C. नियमाप्रमाणे तपासून त्याची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे हे अत्यंत जिकिरीचे आणि दैनंदिन कामकाज बाजूला ठेउन करण्याचे आहे व अशा प्रकारे कार्यालयामध्ये एकटा अपिलकर्ता यांचा अर्ज नसतो तर रोज १० ते १५ माहितीचे अर्ज दाखल झालेले असतात व त्यामुळे अतिशय व्यापक प्रमाणात माहिती असल्याने सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर वळवावी लागेल व दैनंदिन कामकाज सुध्दा होणार नाही व त्यामुळे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम २(ञ) प्रमाणे 'माहितीचा अधिकार' या संज्ञेमध्ये सार्वजनिक प्राधिकरणाचे नियंत्रणामध्ये असलेली माहिती व अभिलेख्याची तपासणी करणे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती घेणे हे अपेक्षित असल्यामुळे त्याप्रमाणे अर्जदारास कळविले जाते जेणे करुन अर्जदाराने स्वत: निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते व त्यानुसार अपिलकर्ता यांना ०१.०९.२०१० रोजी विहित मुदतीतच कळविण्यात आलेले होते. अर्जदार हे दोनही बाजूंनी तक्रार करतात. जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रे दिली तर अनावश्यक कागदपत्रे देतात अशी तक्रार करतात व निरीक्षण करावयांस सांगितले तर ती जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे अशा तक्रारी करतात व ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये सुध्दा स्पष्ट करण्यात आली होती व त्यानुसार अपिलकर्ता यांनी वास्तुविशारद घेउन निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेण्याचे मान्य केले होते तसेही त्यांच्या अर्जामध्ये सुध्दा संपूर्ण माहिती ही निरीक्षण करुनच उपलब्ध करुन घेणार असे नमूद केले आहे व त्याप्रमाणे त्यांनी निरीक्षण सुध्दा केले आहे व काही कागदपत्रे नमुद सुध्दा केली आहे. त्यांचे वास्तुशाविशारद नंतर येउ शकत नाही ही त्यांची अडचण आहे व तसे त्यांना निरीक्षण नको असेल तर या संपूर्ण नस्त्यांमध्ये जेवढी कागदपत्रे असतील त्या सर्वाचा प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे तसेच आराखडे याच्या संदर्भामध्ये जी फी ठरविली आहे त्या फी प्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तीक राहिल. तसेच त्यांच्या दि.२५.०६.२०१० चे अर्जात मोघम व अनेक विभागातील माहिती तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले आहेत.

५.त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना संपूर्ण १२ ते १४ नस्त्यांची निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेण्यास वेळ नाही तसेच त्यांचे वास्तुविशारद सुध्दा येउ शकत नाही व ते तांत्रिक बाबतीत अनभिज्ञ आहेत व अधिनियमाचे कलम ७ प्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. व त्यांना त्या इमारतीच्या संदर्भातील संपूर्ण कागदपत्रांची सुध्दा आवश्यक नाही व ते निरीक्ष्ंण ही करणार नाही. अर्जात मागितल्याप्रमाणे कागदपत्रे काढुन द्यावीत.

६.वास्तविक अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१२.०८.२०१० चे अर्जातच सर्व नस्त्यांचे निरीक्ष्ंण करणार असे नमूद केले आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीस सुध्दा त्यांना मान्य केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(ञ) मधील 'माहिती अधिकार' या संज्ञेची व्याख्यासुध्दा ते त्यांच्या सोई नुसार करतात अधिनियमाचे कलम ७(९) मध्ये मागितलेल्या माहितीकरीता शासकीय यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास माहिती असे तशी द्यावी असे नमूद आहे. याबाबत सुध्दा विचार करणे आवश्यक असते. अधिनियमाचे कलम ७(३) अन्वये खर्चाचा भरणा करावा अशी तरतूद आहे व त्याप्रमाणे संपूर्ण कागदपत्रांच्या संबधात खर्चाचा भरणा करावा हे सुध्दा त्यांना मान्य आहे असे दिसत नाही व ते जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचे संबंधात सुध्दा कळविले असून आयोगाकडे विना मुल्य माहिती मिळावी अशी मागणी करतात.

माहिती तयार करुन देता येत नाही. कागदपत्रांची छायांकित प्रतीच देणे अपेक्षित असते. जन माहिती अधिकारी यांचे कोणत्याही प्रकारणांतील निर्णय प्रक्रिये संदर्भात अभिप्राय 'माहिती' या व्याख्येप्रमाणे अपेक्षित नाहीत तसेच अधिनियमाचे कलम ५(१) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाचे सर्व शाखा, उपशाखांमध्ये त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी नियुक्त केलेले असल्याने अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक असते. हस्तांतराची तरतूद ही एका सार्वजनिक प्राधिकरणाकडून दुस-या सार्वजनिक प्राधिकरणाकडे आहे. एकाच अर्जात अनेक विषयांची शाखांची माहिती मागने अपेक्षित नाही. सार्वजनिक प्राधिकारणाने विषयदार / शाखावार उप कार्यालयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती प्रसिध्द केलेली आहे व त्यामुळे ज्यांना खरोखर माहितीची आवश्यकता आहे त्यांनी सार्वजनिक प्राधिकरणाची कार्यपध्दती समजून देउनच माहिती मागणे अपेक्षित असते. प्रत्येक अर्जदाराने आपआपल्या कल्पनेप्रमाणे माहिती मागणे अपेक्षित नाही.

७.वरील सर्व वस्तुस्थिती व अधिनियमाच्या तरतूदीचा विचार केल्यास जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार विकासकांनी वेळोवेळी सादर केलेले प्रस्ताव हे सुधारीत केले असतात व त्यापैकी काही दिल्यास पुन्हा अपूर्ण माहिती दिल्याचे आरोप होतात असे युक्तीवादात सांगितले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी एक तर संपूर्ण नस्त्यांच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेणे किंवा दुसरा पर्याय हा उपलब्ध असलेल्या नस्त्यांचे निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रे नमूद करुन त्यांच्या छायांकित प्रतीचा खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेणे असा आहे.

८.व त्या दृष्टीने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय व अपिलकर्ता यांनी सुध्दा नस्त्याच्या निरीक्षणा सुध्दा त्यांचे अर्जात नमूद केलेले असल्यामुळे सदचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०६३९/अपील क्र.६७३२/०२
मुमाआ.नो.क्र.५०६४१/अपील क्र.६७३३/०२

श्री.शंभुशरण सक्सेना
रू.नं.१०१४, मुळेबाई चाळ,
रामगडनगर, गोशाला रोड,
मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०. ... अपिलार्थी

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, टी वार्ड,
बृहन्मुंबई महानगरपलिका, लाला देवीदयाल मार्ग,
मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता परिरक्षण, टी वार्ड,
बृहन्मुंबई महानगरपलिका, लाला देवीदयाल मार्ग,
मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपलिका, लाला देवीदयाल मार्ग,
मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०.

निर्णय

व्दितीय अपीलाचा दिनांक २४.११.२०१०
सुनावणीचा दिनांक ०७.०६.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.

अपीलकर्ता यांनी अपील ६७३२ मध्ये जन माहिती अधिकारी, टी वार्ड यांचेकडे रस्त्यावर पेवर ब्लॉक्स त्या संदर्भामध्ये जानेवारी २००७ ते अर्जाच्या तारखेपर्यंत एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.०८.१०.२०१० रोजी माहिती अतिशय व्यापक

प्रमाणामध्ये आहे व तीन वर्षाच्या कालावधीतील माहिती असल्याने अनेक नस्त्याआहे व त्यामुळे निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती खर्चाचा भरणा करुन घ्याव्यात असे कळविलेले दिसून येते.

२. परतु अपिलकर्ता यांनी दि.१५.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.११.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी विहित शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला आहे. परंतु अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

३. अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हे उशिरा उपस्थित झाले. परंतु त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहितीच्या संदर्भात उत्तर देण्यात आले आहे तसेच प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणला जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

४. अपील क्र.६७३३ मध्ये अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, टी वार्ड यांचेकडे रामगड या झोपडपट्टी भागात अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये एकूण ५ मुद्यावंर १९९४ ते २०१० या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.०८.१०.२०१० रोजी माहिती व्यापक प्रमाणात आहे तसेच सन १९९४ पासून मागितलेली आहे त्यामुळे सर्व नस्त्यांचे निरीक्षण करावे व आवश्यक त्या कागदपत्रांचे प्रति पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलबध करुन घ्यावी. परंतु अपिलकर्ता यांनी दि.१८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.

५. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.११.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्त्यास मुळ अर्जात मागितलेली व इमारत व कारखाने विभागात कागदपत्र स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्त्याने विहित शुल्क भरल्यावर १५ दिवसांचे आत देण्यात यावी, असा निर्णय दिलेला असून सुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

६. अपिलकर्ता गैरहजर, उत्तरवादी हजर. जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्याने अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१.अपील क्र.६७३२/०२ व ६७३३ ही निकाली काढण्यांत येतात.**

**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत दयावी.** **Sd--**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०७.०६.२०११**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी क्र.१२२१/क्र.अपील क्र.६७३५/०२**

**श्री.अशोक जेटीया,**
**सचिव, विकास व्हॅली को.ऑप.हौसिंग सोसा.,**
**१, अर्केडिआ, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१.** **... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी**
**लोणावळा नगरपरिषद,**
**तालुका-मावळ,**
**जि.पुणे ४१० ४०१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.नगररचनाकार**
**लोणावळा नगरपरिषद,**
**तालुका-मावळ,**
**जि.पुणे ४१० ४०१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०३.०१.२०११**

**सुनावणीचा दिनांक ०७.०६.२०११**

**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१३.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, लोणवळा म्युनिसिपल कॉन्सिल यांचेकडे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पुढील याचिका क्र.५७९२ of २००७ मधील आदेशाप्रमाणे लोनावळा म्युनिसिपल कॉन्सीलने दि.२३.०५.२००८ रोजी श्री.एम.एल.गुप्ता, विकास डेव्हलोपर यांना दिलेल्या पत्राप्रमाणे मुद्या क्र.A, B, C च्या संदर्भामध्ये काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती

मागितलेली दिसून येते.  सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की, सदर बाब ही विकास व्हॉली हौसींग सोसायटीच्या संदर्भात असून त्याबाबतची माहिती नगरपरिषदेच्या अभिलेखात नाही, तसेच या संदर्भातील माहिती ही माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे अंतर्गत येत नाही.  त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२९.१०.२०१० प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०९.१२.२०१० रोजी देण्यात आला असून संबंधित माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीची फेर तपासणी करुन त्यात उपलब्ध माहिती अपिलकर्त्यास ८ दिवसांच्या आत पुरवावी.  तसेच मा.मुख्यधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे सदर प्रकरणी काय कार्यवाही केली असल्यास त्याबाबतची माहिती देण्यात यावी.  तसेच सदरच्या कामामध्ये इमारत निरीक्षक तथा सहा.माहिती अधिकारी यांनी त्यांच्या संबंधिची माहिती अपिलकर्त्यास संबंधिची कागदपत्रे १ आठवडयाच्या आत पुरविण्याचे व्यवस्था करावी असे आदेश दिलेले दिसून येतात.

सदरच्या आदेशाच्या अनुषगाने दि.१६.१२.२०१० रोजी सहा.माहिती अधिकारी यांनी तत्कालीन मुख्यधिकारी यांनी दि.२३.०५.२००८ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे झालेल्या कार्यवाही बाबत माहिती नगरपरिषदेचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही व त्याबाबत पुढे कोणताही पत्र व्यवहार झालेला नसल्याने माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते.  तसेच दि.१८.१२.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध नाही असेच कळविलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नगरपरिषदेने पत्र लिहिले परंतु पुढील कोणतीही कार्यवाही केलेली नाही.  त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता जी माहिती अपेक्षित करित आहे त्या संदर्भातील जी ओपन स्पेस़ आहे ती सोसायटीच्या परिसरा अंतर्गत आहे व त्यामुळे विकासकांना पत्र देण्यापलिकडे नगरपरिषद कोणत्याही प्रकारची कार्यवाही ही विकासकाच्या विरुध्द करु शकत नाही व त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे नगरपरिषदेने दि.२३.०५.२००८ रोजी विकासक यांना पत्र दिलेले आहे.  परंतु विकासकाच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येत नसल्याने कार्यवाही झाली नाही व अपिलकर्ता हे विकासका विरुध्द कार्यवाहीची अपेक्षा करित आहे.  जी बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नाही व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी

सुध्दा माहिती उपलब्ध नाही व प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा कार्यवाही बाबतची माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अभिलेख्यामध्ये असलेली माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. तरी सुध्दा अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या दि.१३.०९.२०१० च्या अर्जामध्ये A,B,C असे जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबत मुद्येनिहाय कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश व्हावेत.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये कार्यवाही करण्याचे आदेश देता येत नाही किंवा गुणवत्तेच्या बाबत निर्णय सुध्दा देता येत नाही. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज च्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. सार्वजनिक प्राधिकरणाने कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. परंतु अपिलकर्ता यांची विनंती अंशत: मान्य करुन अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांची विनंती मान्य करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.१०.२०१० रोजी दिलेल्या उत्तराप्रमाणे मुद्येनिहाय उत्तर उपलब्ध करुन द्यावे.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/नोंदणी.क्र.१२२१/अपील क्र.६७३४/०२**

**श्री.चंद्रकांत बाबुराव पुजारी**
**४ अे/३०५, श्री.गुरुदत्त को.ऑ.हौ.सो.लि.,**
**देवरत्न नगर, सायन-चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार**
**तालुका दक्षिण सोलापूर,**
**जि.सोलापूर. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार**
**तालुका दक्षिण सोलापूर,**
**जि.सोलापूर.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १२.०१.२०११**
**सुनावणीचा दिनांक ०७.०६.२०११**
**अपिलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी गैरहजर, निवडणूक नायब तहसिलदार उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.३०.०९.२०१० रोजी जावक क्र. पुरवठा/कावीएसआर-६४, दि.०८.१०.२००९ चे पत्र युपीसी व्दारे कोणाच्या नावे, कोणत्या पत्यावर व कोणत्या पोष्टात टाकण्यात आले व याबद्दलची माहिती दि.०८.१०.२००९ ते दि.३१.१०.२००९ या कालावधीतील मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी त्याच दिवशी दि.३०.०९.२०१० रोजी अपिलीय प्राधिकारी यांचेकडे अर्ज

दाखल केला. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, पूर्वी दि.१६.०१.२०१० रोजी सदरच्या प्रकरणाच्या संदर्भात राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांचेकडे व्दितीय अपीलावर निर्णय झाला आहे व त्यामध्ये अपिलकर्त्यास केलेल्या पत्र व्यवहाराबाबत मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांनी जावक बारनिशीची एक प्रत सादर करावी असे आदेश दिले होते. त्याप्रमाणे दि.२७.०४.२०१० रोजी आयोगास सादर करण्यात आले व त्यात अपिलकर्ता यांना देउ केलेली माहिती घेतलेली नाही असे म्हटलेले आहे व त्यामुळे यांनी नायब तहसिलदार यांनी कोणत्या पत्रानुसार माहिती देउ केली ती माहिती आता मागितलेली आहे.

जन माहिती अधिकारी हया उपस्थित झालेल्या आहे परंतु त्यांना निवासी नायब तहसिलदार यांचा अतिरिक्त भार दिलेला असल्याने व त्या पुण्याला कार्यालयीन कामकाजासाठी आलेल्या असल्याने त्यांना संबंधित अर्जाच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती तपासता आलेली नाही असे त्यांना आयोगापुढे सांगितले. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.३०.०९.२०१० रोजी दिलेल्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अभिलेख्याची तसेच जावक बारनिशीची तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार यांनी अपिलकर्ता यांच्या दि.३०.०९.२०१० च्या अर्जात मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास / नसल्यास त्याप्रमाणे स्पष्टपणे कळविण्यात यावे.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**
**सचिव/कक्ष अधिकारी**

राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०४३०/अपील क्र.६७२८/०२
मुमाआ.नो.क्र.५०४३१/अपील क्र.६७२९/०२

श्री. भरत गुर्जर
७ गझदर स्ट्रीट,
श्रीजी भवन, जे.एस.एस.रोड,
मुंबई ४०० ००२. ... अपिलार्थी

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी,
महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट,
१५, वा मजला, पर्यावरण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट,
१५, वा मजला, पर्यावरण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता (झोन-२)
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
रजनी महाल, ८९/९५, ताडदेव रोड,
ताडदेव, मुंबई ४०० ०३४. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (डी-१ डिव्ही)
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,

**रजनी महाल, ८९/९५, ताडदेव रोड,**
**ताडदेव, मुंबई ४०० ०३४.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलांचा दिनांक (नोंदणीचा दिनांक ०१.१२.२०१०) निरंक**
**सुनावणीचा दिनांक ०७.०६.२०११**
**अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी उपस्थित.**
**अपील क्र.६७२८ चे प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित,**
**अपील क्र.६७२९ चे प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

वरील दोन्ही अपीलांच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता गैरहजर आहे परंतु अपिलकर्ता यांनीच अपील क्र.६७२८/०२ मध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध झाली आहे असे लेखी दिलेले आहे. तसेच अपील क्र.६७२९/०२ मध्ये सुध्दा प्रथम अपीलाच्या सुनावणीतच पुनर्विकासाच्या संदर्भातील आवश्यकती माहिती उपलब्ध झाली आहे असे लेखी दिले असल्यामुळे व अर्जदाराची त्यावर सही असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही निकाली काढण्यास पात्र आहेत.

**<u>आदेश</u>**

**१.अपिलकर्ता यांची दोन्ही अपीले निकाली काढण्यांत येतात.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०४०२/अपील क्र.६७२६/०२

**श्री.यतीन एन.शहा**
**नवीन नगर १, टँक लेन,**
**अकबरअलीच्यामागे, म्युन्सिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०५४.** ... अपिलार्थी

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.मनपा आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (पश्चिम उपनगरे)**
**मालमत्ता विभाग, बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक (नोंदणी दि.३०.११.२०१०)**

**सुनावणीचा दिनांक ०८.०६.२०११**

**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.निरंक (विभागात प्राप्त १२.०१.२०१०) रोजी जन माहिती अधिकारी, इस्ट्रेट विभाग एच / वेस्ट वार्ड, बांद्रा (प) यांचेकडे खोतवाडी टीपीएस-६, फायनल प्लॉट १०६, सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०५४ This land included 47 flats in on BMC had made surrey in year 1975, in the year 1985 therefore have meaning structure etc अशी माहिती एकूण ५ मुद्यांमध्ये मागितलेली

दिसून येते.  सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२७.०१.२०१० रोजी माहिती ही इस्ट्रेट विभागाकडे उपलब्ध नसून कॉलनी अधिकारी एच/वेस्ट वार्ड याचेकडे उपलब्ध असते व त्यामुळे अर्ज हा कॉलनी अधिकारी एच/वेस्ट यांचेकडे हस्तांतर केलेला आहे असे त्यांना कळविलेले दिसून येते.  असे असुन सुध्दा अपिलकर्ता यांनी दि.०२.०३.२०१० रोजी प्रथम अपील हे पुन्हा इस्टेट विभागाकडेच दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कार्यालय अधिक्षक, एच/वेस्ट यांनी सुनावणीस हजर रहावे असे कळविलेले दिसून येते.  परंतु निर्णय झालेला दिसून येत नाही व अपिलकर्ता यांनी मात्र प्रथम अपील हे इस्ट्रेट विभागाच्या अधिका-यांच्या विरुध्द दाखल केलेले दिसून येते व त्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून इस्ट्रेट विभागाच्या अधिका-यांनाच नोटीस काढण्यात आली आहे.  परंतु माहिती ज्या कॉलनी अधिकारी यांचेकडे आहे त्यांचे विरुध्द व्दितीय अपील मेमोमध्ये कोणताही संदर्भ दिला नसल्यामुळे त्यांना नोटीस काढण्यांत आलेली नाही व इस्ट्रेट विभागाच्या अधिका-यांनी अर्ज हा कॉलनी अधिका-यांकडे हस्तांतरीत केला आहे असे आयोगापुढे सांगितले.

२. अपिलकर्ता यांची आज आयोगापुढे एकूण ७ अपीले आहेत.  सात ही अपीलांमध्ये अपिलकर्ता यांनी माहितीच्या अर्जात प्रथम मेमोवर तसेच व्दितीय अपील मेमोवर कोणतीही तारीख घालण्यात आलेली नाही.  वास्तविक अपिलकर्ता हे स्वत: ॲडव्होकेट म्हणुन संभोधतात व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा मुळ गाभा हा प्रत्येक प्रक्रियेस मुदत घातलेली असल्यामुळे तारीख घालणे हे आवश्यक असताना ती न घालणे ही बाब अनाकलनीय आहे.  अपिलकर्ता हे वकील असल्याने माहिती ज्या विभागात किंवा शाखेत आहे त्यांचेकडे मागणे व त्यांचेकडे नसल्यास विभागाने हस्तांतर केलेल्या शाखेकडून किंवा विभागाकडून उपलब्ध करून घेणे किंवा हस्तांतरीत शाखेच्या जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे संपर्क साधणे व त्यांनाच व्दितीय अपीलात पक्षकार करणे आवश्यक असते.  हे माहिती नसने हे सुध्दा अनाकलनीय आहे व त्यामुळे आज मालमत्ता विभागाच्या अधिका-यांनी त्यांचेकडील अर्ज हस्तांतरीत केले आहे या शिवाय कोणतीही माहिती ते देउ शकले नाही व अपिलकर्ता सुध्दा गैरहजर असल्यामुळे व कोणत्याही प्रकारची निवेदन किंवा टिप्पणी सादर न केल्याने सदरचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी. **Sd--**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**दिनांक ०८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०४००/अपील क्र.६७२५/०२**

**श्री. श्री.यतीन एन.शहा**
**नवीन नगर १, टँक लेन,**
**अकबरअलीच्यामागे, म्युन्सिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०५४** **... अपिलार्थी**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.मनपा आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा परिरक्षण विभाग**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक निरंक**
**सुनावणीचा दिनांक ०८.०६.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.निरंक (कार्यालयात प्राप्त ०५.०१.२०१०) रोजी जन माहिती अधिकारी, देखभाल दुरुस्ती, वेस्ट वार्ड यांचेकडे दि.११.०७.२००७ रोजी अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये लिओ एन्थोनी हाउस च्या संदर्भामध्ये तक्रार केली होती त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही केली अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार

यांच्या चार तक्रारींची कार्यवाहीची माहिती उपलब्ध झालेली नाही व तक्रारी सुध्दा आढळून येत नाही असे अर्जदाराचे प्रतिनिधी शशांक रॉय यांना अवगत केले होते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी दि.निरंक (११.०२.२०१०) रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१८.०३.२०१० रोजी देण्यात आला असून देखभाल दुरुस्ती विभागाने कागदपत्रांची तपासणी करावी व माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे दि.०५.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या चार ही तक्रारी या तपासणी अंती सुध्दा आढळून आलेल्या नाहीत. वैगरे त्यांना उत्तर दिलेले दिसून येते व त्याबददलचा अहवाल सुध्दा सादर केलेला दिसून येतो व त्यांना अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५९५/अपील क्र.६६४९/०२**

**श्री.अलनासिर अब्दुल्ला काझी**
**१०८२, उद्यमनगर, रत्नागिरी,**
**ता.जि.रत्नागिरी ४१५ ६३९.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी**
**रत्नागिरी विभाग, जि.रत्नागिरी.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी**
**रत्नागिरी विभाग, जि.रत्नागिरी.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०९.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ०८.०६.२०११**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, महसूल यांचेकडे रत्नागिरी महसूल उपविभागामध्ये समाविष्ट असलेल्या रत्नागिरी लांझा व राजापूर तालुक्यातील जातीच्या दाखल्याचे अर्ज प्रकरणी संबंधि मा.उप विभागीय अधिकारी, महसूल विभागाकडे येतात. त्यातील मुस्लीम दर्जी व इतर दाखल्याची तपासणी चालू आहे कळविण्यात आले आहे. त्या संदर्भात व मुस्लीम समाजातील इतर मागास प्रवर्ग समाज घटकांच्या संदर्भात सन २००१ ते माहे ऑगस्ट २००९ पर्यंत जातीचे दाखले देण्यात

आलेले असल्यास त्याबद्दलची संपूर्ण माहिती तीन मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषगाने दि.२२.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार यांनी मागितलेल्या कालावधीत दाखल्यांची संख्या हजारोमध्ये असल्याने व सदरच्या दाखल्याची संचिका दि.०२.०८.२०१० रोजी पाहण्यासाठी उपलब्ध करुन ठेवण्यात आलेल्या असल्यामुळे मुद्या क्र.२ व ३ ची माहिती अधिकृत संकतेस्थळावर उपलब्ध असल्यामुळे तसेच उपलब्ध स्थायी आदेश संचिकेमधून आपणास आवश्यक असलेले शासन निर्णय व परिपत्रके उपलब्ध करण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दि.३०.०१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकर्ता यांना पुन्हा दि.१३.०८.२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये एकूण रु.१७, १७०/- एवढी रक्कम खर्चाचा भरणा करावा या कारणास्तव पत्र दिलेले दिसून येते. तसेच दि.१७.०८.२०१० रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुध्दा खर्चाचा भरणा करावा म्हणुन निर्णय दिलेला दिसून येतो. मात्र अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता यांनी अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही असे कळवून आयोगाकडे लेखी खुलासा पाठविलेला आहे व त्यामध्ये वस्तुस्थिती दिलेली आहे परंतु सदरच्या रक्कमेची मागणी केलेली आहे त्यासंदर्भामध्ये न्याय मिळावा असे निवेदन केलेले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता हे दररोज तहसिल कचेरीत येतात. त्यांना माहितीचे निरिक्षण करा सांगितले तरी ते निरीक्षण करित नाही, खर्चाचा भरणा करावा तरी खर्चाचा भरणा करत नाही. मागितलेली माहिती ही २००१ पासून असल्यामुळे विस्तृत प्रमाणात ही माहिती आहे. त्यामुळे एकतर त्यांनी संपूर्ण अभिलेख्याचे निरीक्ष्ंण करावे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या किंवा अंदाजे ७ ते ८ हजार पृष्ठांच्या करिता प्रती पृष्ट रु.२/- प्रमाणे रु.१७१७०/- तरी भरावे. परंतु ते कोणताही पर्याय स्विकारत नाहीत व मधुन मधुन मागितलेल्या माहितीचे काय झाले असे मात्र विचारत असतात.

४. अपिलकर्ता यांनी मुस्लीम (गवळी) अशा जातीच्या दाखल्याची मागणी केली होती. परंतु तशा प्रकारे दाखला दिला गेला किंवा नाही तसेच नियमाने देता येतो किंवा नाही याबद्दल ही काहीही माहिती नसल्यामुळे त्यांनी मुस्लीम समाजातील इतर मागास प्रवर्ग समाज घटकांच्याकरिता दिलेल्या दाखल्यांची माहिती मागितलेली आहे. त्यात कोणतेही सार्वजनिक व्यापक हित नाही तर वैयक्तिक हितासाठी कार्यालयास वेठीस धरण्याचा प्रकार दिसतो.

५. वरील युक्तीवाद विचारात घेता व अपिलकर्ता यांनी त्यांच्या निवेदनात किंवा व्दितीय अपील मेमोमध्ये कोणतेही संयुक्तीक स्पष्टीकरण दिलेले नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०४०६/अपील क्र.६७२७/०२**

**श्री. यतीन एन.शहा**
**नवीन नगर १, टँक लेन,**
**अकबरअलीच्यामागे, म्युन्सिपल शाळेपुढे,**
**सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०५४** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.मनपा आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (जल विभाग)**
**बृहन्मुंबई महानगरपलिका, एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक (नोंदणीचा दि.३०.११.२०१०) निरंक**
**सुनावणीचा दिनांक ०८.०६.२०११**
**जन माहिती अधिकारी यांच्यावतीने श्री.शुक्ला, दुय्यम अभियंता उपस्थित,**
**अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.निरंक (०५.०१.२०१०) रोजी जन माहिती अधिकारी तथा जल विभाग यांचकडे जल जोडणीच्या संदर्भामध्ये खोतवाडी, सांताक्रुझ (प) १९६० पासून संपूर्ण झोपडपट्टी परिसरात किती जोडण्या दिल्या तशी तपशिलात माहिती वर्ष निहाय उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती शिघ्र टपालाने मागितलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध न झाल्याने त्यांनी दि.निरंक (११.०२.२०१०) रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर असून त्यांचेवतीने श्री.शुक्ला, दुय्यम अभियंता उपस्थित आहे. परंतु श्री.शुक्ला यांना कार्यालयीन कामकाज पध्दतीची काही माहिती आहे असे दिसून येत नाही. परंतु त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०१.२०१० रोजी अपिलकर्ता यांना दिलेल्या पत्राची प्रत दाखल केलेली आहे. जी वकील असून सुध्दा अपिलकर्ता यांनी व्दितीय अपीलाच्या मेमोसोबत दाखल केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी जो परिसर दिलेला आहे तो आढळून येत नाही वैगरे असे उत्तर दिलेले दिसून येते. यावरून जन माहिती अधिकारी यांना सुध्दा कामकाजाची काही माहिती आहे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी तर निर्णयच दिलेला दिसून येत नाही. परंतु प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी निरीक्षण करण्यास परवानगी दिली आहे व श्री.शशांक शॉय हे निरीक्षण करण्यात येणार आहे असे चार ओळीमध्ये नोटीसीच्या उलट बाजूस लिहिण्यात आलेले दिसून येते. यावरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूणच कामकाजाची कार्यपध्दती किती भोंगळ आहे हे दिसून येते व ही बाब आयुक्त महानगरपालिका यांचे निदर्शनास आणणे आवश्यक आहे.

३. असे असले तरी अपिलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात जी माहिती मागितलेली आहे त्यात कोणत्याही निश्चित कागदपत्रांचे वर्णन केलेले नाही. तर मोघम अशी माहिती १९६० पासून मागितलेली दिसून येते. एखादया झोपडपट्टी परिसरामध्ये ५० वर्षामध्ये दरवर्षी किती जल जोडण्या दिल्या जातात किंवा त्या तोडल्या जातात वगैरेची माहिती मागणे म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचा गैरवापर आहे किंवा संबंधित विभागास विनाकारण वेठीस धरणे आहे असा काढावयास हरकत नाही व तसेही अपिलकर्ता स्वत: वकील असूनही अर्ज व अपील यांचेवर तारीख नमूद करित नाही व कोणत्याही कार्यालयात किंवा प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे किंवा व्दितीय अपीलात सुनावणीस किंवा माहिती घेण्यास व्यक्तीश: हजर राहत नाही व कोणी तरी एखादा शशांक रॉय हे त्या कामासाठी ते

नियुक्त करतात व अशा प्रकारे अनेक अर्ज अनेक विभागात करतात यावरुन ते स्वत: माहिती उपलब्ध करुन घेण्यास गंभीर आहे असे दिसून येत नाही व त्यांचे आयोगापुढील अनेक अपीलाच्या माध्यमातुन असे दिसून येते की, त्यांचे मागण्याचे कार्यपध्दतीत सार्वजनिक व्यापक हित आहे असे ही दिसून येत नाही. अशा अर्जदारांमुळे अनेक कार्यालयातील माहिती अधिकारी यांना त्यांचे दैनंदिन कामकाज करणे सुध्दा दुरापस्त झालेले आहे. तसेच जे खरोखर व्यापक सार्वजनिक जनहितासाठी प्रामाणिकपणे माहिती मागतात त्यांना मुदतीमध्ये किंवा योग्य वेळी माहिती ही उपलब्ध होउ शकत नाही व त्यांची अपीले सुध्दा लवकरात लवकर निकाली काढता येत नाहीत व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२. सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त महानगरपालिका यांना स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.**
**३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ०८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७१४/अपील क्र. ६७६०/०२**

**श्री.अजितकुमार पंजाबी**
**७७, महाराष्ट्र नगर नं.१,**
**स्लॅटर हाउस बस डेपोच्या बाजूला,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१.** **... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.पालिका आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**१ ला मजला, सेंट मार्टिन्स रोड,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**१ ला मजला, सेंट मार्टिन्स रोड,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १६.०६.२०११**
**अपिलकर्ता हजर, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.०३.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी एच / पश्चिम, महानगरपालिका (वसाहत) हिल रोड, बांद्रा (प), मुंबई यांचेकडे १९९५ पासून ते आज पर्यंत महाराष्ट्र नगर जुना स्लॉटर हॉउस कंम्पाउड बस डेपो जवळील झोपडपट्टीचे संपूर्ण फोटोपास तपासण्यात द्यावी, तपासणीचे पैसे

भरण्यास तयार आहे, माहिती टपाला व्दारे घेणार असे नमूद केले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार यांनी दि.०८०९.२०१० रोजी महाराष्ट्र नगर, स्लॉटर हॉउस येथील महानगरपालिकेच्या जागेवरील झोपडपटटी धारकास पात्रतेसापेक्ष ओळखपत्र देण्यात आली असून, त्या संबंधीचा अभिलेख या कार्यालयात उपलब्ध असून माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गतचे आकार भरल्यानंतर आपणास तपासण्यास देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपिलकर्ता यांनी दि.०६.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही त्यामुळे अपिलकर्ता यांनी व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता हजर असून युक्तीवाद करताना असे सांगितले की, ते ब-याच वेळा जन माहिती अधिकारी यांचेकडे शुल्क भरण्यास गेले होते. त्यांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य दिले नसल्याने शुल्क कोठे व किती भरावे याबद्दलची माहिती सुध्दा दिली नसल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. पंरतु प्रथम अपीलाचा निर्णय दिला नसल्याने त्यांना आयोगापुढे व्दितीय अपील दाखल करावे लागले आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे गैरहजर आहे व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे आयोगाकडे दाखल केली नाही किंवा गैरहजर राहण्याबद्दल व मुदती दाखल अर्ज दिला नाही. राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि.३०.०५.२०११ रोजी नोटीस निर्गमित करण्यात आली आहे. तिच नोटीस अपिलकर्ता यांना मिळते परंतु जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.पालिका आयुक्त यांना ती उपलब्ध होत नाही, हे अनाकलनीय आहे. यावरुन जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीच्या अमंलबजावणी बद्दल अनास्था दाखवणारे अधिकारी दिसून येतात. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये विना मुल्य तपासणी द्यावी. त्याकरिता**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कामकाजाच्या दिवसाची तारिख व वेळ लेखी कळवावी व त्यावेळेस उपस्थित राहून तपासणी करावी.

२. जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी (प्र), एच/पश्चिम हे आयोगाकडे आज हजर नसल्याने व कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केली नसल्याने त्यांचे विरूध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या शिफारस करण्यात येते.

३.प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुध्दा आयोगाच्या नोटीसची कोणतीही दखल घेतली नसल्याने व कागदपत्रे दाखल केली नसल्याने त्यांचे विरुध्द सुध्दा प्रशासकीय कार्यवाही करावी.
४. सदरच्या निर्णयाची स्वतंत्र एक प्रत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पाठविण्यात यावी.
५.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.

**Sd--**
(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १६.०६.२०११
मुंबई
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७१५/अपील क्र. ६७६१ /०२**

**श्री.अजितकुमार पंजाबी**
**७७, महाराष्ट्र नगर नं.१,**
**स्लॅटर हाउस बस डेपोच्या बाजूला,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.पालिका आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**१ ला मजला, सेंट मार्टिन्स रोड,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**१ ला मजला, सेंट मार्टिन्स रोड,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १६.०६.२०११**
**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.२७.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, एच/पश्चिम, हिल रोड, बांद्रा (प), मुंबई यांचेकडे वसाहत विभागात कार्यकारी अधिकारी श्री.मावळणकर या विभागात केव्हा रुजु झाले व त्यांच्या सेवेच्या संदर्भात संपूर्ण माहिती टपाला व्दारे घेणार अशी मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.२१.०९.२०१० रोजी कॉलनी विभागात काम करणारे अधिकारी श्री.ह.बा.मावळणकर हे

दि.२०.११.२००९ पासून एच/पश्चिम विभागात रुजु झाले आहेत. सदर कर्मचारी अधिकारी सेवेमध्ये केव्हा रुजु झाले, त्यांना पदोन्नती कशा प्रकारे मिळाली वगैरे बाबतची माहिती, त्यांचा सेवाभिलेख या कार्यालयात नसल्याने देता येणार नाही, विचारलेली अन्य माहिती या कार्यालयाशी संबंधित नसल्याने ती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांना दि.०६.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा संबंधित जन माहिती अधिकारी / कार्यालयीन अधिक्षक, एच/पश्चिम यांनी अपिलकाराचा अर्ज संबंधित खात्याकडे अग्रेषित करावा व अपिकारास सुधारित उत्तर द्यावे. त्याप्रमाणे दि.०३.१२.२०१० रोजी अपिलकर्ता यांना श्री.मावळणकर सेवेमध्ये कधी रुजु झाले त्याना पदोन्नती कशा प्रकारे मिळाली आणि ते महापालिका निवास स्थानात राहतात किंवा नाही याबाबतचे अभिप्राय त्यांच्या सेवा अभिलेखावरुन देण्यासाठी आपला अर्ज कार्यालय अधिक्षक, सार्वजनिक आरोग्य खाते, एफ/दक्षिण विभाग यांचेकडे पाठविण्यात आला आहे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे. त्यांनतर दि.२९.१२.२०१० रोजी प्रशासकीय अधिकारी, आस्थापना, सार्वजनिक आरोग्य खाते यांनी श्री.मावळणकर यांच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध करुन दिली ती अपिलकर्ता यांना दि.१८.०१.२०११ रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

२.अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मागितलेली माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिली आहे त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरची माहिती ही त्यांचे कार्यालयात उपलब्ध नव्हती, परंतु जन माहिती अधिकारी यांनीच ती त्यांच्याच कार्यालयात उपलब्ध नव्हती तर अधिनियमाचे कलम ६(३) प्रमाणे संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर करणे आवश्यक होते. त्याकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशाची वाट पाहण्यात काहीही कारण नव्हते. त्यामुळे आयुक्त महानगरपालिका यांनी महानगरपालिकेच्या अधिका-यांना माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीची ओळख करुन देणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते. परंतु माहिती उपलब्ध केली असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**२.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना स्वतंत्रपणे निर्णयाची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.**

**३.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.** **Sd-**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १६.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७१९/अपील क्र.६७६२/०२**

**श्री.भूषण भगवानदास घोडी (पटेल)**
**भगवानदास हाउस, सी-१६, चिंचोली बंदर रोड,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण,**
**कनेरी पोलीस स्टेशनच्या बाजूला,**
**एच.डी.आय.एल. बिल्डींगच्या मागे,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-२**
**झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण,**
**कनेरी पोलीस स्टेशनच्या बाजूला,**
**एच.डी.आय.एल. बिल्डींगच्या मागे,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २९.११.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १६.०६.२०११**

**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.२५.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, कनेरी पोलीस स्टेशनच्या बाजूला, एच.डी.आय.एल. बिल्डींगच्या मागे, गृहनिर्माण भवन,

बांद्रा यांचेकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या आधारे नर्मदा नगर, चिंचोली बंदर रोड, मालाड (प) बिल्डींग क्र.१३., १४, १५, १६ व १७ मध्ये फ्लॅट धारकाची नावा बरोबर यादी व सदर फ्लॅट झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे देण्यात आले आहे की नाही त्यांचे उत्तर या फ्लॅट धारकांना कोणाच्या समंतीने राहण्यास फ्लॅट देण्यात आले अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१९.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२.अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली ती त्यांच्या जागेसंबंधात आहे परंतु अद्याप सुध्दा जन माहिती अधिका-यांनी पत्र व्यवहार केला नाही, पूर्वी सुध्दा ही माहिती मागितली होती परंतु त्याही वेळेस माहिती दिली नाही.

३.त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांचा अर्ज हा दि.०१.०९.२०१० रोजी प्राप्त झाल्यानंतर दि.०५.१०.२०१० रोजीच्या पत्रान्वये कार्यालयात सदर धारिकेचे निरीक्षण करुन उपलब्ध माहिती चलनाने शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र अर्जदार यांनी या कार्यालयात संपर्क साधला नाही. तसेच अर्जदार यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या अपीलाच्या संबंधात अर्जदार हजर न राहिल्याने दि.३१.१२.२०१० रोजी अर्जदार यांना नियमानुसार शुल्क भरुन माहिती घेउन जाण्यास आदेश दिले आहेत. परंतु मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असून अर्जदार यांनी माहिती प्राप्त करुन घेतली नाही असे आयोगापुढे खुलासा दाखल केला आहे व तोंडी युक्तीवादात सुध्दा सांगितले, परंतु प्रत्यक्षात यांनी अर्जदारास पत्रे पाठविलेली होती किंवा नाही त्याबद्दली छायांकित प्रती किंवा पाठविल्याचा पुरावा आयोगापुढे सादर केलेला नाही. तसेच आयोगाने जावक नोंद वहीमध्ये नोंद आहे का याबद्दल पुरावा मागितला असता जावक वहीची बनावट प्रत तयार करुन त्यांची छायांकित प्रत आयोगाचे निर्दशास आणली ती अधिकृत जावक नोंद वहीची छायांकित प्रत असल्यांचा कोणताही पुरावा नाही तसेच अपिलकर्ता यांना पाठविलेल्या पत्रांच्या स्वरुपात त्यांचे नावापुढे कोणतीही नोंद नाही किंवा टिपण नाही व त्यावरुनच ती बनावट छायांकित प्रत आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे.

४.जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध आहे व ती पुरविण्यास तयार आहे असे आयोगास सांगितले मात्र माहितीचे कागदपत्रे १० ते १५ पृष्ठ आहे असे सांगितले. असे असल्यास नस्तीचे निरीक्षण करुन घेउन जाणे पृष्ठ संख्या न देता प्रती पृष्ठ रू.२/- भरणे असे मोघम कळविले असल्याने अधिनियम कलम ७(३) चे उल्लघन करणे असे आहे. त्यावरुन अपिलकर्ता यांना माहिती देण्याची टाळाटाळ झाली आहे व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे विरूध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही शिफारस करणे आवश्यक झाले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी सुध्दा प्रथम अपीलाचे निर्णय देत नाही किंवा कागदपत्रे सादर करत नाही व त्यांना सुध्दा समज देणे आवश्यक आहे. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत माहिती व्यक्तीशः किंवा पोस्टाने विना मुल्य देण्यात यावी.**

**२. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली असल्याने त्यांचे विरूध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तंभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.**

**३. सदरच्या निर्णयाची एक प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी मुख्याधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, तळ मजला प्रशासकीय इमारत एच.डी.आय.एच. मागे, अनंत कानेकर मार्ग, बांद्रा (पू) यांचेकडे स्वतंत्र पाठविण्यात यावी.**

**४.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १६.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०७२०/अपील क्र.६७६३/०२

**श्री.सलीम एस.शेख**
**४०३, ब्लोसम को.हौ.सो,**
**प्लॉट नं.११, सेक्टर-३,**
**घनसोली, नवी मुंबई ४०० ७०१.** ... अपिलार्थी

विरुध्द

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

## निर्णय

**व्दितीय अपीलाचा दिनांक २५.११.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १६.०६.२०११**

**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.१७.०५.२०१० जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक यांचेकडे मच्छीमार नगर, माहिम कोळी सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं.५, सीटीएस नं.१५०५, स्वामी विवेकानंद गार्डन जवळ, माहिम कॉजवे रोड च्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी बंध पत्र दाखल केलेले आहेत काय असल्यास प्रती देण्यात याव्यात. बंध पत्र नसल्यास काय कार्यवाही केली आणि बंध पत्रे दिले नसल्याने सदरची समिती ही अवैद्य ठरेल काय अशी विचारणा केलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१५.०७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले

दिसून येते.  प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२५.०८.२०१० रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो.  परंतु त्यांनतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी पुर्वी दि.२०.०४.२०१० रोजी बंध पत्राची माहिती मागितलेली होती.  परंतु त्यांना बंध पत्रे आढळून येत नाहीत असे कळविले असल्याने त्यांनी पुन्हा दि.१७.०५.२०१० रोजीचा माहितीचा अर्ज सादर केलेला आहे.  त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयेगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.०३.०५.२०१० रोजी विहित मुदती उत्तर दिले आहे. मात्र दि.१७.०७.२०१० रोजीच्या अर्जात त्यांनी तीच माहिती मागितलेली होती म्हणून सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि.११.०६.२०१० रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली होती व त्यानंतर ही प्रथम अपीलांतील आदेशाप्रमाणे दि.०६.०९.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, ती त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली.  यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सुध्दा ते माहितीचे पत्र मिळालेले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले आहे.  मात्र त्यांचे युक्तीवादावरुन त्यांना कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते.  परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या दोन्ही अर्जांच्या प्रमाणे व प्रथम अपिलाच्या आदेशा प्रमाणे माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिली असल्याने सदरचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १६.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७३३/अपील क्र.६७७०/०२**

**श्री.राकेशकुमार रोशन लाल जी सुराणा**
**प्लॉट नं.१६/T/५ रोड नं.१०,**
**बैंगनवाडी, गोवंडी, मुंबई ४०० ०४३. ... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-६),**
**४ था माळा, प्रशासकीय इमारत,**
**आर.सी.मार्ग, चेंबूर (पू), मुंबई ४०० ०७१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
**(पूर्व प्रादेशिक विभाग)**
**पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-६),**
**४ था माळा, प्रशासकीय इमारत,**
**आर.सी.मार्ग, चेंबूर (पू), मुंबई ४०० ०७१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १७.०६.२०११**

**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.२१.०७.२०१० जन माहिती अधिकारी, पुर्व प्रादेशिक विभाग, सहा.आयुक्त पोलीस, चेंबूर यांचेकडे शिवाजी नगर पोलीस ठाणे की हद मे दि.१९.०९.२००९ को दि.२२.०९.२००९ के बाहरसे तपास करणे रिकवरी करणे, एवम गिर फतार करणे कोण-कोणसी पोलीस पथक आऐ और उन्होंने

कोणसी कार्यवाही की और पोलीस स्टेशन मे जो डायरी बनाई एवम जीन लोगो को सहायता के लिऐ भेजा उनकी झेरॉक्स माहिती मिलने हेतू प्रार्थना या संदर्भामध्ये त्यांनी एकूण ४ मुद्यांमध्ये तपशिलात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने शासकीय माहिती अधिकारी व सहा.पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर आपण केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजी नगर पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून अहवाल या कार्यालयात प्राप्त झाला शिवाजी नगर पोलीस ठाणे सन २००९ या वर्षीच्या ठाणे दैनंदिनी तपासली असता माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर २००९ महिन्यातील ठाणे दैनंदिनी क्र.१६/२००९ ही मिळून येत नाही. त्यामुळे आपणास माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१८.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०९.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता हजर नसले तरी अपिलकर्ता यांना माहिती मिळणे आवश्यक आहे. अपिलकर्ता यांनी मागणी केलेली माहितीच्या अभिलेखावर परत शोध घेउन संबंधितांकडून प्राप्त करुन घेउन देय माहिती अपिलकर्त्यास देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त यांना आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतर ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांना युक्तीवाद करताना असे सांगितले की, कोणत्याही गुन्हयांचा तपास करण्याच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीस पोलीसांना अटक करता येत नाही. तसेच एका पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातून दुस-या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात किंवा एका न्यायालयातुन दुस-या न्यायालयात आरोपी स्थलांतर करताना किंवा गुन्हयाचा तपास करताना प्रत्येक वेळेस पोलीस स्टेशन मध्ये नोंद होणे आवश्यक असते. परंतु तशी नोंद केली आहे किंवा नाही याबाबतची पडताळणी करण्यासाठी सदरची माहिती मागितली आहे. कारण त्याना स्वत: लाच पोलीसांनी विना कारण अटक केली होती.

३. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, शिवाजी नगर पोलीस ठाणे यांचेकडे दोन वेळा तपास केला असता पोलीस डायरी आढळून येत नाही असेच त्यांना कळविलेले आहे. म्हणुन त्यांना अपिलकर्ता यांना तसे कळविलेले आहे.

४ पोलीस डायरी CRPC कलम १७२ प्रमाणे अतिशय महत्वाचे असे दस्तऐवज आहे व पोलीस तपासी अधिका-यांने वेळोवेळी तपासाच्या संदर्भातील नोंदी त्यात केल्या असतात व त्यामुळे त्याबददलची डायरी ही उपलब्ध होत नसल्यास त्या डायरीच्यामध्ये ज्या गुन्हयाच्या तपासाच्या नोंदी आहे. त्या गुन्हयाच्या मा.न्यायालयात चौकशीच्या वेळेस तपासी अधिका-यास आवश्यकता वाटल्यास आठवण ताजी करण्यासाठी उपलब्ध होउ शकणार नाही. परिणामी न्यायालयातील पुराव्यावर त्याबाबतचा परिणाम होउ शकतो व त्यामुळे पोलीस डायरी शोध घेउन ही आढळून येत नाही. असे अपिलकर्ता यांना कळविणे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करणेच होय व पोलीस ठाण्यामधील पोलीस डायरी जर गहाळ होत असेल, तर त्या पोलीस ठाण्याच्या प्रमुखाला जबाबदार ठरणे आवश्यक राहिल. त्याकरिता पुन्हा पोलीस डायरीचा कसुन तपास घेउन सदरची डायरी गहाळ होण्यासाठी जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्याचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्याकरिता मा.पोलीस आयुक्त यांनी संबंधित पोलीस डायरीच्या गहाळ होण्याच्याबाबत चौकशीचे आदेश देउन पोलीस डायरी उपलब्ध झाल्यास अपिलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल व पोलीस डायरी गहाळ झाल्याच्या कारणी जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील ते अधिकारी/कर्मचारी त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे संयुक्तीक राहिल. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेल्या पोलीस डायरीच्या गहाळ होण्याच्या संदर्भामध्ये चौकशी आदेश देउन गहाळ होण्यासाठी जबाबदार होणा-या अधिका-यां/कर्मचा-यांवरती जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी**

**२.चौकशी अंती पोलीस डायरी आढळून आल्यास अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२१.०७.२०१० रोजीच्या अर्जातील दि.१९.०९.२००९ सकाळी ८.०० ते दि.२२.०९.२००९ रात्री २४.०० वाजे पर्यंत घेतलेल्या नोंदीची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य रजिस्ट्रर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.**

**३. सदरची निर्णयाची एक पत्र मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीच्या आदेशांत करीता स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**४.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**

**(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

**दिनांक १७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७३२/अपील क्र.६७६९/०२**

**श्री.सुरेंद्र विष्णू मसूरकर**
**गायत्री भवन, रूम नं.७, १ ला मजला,**
**लिबर्टी गार्डन रोड नं.२, मालाड (प),**
**मुंबई ४०० ०६४.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**मिठानगर, म्युन्सिपल स्कुल बिल्डींग,**
**गोरेगांव (प), मुंबई.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**मिठानगर, म्युन्सिपल स्कुल बिल्डींग,**
**गोरेगांव (प), मुंबई.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०२.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १७.०६.२०११**
**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, मुख्य अभियंता (विकास आराखडा) यांचेकडे

7. What is the criteria for application of section 354 of the Mumbai Municipal Corporation Actor BMC Act, 354?
8. If building is in dilapidated, whether the Assistant Engineer of the concerned ward/department of the BMC can take notice of the same on his own? Or whether the said officers of BMC can take notice of the dilapidated condition of the structure if the same is brought to the notice of the said authority by the concerned tenants/landlords?
9. When the notice is issued under section 354 of the Mumbai Municipal Corporation Act or BMC Act 354 the notice is first issued to whom i.e. landlord/tenant? Or the said notice is pasted on the Building?
10. If such notice is issued by BMC to the landlord, what action is required to be taken on the same by the landlord? If no action is taken on such notice by the landlord, what action BMC can take against such landlord as per law?
11. What is the time limit available to the landlord as per law to take action on such notice?
12. If no repairs are undertaken by landlord even after issue of such notice, & if no action is taken by the concerned BMC officer/department on the said landlord, in such a situation, How & Where the tenant can lodge a complaint?

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही मुख्य अभियंता यांचे कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे सदरचा अर्ज दि.२५.०२.२०१० रोजी उप मुख्य अभियंता यांनी सहा.पालिका आयुक्त, पी/साउथ वार्ड यांचे कार्यालयात असल्यामुळे अर्ज त्या कार्यालयात हस्तांतर केलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१२.०३.२०१० रोजी सहाय्यक अभियंता, इमारत व कारखाने, पी/साउथ यांनी मागितलेली माहिती ही प्रश्नोत्तराच्या स्वरूपात असल्यामुळे देता येत नाही. तसेच माहिती ही कागदपत्राच्या स्वरूपात उपलब्ध करून देता येते असे सांगितले. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.०६.०४.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेली माहिती उचित शुल्क वसूल करुन ७ दिवसांत देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना खर्चाचा

भरणा करावा हे कळविण्यात आले.  अपिलकर्ता हे चलन तयार करून घेउन गेले परंतु अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता यांना युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात असली तरी ती उपलब्ध करून देणेची तरतुद अधिनियमात आहे त्यामुळे ती नाकारण्यात येत नाही.  त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांनी महानगरपालिका अधिनियम कलम ३५४ प्रमाणे जर कार्यवाही करावयाची झाल्यास त्याबद्दलच्या सर्व तरतूदी हया अधिनियमातच दिलेल्या आहेत व अधिनियम हा प्रसिध्द केलेला असून सर्वत्र उपलब्ध असतो त्यामुळे त्याबाबतची माहिती उपलब्ध करून देणे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही.  तरीही अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती प्रश्न विचारून जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले आहे.  परंतु जन माहिती अधिकारी हा कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत अभिप्राय देउ शकत नाही व तसेच अधिनियमात ही अपेक्षित नाही.  त्याकरीता त्यांनी अधिनियमाचे कलम २(च) अन्वये माहितीची व्याख्या केली आहे त्याकडे आयोगाचे लक्ष वेधले 'माहिती' याचा अर्थ कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्या असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, इ-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश इत्यादींचा समावेश होतो.  तसेच कलम २(ञ) प्रमाणे "माहितीचा अधिकार" या संज्ञेची व्याख्या दिली आहे व त्यामध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली व त्याच्या नियंत्रणात असलेली व अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार आहे व त्यामध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे.  दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे इत्यांदी अधिकाराचा समावेश होतो.

३. यावरुन कागदपत्रांच्या छायांकित प्रती घेणे म्हणजे कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य म्हणजे नस्तीमध्ये सदरच्या प्रकरणाबद्दल संबंधितांचे अभिप्राय घेण्यात आले असतील तर त्या अभिप्रायांच्या प्रती उपलब्ध करून घेणे असा आहे.

४. माहिती अधिकारी हा माहिती पुरविणारा अधिकारी आहे.  तो त्या प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील संबंधित असेलच असे नाही व त्यामुळे कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित नाही.  तसेच कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणात अनेक शाखा उप

शाखा असल्यास त्या त्या स्थरावर जन माहिती अधिकारी हे नियुक्त करण्याची तरतूद अधिनियमाचे कलम ५ (१) प्रमाणे केली असून अधिनियम ६ प्रमाणे त्या संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे (ज्याच्या नियंत्रणात माहिती असते त्यांचेकडे) अर्ज करणे अपेक्षित असते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मुख्य अभियंता यांचे कार्यालयात माहितीचा अर्ज केला असला तरी त्या कार्यालयात ती माहिती नसल्यामुळे अर्जाचे हस्तांतर करण्या येउन विहित मुदतीत अपिलकर्ता यांना दि.१२.०३.२०१० रोजी उत्तर दिलेले आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र नाहीत. कोणत्याही कायद्याच्या तरतुदींचा अर्थ हा एखादा शब्द स्वतंत्रपणे वाचून लावता येत नाही तर त्या संदर्भातील सर्व तरतुदी एकत्रित वाचून तो लावणे अपेक्षित असते. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी काय चर्चा केली याबाबतचा उल्लेख त्यांच्या निर्णयात नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध असलेली द्यावी असा आदेश जो देण्यात आलेला आहे तो गांभिर्याने दिलेला दिसून येत नाही असे असले तरी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश दिलेला असला तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे परंतु अधिनियमाचे कलम ७(६) प्रमाणे ३० दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल तर ती विना मुल्य देण्याची तरतुद आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना ती माहिती त्या छायांकित प्रती विना मुल्य व्यक्तीश: उपलब्ध करुन द्याव्या हे संयुक्तीक राहिल. अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

<u>आदेश</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे अशंत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेल्या जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०७३१/अपील क्र.६७६८/०२

श्री.चेतन कोठारी
५२, ओसीऑनीक अपार्टमेंट,
डॉ.राजाबाली पटेल लेन ऑफ बी.देसाई रोड,
मुंबई ४०० ०२६. ... अपिलार्थी

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी
नाशिक पोलीस आयुक्त कार्यालय,
शरणपूर पोलीस चौकी जवळ,
एस.डी.एफ.सी.बँकेसमोर, शरणपूर रोड,
नाशिक ४२२ ००२. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक
नाशिक पोलीस आयुक्त कार्यालय,
शरणपूर पोलीस चौकी जवळ,
एस.डी.एफ.सी.बँकेसमोर, शरणपूर रोड,
नाशिक ४२२ ००२.

निर्णय

व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०

सुनावणीचा दिनांक १७.०६.२०११

अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.

अपिलकर्ता यांनी दि.२१.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचेकडे माजी पोलीस आयुक्त, नाशिक श्री.हिमांशु रॉय यांचे विरुध्द गेल्या १० वर्षात नाशिक मध्ये कार्यरत असताना किती तक्रारी किंवा गुन्हे दाखल झालेले होते याबददलची माहिती एकूण ४ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.०९.१०.२०१० रोजी त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती असल्यामुळे गैरअर्जदार श्री.हिमांशु रॉय यांना कलम ११(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली असून त्यांचेकडून उत्तर प्राप्त झाल्यावर कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर दि.२१.१०.२०१० रोजी पोलीस निरीक्षक, तक्रार निवारण कक्ष, पोलीस आयुक्त, नाशिक करिता यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती अपिलकर्ता यांना कळविण्यात आलेली दिसून येते. पंरतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२३.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. पंरतु अपिलकर्ता यांना पुन्हा सर्व कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन घेउन माहिती निरंक आहे. असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता हजर आहे. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, तत्कालीन पोलीस आयुक्त यांचेविरुध्द ब-याच तक्रारी दाखल झाल्या होत्या म्हणून माहिती मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अंतिम: दि.१७.०१.२०११ रोजी सहा.पोलीस आयुक्त विभाग २ पोलीस ठाण्यातून श्री.हिमांशु रॉय तत्कालीन पोलीस आयुक्त नाशिक शहर यांचेविरुध्द गेली १० वर्षात गुन्हे / तक्रारी अर्ज दाखल झाले काय याबाबत माहिती संकलित केली असता स.पो.आ विभाग २ चे हदिदतील पोलीस ठाणेकडून निरंक अहवाल प्राप्त झालेले आहेत असे आयोगाकच्या निदर्शनास आणले त्यावरुन अपिलकर्ता यांना मागिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर मिळाले असलेले असल्याने सदरचे अपिल हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

दिनांक १७.०६.२०११
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०७३६/अपील क्र.६७७१ व ६८३९/०२

श्री.महम्मद हमीद शेख
नेहरू नगर, चाळ क्र.५,
शॉप नं.११, संत ज्ञानेश्वर नगर,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. ... अपिलार्थी

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (दक्षता)
५ वा मजला, विस्तारीत इमारत,
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१. ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा प्रमुख्य अभियंता (दक्षता)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
प्रमुख अभियंता (दक्षता) यांचे कार्यालय,
अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प इमारत, एन.एम.जोशी मार्ग,
बकरीअड्डा, भायखळा (प), मुंबई ४०० ०११.

निर्णय

व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०
सुनावणीचा दिनांक १७.०६.२०११

**अपिलकर्ता सुनावणीसाठी काही कामामुळे उपस्थित राहिले नाहीत असे त्यांनी कार्यालयात प्रत्येक्ष येउन सांगितले. जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०२.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, प्रमुख्य अभियंता दक्षता अधिकारी यांचे कार्यालयामध्ये दि.०२.०१.२००९ ते दि.२०.११.२०१० पर्यंतच्या कालावधीतील उप मुख्र अभियंता (स्ट्रोमवॉटर ड्रेनेज) वेस्टर्न सबर्बस प.ज.वा. चकाला, अंधेरी, मुंबई दि.०२.०१.२००९ ते दि.२०.११.२०१०० पर्यंत निविधा उघडण्यात आल्या आहेत. त्या निविधा यांच्या चौक्या साईट अहवाल व आपल्या वरिष्ठ अधिकारी यांनी दिले तसेच त्यांच्या चौकीचे भाडे डिपॉझीट भरलेले चलन, पावती क्रमांक वार तसेच सर्व ठेकेदार किती आहेत. त्याचे अनुज्ञापन प्रमाणपत्र इंजिनिअर सह टेंडर पत्ते भरते वेळी ज्या अधिकारी यांनी स्विकार केला त्या अधिका-यांच्या सहिनिशी माहिती स्वरुपात द्यावी अशी माहिती टपाला व्दारे मागितलेली दिसून येते. सदरचा अर्ज हा दि.०५.०८.२०१० रोजी प्रमुख्य अभियंता दक्षता यांनी उप प्रमुख्य अभियंता (दक्षता) यांनी उप प्रमुख्य अभियंता (प्रर्जन्य जल वाहिन्या) पश्चिम उप नगरे कार्यालय यांच्या अख्यारीत येत असून सदरचा अर्ज त्या कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहे असे दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१३.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.२९.०९.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी केलेला अर्ज हा प्रर्जन्य जल वाहिन्या या कार्यालयामध्ये असल्याने त्या कार्यालयामध्ये पाठविण्यात आला होता असा निर्णय देउन अपीलाच्या आदेशाची प्रत उप प्रमुख्य अभियंता (प्रर्जन्य जल वाहिन्या) पश्चिम उपनगरे यांचेकडे पाठवून अपिलकर्त्याला हवी असलेली माहिती देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि.१९.१०.२०१० रोजी अपिलकर्ता यांना पुन्हा कळविण्यात आले व दि.३०.१०.२०१० रोजी उप प्रमुख्य अभियंता (प्रर्जन्य जल वाहिन्या) यांनी अपिलकर्ता यांना दि.०६.०९.२०१० रोजी संविस्त पत्र पाठविलेले आहे त्याप्रमाणे कार्यालयात येउन कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे हे स्पष्ट करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविल्याप्रमाणे कार्यालयास भेट देउन उपलब्ध असलेल्या कागदपत्राचे परिक्षण करुन निर्धारित शुल्काचा भरणा महापालिकेकडे केल्यानंतर त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्राप्त कराव्या हे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता उपस्थित झाले होते परंतु प्रत्येक्ष सुनावणीस आलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी हीच माहिती प्रर्जन्य जल वाहिन्या या विभागाकडे दि.२७.०४.२०१० रोजी सुध्दा मागितलेली होती. वास्तविक या अर्जाच्या संदर्भात त्यांना तपशिलामध्ये माहितीच्या संदर्भामध्ये कळविण्यात आले होते व प्रथम अपिलाचा सुध्दा निर्णय हा दि.२७.०७.२०१० रोजी देण्यात आला होता. तरी सुध्दा त्यांनी दक्षता विभागाकडे पुन्हा माहिती मागितली व प्रथम अपील सुध्दा त्या विभागाकडे केले व त्यानंतर ही राज्य माहिती आयोगाकडे पुन्हा व्दितीय अपील केले. सदरच्या अपिलाची सुनावणी ही राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालयात दि.०१.१२.२०१० रोजी झाली असे निदर्शनास आणण्यात आले. परंतु अपरिहार्य कारणामुळे निर्णय झालेला नसल्यामुळे माहिती एकच असल्यामुळे त्याही अपिलाची सुनावणी घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी विनंती केल्यामुळे त्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्यासंदर्भामध्ये प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२६.०७.२०१० रोजी देण्यात आला व एकच माहिती असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेल्या संपूर्ण माहितीचे निरीक्षण त्यांनी केले आहे व त्यास त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांचा खर्चाचा भरणा करणे सुध्दा त्यांना कळविलेले आहे परंतु त्यांनी अद्याप पर्यंत आवश्यक त्या खर्चाचा भरणा केला नाही व माहिती ही अतिशय विस्तृत प्रमाण असल्यामुळे व पृष्ठ संख्या ही जास्त असल्यामुळे त्यांना खर्चाचा भरणा केल्याशिवाय माहितीची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली नाही मात्र अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले आहे व लेखी खुलासा दिला आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील क्र.६७७१/०२ व ६८३९/०२ ही निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील क्र ६७७१/०२ व क्र.६८३९/०२ ही निकाली काढण्यांत येतात.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७३७/अपील क्र.६७७२/०२**

**श्री.महम्मद हमीद शेख**
**नेहरु नगर, चाळ क्र.५,**
**शॉप नं.११, संत ज्ञानेश्वर नगर,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एन विभाग यांचे कार्यालय,**
**दुसरा मजला, जवाहर रोड,**
**घाटकोपर (पू), मुंबई ४०० ०७७.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एन विभाग यांचे कार्यालय,**
**दुसरा मजला, जवाहर रोड,**
**घाटकोपर (पू), मुंबई ४०० ०७७.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १८.०६.२०११**
**अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर.**

अपिलकर्ता यांनी दि.३०.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अभिक्षक, एन/विभाग, घाटकोपर (पू) यांचेकडे कार्यकारी अभियंता श्री.जे.बी.गुप्ता यांचे संदर्भामध्ये तपशिलात टपाल व्दारे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना

दि.१३.०९.२०१० रोजी काही माहिती देण्यात आली व सेवा अभिलेखाची माहिती नगर अभियंता कार्यालयात असल्यामुळे त्यांचा अर्ज त्या कार्यालयाकडे हस्तांतर केला असे कळविण्यात आले. नगर अभियंता कार्यालयाने दि.०४.१०.२०१० रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.०८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२०.१०.२०१० रोजी देण्यात आला असून वाहनाच्या बददलची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात, त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अधिका-यांची बदली झाली म्हणजे त्यांची त्या त्या कालावधीतील माहिती ही एकत्रित पणे नसते तर त्या त्या कार्यालयात उपलब्ध असते व श्री.गुप्ता यांची माहिती ३ कार्यालयात असून ती त्या त्या कार्यालयातून उपलब्ध करुन द्यावयाची असल्याने विलंब झाला आहे मात्र माहिती सर्व उपलब्ध करुन दिली आहे. त्याबाबतची कागदपत्रे आयोगापुढे दाखल झालेली असल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १८.०६.२०११.**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७३८/अपील क्र.६७७३/०२**

**श्री.महम्मद हमीद शेख**
**नेहरु नगर, चाळ क्र.५,**
**शॉप नं.११, संत ज्ञानेश्वर नगर,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता**
**पाचवा मजला, विस्तारीत इमारत,**
**मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण)**
**कक्ष यांचे कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका, जे.बी.शाह,**
**म्युन्सिपल मार्केट इमारत, पहिला मजला, युसूफ मेहर अली रोड,**
**मस्जिद रेल्वे स्टेशनजवळ, मस्जिद (प), मुंबई ४०० ००९.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १८.०६.२०११**
**अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर.**

अपिलकर्ता यांनी दि.०१.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सनियंत्रण व नोंदणीकरण कक्ष यांचेकडे दि.०१.०३.२०१० ते दि.०१.०४.२०१२ या कालावधीची ए/विभाग हद्दीपासून ते पुर्व उपनगर टी/वॉर्ड हद्दीपर्यंत तसेच पश्चिम उपनगर आर/उत्तर वॉर्ड हद्दीपर्यंत आपल्या परिरक्षण खात्यामध्ये सिव्हील कामाची टेंडर किती लोकांना कोणकोणत्या कंपनींना कोणकोणत्या वॉर्डात विभागात दिलेले आहेत इत्यादी माहिती टपाला व्दारे घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने दि.०६.०९.२०१० रोजी सी.डब्ल्यू,सी., गार्डन, ट्रंचेस, डिसल्टींग टेंडरची या कामाच्या ठेकेदारांची माहिती महापालिकाचे खालील कार्यालयाशी संबंधित असून आपला अर्ज संबंधित कार्यालयास अग्रेषित केला आहे व परस्पर माहिती पाठविण्यासाठी कळविलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.०७.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी योग्य उत्तर दिले असल्यामुळे व संबंधित विभांगाकडे अर्जाचे हस्तांतरण केले असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. अपिलकर्ता यांनी त्यांचा अर्ज ज्या ज्या विभागाकडे हस्तांतर केला आहे त्या त्या विभागांच्या जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधणे आवश्यक होते व त्यांनी माहिती जर दिलेली नाही तर त्या त्या विभागातील प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे अपील दाखल करणे आवश्यक होते व राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा हस्तांतरीत विभागातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचा उल्लेख करुन व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक होते. म्हणजे राज्य माहिती आयोगाकडून हस्तांतरीत विभागातील अधिका-यांना नोटीस काढता आली असती व माहितीच्या संदर्भामध्ये हस्तांतरीत विभागातील जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देता आले असते. परंतु ज्या विभागाकडे माहिती उपलब्ध नाही व त्या विभागातील जन माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अर्जाचे हस्तांतरांची कार्यवाही ही योग्य मुदतीत केली असल्यामुळे व संबंधित अधिकारी आयोगाकडे हजर असल्यामुळे त्यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १८.०६.२०११.**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७३९/अपील क्र.६७७४/०२**

**श्री.अर्जुनलाल एम.छाब्रिया**
**बेले व्हिस्ता, फ्लॅट नं.१५,**
**३ रा मजला, लेक व एल.आय.सी.ऑफीससमोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी**
**यांचे कार्यालय, मुंबई अग्निशम दल, ई विभाग महापालिका कार्यालय,**
**ए.के.हफिझुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ४०० ००८. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी**
**यांचे कार्यालय, मुंबई अग्निशम दल, मरोळ,**
**अंधेरी (पू), मुंबई.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**

**सुनावणीचा दिनांक १८.०६.२०११**

**अपिलार्थी यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित आहे / प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०६.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, उप मुख्य अग्निशामक अधिकारी यांचे कार्यालयामध्ये त्यांना दि.२९.०७.२०१० रोजी गॅलेक्सी हाईट, बी विंग, लिंक रोड, बांगुरनगर सिग्नल जवळ, गोरेगांव (प), मुंबई च्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२७.०९.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने दि.०७.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२३.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.कापसे यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हे तर सांगण्यात आले परंतु अपिलकर्ता यांनी कार्यवाहीच्या

संदर्भामध्ये माहिती विचारली व त्या संदर्भात सुध्दा त्यांना स्पष्टपणे उत्तर दिलेले असून अपील निकाली काढण्यात आलेले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे व त्यामध्ये सुध्दा कार्यवाहीच्या संदर्भातच अपील दाखल करण्याचे कारण दाखविलेले आहे.

२. अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.कापसे यांनी अद्याप पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी कार्यावाही केली नाही असा युक्तीवाद केला.

३. अपिलकर्ता श्री.अर्जुनलाल छाब्रिया हे वकील आहे असे लिहितात व माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात कारवाई करुन मिळत नाही किंवा कारवाई केव्हा करण्यात येईल त्याबद्दल ही माहिती विचारता येत नाही. याबद्दल त्यांना माहिती असणे आवश्यक आहे. परंतु माहिती मिळाली असून सुध्दा निव्वळ कार्यवाही का केली नाही व केव्हा करुन मिळेल, या कारणास्तव प्रथम अपील व व्दितीय अपील दाखल करुन आयोगाचा सुध्दा वेळ त्यांनी घेतला व ज्यांना खरोखर माहितीची आवश्यक आहे अशांची अपील सुध्दा प्रलंबित राहतात. अपील मेमोमध्ये सुध्दा अनावश्यक असे अनेक परिच्छेदमध्ये वर्णन करुन अपील मेमो सादर केकला जातो. याबाबतची जाणीव न ठेवल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd---**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७४०/अपील क्र.६७७५/०२**

**श्री.रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज**
**घनश्यामदास चाळ, रुम.क्र.२,**
**संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई ४०० ०१७.** **... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**(परिमंडळ-३) यांचे कार्यालय, मध्य प्रादेशिक विभाग,**
**बावला कंपाउंड, डॉ.बी.ए.रोड,**
**भायखळा (पू), मुंबई ४०० ०२७.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
**(मध्य नियंत्रण कक्ष)**
**(परिमंडळ-३) यांचे कार्यालय, मध्य प्रादेशिक विभाग,**
**बावला कंपाउंड, डॉ.बी.ए.रोड,**
**भायखळा (पू), मुंबई ४०० ०२७.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १८.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी यांच्यावतीने पोलीस निरीक्षक, मध्य नियंत्रण कक्ष खुलाशासह उपस्थित आहेत, प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.३०.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, भायखळा (पू) यांचेकडे दि.२२.०३.२०१० च्या पत्रामध्ये अर्जदाराची पत्नी शिल्पा हिने घर सोडते वेळी रोख रक्कम घरात नसल्याबाबत सांगितले असलेले नमूद जबाब शिल्पा कोणत्या दिनांका अंतर्गत घेतले ते दिनांक व जबाब आणि शिल्पाने कोणत्या पोलीस अधिका-यांना सांगितले की, घरात रोख रक्कम नव्हती त्या अधिका-यांचे नाव, पदची माहिती मागितलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२२.१०.२०१०

रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, धारावी पोलीस ठाणे यांनी सहा.पोलीस आयुक्त यांचेकडे पाठविलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.०१.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२५.११.२०१० रोजी देण्यात आला असून, सदरचे अपील निकाली काढण्यांत आले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, जबाब घेताना जे जबाब म्हटले आहे त्याबद्दलची पुरावे त्यांनी मागितलेले आहे. परंतु माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे जी माहिती उपलब्ध असते ती मिळते, जी उपलब्ध नसते ती मिळू शकत नाही व अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही तपासातील गुणवत्तेच्या संदर्भात असल्याने व न्यायालयात युक्तीवाद करण्यासारखी असल्यामुळे ती उपलब्ध सुध्दा होणे शक्य नाही व त्यात कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित नाही, त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक १८.०६.२०११.**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७४५/अपील क्र.६७८०/०२**

**श्री.विजय के.चौहान**
**२ ए, सन ॲण्ड सी अपार्टमेंट,**
**रॉयल लेन जवळ, जुहूतारा रोड,**
**सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०४९. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मुख्य अभियंता (Development plan) यांचे कार्यालय,**
**४ था मजला, ॲनेक्स बिल्डींग,**
**म्युन्सिपल हेड ऑफीस, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (डी.पी) II**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मुख्य अभियंता (Development plan) यांचे कार्यालय,**
**४ था मजला, ॲनेक्स बिल्डींग,**
**म्युन्सिपल हेड ऑफीस, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २३.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**

**अपिलकर्ता अनुपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेवतीने उप प्रमुख अभियंता यांचा अधिभार असलेले कार्यासन अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यावतीने सहा.अभियंता खुलाशाह उपस्थित, जन माहिती अधिकारी (इ व प्र) (शहर) व जन माहिती अधिकारी (के/पश्चिम) उपस्थित आहेत.**

अपिलकर्ता यांनी दि.०९.०९.२०१० रोजी मुख्य अभियंता (पीआयओ) Development व Planning Department बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

VII) Kindly furnish the list of all Records of Permanent Value (like IOD, CC, BCC etc.) that are preserved by your department.

VIII) Kindly furnish the list of all MCGM dept. under your jurisdiction along with the Address, Contact Nos. Name of Record Ofgficer and Dy Engineer.

IX) Kindly furnish the different series in which the case files are maintained by your department at head office and at all Building Proposal & other departments under your jurisdiction.

X) Kindly furnish in chronological order the list of all files, in each series maintained by the above mentioned departments.

XI) Kindly furnish the list of all missing files along with the names of the then Record Officer and Dep. Engg.

XII) Kindly furnish the Annual Indiees of Public Records of all departments under your Jurisdiction from the time it is compiled till date.

सदरच्या माहितीचा कालावधी महानगरपालिका अस्तित्वात असल्यापासुन ते अर्जाच्या तारखेपर्यंत मागितलेली आहे व सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.२८.०९.२०१० रोजी उपमुख्य अभियंता यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा दि.०९.०९.२०१० रोजीचा अर्ज हा सदरची माहिती ही वेगवेगळया विभागातील असल्यामुळे E.E. (B.P.) CITY, E.E. (B.P.) W.S-I H & K, E.E. (B.P.) W.S-II P & R, E.E. (B.P.) E.S. यांचेकडे हस्तांतर केलेला आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१२.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी E.E. (B.P) (E.S.)-II यांनी आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्त्यांची निरीक्षण ११.०० ते ५.०० या काळात करावे व आवश्यक तो खर्चाचा भरणा करावा व त्यानंतर आवश्यक त्या कागदपत्रांच्या खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी त्यांचे समाधान न झाल्याने दि.१५.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०१.११.२०१० रोजी मुख्य अभियंता यांनी दिलेला असून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे.  सर्व संबंधित विभागाचे जन माहिती अधिकारी हे हजर आहेत. अपिलीय प्राधिकारी, मुख्य अभियंता हे हजर आहेत.

३. अपिलकर्ता यांनी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील मेमोमध्ये माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून कारण दिलेले आहे व माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून शास्ती लादावी अशी विनंती केली आहे.  तसेच इमारत व प्रस्ताव विभाग हे सर्वात भ्रष्टाचारी विभाग आहेत व २००० नस्त्या गहाळ झालेल्या आहेत हे वर्तमान पत्रातील लेखात दिले आहे असे त्यांनी अपील मेमोमध्ये म्हटले आहे.

४. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा संसदेने पारित केलेला कायदा आहे व कोणत्याही कायदयामध्ये ज्या तरतुदी केलेल्या असतात किंवा कार्यपध्दती दिलेली असते त्याची काटेकोरपणे सर्वांनी अमंलबजावणी करणे अपेक्षीत असते.  कोणत्याही प्रकारचे आरोप करुन अर्धन्यायीक पध्दतीने निर्णय होत नसतात.  माहितीचा अर्जामध्ये काय माहिती मागितली व ती मिळाली किंवा नाही, मिळाली असल्यास किंवा मिळाली नसल्यास त्या प्रकारची कारणे प्रथम अपीलात किंवा व्दितीय अपीलात देणे आवश्यक असते.  परंतु जन माहिती अधिकारी यांनी जी उत्तरे त्यांना दिलेली आहेत ती त्यांना मान्य आहेत किंवा नाही याबद्दल दोन्ही अपील मेमोंमध्ये कोणताही उल्लेख नाही.  कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदी या सर्व नागरींकांना सारख्याच लागू असतात.  मात्र माहितीच्या अधिकारामध्ये सर्व अपिलकर्ता / अर्जदारांची अशी समजुत आहे की त्यांना माहितीचा अधिकार मिळाला आहे व त्यामुळे कशाही प्रकारे माहिती मागितली तरी ती उपलब्ध झाली पाहिजे व दिली नाही म्हणजे शास्ती झाली पाहिजे.  परंतु अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे माहितीचा अर्ज आहे किंवा नाही, प्रथम अपील, व्दितीय अपील त्याप्रमाणे दाखल झालेले आहे किंवा नाही हे नैसर्गिक न्यायाचे तत्वाप्रमाणे तपासणे आवश्यक असते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या अर्जात जी माहिती मागितली आहे त्यासंदर्भामध्ये तपशिलात तपासणी करणे आवश्यक आहे.

५. अपिलकर्ता त्यांच्या दि.०९.०९.२०१० च्या अर्जात वर नमुद केल्याप्रमाणे अवलोकन केले असता त्यांनी कोणत्याही एका विशिष्ट प्रक्लपाबाबत किंवा इमारती बाबत माहिती मागितली नाही.  तर संपूर्ण बृहन्मुंबईतील महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिका अस्तित्वात असल्यापासुन इमारत

व प्रस्ताव या सर्व विभागातील इमारतींच्या बांधकामाच्या संदर्भातील म्हणजेच बृहन्मुंबईतील सर्वंच इमारतींच्या बांधकामाच्या संदर्भातील तपशिलातील माहिती एकाच मुख्य कार्यालयामध्ये मुख्य अभियंता यांचेकडे मागितली आहे व ती सर्व मोघम स्वरूपातील असून अत्यंत विस्तृत प्रमाणात आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी आयेगापुढे सांगितले. सदरची माहिती उपलब्ध करुन दयावयाची झाल्यास त्या संदर्भातील लाखो पृष्ठ होतील आणि प्रत्येक कार्यालयास त्यांचे दैनंदिन कामकाज बाजूला ठेवूनच सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावी लागेल असे ही त्यांनी आयेगाला सांगितले व तसेच मागितलेली माहिती ही मुख्य अभियंता यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसते. बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विस्तार व व्याप याचा विचार करता सदरची माहिती ही एकत्रित ठेवणे सुध्दा शक्य नाही व त्यामुळे त्या त्या विभागातील कार्यालयांमध्ये ती माहिती जतन केलेली असते व त्यामुळे मुख्य अभियंता यांचे कार्यालयातून अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि.२८.०९.२०१० रोजी सदरची माहिती ही ज्या, ज्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे त्या त्या कार्यालयामध्ये अर्जांचे हस्तांतर केलेले आहे असे कळविण्यात आले होते व त्याप्रमाणे त्या, त्या विभागातील जन माहिती अधिकारी यांनी अनुक्रमे दि.१२.१०.२०१०, २६.१०.२०१०, २८.१०.२०१० रोजी माहिती ही त्या, त्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे व संबंधित नस्तींचे निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात असे कळविलेले होते. अपिलकर्ता यांचा दि.०९.०९.२०१० चा अर्जच मुळात मुख्य अभियंता यांचे कार्यालयामधुन जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि.२८.०९.२०१० रोजी प्राप्त झाला होता व त्यामुळे त्यानंतरच त्या माहितीचे स्वरूप पाहून त्याबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती व त्यामुळे अपिलकर्ता यांनी जरी दि.१५.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले होते तरी सदरचे अर्जाचे हस्तांतर झाल्यानंतरच त्या, त्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तसेच अपिलकर्ता यांनी ज्या स्वरूपात माहिती मागितली आहे त्या स्वरूपात माहितीच उपलब्ध नसते असे ही त्यांना कळविले होते ते आयोगाच्या निदर्शनास आणले.

६. मुख्य अभियंता यांनी किंवा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्चाचा भरणा करावा किंवा माहितीच्या संदर्भामध्ये जे कळविले होते

त्याबाबत मात्र अपिलकर्ता यांनी प्रथम अपील मेमोमध्ये किंवा व्दितीय अपील मेमोमध्ये त्यांना मान्य नसल्याचे कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही व तसे निवेदन सुध्दा त्यांनी आयोगापुढे दिलेले नाही.

७. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नागरीकास माहिती मागण्याचा अधिकार प्राप्त झाला असला तरी माहिती ही कशी व कोणती, किती मागावी याबाबत तपशिलात तरतुद नसली तरी अधिनियमाच्या सर्व कलमांचा एकत्रित विचार केल्यास माहितीचे म्हणजे कागदपत्राचे, दस्तऐवजांचे निश्चित वर्णन करणे आवश्यक आहे असे दिसून येते. अपिलकर्ता यांनी त्यांच्या व्दितीय अपील मेमोमध्ये कलम ४ प्रमाणे माहिती उपलब्ध नाही तसेच महाराष्ट्र पब्लिक रेकॉर्ड ॲक्ट २००५ व डिस्ट्रक्शन ऑफ रेकॉर्ड ॲक्ट १९१७ प्रमाणे माहिती उपलब्ध नाही असे नमूद केले आहे. परंतु महानगरपालिकेच्या त्या संपूर्ण विभागामध्ये त्यांना अभिलेख्यांचे दस्तऐवजांचे निरीक्षण करण्यासाठी कळविले असतांना सुध्दा व त्यांनी निरीक्षण केलेले नसतांना सुध्दा वरील प्रमाणे कलम ४ प्रमाणे किंवा इतर कायद्यांप्रमाणे माहिती उपलब्ध नाही असा त्यांनी निष्कर्ष काढलेला दिसून येतो. वास्तविक कलम ४ च्या पोट कलम २ मध्ये माहिती मिळविण्यासाठी ती इंटरनेटसह तसेच प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरुपात प्रसारित करण्यात येईल तसेच सर्व माहिती ही पोट कलम ४ प्रमाणे खर्चाचा विचार करुन उपलब्ध करुन देण्यात येईल अशा सर्व प्रकारच्या तरतुदी केल्या आहेत.

परंतु सदरच्या अधिनियमास पूर्व लक्षी प्रभाव दिला नाही व अपिलकर्ता यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका स्थापन झाल्यापासून सर्व कार्यक्षेत्रांतील इमारतींच्या संदर्भामध्ये जी माहिती मागितली आहे ती सर्व माहिती प्रसिध्द किंवा इंटरनेट /संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे शक्य आहे किंवा नाही त्याबाबतचा सुध्दा माहिती मागविताना विचार केलेला नाही. मात्र शास्तीची मागणी केली आहे. अधिनियमाच्या प्रास्ताविकेमध्ये "आणि ज्या अर्थी प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामध्ये अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच, शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधन संपत्तीचा इष्टतम वापर होणे, आणि संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे, याबाबींनाही बाध येण्याची शक्यता आहे." असे ही म्हटले आहे व त्यावरुनही मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ती उपलब्ध करुन देण्याच्या शक्यतेबद्दल विचार करणे आवश्यक असते. अधिनियमाचे कलम ७ (९) मध्ये "सार्वजनिक

प्राधिकरणांची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास, किंवा प्रस्तुत अभिलेख सुरक्षित ठेवण्याच्या किंवा जतन करण्याच्या दृष्टीने ते हानीकारक नसल्यास, माहिती ज्या स्वरुपात मागण्यात आली असेल त्याच स्वरूपात ती सर्वसाधारणपणे, पुरविण्यात येईल" अशी तरतुद आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दि.२८.१०.२०१० रोजी सुध्दा कळविलेले आहे व त्यानंतर दि.१२.०१.२०११ रोजी सुध्दा अपिलकर्ता यांना त्यांच्या एकूण सात मुद्यांच्या संदर्भामध्ये कळविण्यात आलेले दिसून येते.

८. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम २(च) प्रमाणे "माहिती" यांचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, इ-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दिपत्रके, आदेश, रोजवहया इत्यादीचा समावेश होतो असे म्हटले आहे व कलम २(झ) मध्ये "अभिलेख" या संज्ञेची व्याख्या केली आहे आणि त्यामध्ये

क) कोणताही दस्तऐवज, हस्तलिखीत व फाईल,

ख) एखाद्या एस्तऐवजाची कोणतीही मायक्रोफिल्म आणि प्रतीरुप प्रत यांचा समावेश होतो असे म्हटले आहे व

कलम २ (ञ) नुसार "माहितीचा अधिकार" याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे आणि त्यामध्ये, -

(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे,

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे,

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमूने घेणे, इत्यांदी याबाबतचा अधिकाराचा समावेश होतो."

यावरुन या सर्व तीनही व्याख्यांचे एकत्रित वाचन करुन व विचार करुनच माहितीच्या अर्जात मागितलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेणे आवश्यक असते व त्याप्रमाणे विचार केल्यास अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही निश्चितच मोघम स्वरुपाची व अतिशय विस्तृत प्रमाणात आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

९. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(१) प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण त्याच्या अख्यारितील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढया जास्तीत जास्त अधिका-यांना राज्य जन माहिती अधिकारी म्हणुन पदनिर्देशित करील अशा प्रकारची तरतुद आहे. ही तरतुद करतांना अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची जे बंधन घालण्यात आले आहे, त्या मर्यादेमुळेच माहिती जर ३० दिवसात उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास ज्या कार्यालयात माहिती उपलब्ध आहे त्याच कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त केल्यासच ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देता येईल असे अपेक्षित आहे. माहिती जर कनिष्ठ कार्यालयामध्ये उपलब्ध असेल आणि वरिष्ठ कार्यालयात ती मागितली तर ती ३० दिवसात उपलब्ध होईल असे नाही व त्यामुळेच सार्वजनिक प्राधिकरणातील ज्या ज्या स्तरावर जी जी माहिती उपलब्ध आहे त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी नियुक्त करण्याची तरतुद करण्यात आली आहे. त्यातही अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे त्या संबंधित माहिती अधिका-यांकडे अर्जदाराने अर्ज करावयाचा आहे तरच कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांत माहिती उपलब्ध होउ शकेल. त्याकरिता कलम ५, ६ व ७ या तिन्ही कलमांचे एकत्रित वाचन करुन अर्थ लावणे आवश्यक असते.

सदरच्या प्रकरणात अपिलकर्ता यांनी मात्र संपूर्ण बृहन्मुंबईतील महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेच्या स्थापनेपासूनची सर्व इमारतींच्या बांधकामाची माहिती तपशिलात मागणे हे अव्यवहार्य आहे व प्रास्ताविकेतील वर नमूद केलेल्या उद्दिष्ठांशी विसंगत आहे व महानगरपालिका सन १८८८ मध्ये स्थापन झाली तेव्हा पासूनची माहिती ही प्रसिध्द करणे किंवा संकेतस्थळावर प्रसिध्द करणे याबद्दल सुध्दा अधिनियमाचे कलम ४(४) च्या संदर्भात विचार केल्यास अव्यवहार्य आहे.

१०. अशा प्रकारे मोघम व अतिशय व्यापक प्रमाणात माहिती मागणे कोणतेही सार्वजनिक हित नाही. असे असले तरी सर्व जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता / अर्जदार यांना त्यांच्या विभागीय कार्यालयामध्ये उपस्थित होउन उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे, अभिलेखांचे, दस्तऐवजांचे निरीक्षण करुन व त्याचा खर्च भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे जे कळविलेले आहे ते अधिनियमाच्या तरतुदीशी

सुसंगत आहे. परंतु तसे निरीक्षण न करता किंवा निरीक्षणाचा खर्च न भरता अपिलकर्ता यांनी त्या कार्य पध्दतीच्या बाबत कोणताही आक्षेप न घेता मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणुन किंवा महानगरपालिकेत फार भ्रष्टाचार आहे असे कारण देउन व्दितीय अपील दाखल करणे हे योग्य नसल्याने सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०६.२०११.**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७४७/अपील क्र.६७८१/०२**

**श्री.इंद्र बहादूर शर्मा**
**१०, शर्मा चाळ, अंधेरी-कुर्ला रोड,**
**कृष्णा नगर, मरोळ नाका,**
**अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.** **... अपिलार्थी**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**श्रीमती.परमेश्वरीदेवी दुर्गादत्त तिबरेवाला लायन्स,**
**जुहू कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स,**
**श्रीनिवास बागारका मार्ग, जे.बी.नगर,**
**अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**श्रीमती.परमेश्वरीदेवी दुर्गादत्त तिबरेवाला लायन्स,**
**जुहू कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स,**
**श्रीनिवास बागारका मार्ग, जे.बी.नगर,**
**अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०६.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी म्हणुन श्रीमती परवेश्वरदेवी दुर्गादत्त तिबरेवाला, लायन्स, जुहु कॉलेज आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स, जे.बी.नगर, अंधेरी (पू) यांचेकडे महाविद्यालयाच्या अल्पसंख्याकांच्या दर्ज्याच्या संबंधात जे Affidavit दाखल केले आहे तसेच संस्थेचे अद्यावत मेमोरंडम व नियमांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती पोष्टाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना उत्तर दिलेले आहे. सदरचे उत्तराने समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२३.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम

अपीलाच्या संदर्भामध्ये प्राचार्य यांनी महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये चौकशी केली असता सदरची बाब ही १९९०-१९९३ ची असल्यामुळे Affidavit ची प्रत उपलब्ध नाही. मुंबई विद्यापिठाकडून आलेल्या दि.०९.०६.१९९३ च्या पत्राची प्रत आपणास दिलेली आहे व त्या विद्यापिठाकडे ती माहिती उपलब्ध असण्याची शक्यता आहे. संस्थेच्या मेमोरंडमच्या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही व तसेच आपल्या अर्जामध्ये माहितीचा कालावधी हा शैक्षणीक वर्ष २०१० हा दिला आहे. त्यामुळे आपला अर्ज व अपील निकाली काढण्यात आला आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, सदरचे महाविद्यालय हे अल्पसंख्यांक दर्जा आहे या आधारावर प्रवेश देत आहे व त्यामुळेच खरोखर महाविद्यालयास अल्पसंख्यांक दर्जा आहे किंवा नाही हे जाणुन घेण्यासाठी त्यांच्या पत्रामध्ये अल्पसंख्यांक दर्जाच्या संदर्भामध्ये Affidavit केलेले आहे असे म्हटल्यामुळे त्यांनी Affidavit ची प्रत मागितली आहे. तसेच मेमोरंडम व नियम यावरुन संस्थेचा दर्जा कळू शकेल. परंतु दोन्ही प्रकारची माहिती ही जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी नाकारली आहे.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्या महाविद्यालयाच्या जन माहिती अधिकारी आहेत व महाविद्यालयातील शैक्षणीक बाबींच्या संदर्भामध्ये माहिती त्या देउ शकतात. महाविद्यालयास अल्पसंख्यांकांचा दर्जा आहे किंवा नाही ही बाब संस्थेच्या अखत्यारित येते. अल्पसंख्यांक दर्जा हा संस्थेस मिळतो व संस्था ही त्याबाबतचे संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे पत्र व्यवहार करते. तसेच अपिलकर्ता यांना सुध्दा मुंबई विद्यापिठाचे जे पत्र उपलब्ध करून दिले आहे ते पत्र मुंबई विद्यापिठाने संस्थेच्या सचिवास संबोधित केले आहे व त्यामुळे Affidavit ची प्रत असल्यास ती संस्थेच्या अभिलेख्यामध्ये मिळू शकेल. तरी सुध्दा महाविद्यालयाच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध असल्यास शोध घेउन देता येईल. मात्र संस्थेचे मेमोरंडम व नियम हे संस्थेकडूनच उपलब्ध होतील. संस्थेच्या कामकाजाची माहिती ही महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध नसते. तसेच महाविद्यालयातील माहिती अधिकारी व

प्राचार्य हे सुध्दा संस्थेचे सेवक असल्यामुळे संस्थेस माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देउ शकत नाही. मात्र सदरचा अर्ज हा संस्थेकडे हस्तांतरीत करता येईल. असे असल्याने सदरचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी म्हटल्याप्रमाणे उपरोक्त Affidavit ची प्रत महाविद्यालयाच्या अभिलेख्यांमध्ये शोध घेउन उपलब्ध झाल्यास अपिलकर्ता यांना विना मुल्य रजिष्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी व उपलब्ध नसल्यास सदरचा माहितीचा अर्ज हा संस्थेकडे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता हस्तांतरीत करावा. संस्थेने माहिती उपलब्ध न केल्यास अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल करावी.**

**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०६.२०११.**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७५५/अपील क्र.६७८७/०२**

**सौ.मंजुळा जगन्नाथ साटम,**
**२/२०४, स्वराज्य सहकारी गृहनिर्माण संस्था मार्या.,**
**सेनापती बापट मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०१३. ... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**
**(बृहन्मुंबई महानगरपालिका),**
**उप मुख्य अभियंता ग्राहक सेवा,**
**दुसरा मजला, परिवहन अभियांत्रिकी इमारत,**
**टिळक रोड, दादर (पू), मुंबई ४०० ०१४. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्राहक सेवा (जी/उत्तर)**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**
**(बृहन्मुंबई महानगरपालिका),**
**उप मुख्य अभियंता ग्राहक सेवा,**
**दुसरा मजला, परिवहन अभियांत्रिकी इमारत,**
**टिळक रोड, दादर (पू), मुंबई ४०० ०१४.**

## <u>निर्णय</u>

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**
**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व प्रथम अपिलीय प्राधिकारी खुलाशासह उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२०.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी अंतर्गत गा-हाणे निवारण मंच, ग्राहक सेवा जी/उत्तर, बेस्ट उपक्रम, परिवाहन अभियांत्रिकी इमारत यांचेकडे ग्राहक क्र.७११-९३५०३१*७ तसेच यंत्रणा क्र.२१२५१४८ हा आहे. या संदर्भात केलेल्या विज जोडणी अर्जाची अधिकृत प्रत मागितलेली दिसू येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२०.१०.२०१० रोजी एकूण ७ प्रतींसाठी रू.१४/- च्या खर्चाचा भरणा करावा व माहिती उपलब्ध करून घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.१४.१२.२०१० रोजी झाला. त्यानुसार दि.१५.१२.२०१० रोजी त्यांना हवी असलेल्या दस्तऐवज देण्यात आले आहे. परंतु तरी सुध्दा अपुरी व चुकीची माहिती दिली या कारणास्तव अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. त्यांनी अपुरी व चुकीची माहिती उपलब्ध झाली असे म्हटले आहे. परंतु ग्राहक क्र.७११-९३५-०३१*७ तसेच यंत्रणा क्र.२१२५१४८ हा आहे. वरील विज जोडणी संदर्भात अर्जाची अधिकृत प्रत मिळावी असे म्हटले आहे. परंतु अपिलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. ही दि.१५.१२.२०१० रोजी उपलब्ध केली आहे व त्यावर ग्राहक क्र. दिसून येतो. मात्र अपिलकर्ता यांनी व्दितीय अपील हे दि.०१.१२.२०१० रोजी केलेले आहे व त्यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७५१/अपील क्र.६७८४/०२**

**श्री.शिवदास अशोक भोईर**
**रा.वेहळे, ता.भिवंडी, जि.ठाणे. ... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**तहसिलदार भिवंडी यांचे कार्यालय,**
**ता.भिवंडी, जि.ठाणे. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार, भिवंडी यांचे कार्यालय,**
**ता.भिवंडी, जि.ठाणे.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०३.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उशीरा उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी तहसिलदार, भिवंडी कार्यालयामध्ये कै.सोराबजी मेहरबानजी यांच्या मृत्यु दाखल्याबाबत मा.तहसिलदार, भिवंडी यांनी एस.आर.क्र.५६०, दि.०९.०९.२००८ रोजी आदेश केलेला आहे. सदर आदेशाची प्रत देणे व तो दाखला कागदपत्रांच्या आधारे दिला त्याच्या प्रती देणे अशी माहिती स्वत: घेउन जाणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी दि.१८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला असून त्यामध्ये सदरचे मृत्युचे प्रकरण १० दिवसामध्ये शोध घेउन अर्जदार यांना माहिती पुरवावी असे आदेश दिलेले असून सुध्दा अपिलकर्ता यांना माहिती मिळाली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता यांचे तर्फे श्री.जितेंद्र आर.पाटील हे वकील हजर झाले. त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलार्थी हे भिवंडी येथील कै.सोराबजी मेहरबानजी भिवंडीवाला यांचे शेत जमिनीवर कुळ आहे कै.सोराबजी मेहरबानजी भिवंडीवाला हे मयत झाल्यावर जे वारस

लावण्यात आले आहे ते अनेक असुन कै.सोराबजी मेहरबानजीचे वारस नाही व त्यामुळे तत्कालीन तहसिलदार यांनी आदेश क्र.५६०, दि.०९.०९.२००८ प्रमाणे कोणत्या आधारावर वारस लावण्यात आले ती माहिती मागितली होती. परंतु नस्त्या उपलब्ध होत नाही असे कारण देउन किंवा सेतुकडे संपर्क साधावा असे कारण देउन माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, कार्यालय भिवंडी हे उशिराने उपस्थित झाले व त्यांनी आयोगाकडे तोंडी युक्तीवाद केला व युक्तीवाद करताना सांगितले की, तत्कालीन सेतु लिपीक व सध्या कार्यरत असलेले सेतु लिपीक यांना वेळोवेळी सुचना देउन माहिती शोधण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आज पर्यंत सदर प्रकरणाची संचिका उपलब्ध झाली नाही. २००८ मधील काही संचिका उपलब्ध होतात पंरतु ब-याच संचिका या गहाळ झाल्या आहेत असे ही त्यांनी सांगितले. तसे असल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेखे अधिनियम २००५ च्या कलम ९ प्रमाणे पोलीसांकडे एफ.आय.आर. दाखल करणे संयुक्तीक राहिल त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असुन हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत तहसिलदार भिवंडी यांनी सेतु कडील २००८ मधील संचिका गहाळ झाल्याच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००८ च्या तरतुदीप्रमाणे पोलीसांकडे एफ.आय.आर. दाखल करावे.**

**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७४९/अपील क्र.६७८२/०२**

**श्री.भगवान राम करिया**
**कोटेश्वर आशिष, ६ वा मजला, रू.नं.६०१,**
**जे.एन, रोड, मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०. ... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप नियंत्रक**
**नियंत्रक वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**शासकीय कुटीर क्र.७,**
**फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.नियंत्रक**
**नियंत्रक वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**शासकीय कुटीर क्र.७,**
**फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ३०.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**
**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी सह सहाय्यक आयुक्त, वजने व मापे यांचेकडे Appeal Report for missing stamp plate on railway platform scale machine e.g Eastern scale and northern passenger scale machine च्या संदर्भामध्ये त्यांनी दिलेले पत्र दि.२७.०४.२०१० रोजी व त्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची व पत्रव्यवहाराची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.०४.०८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. तसेही अपिलकर्ता यांनी आता पर्यंत अनेक अर्ज दाखल केले आहेत. व अनेक अपीले दाखल केलेली आहेत असे कागदपत्रांवरुन दिसून येते व त्यांना वेळोवेळी माहिती सुध्दा दिलेली आहे व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दि.१७.०९.२०१० रोजी दिलेला आहे. तरी सुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी आज पर्यंत या एकाच मुद्यांच्या संदर्भात अनेक वेळा माहिती मागितली आहे. त्यांना दि.०९.०७.२०१० रोजीच्या पत्रान्वये सुध्दा माहिती दिली आहे. अपिलकर्ता यांनी मेसर्स इस्टर्न स्केल कंपनी विरोधात का कारवाई केली नाही असा वेळोवेळी प्रश्न उपस्थित केला आहे. परंतु सदर कंपनी कडून उल्लंघन झाल्याचे आढळून आलेले नसल्याने कारवाई करण्यात आलेली नाही असे त्यांना सांगितले असताना तसेच उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई महानगर विभाग यांना तपासणी विषयी सुचित केल्याचे पत्र सुध्दा दाखविण्यात आले व पत्र व्यवहाराची नस्ती सुध्दा दाखविली व त्यामुळेच प्रथम अपील हे फेटाळण्यात आले होते व मुद्‌दा क्र.२ च्या संदर्भामधील शासकीय जन माहिती अधिकारी यांनी उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई महानगर विभाग यांना दि.३१.०३.२०१० रोजी दिलेल्या पत्राची प्रत दयावी असे आदेश दिले व त्या पत्राची प्रत सुध्दा दिलेली आहे. यावरुन या संदर्भातील सर्व माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २१.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.९७३/अपील क्र.६६५६/०२**

**श्री.डॉ.मोहन बिजूर**
**१ बी.सी.हाय पीक को.हौ.सो.,**
**२०-ए, एस.व्ही.रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५१.** **... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था (३), पश्चिम उपनगरे,**
**कक्ष क्र.६९, गृहनिर्माण भवन,**
**तळ मजला, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५०.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक**
**सहकारी संस्था, के-पूर्व विभाग,**
**बि.नं.अ/१, रुम नं.३१५, ३ रा मजला, वडाळा ट्रक टर्मिनल,**
**आर.टी.ओ.जवळ, वडाळा (पू), मुंबई ४०० ०३७.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २३.०२.२०११**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१३.१२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी सस्था के/पूर्व वॉर्ड यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

g. Register of members in “I” form prescribed under Rules 32 of the Rules for the period Jan 2007 onwards till date.
h. List of Members in “J” form prescribed under Rule 33 of the Rules for the period Jan 2007 onwards till date.
i. Copy of the No Objection Certificate / permission give by society allowing the Damle family to occupy the flat no.3 & 4.
j. Status of “Damle” – whether Owner / Lessee, Tenant, etc as per Society records in relation to flat no.3 & 4 resp:

k. Details of previous owner, change of Ownership relating to flat no.3 & 4 since 1993 onwards.

l. Documents submitted for transmission of shares (relating to flat no.3) consequent upon please do the needful & oblige.

सदरची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक यांनी दि.२०.१२.२०१० रोजी अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये आपण मागितलेली माहिती ही संस्थेसंदर्भातील असल्यामुळे आपण संस्थेचे सभासद असल्यास आपण ती संस्थेस संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी व माहितीचा अधिकार २००५ मध्ये कलम २(च) मधील तरतुदीमध्ये उपलब्ध असलेली माहिती पुरविणे अभिप्रेत असून जेथे वेगळयाने माहितीचे संकलन, संशोधन पृथ:करण करणे आवश्यक आहे, अशा स्वरूपाची माहिती पुरविणे अभिप्रेत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.०५.०१.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०७.०२.२०११ रोजी देण्यात आला असून अपील फेटाळण्यात आलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ते संस्थेचे सभासद नसले तरी त्यांची दिवंगत पत्नी ही संस्थेची सभासद होती व त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने त्यांचे कब्जास कोणत्याही प्रकारे हरकत घेउ नये असे आदेश दिले आहे व त्यामुळे त्यांनी सभासदत्व का नाकारण्यात आले याबाबतची माहिती मागितली होती.

३. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता / अर्जदार हे संस्थेचे सभासद नाही. सहकारी संस्थेचे सभासद असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३२ प्रमाणे संस्थेची माहिती त्या कलमामध्ये दिलेल्या संदर्भामध्ये मागता येते. परंतु अपिलकर्ता हे संस्थेचे सभासद नाही व अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती माहिती संस्थास्तरावरील आहे व संस्था ही सदरची माहिती उपनिबंधक यांचेकडे कधीही पाठवित नाही व संस्थेने पाठवावी अशी तरतूद सुध्दा नाही. तसेच सहकारी गृह निर्माण संस्थेस शासनाचे अनुदान व सवलती दिल्या नसल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी सुध्दा त्या संस्थेस लागु होत नाहीत. त्यावर अपिलकर्ता यांनी

पुन्हा युक्तीवाद करताना सांगितले की, अधिनियमात कलम २(च) प्रमाणे जन माहिती अधिकारी किंवा सार्वजनिक प्राधिकरण हे अंमलात असलेल्या कायदयाच्या तरतुदीनुसार एखादया खाजगी निकायांशी संबंधित माहिती उपलब्ध करुन घेउ शकते तर त्या कागदपत्रांचा समावेश हा माहितीच्या व्याख्येत होतो व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सहकारी संस्थेकडून मागितलेली माहिती, माहिती या व्याख्येमध्ये उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु पुन्हा त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संस्थेला उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयात देणे बंधनकारक नसल्यामुळे ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कारवाई करुन सुध्दा उपलब्ध करुन देता येणार नाही व अपिलकर्ता हे सभासद सुध्दा नाही.

४. ज्या सहकारी संस्थेस शासनाकडून अनुदान उपलब्ध होत नाही किंवा कोणत्याही प्रकारची सवलत मिळाली नाही तर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागु होत नाही असा निर्णय मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिला आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २३.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०३२८/अपील क्र.६७८८/०२**

**श्री.सुरेश कमळाकर पाटील**
**१/६१, प्रकल्प सोसायटी,**
**जुनी एम.एच.बी.कॉलनी, गोराई रोड,**
**बोरीवली (प), मुंबई ४०० ०९१.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा करनिर्धारक व संकलक,**
**करनिर्धारक व संकलक खाते,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य इमारत,**
**तळ मजला, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप करनिर्धारक व संकलक,**
**करनिर्धारक व संकलक खाते,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य इमारत,**
**तळ मजला, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२०.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, करनिर्धारक व संकलक यांचेकडे CHODE/ACT 2182 दि.१८.०५.२०१० नुसार (मा.स्पेशल कोर्ट, लाचलुचपत खाते, मुंबई यांच्या दि.३०.०४.२००७ च्या निकालानुसार) माझ्या विरुध्द लावण्यात आलेल्या आरोपातून निष्कलंक मुक्तता केल्यावर प्राथमिक चौकशी १९८७-८८ झाली असताना पुन्हा प्राथमिक चौकशी व तदनुसार खाते निहाय चौकशी आरंभिली असताना. खाते निहाय चौकशी बंद करुन आरोप पत्र मागे घेण्यात आले हे सत्य आहे काय इत्यादी माहिती एकूण सात मुदयांमध्ये मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी ०६.१२.१८८८ ते १२.०९.२००७ व १३.०९.२००७ ते आजतागायत (२०.०७.२०१०) असा आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.०९.०८.२०१० रोजी अपिलकर्ता यांना मुदये निहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून

येते.  परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२४.०८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.  प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२३.०९.२०१० रोजी देण्यात आला असून प्रश्न २(ब) बाबत चौकशी खात्यास सादर केलेल्या प्रस्तावाच्या व चौकशी खात्यातुन झालेल्या अभिप्रायांच्या व त्या अनुषंगाने संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रती तसेच प्रश्न ३(इ) संदर्भातील पदोन्नती समिती समोर अग्रेशित केलेल्या प्रस्तावाची छायांकित प्रत देण्याचे निर्देश देण्यात आले आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यानंतर अपिलकर्ता यांना दि.३०.०९.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली येते.  पंरतु अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे व त्या व्दितीय अपील मेमोमध्ये त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भामध्ये अनियमितता झाली असल्यामुळे बँकेच्या दराने व्याज देण्याकरिता तसेच मानीव पदोन्नती देण्याकरिता व्दितीय अपील दाखल केले आहे असे कारण दिलेले आहे.

२. अपिलकर्ता यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भामध्ये निर्णय प्रक्रियेबद्दल युक्तीवाद केला व मागितलेली माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध झाली हे मात्र मान्य केले.  तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा अपिलकर्ता यांना त्यांनी मुद्दयेनिहाय मागिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये सर्व कागदपत्रे विहित मुदतीतच उपलब्ध करुन दिली आहे असे सांगितले.

३. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे माहिती ही कागदपत्रांच्या छायांकित प्रतींच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.  कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेमध्ये गुणवत्तेबाबत चौकशी करुन कारवाई करुन देण्याचे आदेश देणे हे अपेक्षित नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २३.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०२६४/अपील क्र.७०७०/०२**

**श्री.गुलाम वारीश शेख**
**रूम नं.२, घनश्यामदास कि चाळ,**
**काला किल्ला, धारावी, मुंबई ४०० ०१७. ... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**म्हाडा भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**म्हाडा भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक निरंक**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२०.०५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा यांचेकडे सन २००४ ते २००९ या कालावधीत आमदार सुरेश शेट्टी यांच्या मतदार संघामध्ये क्षेत्रात निवडून आल्यानंतर त्यांच्या फंडातून किती विकास कामे करण्यात आली. या संदर्भामध्ये एकूण ६ मुदयांमध्ये माहिती मागितली असून ती व्यक्तीश: घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.०८.०६.२०१० रोजी आपण मागितलेली माहिती संकलित करण्याचे काम सुरु आहे. संकलित करण्यात कालावधी लागण्याची शक्यता आहे. माहिती संकलित होताच आपणास निरीक्षणार्थ बोलविण्यात येईल. निरीक्षणाअंती आपणास जी माहिती आवश्यक आहे असे स्पष्ट कराल त्या माहितीच्या छायांकित प्रती प्रत रू.२/- प्रमाणे रक्कम अदा केल्यानंतर आपणास देण्यात येतील असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.३१.०७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.३०.०८.२०१० रोजी

देण्यात आला असून प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे अपील निकाली काढण्यांत आले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी उपस्थित राहू शकत नाही असे कळविले आहे, परंतु दि.१५.०६.२०११ रोजी लेखी युक्तीवाद आयोगाकडे दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील काही नस्त्यांचे निरीक्षण केले आहे व गावावरुन परत आल्यावर उर्वरित अभिलेख्यांचे निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेईल असे म्हटलेले आहे. मात्र निरीक्षण केल्यानंतर विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असे त्यांना अनुपस्थितीमध्ये जन माहिती अधिकारी यांना आदेश दयावेत असे म्हटले आहे.

३. परंतु अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२०.०५.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.०५.२०१० रोजी म्हणजे विहित मुदतीत मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये निरीक्षण करुन आवश्यकत्या कागदपत्रांचा प्रती पृष्ठ रू.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे व अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती पाच वर्षाच्या कालावधीतील अतिशय विस्तृत प्रमाणात असल्यामुळे निरीक्षणास विलंब होणे हे ही अपरिहार्य असल्यामुळे व अपिलकर्ता हे स्वत: निरीक्षण अपूर्ण ठेउन गावी निघून गेले असल्याने विनामुल्य माहिती देण्याचे आदेश देता येणे योग्य होणार नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २३.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०३३८/अपील क्र.६४५०/०२**

**श्री.अर्जुनलाल एम.छाब्रिया**
**बेले व्हिस्ता, फ्लॅट नं.१५,**
**३ रा मजला, लेक व एल.आय.सी.ऑफीसमोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०९.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता यांच्यावतीने त्यांचे प्रतिनिधी उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.०८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग यांचेकडे दि.२३.०३.२०१० रोजी त्यांनी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये व कारवाईच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांने दि.२९.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिला नसल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता हे वकील असल्यामुळे व त्यांचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार माहिती मागवून देण्याचा व्यवयास आहे असे दिसते व त्यामुळे ते त्यांच्या अनेक अपीलांच्या सुनावणीसाठी स्वत: हजर न राहता कायम प्रतिनिधी पाठवत असतात. अपिलकर्ता यांचा माहितीचा अर्ज प्रथम अपील व व्दितीय अपीलामध्ये अनेक परिच्छेदामधून एकच माहिती पुन्हा पुन्हा पुनरावृत्ती करुन मागितलेली असते व त्यातून कारवाई करुन मिळण्याची सुध्दा मागणी असते. एकच तक्रार ते मंत्री महोदयांपासून तर संबंधित पोलीस स्टेशन पर्यंत जे अधिकारी असतील त्या सर्वांकडे दाखल केलेली असते. त्या सर्वांकडे दाखल केलेल्या एकच तक्रारीचा सर्व परिच्छेदांमध्ये उल्लेख असतो. त्यामुळे त्यांचे अर्ज

अपील हे अर्धन्यायीक तत्वा प्रमाणे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नसतात व त्यामुळेच प्रत्येक कार्यालयात सुध्दा त्यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये प्रक्रिया होण्यास विलंब तरी किंवा दुर्लक्ष तरी होते. माहिती मागण्याचा अधिकार मिळाला याचा अर्थ कोणत्याही स्वरुपात अर्ज, अपील दाखल करणे असे होत नाही. मागितलेल्या माहितीचे वर्णन किंवा कागदपत्रांचे वर्णन हे थोडक्यात करुन त्यांच्या छायांकित प्रती मागणे असे, सुटसुटीत अर्ज करणे अपेक्षित असते व त्यामुळे अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात एखादया माहिती अधिकारी यांनी दखलच घेतली नसेल तर त्यास दोषी धरता येणार नाही.

३. मात्र आयोगाची नोटीस गेल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित न राहणे हा आयोगाचा अवमान असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपीलाच्या सुनावणीस गैरहजर असल्याबाबत आयोगास खुलासा सादर करावा तसे न केल्यास शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**२. अपिलकर्ता यांच्या दि.२३.०८.२०१० च्या अर्जामध्ये उल्लेख केलेल्या दि.२३.०३.२०१० च्या तक्रारीच्या संदर्भात गृह विभाग, मंत्रालयात काय कार्यवाही झाली, याबाबतची माहिती अपिलकर्ता यांना कळविण्यात यावी.**

**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २३.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अवये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०१०/३००९/तक्रार क्र.१५८५/०१**

**श्री.एरॉल सिक्वेरा**
**३ ए, पृथी निवास, प्रभात कॉलनी,**
**सातांक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५. ... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (इ व का)**
**महानगरपालिका, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५. ... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**तक्रारीचा दिनांक २५.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १९.०४.२०११**
**तक्रारदार - हजर, जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.२१.१०.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) अन्वये अपील क्र.२०२०/७४७/०२ मधील दि.०८.०४.२०१० चे निर्णयातील आदेशाप्रमाणे अपिलकर्ता यास जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का), श्री.वि.जे.देसाई यांनी अपिलकारास माहिती पुरविलेली नाही. आयोगाच्या दि.१८.१२.२००८ च्या आदेशाचे पालन केले नाही. विलंबाबाबत श्री.देसाई यांना दि.१८.१२.२००८ च्या आदेशान्वये रू.१५,०००/- ची शास्ती लादलेली आहे त्या व्यतिरिक्त या आदेशान्वये रू.१०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदर ची रक्कम ही श्री.देसाई यांच्या वेतनातून दोन समान मासिक हप्त्यात वसूल करावे. सदर शास्तीची वसूली श्री.देसाई यांच्या मे २०१० पासून सुरु करावी असे आदेश दिलेले असताना माहिती दिली नाही म्हणुन व त्या आदेशांचे पालन केले नाही म्हणुन तक्रार केली आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी दि.२५.११.२०१० रोजी स्मरण पत्र दिले आहे. त्या संदर्भामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.वि.जे.देसाई यांचा आयोगाकडून खुलासा मागविण्यात आला होता. त्यामध्ये ऑगस्ट २००६ पासून नोव्हेंबर २००८ पर्यंत सहा.अभियंता (इ व का) विभागात एच/पूर्व विभागात कार्यरत होतो. सन २००८ पासून पदोन्नती पी/दक्षिण विभागात झाली असून सध्या पी/दक्षिण विभागात कार्यरत आहे. सन २००६/०८ पर्यंतच्या आलेल्या सर्व माहिती अधिकार अर्जाचा जन माहिती अधिकारी यांना त्यांने निपटारा केला होता. संबंधितांना आवश्यक माहिती पुरविली होती. एरॉल सिक्वेरा याची माहिती बाबत रू.१५, ०००/- दंड आकारण्यात आला होता. त्यानंतर सन

२००९ मध्ये याच प्रकरणात तक्रार केली होती. माहिती मागितलेली होती. एच/पूर्व विभागाचा कार्यरत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेली माहिती त्यांना दिली होती तरीही त्यांचे कडून रु.१०, ०००/- चा अतिरिक्त दंड आकारण्यात आला होता. सदर दंड मासिक वेतनातून वसूल करण्यात आला होता. याबाबत पुन्हा एकदा एरॉल सिक्वेरा यांनी तक्रार केली आहे. सन २००८ पासून पी/दक्षिण विभागात पदोन्नती झाली असल्यामुळे एच/पूर्व विभागाची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही तरीही सदर बाबतची माहिती माझ्याकडून मागितली जाते. एरॉल सिक्वेरा यांना वस्तुस्थिती माहिती असूनही ते वारंवार जाणिवपूर्वक आकस बुध्दीने माझ्यावर दोषारोप करतात. सदर बाबत कोणतीही माहिती हवी असल्यास अर्जदार एच/पूर्व विभागाच्या कार्यरत जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करून शकतात असा खुलासा दिलेला आहे. पुन्हा विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का), एच/पूर्व विभाग यांनी लेखी खुलासा दि.१८.०४.२०११ रोजी दाखल केलेला आहे. श्री.प्रफुल शहा, रा.ठिकाण रुम नं.७, ८ यांनी बाल्कनीमध्ये केलेल्या अनधिकृत बांधकामाचे या कार्यालयामार्फत दि.०२.०७.२०१० व सदर बाल्कनीस मनपा अधिनियम ३५१ अन्वये नोटीस क्र.स.आ.एच/पू/३५१/४४६/स.अ.(इ व का), दि.१८.१०.२०१० रोजी बजावून तसेच नोटीसीची मनपा चौकशी नुसार प्रक्रिया पुर्ण करुन दि.२५.०३.२०११ रोजी निष्कर्षनाची कारवाई स्थानिक पोलीस ठाण्याची मदत घेउन करण्यात आली आहे. तसेच सदर रुम नं.७ व ८ चे एकत्रिकरण केल्याबाबत सदर मालक / ताबेदार यावर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये ५३ (१) ची नोटीस बाजावून पुढील कारवाई करता स्थानिक पोलीस ठाणे या कार्यालयाचे पत्र दि.११.०३.२०११ अन्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच श्री.एरॉल सिक्वेरा यांच्या सदनिकेत होणा-या गळतीबाबत या कार्यालयातर्फे मनपा अधिनियम ३८१ अन्वये नोटीस सदर मालक/ताबेदारास बजावण्यात आली असून सदर नोटीस न्याय प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता पाठविण्यात आली आहे. तसेच एरॉल सिक्वेरा यांना योग्य उत्तरासह वेळोवेळी पत्र व्यवहार झाला असल्यामुळे सदर बाबतीत एरॉल सिक्वेरा यांनी केलेले आरोप व दावे निकालास खोटे असून श्री.प्र फुल शहा व एरॉल सिक्वेरा यांच्यात आपआपसातील वाद विवाद असल्यामुळे श्री. एरॉल सिक्वेरा हे महानगरपालिकेचा साधन म्हणुन वापर करित आहे. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.देसाई हे दि.०३.११.२००८ रोजी या कार्यालयातून पदोन्नतीमुळे बदली कार्यकारी अभियंता, पी/दक्षिण विभाग येथे झाली असल्यामुळे

त्यांच्यावर लादलेल्या शास्तीची या कार्यालयात सध्यपरिस्थिती माहिती उपलब्ध नसल्याचे कार्यालय अधिक्षक, एच/पूर्व यांच्या पत्रानुसार आढळते तर त्यांची वेतन आकारणी सध्या का.अ.पी./दक्षिण कार्यालयात केली असल्यामुळे सदर शास्तीची वसुली संबंधिची माहिती का.अ.पी/दक्षिण कार्यालयातूनच प्राप्त होउ शकेल.

२.याबाबत तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना याबद्दल कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतु विद्यमान माहिती अधिकारी यांनी जी कागदपत्रे आयोगाकडे सादर केली आहे त्या कागदपत्रांवरुन महानगरपालिकेने वेळोवेळी श्री.प्रफुल शहा यांचे संदर्भात कारवाई केली असे दिसून येते व त्या संदर्भातील कागदपत्रे सुध्दा तक्रारदार यांना वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेले दिसून येतात व तसेच तक्रारदार यांनी दि.०८.०४.२०१० रोजीच्या निर्णया संदर्भामध्ये तक्रार केली आहे असे जे म्हटले आहे की, त्यामध्ये त्यांना कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलबध करुन द्यावेत असे आदेश दिलेले नाहीत व तसेच तक्रारदार यांना वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला असल्यामुळे पुन्हा कागदपत्राचे निरीक्षक करुन देता येणार नाही. श्री.देसाई यांनी जरी त्याचे विरुध्द शास्तीची वसुली केली आहे असे म्हटलेले आहे तरीही त्या संदर्भातील माहिती ही का.अ.पी/दक्षिण कार्यालयातून उपलब्ध करुन घेउन सहा.अभियंता (इ व का), एच/पूर्व यांनी तक्रारदार यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार अशंत: मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असुन श्री.व्ही.जे.देसाई, सहा.अभियंता (इ व का) यांचेविरुध्द दि.१८.१२.२००८ च्या आदेशान्वये लादण्यात आलेली शास्तीची वसुलीच्या संदर्भात तसेच दि.०८.०४.२०१० रोजी लादण्यात आलेल्या शास्तीच्या वसुलीच्या संदर्भात सहा.अभियंता (इ व का), एच/पूर्व यांनी का.अ.पी/दक्षिण कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन घेउन तक्रारदार यांना कळवावी.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २०.०५.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५६९४/अपील क्र.६७९७/०२**

**श्री.प्रमोद एल.कदम**
**वर्सोवा अंधेरी, श्री साई को.हौ.सो.लि.,**
**प्लॉट नं.१६/डी-३, सरदार वल्लभ भाई पटेल नगर, अंधेरी (प),**
**मुंबई ४०० ०५३.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अवर सचिव (रस्ते-८)**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता**
**मुख्य अभियंता यांचे कार्यालय, मुंबई (सा.बां)**
**प्रादेशिक विभाग, २५, मर्झबान रोड, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २७.०६.२०११**
**अपिलकर्ता गैरहजर. जन माहिती अधिकारी उपस्थित (मंत्रालय),**
**जन माहिती अधिकारी उपस्थित (मुख्य अभियंता कार्यालय)**
**जन माहिती अधिकारी उपस्थित (का.अ.इमारत बांधकाम, मुलुंड)**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दाखल केलेले अपील हे त्यांच्या दि.०५.०७.२०१० रोजी दाखल केलेल्या माहितीच्या अर्जासंदर्भात असल्याने व त्याच अर्जासंदर्भात अपिलकर्ता यांनी अपील क्र.६७२७/०२ हे सुध्दा दाखल केलेले होते व त्या अपीलामध्ये दि.०५.०५.२०११ रोजी निर्णय झालेला असल्यामुळे पुन्हा त्याच अर्जासंदर्भातील व्दितीय अपीलात निर्णय करणे हे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यांत येते.

२. मात्र तरीही अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा हा दि.२५.०१.२०१० रोजी केलेला असून माहिती सुध्दा उपलब्ध करुन घेतलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.२१८६/अपील क्र.६७९५/०२**

**श्री.महेंद्र सी.म्हात्रे**
**एस/४३, प्रिंस व्हिला,**
**मालती कॉटेज, एरंगल गाव,**
**पो.मढ, मढ आयलंड,**
**मुंबई ४०० ०६१.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**(परिमंडळ-१२) शैलेंद्र नगर,**
**दहिसर, मुंबई ४०० ०६८.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
**उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,**
**कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक १३.०४.२०११**
**सुनावणीचा दिनांक २७.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर आहे.**

अपिलकर्ता यांनी दि.२८.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्याविरुध्द दि.३०.०६.२०१० रोजी दर्शनसिंग भाटीया यांनी दाखल केलेल्या तसेच दि.२७.०७.२०१० व दि.२९.०७.२०१० रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भातील झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२९.१०.२०१० रोजी मालवणी पोलीस स्टेशन कडून आलेली माहिती मुद्देनिहाय उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.०३.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.१८.१२.२०१० रोजी देण्यात आला असून नियमाने देय आहे ती माहिती पुरवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर दि.०४.०३.२०११ रोजी अपिलकर्ता यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मालवणी यांनी दिलेली माहिती पुरविण्यात आली व त्यामध्ये श्री.भाटीया यांनी त्यांचे तक्रारीची प्रत देण्यास हरकत

घेतलेली आहे असे कळविलेले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांचेविरुध्द जी तक्रार दाखल करण्यात आली व ज्या तक्रारीनुसार अटक करण्यात आली मात्र त्या संदर्भामध्ये त्यांना जामीन मिळालेला आहे. याचा अर्थ अपिलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असती तर त्यांचे विरुध्द एन्टीसिपेटरी बेलच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देता आली असती व त्यांची अटक टाळता आली असती व यावरुन माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुनच त्याची अटक टाळणे शक्य झाले नाही कारण पुरावा असता तर त्यांना जामिन मिळाला नसता व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेंविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी अशी त्यांनी आयोगाकडे विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, श्री.भाटीया यांनी दाखल केलेली तक्रार ही त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्रयस्थ पक्ष म्हणुन श्री.भाटीया यांनी हरकत घेतल्यामुळे अपिलकर्ता यांना तसे कळविण्यात आले होते व तपासाच्या बाबत मात्र जो पर्यंत तपास पूर्ण होत नाही तो पर्यंत तपासावर कोणताही विपरीत परिणाम होउ नये म्हणुन अधिनियमाचे कलम ८(१) (ज) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले होते.

३. वास्तविक पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल झाल्यानंतर सदरची तक्रार ही सार्वजनिक अभिलेख्याचा भाग होते. ती त्रयस्थ पक्षाची माहिती नाही. त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी ती त्रयस्थपक्षाने गोपनीय म्हणुन जन माहिती अधिकारी यांनी प्रकट करु नये अशी कोणतीही अट घातलेली नसते व आलेल्या तक्रारीप्रमाणे चौकशी करावयाची असल्यामुळे ती सार्वजनिक अभिलेख्याचाच भाग होते. मात्र सदरच्या तक्रारीप्रमाणे तपास करणे आवश्यक असल्यामुळे तपासाच्या संदर्भात कोणताही विपरीत परिणाम होउ नये म्हणुन ती तक्रार तसेच तपासाची माहिती उपलब्ध करुन देणे यास अधिनियमाचे कलम ८(१) (ज) प्रमाणे प्रकट केल्यास अपवाद करता येईल व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ८(१) (ज) चा आधार घेतला असल्यास ते योग्य आहे.

४. मात्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, या संपूर्ण प्रकरणामध्ये तपास होउन दि.२३.०६.२०११ रोजी आरोप पत्र सादर केले गेले असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन

देण्यास त्यांची हरकत नाही. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना आयोगाचे समक्ष सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली असून अपिलकर्ता यांनी पोच सुध्दा दिलेली आहे म्हणुन सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २७.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०८२९/अपील क्र.६७८९/०२**

**श्री.राकेश मोहनलाल उपाध्याय**
**जानकीदास चाळ, काला किल्ला,**
**धारावी, मुंबई ४०० ०१७.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-३) यांचे कार्यालय,**
**मध्य प्रादेशिक विभाग, बावला कंपाउंड,**
**डॉ.बी.ए.रोड, भायखळा (पू), मुंबई ४०० ०२७.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
**(मध्य नियंत्रण कक्ष)**
**पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-३) यांचे कार्यालय,**
**मध्य प्रादेशिक विभाग, बावला कंपाउंड,**
**डॉ.बी.ए.रोड, भायखळा (पू), मुंबई ४०० ०२७.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित, प्रथम अपिलीय प्राधिकारी गैरहजर.**

अपिलकर्ता यांनी दि.२२.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, प्रधान सचिव, गृह विभाग यांचेकडे त्यांच्या दि.१४.०५.२०१० च्या दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१०.०९.२०१० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ॲन्टॉप हिल यांनी सहा.माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त यांनी पाठविलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.१६.०९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. म्हणुन अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती ही विलंबाने प्राप्त झाली. श्री.नेटके यांनी खोटे सर्फिफिकेट मेस्त्री यांना दिले होते. एनसी देताना नेटके यांनी काही करार पत्र घेतले होते त्यांच्या प्रती त्यांना उपलब्ध करुन दयाव्यात. तसेच प्रधान सचिव कार्यालयात माहिती मागितली होती. तर त्यांनी ती माहिती देणे आवश्यक होते. तसेच जी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे त्यातुन त्यांनी काही प्रश्न आयोगापुढे उपस्थित केले आहेत.

३. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी प्रधान सचिव, गृह विभाग यांचेकडे जरी दि.१४.०५.२०१० रोजी तक्रार दाखल केली असली तरी सदरच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनकडे ती पाठविण्यात येते व त्यामुळे माहिती ही त्या संबधित पोलीस स्टेशनमध्ये उपलब्ध असते व त्यामुळे प्रधान सचिव, गृह विभाग यांचे कार्यालयातून सदरची माहिती ही उपलब्ध होउ शकत नसल्याने सदरचे अर्ज हे हस्तांतर करणे आवश्यक असते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांचा अर्ज त्यांचे कार्यालयामध्ये दि.१४.०८.२०१० रोजी प्राप्त झाला. कारण मंत्रालयीन विभागातून तो थेट संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर होउ शकत नाही. कारण मंत्रालयीन विभागामध्ये कनिष्ठ स्तरावर कोणत्या कार्यालयात माहिती उपलब्ध असेल याबाबतची कल्पना नसते व त्यामुळेच सदरचा अर्ज हा मुख्यालयाकडून पुन्हा हस्तांतर करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर होतो. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यांनी त्याबाबत पोच सुध्दा दिलेली आहे.

४. मात्र अपिलकर्ता यांनी जे मुददे उपस्थित केले आहे ते अर्थातच उपलब्ध झालेल्या माहितीच्या कागदपत्रामधुन गुणवत्तेच्या संदर्भात उपस्थित केलेले दिसून येतात. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या किंवा कार्यवाहीच्या संदर्भात, गुणवत्तेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करता येत नाही. तर जशी कार्यवाही झालेली आहे त्याप्रमाणे कागदपत्रे जे उपलब्ध असतील त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे व जन माहिती

अधिकारी यांनी ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २३.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.९०१/अपील क्र.६८०३/०२**

**श्री.वैद्य मधुकर किसनराव क्षीरसागर**
**सोमेश कॉलनी, कलामंदिर मागे, नांदेड**
**जि.नांदेड ४३१ ६०१.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (आयुर्वेद कक्ष),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (आयुर्वेद कक्ष),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २४.१२.२०१०**

**सुनावणीचा दिनांक २८.०६.२०११**

**अपिलकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.०६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव/कार्यासन अधिकारी यांचेकडे वैद्य मधुकर किसनराव क्षीरसागर यांचे राजिनामा परत घेण्याची विनंती नामंजुर करणेबाबत घडलेल्या अनियमिततेची माहिती मिळणे आणि १९७८ पासून नामनिर्देशन सहित सेवा कालावधी संलग्नित करुन प्रपाठक पदोन्नती, मानीव दिनांक व प्राध्यापक पदोन्नती देउन रुजू करणेबाबत शासन निर्णय काढण्याची माहिती मिळणेबाबत अर्ज केला. माहितीचा कालावधी सन १९७८ ते २०१० असा असून शिघ्र टपालाव्दारे माहिती घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सोबतच्या तपशिलामध्ये एकूण ८ मुद्ये उपस्थित केलेले दिसून येतात. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी दि.०९.०८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा मिळाला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे प्रस्तुत व्दितीय अपील दाखल केले आहे.

२.अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, अद्याप पर्यंत कोणतीही माहिती मिळाली नाही व कोणताही पत्र व्यवहार जन माहिती अधिकारी यांनी केला नाही. जन माहिती

अधिकारी आज गैरहजर आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जी कागदपत्रे दाखल केली आहे ती सर्व कागदपत्रे ही अपिलकर्ता यांनी दि.१६.११.२०१० रोजी दाखल केलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात असुन प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा त्याच अर्जाच्या संदर्भात आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांच्या दि.२३.०६.२०१० च्या अर्जाप्रमाणे काय कार्यवाही केली ही बाब आयोगाकडे सादर केली नाही व त्यामुळे दि.२३.०६.२०१० च्या अर्जाच्या संदर्भामध्ये झालेल्या कारवाई च्या बद्दल काहिहि माहिती आयोगापुढे सादर झाली नाही. अपिलकर्ता यांच्या अर्जामध्ये विश्लेषन करुन अभिप्राय मागितलेली दिसून येतात. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये गुणवत्तेबाबत जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागता येत नाही व तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या संदर्भात असलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले असल्याने सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांच्या संदर्भामध्ये वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे जे प्रकरण ज्या दिनांकापासून व वर्षापासून सुरू झाले आहे त्या नस्तीतील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिष्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात**

**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५००३३/अपील क्र.६८०५/०२**
**मुमाआ.नो.क्र.५००३४/अपील क्र.६८०६/०२**

**श्री.वसंतराव भागुजी जाधव**
**७, युनायटेड हाउस, जे.के.सावंत मार्ग,**
**माहिम, मुंबई ४०० ०१६. ... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**प.डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ,**
**विद्यापीठ इमारत, प्लॉट नं.५०,**
**सेक्टर-१५, सी.बी.डी, बेलापूर,**
**नवी मुंबई ४०० ६१४. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**प.डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ,**
**विद्यापीठ इमारत, प्लॉट नं.५०,**
**सेक्टर-१५, सी.बी.डी, बेलापूर,**
**नवी मुंबई ४०० ६१४.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २८.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी रजिस्ट्रार, डी.वाय पाटील डिम्ड विद्यापिठ यांचेकडे दि.२६.०७.२०१० रोजी अर्ज करुन १. डी.वाय.पाटील (रामराव आदीक एज्युकेशन सोसायटी डी.वाय.पाटील इन्स्टिटयूट) सिडकोकडुन नेरुळ व सीबीडी बेलापूर येथे किती चौरस मिटर जागा मिळाली आहे. २. ती जागा किती वर्षाच्या लिज करारावर मिळाली आहे. तसेच प्रती वर्षी प्रती चौरस मिटर भाडे किती ३. नेरुळ येथे क्रिकेट स्टेडियम उभारताना ती जागा सिडकोकडून क्रिकेट स्टेडियमसाठी कि खेळाच्या मैदानासाठी मिळालेली आहे. ४.आय.पी.एल साठी नेरुळ येथील स्टेडियम भाडयाने देताना किती भाडे आकारले जाते (एका दिवसाचे किती व संपूर्ण मॅचचे किती) ५. नेरुळ येथील क्रिकेट स्टेडियमचे खालील कालावधीचे विज बिल किती दि.०१.०१.२००८ ते दि.३१.१२.२००८, दि.०१.०१.२००९ ते दि.३१.१२.२००९ आणि दि.०१.०१.२०१० ते दि.३०.०६.२०१०.

तसेच दि.२३.०७.२०१० च्या माहिती अर्जान्वये सन २००९-२०१०-२०११ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम वर्ष एम.बी.बी.एस.ला प्रवेश घेण्या-या विद्यार्थ्याच्या संदर्भात तसेच एन.आर.आय.कोटयातून दिलेल्या प्रवेशांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

दोन्ही अर्जाच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांना अनुक्रमे दि.१२.०८.२०१० व दि.२१.०८.२०१० रोजी पद्मश्री डॉ डी.वाय पाटील विद्यापीठ हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी खाली येत नाही. तसेच अधिनियमाच्या कलम २(ज) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण सुध्दा नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु दोन्ही उत्तरांमुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी अनुक्रमे दि.०६.०९.२०१० व दि.१३.०९.२०१० रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली आहे. दोन प्रथम अपीलांच्या संदर्भात वरील प्रमाणेच निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन व्दितीय अपीले दाखल केलेली आहे.

दोन ही व्दितीय अपीलाच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी सांगितले की, डी.वाय.पाटील विद्यापीठ हे संसदेने पारित केलेल्या विद्यापीठ अनुदान कायदयाने स्थापन झाले आहे व त्यामुळे त्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात व त्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यावर विद्यापीठातील आलेल्या प्रतिनिधीने आयोगापुढे असे सांगितले की, राज्य माहिती आयोगाचे कोकण खंडपीठानी दिलेल्या निर्णयाप्रमाणे डी.वाय.पाटील डिम्ड विद्यापीठामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती झाली असून माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणतीही हरकत नाही. असे असल्यास अपिलकर्ता यांच्या दोनही अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सदरची दोन्ही अपीले ही मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांची अपील क्र ६८०५ व ६८०६ ही दोन्ही अपीले मंजूर करण्यात येत असून दि.२६.०७.२०१० व दि.२३.०७.२०१० च्या दोन्ही माहिती अर्जाच्या संदर्भामध्ये हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांना विनामूल्य रजिस्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.

Sd--

(विलास पाटील)

राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २८.०६.२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.४७७३८/अपील क्र.६८०४/०२**

**श्री.प्रमोद गोविंद चोगले**
**१९-२, चोगले हाउस, एल.टी.रोड,**
**बाभई, बोरीवली (प), मुंबई ४०० ०९२. ... अपिलार्थी**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त (बाजार)**
**म.ज्योतिबा फुले मंडई, १ ला मजला,**
**डी.एन.रोड, मुंबई ४०० ००१. ... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अधिक्षक बाजार (प.उप)**
**३ रा मजला, आर.के.पाटकर मार्ग,**
**भाभा हॉस्पिटल जवळ, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक २६.०३.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २८.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०३.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा.प्रबंधक बाजार (पश्चिम उपनगरे) यांचेकडे Information in respect of Zunka Bhakar Kendra (Kalpatru Charitable & Religious Trust Mumbai ) Act Municipal Market, S.V. Rd Borivali (W), Mumbai 92 च्या संदर्भात व्यक्तीश: माहिती घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.२०.११.२००९ रोजी मागितलेली माहिती कल्पतरु झुनका भाकर केंद्राच्या साक्षांकित केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रत्येक प्रतीस रु.२/- प्रमाणे शुल्क आकारुन सदर पत्र मिळतास ७ दिवसांच्या आत कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.०३.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु त्यानंतर मात्र अपिलकर्ता हे स्वत: दि.१४.१२.२००९ रोजी कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांना खर्चाचा भरणा करुन माहिती

उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु काही कागदपत्रे दि.०८.१२.२००९ रोजी कार्यवाही करता वरिष्ठाकडे सादर करण्यात आली असल्यामुळे त्यावेळी उपलब्ध होउ शकली नव्हती. त्याप्रमाणे पुन्हा अपिलकर्ता यांच्या अपीलाची सुनावणी दि.१७.१२.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावर निर्णयात आदेश नमूद केल्यानुसार दि.१२.०१.२०१० रोजी अपिलकर्ता यांना कळविण्यात आले व एकूण ६१ प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य माहिती देण्यात आली. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करताना मागितलेली माहिती दिली नाही व कलम ४ प्रमाणे सुध्दा माहिती ही प्रसिध्द केलेली नाही असे कारण देउन व्दितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलकर्ता यांचे वकील यांनी वकील पत्र दाखल न करता आयोगापुढे युक्तीवाद केला. त्यामध्ये त्यांनी कल्पतरू चॅरिटेबल व रिलीजीयस फोरम च्या संदर्भात माहिती दिली व कल्पतरू चॅरिटेबल व रिलीजीयस ट्रस्ट च्या संदर्भात माहिती दिली नाही व तसेच चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिली असा युक्तिवाद केला. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचेपुढे युक्तीवाद करताना सांगितले की कल्पतरू चॅरिटेबल व रिलीजीयस फोरम ही पुर्वीची संस्था होती व त्यानंतर ती कल्पतरू आणि चॅरिटेबल रिलीजीयस ट्रस्ट झाली असावी. कल्पतरू चॅरिटेबल व रिलिजीयस फोरम यांमध्ये सुध्दा श्री.प्रमोद गोविंद चोगले हे एक सदस्य आहेतच व सदरची कागदपत्रे ही त्यांचे कार्यालयाची नसून कल्पतरू चॅरिटेबल आणि रिलिजीयस ट्रस्टने सादर केलेल्या कागदपत्रांपैकीच आहे. त्यामुळे त्यासंदर्भात एकाच नस्तीमध्ये जी कागदपत्रे उपलब्ध आहेत ती सर्व कागदपत्रे अपिलकर्ता यांनी स्वत: निरीक्षण करुनच घेतली आहे व त्यामुळे दिशाभूल करुन देण्याचा किंवा चुकीची माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उदभवत नाही असे सांगितले.

३. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना जी सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिली आहे ती कल्पतरू चॅरिटेबल आणि रिलीजीयस ट्रस्टच्या संदर्भात आहेत. एकच दस्तऐवज हा फोरमच्या संदर्भात आहे. यावरुन फोरमचे ट्रस्टमध्ये रुपांतर झालेले असल्यामुळे पुर्वीचा संदर्भ म्हणुन श्री.चोगले यांनी दाखल केलेली कागदपत्रे दिसून येतात. यावरुन अपीलकर्ता यांना

कोणतीही दिशाभुल करणारी व चुकीची माहिती दिली नाही असा निष्कर्ष काढून सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील निकली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/१२५८/तक्रार क्र.२६४/०१**

**श्री.कैलास देवराम पाटील**
**७, भुषण कॉलनी,**
**विनोद भोजनालया समोर,**
**जळगांव.** **... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य**
**एस.एस.बी.टी.चे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय,**
**बांभोरी, जळगांव ४२५ ००१.** **... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक ३०.०६.२०११**
**तक्रारदार - गैरहजर,**
**जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.२१.०५.२०११ रोजी विना अनुदानीत महाविद्यालयांना म्हणजे ट्रस्ट यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असा निर्णय आपण दिला आहे. मात्र त्यापूर्वी अपील क्र.८५०२ मध्ये दि.०७.१०.२०१० रोजी माहिती द्यावी असा निर्णय दिला असल्यामुळे यात कोणता निर्णय योग्य आहे याबद्दल त्यांनी आयोगाकडेच तक्रार केलेली आहे. त्याच प्रमाणे त्यांनी त्याच दिवशी पुन्हा राज्य माहिती आयोगाचे कार्यालयावर आरोप करणारे असे पत्र लिहिले आहे व त्यामुळे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, बांभोरी या विद्यालयाला नोटीस काढून त्यांचे निर्णय मागविले होते. त्यामध्ये अपिलकर्ता यांना वेळोवेळी माहिती पुरविलेली आहे ती तारीख व पत्र क्रमांक हे त्यांनी आयोगापुढे सादर केले आहे. त्याचप्रमाणे रिट पिटिशन नं.५१३२/ २००८ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाने नगरयोग शिक्षण संस्था आणि त्या अंतर्गत असणारे यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ इजिनिअरींग हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(४) प्रमाणे पब्लीक ऍथोरीटी नसल्याने माहितीचा अधिकार २००५ हा विना अनुदानीत अभियांत्रिकी महाविद्यालयास लागू नसल्याचा महत्वपूर्व निकाल दिला आहे. असोसिएशन मॅनेजमेंट ऑफ अनऐडेड इंजिनिअरींग कॉलेजेस (महा) ही संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयाची संघटना आहे. सर्व सभासद महाविद्यालय ही कायम स्वरुपी विना अनुदानीत तत्वावर चालणारी आहे. त्यामुळे ही सर्व सभासद महाविद्यालये माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(H) प्रमाणे पब्लीक ऑथोरीटी नाही या कारणास्तव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या सर्व विना अनुदानीत अंभियांत्रिकी महाविद्यालयास लागू नसल्याचे स्पष्ट होते. या कारणास्तव माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत येणा-या अर्जाला उत्तर देणे इत्यादी कामे विना अनुदानीत अभियांत्रिकी महाविद्यालयांना बंधनकारक नाही. तसेच राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ यांनी संस्थेचे माजी कर्मचारी श्री.संजय सिनकर यांच्या अपीलात माहिती अधिकार विना अनुदानीत महाविद्यालयास लागू नसल्याचा निर्णय दिला आहे. अशा प्रकारचा खुलासा केला आहे.

२. राज्य माहिती आयेगाने सुरुवातीला महाविद्यालयांना त्यात (विना अनुदानीत) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू करून माहिती दयावी म्हणून निर्णय दिले आहेत. परंतु यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ इंजिनिअरींग नगरयोग शिक्षण संस्था यांनी राज्य माहिती आयोगाच्या निर्णयास मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांचेकडे आव्हान दिलेले होते व मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी विना अनुदानीत महाविद्यालयांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नाही असा निर्णय दिला असल्यामुळे व जो पर्यंत तो निर्णय कायम आहे तो पर्यंत महाराष्ट्र राज्यामध्ये त्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्णय देणे बंधनकारक आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची संविधानीक व कायदेशीर तरतुदीची माहिती करुन न घेता आपल्याला लिहिता येते म्हणुन कोणत्याही प्रकारचे आरोप कोणत्याही संस्थेवर करणे ही प्रवृत्ती कायदयाचे राज्य न मानण्याचीच आहे व त्यामुळे सदरची तक्रार ही निकाली काढण्यात येते.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही निकाली काढण्यांत येते.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३०.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/१०६६/तक्रार क्र.२११/०१**

**श्री.मोहम्मद अफजल**
**सी-५०८, आकार, कल्याण कॉम्प्लेक्स,**
**यारी रोड, अंधेरी (प), मुंबई ४०० ०६१.** **... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**इमारत प्रस्ताव विभाग (WS)**
**म्युनिसिपल ऑफीस, १ ला मजला,**
**आर.के.पाटकर मार्ग,**
**भाभा हॉस्पीटलच्या पुढे, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक २९.०६.२०११**

**तक्रारदार - हजर,**

**जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.१९.०५.२०११ रोजी जन माहिती अधिकारी इमारत व प्रस्ताव विभाग, (WS) बांद्रा (प) यांनी दि.१९.०३.२०११ च्या अर्जाच्या प्रमाणे दि.२३.०३.२०११ रोजी आयोगात तक्रार क्र.१५६/०१ मध्ये आयोगाने दिलेल्या निर्णयाच्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणुन अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केली आहे.

२. तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी जी माहिती दिली आहे ती अपूर्ण आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, तक्रारदार यांनी जी माहिती मागितली होती त्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ज्या इमारतीच्या संदर्भात भोगवटा प्रमाणपत्र दिले नाही व त्यांना मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५३ (A) प्रमाणे नोटीस दिलेली आहे. अशा सर्व इमारतींची माहिती दि.२६.०५.२०१० व दि.२८.०६.२०११ रोजी उपलब्ध करुन दिली आहे. त्यावर पुन्हा तक्रारदार यांनी आयोगास सांगितले की, भोगवटा प्रमाणपत्र हे अनेक इमारतींना दिलेले नसुन सुध्दा काही ठराविक इमारतींच्या संदर्भातच नोटीस दिलेली आहे याचा अर्थ विशिष्ट हेतू ठेउनच नोटीस दिली जाते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई मध्ये अनेक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. मात्र ज्या इमारतीच्या संदर्भामध्ये तक्रार येते त्याच इमारतीच्या संदर्भामध्ये नोटीस दिली

जाते. अन्यथा सर्व इमारतींना तशी नोटीस दिल्यास भोगवटा दाराना त्रास होण्याचा संभव असतो. परंतु तक्रारदार यांनी विशिष्ट इमारतींच्या संदर्भामध्ये जी नोटीस दिली आहे त्यामध्ये सुध्दा विकासकाच्या सदनिकेच्या संदर्भात नोटीस दिली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी पुन्हा आयोगास सांगितले की, त्या संदर्भात चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन दिली जाईल. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अशंत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत असून पॅराडाईस हाईट व्हिलेज ओशिवरा अंधेरी (प) या इमारतीमध्ये विकासकाच्या किंवा इतर दोन सदनिकांना कलम ३५३ (A) प्रमाणे नोटीस का दिलेली नाही याबाबतची चौकशी करुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३०.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**
**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/१०६७/तक्रार क्र.२१२/०१**

**श्री.मोहम्मद अफजल**
**सी-५०८, आकार, कल्याण कॉम्प्लेक्स,**
**यारी रोड, अंधेरी (प), मुंबई ४०० ०६१.** **... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक २९.०६.२०११**

**तक्रारदार - हजर,**

**जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.१९.०५.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाने तक्रार क्र.१३८/०१ च्या दि.१९.०४.२०११ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) प्रमाणे तक्रार करण्यात आली आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही नगर विकास विभागाकडे उपलब्ध नसते तर ती माहिती उद्योग विभागाकडे उपलब्ध असते व महानगरपालिकेच्या संदर्भातील माहिती ही त्या त्या महानगरपालिकेकडे उपलब्ध असते.

३. तक्रारदार यांनी नगर विकास विभागाकडे दि.१५.०१.२०११ रोजी दिलेला माहितीचा अर्ज नोंद वहीमध्ये दि.१८.०१.२०११ रोजी नोंदण्यात आला आहे. परंतु त्यानंतर नोंदणी शाखेतील माहिती अधिकारी उ.ना.पाटील (कक्ष अधिकारी) यांनी नवि-२६ कक्षाकडे पाठविल्याचे दिसून येते. तथापी नवि-२६ कार्यासनाने सदर अर्ज स्विकारल्याबाबत कोणतीही पोच आढळून येत नाही व उ.ना.पाटील हे दि.२८.०२.२०११ पासून कार्यासनात अनुपस्थित आहे व त्यामुळे श्री.पाटील यांनी पुढे कोणती कार्यवाही केली याबाबत अभिलेखावर कोणतीही माहिती उपलब्ध नाही. तसेच राज्य माहिती आयोगाची दि.१९.०४.२०११ ची सुनावणीची नोटीस दि.२४.०३.२०११ रोजी नगर विकास विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येते. परंतु नवि-२६ कार्यासनाने सदर सुनावणी नोटीस त्यांचेशी संबंधित नसल्याने नोंदणी शाखेस परत केली. परंतु आता अर्जदाराच्या मुळ माहिती अर्जाची प्रत राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून

प्राप्त झाल्याने व मागितलेली माहिती ही उद्योग, उर्जा व कामगार विभागाशी संबंधित असल्याने त्या विभागाकडे अग्रेषित करण्यात आलेला आहे व मुद्दा क्र.२ व ३ विविध महानगरपालिकेशी संबंधित असल्याने त्यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी अग्रेषित करण्यात आला आहे व त्यामुळे नगर विकास विभागाकडून जाणिव पूर्वक कोणतेही दुलक्ष झाले नाही म्हणुन अर्जातील विषयाबाबत संदिग्धता असल्याने अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्याचे दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांचे खुलाशा वरुन नगर विकास विभागातील नोंदणी शाखेतील अधिकारी किंवा कर्मचारी हेच दोषी आढळून येतात. कोणताही अर्ज, तक्रार प्राप्त झाल्यानंतर ती विषयाप्रमाणे संबंधित शाखेकडे किंवा कार्यासनाकडे योग्य रितीने हस्तांतर करणे ही नोंदणी शाखेची जबाबदारी आहे व त्यामुळे नोंदणी शाखेतील अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाई आवश्यक आहे.

४. तक्रारदार यांचा माहितीचा अर्ज हा उद्योग विभागाकडे हस्तांतर केलेला असल्यामुळे उद्योग विभागाने त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. सध्याची तक्रार ही नगर विकास विभागाच्या विरुध्द असल्याने व उद्योग विभागाच्या संदर्भात कोणतीही माहिती नसल्याने नगर विकास विभागास नोटीस काढण्यात आली होती व त्यामुळे आज उद्योग विभागाचे अधिकारी उपस्थित नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी उद्योग विभागाकडून माहिती मिळाली नसल्यास आयोगाकडे त्या विभागाच्या माहिती अधिका-यांच्या विरुध्द माहितीचा अर्ज जोडून तक्रार करणे संयुक्तीक होईल. तसेच ज्या महानगरपालिकांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसेल त्या महानगरपालिकेच्या संदर्भात तक्रार करणे योग्य राहिल. मात्र सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही निकाली काढण्यांत येते.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३०.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/१२५९/तक्रार क्र.२६५/०१**

**श्री.अरूण पांडुरंग चौधरी**
**पांडुरंग २१, ब आनंदनगर,**
**पिंप्राळा रेल्वे गेट जवळ, जळगांव. ... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,**
**चर्चगेट, मुंबई. ... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक ३०.०६.२०११**

**तक्रारदार - गैरहजर,**

**जन माहिती अधिकारी यांचेवतीने प्रथम अपिलीय प्राधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.२०.०५.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या दि.१०.०३.२०११ रोजी केलेल्या माहिती मागण्याच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दोन महिन्याचा कालावधी उलटून गेल्यावरही माहिती उपलब्ध केली नसल्यामुळे तक्रार दाखल केलेली आहे.

२. तक्रारदार गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. मात्र डॉ.मधु मदन, प्रबंधक व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे हजर आहेत.

३. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी हे आजारी असल्याने माहिती उपलब्ध करून देउ शकले नाही. मात्र त्यांनी आयोगापुढे कोणताही लेखी खुलासा दिला नाही व याबद्दल त्यांना फारशी माहिती सुध्दा नाही असे त्यांनी सांगितले. मात्र विद्यापिठाच्या स्टॅटीव्ह प्रमाणे निवडणुक झाल्यानंतर एक महिन्याचे आत सदरच्या निवडणुकीच्या संदर्भातील कागदपत्रे नष्ट करण्याची तरतुद आहे व तक्रारदार यांनी मात्र दि.१०.०३.२०११ रोजी माहितीचा अर्ज केलेला आहे व त्यामुळे सदरची कागदपत्रे उपलब्ध असतीलच असे नाही.

४. असे असले तरी तक्रारदार यांच्या दि.११.०३.२०११ रोजीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जी वस्तुस्थिती आहे ती अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांचे आत अर्जदारास कळविणे बंधनकारक आहे व ते कळविलेले नसल्यामुळेच विद्यापिठ माहिती लपवित आहे असा

निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास टाळाटाळ करित असल्याची आयोगाची खात्री झाली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रु.५, ०००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्ती लादण्यापुर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकूण घेणे बंधनकारक आहे. त्याकरिता आयोगाचे कार्यालयातून दि.१४.०६.२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीकरिता सुनावणीचे वेळी आपणा विरुध्द केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० प्रमाणे शास्ती का लादण्यात येउ नये याबाबतचा लेखी खुलासा सादर करावा, जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीस व्यक्तीश: हजर रहावे, अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० प्रमाणे कारवाई करण्यात येईल व एकतर्फी निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी, अशी नोटीस देउन सुध्दा जन माहिती अधिकारी ते व्यक्तीश: आयोगापुढे उपस्थित झाले नाही. तसेच त्यांनी लेखी खुलासा सुध्दा दाखल केलेला नाही किंवा विद्यापीठाकडून सुध्दा कोणताही लेखी खुंलासा दाखल करण्यात आलेला नाही. यावरुन विद्यापीठच माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करित असल्याची आयोगाची खात्री झाली आहे व त्यामुळे अर्जदारास अधिनियमाचे १९(८) (ख) प्रमाणे रु.१०, ०००/- ची नुकसान भरपाई देणे आवश्यक झाले आहे. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत तक्रारदार यांना त्यांच्या दि.१०.०३.२०११ च्या अर्जाप्रमाणे माहिती विना मुल्य रजिस्ट्रर पोष्टाने उपलब्ध करुन दयावी.**

**२. तक्रारदार यांच्या दि.१०.०३.२०१० च्या अर्जाप्रमाणे तक्रारदार यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करून दिली नसल्याने व आयोगापुढे ही ते उपस्थित न राहिल्याने व कोणताही लेखी खुलासा दाखल न केल्याने त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रु.५, ०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसूली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करण्यात यावी व**

**"लेखाशिर्ष क्र.००७-इतर प्रशासनिक सेवा**
**६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८)**
**माहितीचा अधिकार (००७००१६-१)" मध्ये जमा करण्यात यावी.**

**३. तक्रारदार यांना त्यांच्या दि.१०.०३.२०११ च्या अर्जाप्रमाणे अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरण म्हणुन SNDT**

**महिला विद्यापीठ यांनी अर्जदारास अधिनियमाचे कलम १९(८) (ख) प्रमाणे रू.१०, ०००/- नुकसान भरपाई देण्याचे आदेश देण्यात येतात.**
**४.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३०.०६.२०११
मुंबई
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/१२६०/तक्रार क्र.२६६/०१**

**श्री.जेम्स थॉमस गॉडविन**
**फ्लॅट नं.१६, ३ रा मजला, युनियन हाउस नं.२,**
**मोगल लेन, एल.जे.रोड, माहिम, मुंबई ४०० ०१६.** **... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, मुख्यालय-१,**
**मुंबई पोलीस मुख्यालय, क्रॉफर्ड मार्केट,**
**मुंबई ४०० ००१.** **... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक ३०.०६.२०११**
**तक्रारदार - हजर, जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी दि.१३.०६.२०११ रोजी त्यांचे दि.१८.०५.२०११ च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही ४८ तासात उपलब्ध करुन दिली नाही म्हणुन आयोगाकडे तक्रार केलेली आहे.

२. तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, बृहन्मुंबईतील सत्र न्यायालयाने ॲन्टीसिपेटरी बेल ॲप्लीकेशन नंबर ०१०१४२४/२०१० (सी आर नं.४११ of २०१० माहिम पोलीस स्टेशन) च्या संदर्भातील दि.२५.०१.२०११ च्या निर्णयामध्ये अर्जदारास म्हणजेच तक्रारदारास जामिन देण्यात आला आहे. परंतु तपासी अधिका-यांकडे ज्या ज्या वेळेस आवश्यक असेल त्या त्या वेळेस हजर राहाणे व तसे हजर न राहिल्यास जामिन रद्द होईल अशी अट घालण्यात आली आहे व त्यामुळेच तपासी अधिका-यांने बोलवणे असून सुध्दा तक्रारदार हजर राहून सुध्दा ते हजर झाले नाही असा प्रयत्न पोलीस ठाण्याचा दिसून येतो. जेणे करुन जामिन रद्द होउ शकतो. ते दि.२८.०९.२०१० रोजी अपीलाच्या सुनावणीस हजर होते, परंतु ते हजर नाहीत असे दाखविण्याचा प्रयत्न झाला आहे व म्हणुनच ती माहिती दि.१८.०५.२०११ रोजी

४८ तासामध्ये मिळावी कारण त्याचे स्वातंत्र्य धोक्यात आहे.  असे त्यांना वाटते म्हणुन त्यांनी माहिती मागितली होती.

३. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अर्जदार श्री.जेम्स गॉडवीन यांनी त्यांच्या दि.१८.०५.२०११ च्या माहिती अधिकारा अंतर्गतच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती कलम ७(१) मधील तरतुदीनुसार स्वातंत्र्याशी निगडीत असल्याने ४८ तासांत पुरविण्याची विनंती केलेली होती.  अर्जातील माहितीचे वर्णन विचारात घेता त्यात जीवित व स्वातंत्र्य धोक्यात आहे अशा माहितीचे स्वरूप दिसून येत नसल्याने तसेच अर्जदाराने त्यांना हवी असलेली माहिती त्यांच्या स्वातंत्र्याशी निगडीत असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जासोबत जोडलेला नव्हता.  त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराचे स्वातंत्र्य धोक्यात येण्याची कोणतीही शक्यता न दिसल्याने ४८ तास एवढया शिघ्रतेने माहिती पुरविण्याचे प्रयोजन दिसलेले नव्हते.  तरी सुध्दा माहिती लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.०५.२०१० अन्वये स्विय सहाय्यक पोलीस उपायुक्त (मुख्यालय-१) यांचे कार्यालयात, छावणी अधिकारी, नागरी सुविधा केंद्र व प्रमुख लिपीक, कक्ष-२ (नोंदणी शाखा) यांना माहिती पुरविण्याकामी लेखी पत्राव्दारे कळविले होते.  तसेच अर्जदाराच्या अर्जातील मुद्दा ९ बाबतची माहिती अन्य विभागाशी संबंधित असल्याने व त्यासाठी वेगळे माहिती अधिकारी असल्याने त्यांचा अर्ज शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (समन्वय) पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई यांना संबंधित मुद्दा क्र.९ बाबतची माहिती अर्जदारास परस्पर पुरविण्याकामी दि.२६.०५.२०११ रोजी कलम ६(३) (२) नुसार वर्ग करण्यात आला होता व अर्जदारास सुध्दा त्याबाबत कळविण्यात आले होते व त्या संदर्भामध्ये आयोगाने अर्जदाराने केलेल्या तक्रारीवर ४८ तासामध्ये मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता माहिती उपलब्ध करून देण्याची आवश्यकता नाही.  मात्र अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांमध्ये मागितलेली माहिती उलपब्ध करून दयावी असे आदेश दिलेले असल्यामुळे तक्रारदार यांना दि.१४.०६.२०११ रोजी मुद्देनिहाय उत्तर दिले आहे.  त्यांच्या अर्जातील मुद्दा A, B, C, F, K अन्वये दि.२८.०९.२०१० रोजी पोलीस आयुक्त कार्यालयात प्रवेश केलेल्या अभ्यागतांच्या नोंदी संबंधीची माहिती मागितली होती.  पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या प्रवेश

व्दारातील नागरी सुविधा केंद्र येथे सुरक्षेच्या कारणासाठी पोलीस आयुक्त कार्यालयात व गुन्हे शाखा, गुन्हा अन्वेषण विभाग येथे येणा-या सर्व अभ्यागतांची तपासणी करुन व त्यासंबंधिच्या नोंदी तयार करुन, त्यांना प्रवेश पास देउन प्रवेश दिला जातो. अभ्यागतांची माहिती उघड केल्यास गुन्हे प्रतिबंध, गुन्हे अन्वेषण आणि कायदा व सुव्यवस्था राबविण्यासाठी गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच गुन्हे अन्वेषणासाठी मिळालेली मदत उघड झाल्यास संबंधितांचे जीवित व सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता सुध्दा नाकारता येत नसल्याने अर्जदाराने मागितलेली मुद्दा A, B, C, F, K याबाबतची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८(१) (छ) अन्वये नाकारण्यात आली आहे. मात्र ती विहित मुदतीत पुरविण्यात आली आहे.

४.माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(१) अन्वये माहिती ३० दिवसांत उपलब्ध करुन दयावी अशी तरतुद आहे. मात्र जर मागितलेली माहिती, एखादया व्यक्तिचे जाणिव व स्वातंत्र्यासंबंधी असेल तर, विनंतीचा अर्ज मिळाल्यापासून ४८ तासांच्या आत ती देण्यात येईल अशीही तरतुद आहे. याचा अर्थ ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन देणे हा नियम आहे व विशिष्ट माहितीच्या संदर्भामध्ये ४८ तासामध्ये माहिती उपलब्ध करुन दयावी असे नमूद केलेले आहे हा अपवाद करण्यात आलेला आहे व त्यामुळे अपवादाच्या संदर्भामध्ये ४८ तासामध्ये माहिती का हवी आहे याबाबत कारणे देणे आवश्यक आहे व तशी कारणे किंवा पुरावा दिला नसल्यास जन माहिती अधिकारी यांनी स्वत: माहितीचे स्वरुप तपासून निर्णय घेणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय हा योग्य असल्याने ४८ तासांत माहिती दिलेली नाही याबद्दल जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत नाहीत.

त्यावर पुन्हा तक्रारदार यांनी आयोगास सांगितले की, त्यांना इतर अभ्यागतांच्याबाबत माहिती उपलब्ध करुन देता येत नसेल तर ते स्वत: उपस्थित होते किंवा नाही याबाबतची माहिती अभ्यागतांच्या नोंदीवरुन तसेच सी.सी.टी.व्ही असल्याने सी.सी.टी.व्ही चे फुटेज पाहून तक्रारदार त्यात दिसून आल्यास किंवा न आल्यास तशी त्यांना माहिती देणे संयुक्तीक राहिल. तक्रारदार यांनी त्याच दिवशी उपस्थित

राहण्याचा अर्ज दिला होता याबाबतची पोच सुध्दा त्यांनी आयोगापुढे दाखवली. त्याबाबतची ही जन माहिती अधिकारी यांनी तपासणी करुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार ही अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आत तक्रारदार यांना ते स्वत: दि.२८.०९.२०१० रोजी संबंधित कार्यालयात उपस्थित झाले होते किंवा नाही याबाबत अभ्यागत नोंद वही तपासून तसेच सी.सी.टी.व्ही चे फुटेज तपासून तसेच त्यांनी त्याच दिवशी दिलेल्या अर्जाची माहिती घेउन त्यांच्या स्वत: च्या उपस्थित राहण्याच्या संदर्भामध्ये लेखी कळवावे.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिाांक ३०.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ ाािर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/८७२/तक्रार क्र.२३०/०१**

**श्री.एस.के.नानगिया**
**७०४, गोल्डन चॅरिएट सह.गृह.संस्था (म)**
**१३३/सेक्टर ९, चारकोप, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७.** **... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (पोल-२),**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**

**तक्रारदार - हजर, जन माहिती अधिकारी - हजर.**

तक्रारदार यांनी यांच्या तक्रार क्र.७१७/०१ च्या दि.०३.०५.२०१० रोजीच्या आयोगाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणुन दि.०७.०२.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

२. त्यावर जन माहिती अधिका-यांनी आयोगाकडे खुलासा दाखल करताना तक्रारदार यांना दि.३१.०३.२०११ रोजी मुददये निहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे सांगितले. परंतु तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती देउन माहिती देण्याचे टाळाटाळ केले आहे. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०३.०४.२००० नुसार लाचलुचपत प्रतिबंध विभागामार्फत सापळा प्रकरणी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची गृह विभागात छाननी करण्यात येउन अप्पर मुख्य सचिव (गृह) यांच्या पूर्व सहमतीने सदर प्रकरण आरोपी लोकसेवकांच्या संबंधित प्रशासकीय विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविली जातात. संबंधित प्रशासकीय विभागात प्रकरणाची सखोल छाननी करुन सक्षम

प्राधिकारी म्हणुन आरोपी लोकसेवकाविरुध्द मा.विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यास मंजूरी देण्याबाबत योग्य तो निर्णय घेतला जावून सदर निर्णय परस्पर लाचलुचपत प्रतिबंध विभागास कळविण्यात येतो. त्या पुढील कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून केली जाते. त्यामुळे एकदा या कार्यासनातून प्रकरण संबंधित विभागाकडे पाठविल्यानंतर पुन्हा सदर प्रकरणाशी या विभागाशी संबंध येत नाही. त्यामुळे याबद्दलची माहिती या कार्यासनात उपलब्ध नाही. दि.०१.०७.२०१० ते दि.२८.०२.२०११ दरम्यान एकूण ४९ प्रकरणे या कार्यासनांस प्राप्त झाले असून त्यापैकी ४४ प्रकरणे छाननी करुन संबंधित विभागाकडे पाठविलेली आहेत. उर्वरित ५ प्रकरणावर कार्यवाही चालू आहे असेही सांगितले व तक्रारदार यांना सुध्दा कळविण्यात आले आहे. असे असुन सुध्दा तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची प्रकरणे ही हेतू पुर्रतसर प्रलंबित ठेवण्यात येतात व माहिती देण्याचे सुध्दा त्यामुळेच टाळाटाळ करण्यात येते. अशी शेकडो प्रकरणे वर्षानुवर्ष प्रलंबित आहे त्याबद्दल माहिती अधिकारी यांना शास्ती करावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. कोणत्याही शासनामध्ये प्रत्येक विभागाचे कामकाज हे संवंधिनाच्या कलम १६६ मा.राज्यपालांनी केलेल्या "शासनाचे कामकाजाचे नियम" प्रमाणे कामकाज होत असते. सदरच्या नियमांमध्ये प्रत्येक विभागास विषय वाटून दिलेले असतात. तसेच लोकसेवकांच्या संदर्भामध्ये कोणतीही कारवाई करावयाची झाल्यास ती सक्षम प्राधिकारी यांनी करावयाची असते व ते सक्षम प्राधिकारी हे त्या त्या प्रशासकीय विभागात असतात व त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना जी माहिती कळविलेली आहे ती नियमांचे पालन करुनच कळविलेली आहे. तसेच अर्जदारांने प्रकरणे प्रलंबित आहे म्हणुन शास्तीची विनंती केलेली आहे. या दोनही बाबत तक्रारदार यांनी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांच्या कामकाजासंबंधी माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्ज करते वेळेस कागदपत्रांच्या स्वरुपात जशी माहिती उपलब्ध असते तशी माहिती मिळते. कोणत्याही प्रकरणामध्ये निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये सार्वजनिक प्राधिकरणांस कारवाई किंवा कार्यवाही बाबतचे आदेश देण्याचे किंवा निर्णय प्रक्रिया होत नाही म्हणुन शास्ती करण्याची तरतुद

नाही व त्यामुळे तक्रारदार यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे ती योग्य असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यांस पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही निकाली काढण्यांत येते.**
**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक ३०.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र.मुमाआ.२०११/२९७६/तक्रार क्र.३६/०१**

**श्री.पृथ्वीराज विश्वास चव्हाण**
**अनुबंध २५, दौलत नगर,**
**संत एकनाथ जलकुंभाजवळ,**
**जळगांव. ... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी (का.१७)**
**विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,**
**धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला,**
**८३, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८. ... उत्तरवादी**

**निर्णय**

**सुनावणीचा दिनांक २०.०४.२०११**

**तक्रारदार - हजर,**

**जन माहिती अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय हजर आहे.**

**जन माहिती अधिकारी, विधी व न्याय विभाग हजर आहे.**

**जन माहिती अधिकारी, धर्मादाय आयुक्त कार्यालय हजर आहे.**

तक्रारदार यांनी दि.२८.०७.२०१० रोजी मुख्य सचिव कार्यालयाचे माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(१) प्रमाणे केलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणुन राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.११.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केली आहे.

२. तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दि.२८.०७.२०१० रोजी मुख्य सचिव कार्यालयातील माहिती अधिकारी यांना जळगावं पर्यटन विकास व खानदेश महोत्सव ट्रस्ट, जळगांव संस्थेचे विश्वस्थ असलेल्या शासकीय अधिका-यांनी शासनाचे किंवा सक्षम अधिका-यांची पूर्व परवानगी

वा मंजूरी घेणेबाबत माहे सप्टेंबर २००९ ते २५ जुलै २०१० या कालावधीतील माहिती मागितली होती. जळगांव पर्यटन विकास व खानदेश महोत्सव ट्रस्ट, जळगांव या संस्थेचे विश्वस्थ श्री.कुणाल कुमार, तत्कालीन जिल्हाधिकारी जळगांव, ट्रस्टचे अध्यक्ष श्री.डॉ.रामस्वामी एन, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगांव ट्रस्टचे उपाध्यक्ष श्री.रामनाथ सोनावणे, आयुक्त महानगरपालिका, जळगांव ट्रस्टचे विश्वस्थ तरी उपरोक्त शासकीय अधिका-यांनी सदर ट्रस्टचे विश्वस्त तसेच पदाधिकारी होण्याआधी ट्रस्टची नोंदणी दि.०३.१०.२००९ आहे. केंद्र शासनाकडून, राज्य शासनाकडून वा इतर कुणाच्या सक्षम अधिका-यांकडून (ज्यांना शासनाने प्रधिकृत केले आहे) परवानगी किंवा मजूंरी घेतली आहे काय? असल्यास त्यांच्या बाबतीतील अर्ज व परवानगी आदेशाची या कागदपत्रांची प्रमाणित प्रत मिळावी. तशी परवानगी घेतली नसल्यास पत्राव्दारे कळविण्यात यावे व परवानगी दिलेली असल्यास संपूर्ण कागदपत्रे व संचिका अवलोकनार्थ मिळावी. सदर ट्रस्ट च्या कामकाजासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचा कार्यालय म्हणुन व सरकारी कर्मचा-यांचा ट्रस्टच्या कामासाठी वापर करण्याची परवानगी मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना दिलेली असल्यास त्यांची प्रमाणित प्रत मिळावी अशी माहिती मागितलेली होती. परंतु अवर सचिव तथा राज्य जन माहिती अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय यांनी सदरचा अर्ज हा विधि व न्याय विभागाशी संबंधित आहे या कारणास्तव त्या विभागात दि.०२.०८.२०१० रोजी हस्तांतर करुन त्याप्रमाणे त्यांना स्वत: कळवून मुख्य सचिव हे माहिती अधिकारी नाहीत ही बाब स्पष्ट करण्यात येत आहे असे कळविले. त्यांनतर दि.१८.०८.२०१० रोजी कार्यासन अधिकारी तथा माहिती अधिकारी विधी व न्याय विभाग यांनी त्यांचा मुळ अर्ज हा धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयात पाठविण्यात येत आहे असे कळविले व त्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविले. माहिती अधिकारी धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयाने सदरचा अर्ज दि.०९.०९.२०१० रोजी माहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव यांचेकडे पाठवला व तक्रारदार यांना त्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे कळविले. अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव यांनी दि.२२.०९.२०१० रोजी मागितलेली माहिती या कार्यालयाशी संबंधित नाही. त्यामुळे अशी माहिती उपलब्ध नाही असे माहिती अधिकारी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना कळविले. परिणामी त्यांना कोणत्याही कार्यालयातून अदयाप माहिती उपलब्ध झाली नाही म्हणुन त्यांनी माहिती आयोगाकडे तक्रार केली. जन माहिती अधिकारी तथा अवर

सचिव, मुख्य सचिव यांचे कार्यालय यांनी आयोगाकडे लेखी खुलासा सादर करताना अर्जदाराने मागितलेल्या माहितीचा विषय विधी व न्याय विभाग यांचे अधिनस्त कार्यालयामार्फत हाताळण्यात येत असल्यांच्या धारणेस्तव संबंधित विभागाशी परस्पर संपर्क करण्याविषयी कळविण्यात आले होते. अपिलार्थीच्या मुद्दयांशी मुख्य सचिवांचे कार्यालय पूर्णत: सहमत नाही. अर्जातील विषय धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाशी निगडीत असल्याने कोणत्याही विश्वस्त संस्थेची कार्यवाही व त्याकरिता हाताळण्यात येत असलेली विहित कार्यपध्दती अथवा नोंदणी करण्यासाठी अनुज्ञेय कागदपत्रांची पुर्तता त्यांची तपासणी/छाननी करुन पात्रता निश्चित करण्याचे अधिकार धर्मादाय आयुक्त अथवा संबंधित कार्यालयाच्या प्राधिका-यांस असल्याची या कार्यालयाची धारणा असल्यानेंच सदरचा अर्ज विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला होता. कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, विधी व न्याय विभाग यांनी सदर विषय व त्यांचे दस्तऐवज हे धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संबंधित असल्याने प्रस्तृत अर्जदारांला माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे हस्तांतर केला होता असे नमुद केले आहे. त्यावर पुन्हा तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तीनही अधिकारी हे शासकीय अधिकारी आहेत व त्यात दोन अधिकारी हे आय.ए.एस अधिकारी आहे व शासकीय सेवेच्या नियमाप्रमाणे शासकीय सेवेच्या व्यतिरिक्त सामाजिक संघटना किंवा विश्वस्त संस्था यांचेवर पदाधिकारी म्हणुन काम करावयाचे असल्यास शासनाची परवानगी घेणे आवश्यक असते व त्यामुळे एक सर्व साधारण समज म्हणुन या तीन ही अधिका-यांनी शासनाची म्हणजे मुंबई येथे असलेल्या मुख्य माहिती आयुक्त यांच्या माध्यमातून किंवा सामान्य प्रशासन विभागाकडून अर्ज करुन परवानगी घेतलेली असावी म्हणुन मुख्य सचिव यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितली होती. मला असे वाटते की अशी परवानगी देण्याचा धर्मादाय आयुक्त यांना अधिकार नसावा व त्यामुळे त्यांचेकडे मी माहिती मागितली नाही. वास्तविक मुख्य सचिव यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी माझ्या अर्जाचे वाचन केले असते तर व त्यांना प्रशासनाची माहिती असती तर त्यांनी सदरचा अर्ज हा सामान्य प्रशासन विभागाकडे जो विभाग शासकिय सेवेच्या संदर्भामध्ये नियंत्रण करणारा विभाग आहे त्यांचेकडे हस्तांतर केला असता. परंतु त्या प्रकारचे कोणत्याही प्रकारची आकलन न करुन घेता त्यांचा अर्ज हा विधी व न्याय विभाग, धर्मादाय आयुक्त व जळगांव येथील अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय पाठविण्यात

आला. मी जळगांव येथील रहिवासी असल्याने मला ती माहिती जळगांव येथील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात सुध्दा मागता आली असती. माझ्या माहिती प्रमाणे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय हे शासन नाही म्हणुन मी त्या कार्यालयात माहिती न मागता शासनाकडे माहिती मागितली व त्यातुन काहीही निष्पन्न झाले नाही.

३. मात्र माहिती अधिकारी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाने राज्य माहिती आयोग कार्यालयाकडे जो खुलासा पाठविलेला आहे तो पुढील प्रमाणे आहे.

"सदर पदाधिका-यांना न्यासाचे विश्वस्त होण्यासाठी केंद्र शासनाकडून, राज्य शासनाकडून इतर कोणत्या अधिका-याकडून (ज्यांना शासनाने प्राधिकृत केले आहे) परवानगी दिली अगर मंजूरी दिली त्याबाबतची माहिती हवी होती व अशी माहिती या विभागाकडे नसल्याने अर्जदारास जळगांव कार्यालयाने लेखी कळविले आहे.

जळगांव पर्यटन व खानदेश महोत्सव ट्रस्ट, जळगांव या न्यासाची ट्रस्ट डीडच्या माध्यमातून व दि.१६.०७.२००९ रोजी ठराव मंजूर करुन नोंदणी करण्यासाठी दि.३१.०७.२००९ रोजी सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांच्या कार्यालयात प्रस्ताव दाखल केला. सदर अर्जाचा चौकशी क्र.७२२/९ असा आहे. सदर प्रकरणामध्ये चौकशी करुन मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २० अन्वये सदर ट्रस्ट नोंदणी प्रमाणपत्र ई ११७५ (जळगांव) दि.०३.१०.२००९ रोजी नोंदविण्यात आला असे दुरध्वनीव्दारे विचारणा केल्यानंतर माहिती प्राप्त झाली. सदर आदेश न्यायिक स्वरुपाचे असल्याने त्याबाबत माहिती अधिका-यांना कोणतेही भाष्य करता येत नाही. अर्जदाराने मागितलेली माहिती या विभागाशी संबंधित नसल्याने तक्रार दप्तरी दाखल करणेस विनंती आहे."

४. तक्रारदार यांचा युक्तीवाद व गैरतक्रार यांचे लेखी युक्तीवाद यावरुन असे दिसून येते की, कोणत्याही शासकीय अधिका-यांस सामाजिक संघटना किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्थेवर कामे करावयाचे असल्यास सेवा शर्तीच्या व शर्तीच्या नियमाप्रमाणे शासनाची परवानगी घेणे आवश्यक असते व अखिल भारतीय प्रशासकीय सेवा किंवा राज्यातील सेवा याच्या संदर्भातील याचें अधिकारी यांना सुध्दा शासनाची परवानगी घेणे बंधनकारक असल्याने सदरची माहिती ही शासनाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. सार्वजनिक विश्वस्त नोंदणी कार्यालय यांचेकडे ती माहिती परवानगी घेतल्यास असे किंवा घेतली नसल्यास

ते कार्यालय त्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची विचारणा करेलच असे नाही व त्यामुळे सदरचा अर्ज हा जन माहिती अधिकारी मुख्य सचिव कार्यालय यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे हस्तांतर केला असता तर त्यांचेकडे माहिती उपलब्ध असल्यास तक्रारदार यांना ती त्याच वेळेस उपलब्ध झाली असती. पुन्हा असा अर्ज सामान्य प्रशासन विभागाकडे हस्तांतर केल्यास तक्रारदार यांना माहिती मिळेल असे नाही. त्यामुळे सदरच्या अर्जा प्रमाणे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव मुख्य सचिव कार्यालय यांनी सामान्य प्रशासन विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घेउन ती तक्रारदार यांना पुरविणे संयुक्तीक राहिल. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, मुख्य सचिव कार्यालय यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत तक्रारदार यांना सामान्य प्रशासन विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घेउन तक्रारदार यांना विना मुल्य रजिस्ट्रर पोस्टाने पुरविण्यात यावी.**

**२.तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २०.०५.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.१०/अपील क्र.६८०८/०२**

**श्री.सुदेश श्रीकांत साळगांवकर**
**बी/५७, १ माळा, मेघवाडी,**
**डॉ.एस.एस.राव रोड, लालबाग,**
**मुंबई ४०० ०१२.** **... अपिलार्थी**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त (मालमत्ता)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहा.आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत,**
**दुसरा मजला, पलटन रोड,**
**मुंबई ४०० ००१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहा.आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत,**
**दुसरा मजला, पलटन रोड,**
**मुंबई ४०० ००१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०७.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ३०.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२८.०६.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी, आयुक्त महानगरपालिका यांचेकडे त्यांनी दि.०४.०३.२०१० रोजी आयुक्तांना डॉ.एस.एस.राव रोड, लालबाग, मेघवाडी येथील भूखंड क्र.सी.एस.क्र.११८ च्या भूखंडाबाबत भेट मिळण्याबाबत अर्ज केला होता. त्या अर्जा संदर्भात संपूर्ण माहिती मिळावी. तसेच कलम ४ प्रमाणे दस्तऐवजाच्या सर्व प्रती व्यक्तीश: उपलब्ध करुन मिळाव्यात. अर्जाच्या अनुषगांने अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.१२.०८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी आयुक्तांची भेट मागितली होती व अदयाप पर्यंत काहीही माहिती मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक (आयुक्त) यांनी दि.१३.०७.२०१० रोजी अपिलकर्ता यांना सदर पत्र या कार्यालयातील नोंद वहयामध्ये शोध घेतला असता नोंद वहयामध्ये नोंद झालेली दिसून येते नाही. तथापी आपल्या माहितीच्या अधिकारा अंतर्गच्या अर्जातील नमूद केलेल्या विषयावरुन आपला अर्ज प्रमुख अभियंता (विकास नियोजन) / सहा.आयुक्त, एफ/दक्षिण/सहा.आयुक्त (मालमत्ता) यांचेकडे अग्रेषित करुन आपणास हवी असलेली माहिती परस्पर देण्याचे कळविण्यात आले आहे. तसेच महानगरपालिकेत विविध खात्यात जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांची नेमणुक झाली असून त्याची संपूर्ण माहिती महापालिकेच्या www.msgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे असे कळविलेले होते. त्यानंतर अर्जदारास दि.१३.०८.२०१० रोजी पत्र पाठवून उपरोक्त भूखंडावर विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अन्वये मा.जगदंबा सहकारी संस्थेने सादर केलेल्या पुर्नविकासाची कागदपत्रे या कार्यालयात उपलब्ध असून सदर कागदपत्रांच्या छायांकित प्रती आवश्यक शुल्क भरुन उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविण्यात आले होते. परंतु अर्जदार माहिती घेण्यासाठी कार्यालयात हजर झाले नाही. प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये अपिलकर्ता यांनी सुनावणी समाधान कारक झाल्याचे लिहून दिल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती दि.०७.१०.२०१० व दि.०७.१२.२०१० रोजी देण्यात आलेल्या आहेत व तशी पोच ही त्यांनी दिलेली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८.०६.२०११,**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ.नो.क्र.५०३०९/अपील क्र.६७९०/०२

**श्री.कमलेश चंद्रकांत नायक**
**शॉप क्र.२०, कामा नाझा भरवाड चाळ,**
**नॅशनल हाईवे जवळ, मालाड (पू), मुंबई ४०० ०९७.** ... अपिलार्थी

विरुध्द

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.निबंधक**
**सहाकरी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी (श्रेणी-२)**
**सहाकरी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**निर्णय**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०१.११.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २३.०६.२०११**
**अपिलकर्ता यांना काही अपरिहार्य कारणामुळे सुनावणीसाठी उपस्थित राहता येणार नाही असे त्यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे., जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१२.०३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-२ यांचेकडे १९९५ ते २०१० या कालावधीतील चार्ल्स ग्रुप को.हौ.सो.मर्या. एस.आर.ए. डेप्युटी सी.इ/५४/पी.एन/पी.एल/एल.ओ.आय. धनजीवाडी मालाड (पू), मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारी (१०) च्यासंदर्भामध्ये परिपत्र २२ नुसार बांधकामाची खालील विषयी माहिती पहिजे यासाठी अर्ज केला होता. ९०० मोफत घर घेतलेला भाव वादी लिस्ट एस.आर.ए. इमारत नं.१, ३, ४ ब, ५ अ, ८ अ, ११ सी, ११ ब तसेच बंधपत्राची माहिती प्रमाणित करुन पाहिजे असे मागितले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.०६.०४.२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध आहे घेउन जावे असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कळविले होते. अर्जदार माहिती घेण्यास दि.०४.०६.२०१० रोजी कार्यालयात आले असता त्यांना सदर माहितीची ९४ पृष्ठांचे व रु.१८८/- चे चलन दिले त्याचा भरणा अर्जदार यांनी दि.२१.०६.२०१० रोजी

करुन सदरची माहिती प्राप्त करुन घेतली मात्र प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०५.०८.२०१० रोजी देण्यात आला असून ज्या इमारतीची वाटप यांदी कार्यालयात उपलब्ध नाही परंतु संस्था पातळीवर वाटप झाले आहे त्याबाबत संस्थेस सदरची यादी अर्जदार यांना उपलब्ध करुन देउन त्यांची एक प्रत कार्यालयात सादर करण्यास सुचना देण्यात याव्यात असे आदेश दिलेले दिसून येतात व त्याप्रमाणे दि.१२.०८.२०१० रोजी उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आली. परंतु तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. माहिती दिलेली नाही असे कारण दिलेले आहे.

२. अपिलकर्ता गैरहजर आहे. सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही असे त्यांनी कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे सांगितले. अर्जदार यांच्या मागणी नुसार संस्थेच्या बंधपत्राची माहिती कार्यालयास उपलब्ध नसल्याने संस्थेविरुध्द दि.२१.०७.२००८ रोजीच्या आदेशानुसार संस्थेची व्यवस्थापक समिती बरखास्त करुन प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. त्यावर संस्थेने अपील केले होते अपील हे फेटाळण्यात आले व डी.आर.पाटील यांची प्रशासक म्हणुन नियुक्ती झाली आहे. यावरुन अपिलकर्ता यांना संपूर्ण माहिती मिळाली असल्याने ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपील हे निकाली काढण्यांस पात्र आहे.

<u>आदेश</u>

**१.अपिलकर्ता यांचे अपील हे निकली काढण्यांत येते.**
**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८.०६.२०११**
**मुंबई**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ.नो.क्र.५०७५२/अपील क्र.६७८५/०२**

**श्री. इस्माईल खामिसा अहमद,**
**६० फीट रोड, प्रजापती सहकारी उत्पादक मंडळ लि.च्या मागे,**
**खामिसा अहमद चाळ, कुंभारवाडा, धारावी,**
**मुंबई ४०० ०१७.** **... अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त (मालमत्ता)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहा. आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत,**
**२ रा मजला, पलटन रोड, मुंबई ४०० ००१.** **... उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता) लेखा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहा. आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत,**
**२ रा मजला, पलटन रोड, मुंबई ४०० ००१.**

**<u>निर्णय</u>**

**व्दितीय अपीलाचा दिनांक ०३.१२.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २१.०६.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित,**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.०२.०७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा आयुक्त (मालमत्ता) यांचेकडे अर्ज करुन सन १९३९ मध्ये बी.एम.सी. खमीसा अहमद यांना व्हिएनटी प्लॉट नं.१२५ व १२६ चे वाटप केले होते ती सर्व कागदपत्रे अपिलकर्ता यांनी मागितलेली दिसून येतात. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१४.०७.२०१० रोजी माहिती उपलब्ध आहे रु.१५५/- चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.३१.०७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.०६.०९.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी सदरची कागदपत्रे प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता),

जी/उत्तर विभाग यांचेकडे इतर कागदपत्रे उपलब्ध करण्यासाठी पाठवावे असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यानंतर दि.२१.०९.२०१० रोजी प्रथम अपीलाचे निर्णय पाठविण्यात आले आहे असे अपिलकर्ता यांना कळविण्यात आले होते. परंतु त्यानंतर माहिती उपलबध झाली नाही म्हणुन अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

२. अपिलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना ॲग्रीमेंट ची प्रत मिळाली व इतर कागदपत्रे मिळाली नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की सदरची कागदपत्रे वॉर्ड विभागात उपलब्ध आहेत. त्यामुळे अपिलकर्ता याना विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वॉर्ड मधुन कागदपत्रे उपलब्ध करुन घेउन पुरविणे संयुक्तीक राहिल. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१.अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता) यांनी वॉर्ड कडून माहिती घेउन विना मुल्य अपिलकर्त्यास पुरविण्यात यावी.**

**२.अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत द्यावी.**

**Sd--**
**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८.०६.२०११**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**